(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विनायक मेट)

पृ.शी.: विद्यमान शैक्षणिक धोरणा संबंधातील श्वेतपत्रिका सादर करून नवीन शैक्षणिक धोरण सादर करणे

मु.शी.: विद्यमान शैक्षणिक धोरणा संबंधातील श्वेतपत्रिका सादर करून नवीन शैक्षणिक धोरण सादर करणे या विषयावर सर्वश्री विनोद तावडे,दिवाकर रावते पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील संजय केळकर,डॉ.दीपक सावंत,प्रीतमकुमार शेगावकर,चंद्रकांत पाटील,सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस,सर्वश्री रामनाथ मोते,केशवराव मानकर,भगवानराव साळुंखे, पाशा पटेल, नागो पुंडलिक गाणार,यांचा प्रस्ताव

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग-शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प.नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"गेल्या 8 वर्षापासून अनुदानित संस्थांचे वेतनेतर अनुदान बंद करणे, मराठी माध्यमाच्या शाळांना मान्यता न देणे, इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे प्रस्ताव मोठ्या प्रमाणावर तयार होणे, त्याचवेळेस स्थानिक स्वराज्य संस्थांमधील मराठी माध्यमाच्या मोफत प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळा बंद पडणे, आदिवासी क्षेत्रातील शाळांना अनुदान देण्याचा निर्णय 5 वर्षापूर्वी अनु.जनजाती कल्याण समितीने घेऊनही अंमलबजावणी न होणे, शिक्षक-शिक्षकेत्तरांना नियमित वेतन न मिळणे तसेच शिक्षकेत्तरांचा आकृतीबंध गेल्या 10 वर्षापासून प्रलंबित असणे, रात्र शाळांच्या प्रश्नावर समितीच्या शिफारशी प्राप्त होऊनही निर्णय न होणे, कायम विनाअनुदानित कनिष्ठ महाविद्यालयांचा कायम शब्द न काढणे, राज्य/राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षकांना वेतनवाढी तसेच नगरपालिकांच्या माध्यमिक शाळांतील शिक्षकांना 6 वा वेतन आयोग देण्यात न येणे, पुर्नरचित अभ्यासक्रमातून हिंदी विषय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

वगळणे, वाढीव तुकड्यांना गेल्या 8 वर्षांत मान्यता न देणे, विषय समित्यांचे कामकाज ठप्प होणे, क्रीडा विषयाचे 25 गुण रद्द करण्याचा निर्णय घेणे, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्या वेळेवर न मिळणे, मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क परत न मिळणे, शाळाबाह्य मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होणे, प्राथमिक, उच्च माध्यमिक शिक्षक व शिक्षकेत्तरांनी विनाअनुदानित सेवा ग्राह्य न धरणे, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतनश्रेणीतील तफावत दूर न होणे, शिक्षण हक्क विधेयकाची योग्य अंमलबजावणी न होणे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांची संख्या घटणे, सर्व माध्यमांच्या सर्व प्रकारच्या शाळांचा बृहत आराखडा तयार नसणे, परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची स्तुत्य यशस्वीता लक्षात घेऊन त्याच धर्तीवर गुणवत्ता विकासासाठी कागदी प्रशिक्षणाव्यतिरिक्त अन्य उपाययोजना न करणे, शिक्षकांवर अशैक्षणिक कामांचा बोजा टाकणे, शिक्षकांवर लेखी कामाचा अतिरिक्त बोजा वाढवून त्यांना कारकून बनविणे, विनाअनुदानित शाळांना अनुदानापासून वंचित ठेवण्यासाठी मूल्यांकनाचे जाचक निकष लावणे, त्यामुळे लक्षावधी शिक्षकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व सर्व संबंधित शैक्षणिक धोरणाचा एकसंघपणे विचार करुन विद्यमान धोरणांचा आढावा घेऊन श्वेतपत्रिका सादर करुन नवीन शैक्षणिक धोरण सादर करण्याची आवश्यकता व त्याअनुषंगाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांना मनापासून धन्यवाद देतो. मला विरोधी पक्षाचा प्रस्ताव मांडण्याची संधी दिल्याबद्दल मी सुरूवातीलाच आभार आणि कृतज्ञता व्यक्त करतो. शिक्षण क्षेत्रातील विविध समस्यांप्रती सभागृहातील सन्माननीय सदस्य विविध आयुधांचा उपयोग करून विषय मांडत असतात. लक्षवेधी सूचना, तारांकित प्रश्न, नियम 93 ची सूचना, अल्पकालीन सूचना, अर्धा तास चर्चा अशा विविध संसदीय आयुधांचा उपयोग करून सभागृहातील सन्माननीय सदस्य शिक्षण क्षेत्रातील विविध समस्या मांडत असतात.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते . . ..

सभापती महोदय, या विविध विषयावर चर्चा होत असताना शासनाकडून आम्हाला या सदनामध्ये उत्तरे दिली जातात आणि त्यावेळी असे सांगितले जाते की, काही प्रश्न विचाराधीन आहेत तर काही आश्वासने दिली जातात. परंतु या प्रस्तावामध्ये ज्या विषयांचा उल्लेख करण्यात आलेला आहे, त्यामध्ये साधारणपणे 25-26-22 चा उल्लेख आहे. याबाबतीत सभागृहामध्ये माननीय मंत्री महोदयांबरोबर किंवा संबधित विभागाच्या सचिवांबरोबर सर्व चर्चा झालेल्या आहेत, यामध्ये नव्याने कोणताही विषय नाही. ज्या विषयाच्या बाबतीत चर्चा होऊन देखील शासनाने निर्णय घेतलेला नाही, प्रश्न प्रलंबित ठेवलेला आहे आणि केवळ विचार करण्याबाबत आश्वासन दिले पण या बाबतीत कोणत्याही प्रकारचा निर्णय होत नाही, अंमलबजावणी होत नाही आणि त्या अनुषंगाने मी या ठिकाणी सर्व विषय मांडण्याचा प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, सर्वात महत्वाचा विषय असा आहे की, आज राज्यात 18,500 ते 19,000 अनुदानित शाळा आहेत. या अनुदानित शाळांना दोन प्रकारचे अनुदान दिले जाते. एक म्हणजे त्यांच्या पगारासाठी दिले जाणारे वेतन अनुदान आणि पगारा व्यतिरिक्त अन्य खर्च भागविण्यासाठी दिले जाणारे वेतनेतर अनुदान. या वेतनेतर अनुदानामध्ये काही कमिटेड एक्सपेंन्सेंस असून तो खर्च करणे आवश्यकच आहे. मग त्यामध्ये साधनसामुग्री, शैक्षणिक सहित्य, इमारतीची देखभाल-डागडुजी, विजेचे भाडे, इमारतीचे भाडे इ.गोष्टी आहेत. अन्य खर्चामध्ये काटकसर होऊ शकते.परंतु हा कमिटेड एक्सपेन्सेंस आहे त्याबाबतीत संबंधित संस्थेला खर्च करण्याशिवाय पर्याय नसतो. शासनाकडून पूर्वी 12 टक्के वेतनेतर अनुदान मिळत होते पण त्या नंतर त्यांनी प्रतवारी बदलली आणि नऊ टक्के, सहा टक्के अशा प्रकारे वेतनेतर अनुदानाचे टप्पे दिले जात होते. पण गेल्या आठ वर्षापासून या राज्यातील एकाही संस्थेला वेतनेतर अनुदान देण्यात आलेले नाही. शासनाने वेतनेतर अनुदान न दिल्यामुळे आज शैक्षणिक संस्थांची, शाळांची दुरवस्था झाली आहे. एका बाजूला मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडत आहेत. अशा वेळी आम्ही जर शाळेच्या माध्यमातून किंवा संस्थेच्या माध्यमातून फी वसूल केली तर पालकांची ओरड सुरु होते, ते आपला संताप व्यक्त करतात. म्हणून शासन अनुदानित शाळांमध्ये फी घेण्यासाठी आणि फी वाढीसाठी देखील परवानगी देत नाही. त्याठिकाणी आपण नि:शुल्क शिक्षण देण्याचे मान्य केलेले आहे. म्हणून वेतनेतर अनुदान मिळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय,याठिकाणी वेतनेतर अनुदानाच्या बाबतीत अनेक वेळा चर्चा झाली.या राज्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते . . ..

शासनाकडून, राज्यकर्त्यांकडून म्हणजे साधारणत: पाच वर्षापूर्वी तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांनी धोरणात्मक निर्णय घेतला आणि शालेय शिक्षण विभागाला त्याची अंमलबजावणी करण्यास सांगितले. पण गेल्या पाच वर्षामध्ये याची अंमलबजावणी देखील होऊ शकली नाही. दि.8 ऑगस्ट 2007 रोजी सन्माननीय मुख्यमंत्र्यांकडे बैठक झाली, त्यावेळी तत्कालीन माननीय मुख्यमंत्र्यांनी शासनाला आदेश दिले की, अनुदानित खाजगी खाजगी माध्यमिक शाळांच्या वेतनेतर अनुदानाच्या संबंधात निर्णय घ्यावा आणि त्यासंबंधीचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये सादर करावा. परंतु अद्यापही गेल्या पाच वर्षामध्ये याबाबत निर्णय होऊ शकलेला नाही. शासनाने यासाठी समिती गठीत केली होती आणि त्या समितीचा अहवाल येऊन देखील 2-3 वर्षे झाली आहेत. परंतु अद्यापही याबाबतीत कोणतीही तरतूद होऊ शकलेली नाही आणि या बाबतीत निर्णय होऊ शकलेला नाही.म्हणून संस्था चालकांच्या दृष्टीकोनातून, शाळा चालविण्याच्या दृष्टीकोनातून विशेषत: ग्रामीण भागातील, झोपडपट्टीतील शाळा, आदिवासी भागातील शाळांना जर वेतनेतर अनुदान मिळाले नाही तर त्या चालू शकणार नाहीत. आज या शाळांची अत्यंत गैरसोय होत आहे. म्हणून वेतनेतर अनुदान न मिळाल्यामुळे शाळांची अत्यंत गैरसोय होत आहे.

सभापती महोदय, शासनाने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध सुध्दा गेल्या 12 वर्षापासून प्रलंबित ठेवलेला आहे.त्यामुळे राज्यामध्ये शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अवस्था अत्यंत वाईट आहे म्हणजे आम्हाला एस.एस.कोड प्रमाणे शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा आकृतीबंध लागू आहे की 25-11 च्या नवीन धोरणानुसार लागू आहे हा प्रश्न आहे. मी माननीय शिक्षण मंत्री श्री.राजेंद्र दर्डा साहेबांना सांगू इच्छितो की, अधिकाऱ्यांकडून शाळांसाठी एस.एस.कोड प्रमाणे त्याचे निकष लावून ही पदे मंजूर केली जातात. परंतु मान्यता देताना, पदे भरताना 25-11 नुसार जे निकष ठरवून दिलेले आहेत, त्याप्रमाणे ही पदे भरण्यासाठी परवानगी मिळते.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

परंतु पद मंजुरीचे निकष वेगळे, पद मान्यतेचे निकष वेगळे आहेत. आपण आकृतिबंधाच्या संदर्भातील निर्णय धोरणात्मकदृष्टया मान्य केलेला आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी श्री.गोविंदभाई श्रॉफ यांना आश्वासन दिले होते परंतु त्या निर्णयाची अंमलबजावणी अद्यापपर्यंत झालेली नाही. म्हणून शाळांचे वेतनेतर अनुदान आणि शाळांचा आकृतीबंध या संदर्भात निर्णय होणे आवश्यक आहे. आपण कोणत्याही माध्यमातून हा विषय उपस्थित केला तरी आम्ही आपणास वेतनेतर अनुदान देणार नाही, शिक्षकांचा आकृतीबंध बदलणार नाही असे शासनाने स्पष्ट सांगावे. शासनाने ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. आम्ही सातत्याने हा विषय सभागृहात मांडत आहोत. या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी येथे आश्वासन दिल्यानंतरही त्याचे पालन होत नसेल तर अधिकारी कोणाचे आदेश पाळणार आहेत हे मला माहीत नाही. शासनाची भूमिका लक्षात येत नाही. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी अधिकारी करीत नसतील तर ती अतिशय गंभीर व खेदाची बाब आहे असे मला या ठिकाणी नमूद करावेसे वाटते. तेव्हा शासनाने एकदा ठोस निर्णय घेऊन आम्हाला अनुदान देणार किंवा नाही हे सांगावे, देणार असाल तर कोणत्या पध्दतीने देणार आहात ते देखील सांगावे.

सभापती महोदय, या राज्यात सर्वांना समान न्याय मिळावा म्हणून राज्य सरकारने सरकारी कर्मचाऱ्यांना पाचवा व सहावा वेतन आयोग लागू केला. सहाव्या वेतन आयोगाच्या अनुषंगाने दिनांक 12 जून रोजी निर्णय घेण्यात आला. त्या नुसार प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळांतील शिक्षकांना सहावा वेतन आयोगाची संरचना लागू केली. पण त्या संदर्भात विभागाचे वेगवेगळे जी.आर.निघाले आहेत. खरे म्हणजे शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारितील नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या शाळांना शासन 100 टक्के अनुदान देते. त्या शाळेतील शिक्षकांना आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू करण्यात आला पाहिजे. शासनाने काही नगरपालिका आणि महानगरपालिकांच्या बाबतीत सुध्दा निर्णय घेतले. प्राथमिक शाळांसाठी निर्णय घेतले. महानगरपालिकेच्या माध्यमिक शाळांसाठी निर्णय घेतले. दुर्दैवाने काही महानगरपालिका किंवा नगरपालिकेतील काम करणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

बाबतीत शासनाने निर्णय घेतलेला नाही. या संदर्भात मागील तीन वर्षापासून मी सतत पत्रव्यवहार करीत आहे. शिक्षक माझ्याकडे सातत्याने पाठपुरावा करीत आहेत आणि मी त्यांच्या प्रश्ना बाबत सातत्याने शासनाकडे पाठपुरावा करीत आहे. मला आता काम करणे कठीण झाले आहे शेवटी मला आत्महत्या करण्यावाचून पर्याय नाही. शासन म्हणते "तुम्ही आत्महत्या करुन काय फरक पडणार आहे;" मी पाठविलेल्या पत्रांची उत्तरे सुध्दा दिलेली नाहीत. माझ्या पत्रांची दखल सुध्दा घेतलेली नाही इतकी वाईट अवस्था आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी येथे सांगितले की, "तुम्ही आत्महत्या करुन काय फरक पडणार आहे" हे वाक्य कामकाजातून काढून टाकावे अशी विनंती आहे.

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : "तुम्ही आत्महत्या करुन काय फरक पडणार आहे हे वाक्य कामकाजातून काढून टाकण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आम्ही सातत्याने पाठपुरावा करुनही त्या बाबत शासनाने कोणताही निर्णय घेतलेला नाही. या राज्यातील नगरपालिका आणि महानगरपालिकेच्या शाळा आजही सहाव्या वेतन आयोगा पासून वंचित आहेत. माध्यमिक शिक्षकांची एकूण 7900 पदे मंजूर आहेत त्यापैकी 7433 पदे कार्यरत आहेत. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची एकूण 3003 पदे मंजूर आहेत त्यापैकी 2692 पदे मंजूर आहेत. म्हणजे जवळपास 10 हजार शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी नगरपालिकांच्या शाळेत काम करतात त्यांच्या बाबतीत शासनाने निर्णय घेतलेला नाही. शासनास निर्णय घेण्यास इतका वेळ का लागत आहे हे मला समजत नाही. राज्यातील इतर शासकीय कर्मचाऱ्यांना तीन वर्षापूर्वी सहावा वेतन लागू केला. वेतन आयोगाची कमाल मर्यादा दहा वर्षाची असेल तर आता पाच -सहा वर्षाचा कालावधी संपलेला आहे. तेव्हा या संदर्भात तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. आम्हाला वेतन आयोग मंजूर करता येणार नाही असे शासनास म्हणता येणार नाही. तेव्हा या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अशी मी पुन्हा एकदा विनंती करतो.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

सभापती महोदय, कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या बाबतीत मी येथे जवळपास 25-26 वेळा विषय मांडलेला आहे. सन 2000 पासून आतापर्यंतच्या प्रत्येक अधिवेशनात कनिष्ठ महाविद्यालयाच्या शिक्षकांचा प्रश्न उपस्थित झाला नाही असे एकही अधिवेशन झालेले नाही. कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक्ांना शासनाने 7200 ची वेतनश्रेणी दिली. परंतु ही वेतनश्रेणी 1 मार्च 2000 पासून दिली. दिनांक 3 मार्च 2000 रोजी शासन निर्णय काढण्यात आला. परंतु शासनाने इतरांना मात्र दिनांक 1.1.1996 पासून लाभ दिला. शासनाने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. परंतु सर्वोच्च न्यायालयाने ते मान्य केले नाही. इतरांना दिनांक 1.1.1996 पासून वेतन आयोग लागू केला. तेव्हा कला विभागातील शिक्षकांना देखील 1.1.1996 पासून वेतन आयोग लागू करण्याचे निर्देश माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिले.

यानंतर कु.थोरात..

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

गृह विभागाच्या अभियोक्त्यांना देखील दिनांक 1-1-1996 पासून वेतनश्रेणी दिली जात नव्हती त्यामुळे ते न्यायालयात गेले शेवटी त्यांनाही दिनांक 1-1-1996 पासून वेतनश्रेणी देण्यात आली. माझा सांगण्याचा उद्देश एवढाच आहे की, इतर सर्वांना दिनांक 1-1-1996 पासून वेतनश्रेणी दिलेली आहे केवळ कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांना दिनांक 1-1-1996 पासून वेतनश्रेणी दिलेली नाही त्यामुळे त्यांच्या संदर्भातील विषय सातत्याने या सभागृहात उपस्थित केला जात आहे. या कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांची मागणी योग्य प्रकारची आहे, तातडीने या संदर्भातील निर्णय घेण्यात यावा असे माननीय पीठासीन अधिकाऱ्यांनी निदेश दिलेले आहेत. सभापती महोदय, या संदर्भात सातत्याने प्रयत्न करुन आणि वारंवार मागणी करुन अद्याप निर्णय झालेला नाही.

सभापती महोदय, या राज्यामध्ये शासनाने दिनांक 24 नोव्हेंबर, 2001 च्या शासन निर्णयानुसार नवीन शाळांना मान्यता देताना कायम विना अनुदानानित तत्वावर मान्यता देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला पण तो पॉलिसी डिसिजन होता. आदिवासी भागातील शाळा तसेच ज्या शाळांमध्ये 50 टक्क्यापेक्षा अधिक विद्यार्थी हे आदिवासी क्षेत्रातील आहेत, आदिवासी जमातीतील आहेत या विद्यार्थ्यांच्या संदर्भात शासनाने एक धोरणात्मक निर्णय घेतला होता. त्या समितीच्याही अध्यक्षस्थानी माननीय मुख्यमंत्री होते. अनुसूचित जनजाती कल्याण समितीची बैठक दिनांक 7 जून, 2007 रोजी झाली. या बैठकीमध्ये केवळ आदिवासी क्षेत्रातील शाळांच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. आदिवासी क्षेत्रातील सर्व शाळा ज्या कायम विनाअनुदानित तत्वावर सुरु आहेत, आदिवासी भागात अशा प्रकारे कायम विनाअनुदानित तत्वावर शाळा सुरु राहणे योग्य नाही म्हणून या समितीचे अध्यक्ष माननीय मुख्यमंत्री यांनी असा निर्णय दिला होता की, या राज्यातील आदिवासी क्षेत्रातील सर्व शाळांचा 'कायम' शब्द वगळण्यात यावा आणि त्या सर्व शाळांना अनुदान देण्यात यावे अशा प्रकारचा धोरणात्मक निर्णय सन 2007 साली झाला पण याची अंमलबजावणी अद्यापही झालेली नाही. हा विषय अनेक वेळा सभागृहात उपस्थित करण्यात आला होता. अशा प्रकारचा निर्णय झालेला आहे हे शासनाने मान्य केलेले आहे मग त्याची अंमलबजावणी का होऊ शकली नाही.

सभापती महोदय, मी या ठिकाणी आकृतीबंधांच्या संदर्भात बोललो, वेतनेत्तर अनुदानाच्या संदर्भात बोललो. अनुसूचित जनजाती कल्याण समितीच्या बैठकीमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

दिलेल्या आदेशाची सुध्दा शासनाकडून, विभागाकडून आणि या विभागातील अधिकाऱ्याकडून अंमलबजावणी होऊ शकलेली नाही, ती अंमलबजावणी करण्याच्या संदर्भात निर्णय होणे अपेक्षित आहे. दरवर्षी या राज्यातील साधारणत: 100 ते 125 शिक्षकांना गुणवंत शिक्षक म्हणून पुरस्कार दिला जातो. त्यामध्ये प्राथमिक शाळेतील शिक्षक, माध्यमिक शाळेतील शिक्षक, अपंग शिक्षक आहेत. आदिवासी भागातील शिक्षक आहेत, सावित्रीबाई फुले यांच्या नावानेही पुरस्कार दिले जातात. आता पर्यंत शासनाच्या धोरणात्मक निर्णया नुसार ज्यांना आदर्श शिक्षकाचे राज्य किंवा राष्ट्रीय पुरस्कार मिळालेले आहेत त्यांना दोन आगाऊ वेतनवाढी दिल्या जातात. शासन ज्यांचा गौरव करते, त्यांचा सत्कार करतांना आणि अभिनंदन करताना यांना विशेष लाभ म्हणून दोन वेतनवाढी देण्याचा या राज्याचे माननीय मुख्यमंत्री घोषणा करतात. शासनाने पुरस्कारासंबंधी काढलेल्या आदेशामध्ये दोन वेतनवाढी देण्याचे मान्य केलेले आहे. परंतु त्यांची फसवणूक होत आहे. एका बाजूला आदेश काढावयाचा त्यांना पुरस्कार द्यायचा, त्यांचा गुणगौरव करायचा, माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर फोटो काढायचे पण त्या संबंधीचे प्रमाणपत्र मिळाल्यानंतर जो लाभ त्यांना देय आहे तो देण्यात येत नाही. ते या संबंधीची मागणी करीत नाहीत पण या संबंधात शासनाचा धोरणात्मक निर्णय आहे, ज्यांना हा पुरस्कार देण्यात आलेला आहे त्यांना दोन वेतनवाढी मिळण्याचा जो अधिकार आहे त्याच्यापासून त्यांना वंचित ठेवण्यात आलेले आहे. म्हणजे एक प्रकारे या गुणवंत शिक्षकांची, आदर्श शिक्षकांची ज्यांनी या क्षेत्रामध्ये समर्पित भावनेने काम केलेले आहे त्यांची फसवणूक करण्यात येत आहे, दिशाभूल करण्यात येत आहे. या संदर्भात वेगळे धोरणात्मक पॉलिसी मॅटर ठरविण्याचा काही संबंध येत नाही. यापूर्वी विशिष्ट रक्कम वेतनवाढ म्हणून दिली जात होती.

सन्माननीय हकीम समितीच्या अहवालामध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे की, या वेतनवाढी बंद करण्यात आलेल्या आहेत. वेतनवाढ देण्याची पध्दत बदलण्यात आलेली आहे. अशा प्रकारच्या सर्वसामान्य कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीसाठी आता तीन टक्क्याप्रमाणे वेतनवाढ देण्याचा निर्णय झालेला आहे. या अत्युत्कृष्ट कामाबद्दल किंवा या राज्य पुरस्काराबद्दल त्या संबंधितांना एक वेतनवाढ अधिक द्यावयाची आहे म्हणजे चार टक्के दराने वेतनवाढ द्यावयाची आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. रामनाथ मोते ....

आता ही 4 टक्के वेतनवाढ देण्याचा निर्णय शासनाने घ्यावयाचा नाही कारण हकीम समितीच्या शिफारशींचा अहवाल शासनाने स्वीकारलेला आहे. हकीम समितीच्या अहवालामध्ये शिफारस क्रमांक 3.24.1 मध्ये स्पष्ट तरतूद आहे. शासनाने मान्य केले आहे की, आम्ही ती तरतूद स्वीकारली आहे. या स्वीकारलेल्या तरतुदीनुसार राज्य पुरस्कारप्राप्त, राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त शिक्षकांच्या बाबतीत निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, रात्र शाळांचा विषय तितकाच महत्वाचा आहे. रात्र शाळांना एक वेगळे महत्व आहे. या राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि आता केंद्रामध्ये मंत्री असलेले श्री. सुशीलकुमार शिंदे साहेब हे रात्र शाळेचे विद्यार्थी होते. या रात्र शाळांमधून चांगल्या प्रकारचे शिक्षण दिले जाऊ शकते. ही या महाराष्ट्राची परंपरा आहे. या महाराष्ट्रातील रात्र शाळांमधून गोरगरिबांची मुले शिक्षण घेतात. दिवसभर कोठे तरी हमाली करुन किंवा हॉटेलमध्ये काम करुन ज्यांना शिकण्याची जिद्द आहे पण जे दिवसाच्या शाळेमध्ये जाऊ शकत नाहीत अशा विद्यार्थ्यांना रात्र शाळांचा फार मोठ्या प्रमाणात उपयोग होतो. या रात्रशाळांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आपण अर्धवेळ कर्मचारी समजतो. त्यामुळे या कर्मचाऱ्यांच्या वेतनाच्या संदर्भात, त्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या संदर्भात विचार करण्याची आवश्यकता आहे. त्यांची एकूणच कौटुंबिक स्थिती विचारात घेता त्यांना जीवन जगण्याचा अधिकारच हिरावून घेतो असा त्याचा अर्थ होतो.

सन्माननीय शिक्षण मंत्री श्री. राजेंद्र दर्डा हे स्वत: संवेदनशील आहेत याची मला कल्पना आहे. ते विधानसभेमध्ये सदस्य असताना 6 डिसेंबर, 2006 रोजी त्यांनी या रात्र शाळांच्या संदर्भामध्ये सभागृहामध्ये लक्षवेधी सूचना मांडली होती. ज्या भावना आज आम्ही व्यक्त करीत आहोत, ज्या भावना आज आम्ही मांडत आहोत, ज्या रात्रशाळांच्या शिक्षकांच्या बाबतीत आम्ही विचार करीत आहोत त्याच रात्रशाळांच्या संदर्भात 6 डिसेंबर, 2006 रोजी विधानसभेमध्ये आताचे शिक्षण मंत्री, जे आता हा विषय हाताळत आहेत ते श्री. राजेंद्र दर्डा हे सदस्य असताना त्यांनी या रात्र शाळांच्या शिक्षकांचे नेतृत्व करुन त्यांचा विषय सभागृहामध्ये शासनापुढे मांडला होता. त्यांना या रात्र शाळांच्या शिक्षकांच्या संदर्भात वेगळे काही सांगण्याची आवश्यकता नाही. ज्या पोटतिडिकीने आम्ही बोलतो तेवढाच कळवळा आमच्या आदरणीय शिक्षण मंत्री महोदयांनाही आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS

श्री. रामनाथ मोते ...

हा विषय मार्गी लावण्याची आवश्यकता आहे. केवळ सहानुभूती असून चालणार नाही. आधी ज्यांच्यासाठी आपण भांडत होता, ज्यांच्यासाठी प्रयत्न करीत होता त्यांचा प्रश्न सोडविण्याचे अधिकार आता सन्माननीय मंत्री महोदयांकडेच आलेले आहेत. त्यांच्याच अधिकारात तो विषय आहे. या संदर्भात आपली ताकद कोठे कमी पडते की काय असे वाटते. पण आपण हा विषय माननीय मुख्यमंत्र्यांकडे नेऊन त्यांच्याकडे आग्रह धरावा. आपण आग्रह धरता, आमच्या अनेक विषयासाठी प्रयत्न करता याची मला जाणीव आहे. आपण अत्यंत प्रामाणिकपणे आणि पोटतिडिकीने काम करीत आहात. परंतु प्रश्न मार्गी लागत नाही. कोठे तरी अडचणी येत आहेत. या विषयाच्या संदर्भात सुध्दा विचार करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, फार कमी शिक्षकांचा हा प्रश्न आहे. या शाळांमध्ये दोन प्रकारचे शिक्षक काम करतात. एक म्हणजे दिवस-रात्र शाळेमध्ये काम करणारे शिक्षक आहेत आणि दुसरे शिक्षक फक्त रात्रशाळेमध्ये काम करणारे आहेत. फक्त रात्रशाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांची संख्या 352 आहे. एकूण जी 1345 संख्या आहे त्यापैकी फक्त 352 शिक्षकांच्या वेतनाचा प्रश्न आहे. जे 755 शिक्षकेतर कर्मचारी आहेत त्यातील फक्त 239 कर्मचारी रात्रशाळांमध्ये काम करतात. इतका हा छोटासा विषय आहे. रात्रशाळेमध्ये व दिवसाच्या शाळेमध्ये काम करणारे जे कर्मचारी आहेत त्यांचा पगार सुरु असतो. त्यांनी काम करण्याबद्दल माझे काही म्हणणे नाही. या सभागृहामध्ये सातत्याने एक विषय मांडला जातो की, रात्र शाळांमध्ये अनुभवी शिक्षकच नेमण्याची आवश्यकता आहे. मी परवा या संदर्भात प्रश्न विचारला होता. सन्माननीय मंत्री महोदयांनी मला शासनाच्या वतीने उत्तर दिले आहे की, अशा प्रकारचा कोणताही निर्णय नाही. अशा प्रकारची कोणतीही तरतूद कायद्यामध्ये नाही. परंतु फक्त रात्रशाळेतच काम करणारे जे कर्मचारी आहेत त्यांचा विचार होण्याची आवश्यकता आहे. 25 वर्ष, 28 वर्षे, 30 वर्षे काम करुन काही कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत. आज त्यांची अवस्था काय आहे ? एक तर त्यांना पूर्ण पगार मिळाला नाही. भविष्य निर्वाह निधी नाही. त्यांना पेन्शन नाही. त्यांचा विचार शासन करणार आहे की नाही ? जे कर्मचारी 20-25 वर्षे काम करीत आहेत आणि

यानंतर श्री. खंदारे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते...

त्यांना सेवानिवृत्तीनंतर एक पैसाही मिळत नाही, याचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे.

3 वर्षापूर्वी नेमलेल्या समितीचा अहवाल शासनाकडे आलेला आहे. ही समिती केवळ टीक मार्क करण्यासाठी नेमली होती काय, याचाही विचार करण्याची आवश्यकता आहे. रात्र शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षकांचे तास वाढवून त्यांना वेतनश्रेणी देण्याबाबत, त्यांना निवृत्ती वेतन देण्यासंबंधी विचार करण्याची आवश्यकता आहे. याबाबत मी शासनाला विनंती करतो. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी आश्वासित प्रगती योजना आहे. शासनाची ही योजना सुरु झाली आहे. त्यासंबंधीचा शासनाने जी.आर.काढला तो आम्हाला देखील लागू आहे. परंतु यासंबंधी निर्णय झालेला नाही. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विना अनुदानित शाळांमधील सेवा ग्राह्य धरण्यासंबंधीचा विषय पुढील अधिवेशनामध्ये उपस्थित करण्याची गरज भासणार नाही असे स्पष्ट आश्वासन मंत्री महोदयांनी आम्हाला दिले होते. आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवला होता. परंतु त्यानंतर दोन अधिवेशने झाली तरी अद्याप निर्णय झालेला नाही.

सभापती महोदय, या राज्याचे शैक्षणिक धोरण ठरविताना शासनाने 1964 मध्ये त्रिभाषा सूत्र स्वीकारले होते. प्रथम मातृभाषा, दुसरी हिंदी भाषा व तिसरी इंग्रजी भाषा असे इंग्रजी माध्यमांच्या शाळांसाठी हे सूत्र स्वीकारले आहे. परंतु अभ्यासक्रम मंडळाने इयत्ता 5 वी ते 7 वी पर्यंतच्या सुधारित अभ्यासक्रमामधून हिंदी विषय वगळला आहे. या संदर्भात हिंदी भाषा शिक्षकांचे प्रतिनिधी मंत्री महोदयांनी भेटले आहेत. त्यांनी लाखो विद्यार्थ्यांच्या पालकांचे निवेदन दिलेले आहे. हिंदी ही संपर्क भाषा आहे. एका बाजूला या भाषेला आपण राष्ट्रभाषा म्हणतो. दुसऱ्या बाजूला त्या भाषेला अभ्यासक्रमातून वगळतो हे बरोबर नाही. ही तर बिन पैशाची मागणी आहे. त्यासाठी काहीही खर्च होणार नाही किंवा शासनावर अतिरिक्त आर्थिक बोजा पडणार नाही. याबाबत शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन अभ्यासक्रमाच्या मंडळाने हिंदी विषय वगळण्याचा जो निर्णय घेतला आहे तो रद्द करावा. या संदर्भातील ठोस घोषणा किंवा निर्णय आज या सभागृहात मंत्री महोदय करतील अशी माझी अपेक्षा आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

श्री.रामनाथ मोते.....

सभापती महोदय, 2002 पासून राज्यशासनाने धोरणात्मक निर्णय घेतला आहे की, कोणत्याही प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत कार्यभार वाढला किंवा पदे वाढली तर त्या पदांना शासनाची मान्यता मिळाल्याशिवाय वाढीव पदांवर काम करणाऱ्यांना वेतन मिळत नाही. 2002 पासून आजपर्यंत त्याच पध्दतीने कामकाज सुरु आहे. परंतु मान्यता देण्याला जो विलंब होतो तो आक्षेपार्ह आहे. शासनाकडे वाढीव पदांना मान्यता मिळण्यासाठी पाठविलेले प्रस्ताव 4-4, 5-5 वर्षे प्रलंबित राहतात. गेल्या वर्षी 2005-06 या वर्षातील वाढीव पदांना मान्यता देण्यात आली आहे. त्यानंतरच्या 4 वर्षाचे प्रस्ताव अजून शासनाकडे प्रलंबित आहेत. एखाद्या प्रस्ताव वर्षाच्या सुरुवातीला आला तर तो प्रस्ताव वर्ष संपण्यापूर्वी तरी निकाली काढला पाहिजे. निदान पुढील वर्षाच्या सुरुवातीला तरी निकाली काढावा. 4-4 वर्षे हे प्रस्ताव निकाली काढले जात नाहीत हे योग्य नाही. अनुदानित शाळांचे हे सर्व प्रस्ताव आहेत. परंतु शासनाकडून असे उत्तर दिले जाते की, हे कर्मचारी अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये काम करीत असल्यामुळे त्यांना वेतन देण्याची जबाबदारी आमची नाही. ही जबाबदारी त्या त्या शिक्षण संस्थांची आहे. परंतु या सर्व अनुदानित शाळा असल्यामुळे त्यांना वेतन देण्याची जबाबदारी शासनाचीच आहे. (अडथळा)

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

सभापती महोदय, पायाभूत पेक्षा वाढीव पदांना मान्यता देण्याचा हा विषय आहे. एक तर वेळेवर मान्यता द्या किंवा याचा फेर विचार करा. तुमचा धोरणात्मक निर्णय झाला ना, मग वेळेवर मान्यता द्या. तुम्ही चार-चार वर्षे पदांना मान्यता देत नाही. मान्यता उशिरा मिळाली तर पगार केव्हा पासून देता ? तर जेव्हा पासून मान्यता दिली जाते तेव्हा पासून पगार दिला जातो. मागील चार वर्षाचा पगार तुम्ही देत नाही. पगाराचा डिफरन्स देत नाही. चार-चार वर्षाचा शिक्षकांचा लाखो रुपयांचा पगार बुडतो. संस्था पगार देत नाही, शासन पगार देत नाही. त्या शिक्षकांनी उपाशीपोटी काम करायचे काय, बिनपगारी काम कराचे काय ? तेव्हा अशा प्रकारे शिक्षकांचे शोषण होऊ नये म्हणून किमान हा निर्णय तरी करा. पायाभूत पेक्षा वाढीव पदांना मान्यता द्या. माध्यमिकचे 10 वर्षापासूनचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. 10 हजार तुकड्यांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. आता पटपडताळणीसाठी आपण थांबला होता हे आम्ही समजू शकतो. आता तो निर्णय झालेला आहे. 9 हजार तुकड्यांवर काम करणारे साधारणत: 15 हजार शिक्षक गेल्या 10 वर्षापासून काम करीत आहेत. त्यांना वेतन मिळत नाही. त्यांच्या अस्तित्वाला धोका आहे. जोपर्यन्त तुकड्यांना मान्यता मिळत नाही तोपर्यन्त त्यांना वैयक्तिक मान्यता मिळत नाही अशी अडचण आहे. म्हणून गेल्या 10 वर्षाचे प्रस्ताव, उच्च माध्यमिकचे गेल्या 4 वर्षापासूनचे प्रस्ताव, वाढीव अभ्यासक्रमाचे गणिताचे प्रस्ताव, त्या त्या वर्षात आपण काढावेत, त्याबाबतीत धोरणात्मक निर्णय घ्यावा. हे प्रलंबित प्रस्ताव तातडीने काढावेत. पुढील वर्षापासून त्या वर्षाचे प्रस्ताव त्या वर्षात किंवा 1 वर्षाच्या आत त्याला मान्यता देण्याच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, आदरणीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि अन्य सन्माननीय सदस्य या विषयावर बोलतीलच. मराठी माध्यमाच्या शाळांची अवस्था विचारात घेता आता तुकडया बंद पडत आहेत, विद्यार्थ्यांची संख्या कमी कमी होत आहे. या तुकड्या का बंद पडत आहेत याच्या कारणांचा विचार नंतर करु. मराठी माध्यमाच्या तुकड्या बंद पडत आहेत. केवळ माध्यमिकच्याच तुकड्या बंद पडतात असे नाही तर प्राथमिक शाळातील तुकड्या देखील बंद पडत आहेत. माध्यमिक शाळातील बंद पडलेल्या तुकड्याचे समायोजन करण्याच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. 8वीची तुकडी बंद पडली तर 9वी, 10वीची तुकडी वाढू शकते काय ? ती तुकडी आपण त्या संस्थेला,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते...

त्या शाळेला देतोय का ? नाही. ती तुकडी, त्या जिल्ह्यातील, गावातील अन्य शाळेला देतो. 100 टक्के अनुदानित तुकडी ज्याना ज्याना देणे शक्य आहे त्यांना आपण देत आहात. हा निर्णय माध्यमिक शाळांच्या बाबतीत झाला. प्राथमिक शाळांतील बंद पडलेल्या तुकडयांच्या संदर्भात त्यांचे समायोजन करण्याच्या संदर्भात काय निर्णय घेतलेला आहे ?

मी एक उदाहरण देतो. विद्यार्थ्यांची संख्या 190 आहे आणि तुकड्या 2 आहेत. एक शाळा अशी आहे की तेथे विद्यार्थ्यांची संख्या 62 आहे आणि तुकड्यांची संख्या 2 आहे. म्हणजे 62 विद्यार्थ्यांसाठी 2 तुकडया आणि 192 विद्यार्थ्यांसाठी 2 तुकडया. मी कल्याणचे उदाहरण देतो. कल्याणमध्ये 33 शिक्षक अतिरिक्त आहेत. तुकड्या बंद पडलेल्या आहेत. मी सांगितले की 192 विद्याथी आणि 2 तुकडया जेथे आहेत त्यांना तिसरी तुकडी द्यावी. या बंद पडलेल्या तुकडया तिकडे समायोजित करा, शिक्षकासहीत ती तुकडी समायोजित करा. 33 अतिरिक्त शिक्षक घरी बसून पगार घेत आहेत.ज्या ठिकाणी तुकड्या वाढू शकतात त्या ठिकाणी तुकडया देत नाही.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

फक्त समायोजन करायचे आहे, आदेश काढायचा आहे. या संदर्भात निर्णय होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मंत्री महोदयांनी मुंबईसाठी राष्ट्रीयकृत बँकेमार्फत वेतन देण्याचा चांगला निर्णय घेतला, त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. 1 तारखेला वेतन मिळणे सहज शक्य झाले आहे. मुंबईसाठी हा निर्णय घेतला असला तरी ठाणे जिल्हयामध्ये 7 महानगरपालिका आहेत, नगरपालिका आहेत, शहरी भाग मोठया प्रमाणावर आहे, तेथील शिक्षकांना 1 तारखेला वेतन मिळावे यासाठी ठाणे जिल्हयामध्ये सुध्दा मुंबईच्या धर्तीवर निर्णय घेतला जावा. ठाणे जिल्हयाबरोबरच नागपूर जिल्हा आणि संपूर्ण महाराष्ट्रासाठी राष्ट्रीयकृत बँकेमार्फत वेतन देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी मी मंत्री महोदयांना विनंती करतो.

सभापती महोदय, या प्रस्तावावर अनेक माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत. त्यामुळे कमी वेळेत जास्तीत जास्त विषयांना स्पर्श करण्याचा मी प्रयत्न केला आहे. मी मंत्री महोदयांना विनंती करतो की, ज्या विषयांचा मी उल्लेख केला, ज्या विषयाबाबत सभागृहात चर्चा झाली आहे त्याबाबत शासनाने ठोस आश्वासन दिले आहे. आता आम्हाला आश्वासन नको. शासनाने आमची फसवणूक करु नये. या सभागृहाची फसवणूक करु नये. राज्यातील लाखो शिक्षकांची शासनाने दिशाभूल करु नये. जो निर्णय घ्यावयाचा आहे तो योग्य त्या पध्दतीने घ्यावा आणि या राज्यातील शिक्षकांना दिलासा द्यावा अशी मी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : माननीय विरोधी पक्षनेते व अन्य सन्माननीय सदस्यांनी एका अतिशय महत्वाच्या समस्येवर नियम 260 अन्वये जो प्रस्ताव सभागृहात चर्चेसाठी आणला आहे, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या प्रस्तावात अनेक समस्यांचा अंतर्भाव केलेला असून त्या पाहता असे चित्र निर्माण होऊ शकतो की, शिक्षणाकडे शासनाचे खूप दुर्लक्ष आहे. या निमित्ताने मला काही गोष्टी सांगितल्या पाहिजे. खरे म्हणजे शिक्षण क्षेत्रात खूप चांगल्या गोष्टी शासनाने केल्या आहेत. महात्मा फुले यांनी शिक्षणाला त्या काळात जे महत्व दिले होते त्याला अनुसरुन शासनाने अधिक चांगले काम या क्षेत्रात केले. स्वातंत्र्यानंतरच्या काळात शिक्षणाच्या क्षेत्रात आजपर्यंत केलेल्या कामाचा आढावा घेतला तर 75 हजाराहून अधिक प्राथमिक शाळा, 25 हजार माध्यमिक शाळा, 8 ते 10 हजार उच्च माध्यमिक शाळा, 1200 आदिवासी आश्रमशाळा, 800 अपंगांसाठी शाळा या शासनाने काढलेल्या आहेत. या सर्व गोष्टींचा विचार केला तर आपल्या राज्याचा क्रमांक हा देशात केरळनंतर पहिलाच लागतो. त्यात आपण शिक्षणासाठी वस्तीशाळा, शाळाबाह्य मुलांसाठी शिक्षणाची व्यवस्था केलेली दिसून येते. अशा प्रकारे आजपर्यंत जे काम शासनाने केले ते नजरेआड करण्यासारखे नाही. नजिकच्या काळात सुध्दा माननीय शिक्षण मंत्र्यांनी तसेच महाराष्ट्र शासनाने शिक्षणाच्या संदर्भात अनेक चांगले निर्णय घेतले आहेत, त्याबद्दल मी शिक्षण मंत्री आणि महाराष्ट्र शासन यांचे अभिनंदन करतो. त्यांनी शिक्षण सेवकांचे मानधन दुप्पट केले, जुन्या पेन्शन योजनेचे प्रश्न असतील किंवा शिक्षण सेवकांना तीन वर्षानंतर रेग्युलर वेतनश्रेणीत घेण्याचे प्रश्न असतील असे काही महत्वाचे प्रश्न निर्णय घेऊन निकाली काढलेले आहे.

महोदय, प्रस्तावात दिलेल्या ज्या एकूण समस्या आहेत त्यातील बऱ्याच समस्या सहज सुटण्यासारख्या आहेत. पण आपण नेहमी म्हणतो की, "हत्ती गेला पण शेपूट राहिले" असा हा प्रकार असतो. तशा यातील अनेक समस्या या पैशांशी निगडीत नाहीत म्हणून वारंवार आम्ही शासनाला विनंती करतो की, या सर्व समस्यांचे चांगल्या प्रकारे विश्लेषण करुन त्या सोडविण्याचा प्रयत्न केला तर अर्ध्याहून अधिक समस्या तातडीने सुटू शकतील म्हणून या बाबींकडे गंभीरपणे पाहणे गरजेचे आहे. पण प्रशासकीय पातळीवर मात्र या समस्यांकडे नकारात्मक दृष्टीने पाहिले जात असल्याचे आढळून येते आणि हाच दृष्टीकोन शिक्षण आणि समाजाच्या दृष्टीने चांगला नाही.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे .....

महोदय, यशवंतरावजी चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष आपण साजरे करीत आहोत. चव्हाण साहेबांचे शिक्षणाच्या बाबतीत असलेले काही विचार मी येथे प्रकर्षाने उद्धृत करण्याचा प्रयत्न करतो. ते म्हणाले होते की, शिक्षणाकडे केवळ सामाजिक गरजेच्या दृष्टीने पाहत नाही तर माझ्या मते शिक्षण हे आर्थिक विकासाचे मुलभूत साधन आहे. आमच्यामध्ये शक्ती निर्माण करण्यासाठी मनुष्यबळाशिवाय दुसरे साधन नसल्यामुळे आम्हाला या धनाचा विकास करण्यासाठी शिक्षणाची जोड द्यावयाची आहे. खेड्यामध्ये डिझेल घेऊन पोहचविल्याशिवाय ज्याप्रमाणे शेतीचा विकास होणार नाही, त्याप्रमाणे आमच्या नापीक बळाला मनुष्यबळाचा हा जो मोठा थोरला साधनसंपत्तीचा भाग आहे तो अत्यंत महत्वाचा आहे. ज्याप्रमाणे आमच्या नापीक बळाला मनुष्यबळाचा हा जो मोठा थोरला साधनसंपत्तीचा भाग आहे त्यामध्ये शिक्षणाची बिजली नेल्याशिवाय नवे सामर्थ्य निर्माण होणार नाही, असा माझा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन होता. महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती करण्याचा कार्यक्रम जितका महत्वाचा आहे, शेतीचा विकास करण्याचा कार्यक्रम जितका महत्वाचा आहे तितकाच शिक्षणाचा कार्यक्रम राज्याच्या दृष्टीने महत्वाचा आहे" असे उद्गार त्यांनी सन 1960 मध्ये काढले होते.

महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपरोक्त ठरावात अनेक समस्या मांडल्या त्या सर्वांच्या बाबतीत मी बोलणार नाही, अन्य सदस्य जरुर त्यावर बोलतील. पण एवढे मात्र जरुर सांगणार आहे की, शिक्षणाकडे सकारात्मक दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. सन 1991 साली या देशाचे सोने गहाण टाकण्याची वेळ आली होती आणि सन 2011 मध्ये मात्र जगातील आर्थिक महासत्ता म्हणून आपण पुढे येत आहोत , हा 20 वर्षातील बदल जो दिसून येतो त्यात शिक्षण क्षेत्राचे फार मोठे योगदान आहे हे विसरुन चालणार नाही. म्हणून शिक्षणासाठी शासनाने अधिकची तरतूद केली पाहिजे व त्याकडे सकारात्मक दृष्टीनेच पाहिले पाहिजे. अशा अनेक प्रश्नांचा उल्लेख मला करता येईल पण मी जास्त वेळ न घेता त्यातील प्रमुख समस्या खरे म्हणजे कायम विना अनुदानित आणि विना अनुदानित हे शब्द अकरावी-बारावी पर्यंत ठेवणे हे चुकीचेच आहे. केंद्रशासनाने शिक्षण हक्क कायदा केल, शाहू महाराजांनी तसेच सयाजीराव गायकवाड यांनी त्यांच्या संस्थानात त्या काळात सुध्दा शिक्षण हक्क कायदा मंजूर केला होता.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे ...

शिक्षण हक्काचा कायदा मंजूर करीत असतांना शासनाने त्यामध्ये 6 ते 14 वर्षाची मर्यादा घातली आहे. आता शिक्षणाचे संदर्भ बदलत चालले आहेत. त्यामुळे यासंदर्भात मला असे वाटते की, 12 वी पर्यंतचे शिक्षण हे मूलभूत समजले गेले पाहिजे व 12 वी पर्यंतचे शिक्षण पूर्णत: अनुदानित असले पाहिजे. ग्रामीण भागात विना अनुदानित ज्यु. कॉलेज चालविण्याची आपण कल्पना सुध्दा करु शकत नाही. ग्रामीण भागातील ज्युनियर कॉलेजचे विद्यार्थी कसे काय फी देऊ शकणार आहेत? एकीकडे मुलींकडून, आदिवासी मुलांकडून तसेच मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून फी घ्यावयाची नाही. शासन जी काही फी देते ती 15 ते 20 रुपये असते. शिक्षण शुल्का प्रमाणे फी काढली तर ती 10-12 हजार रुपये होऊ शकते. त्यामुळे यासंदर्भात जी विसंगती आहे ती कोठे तरी दूर होण्याची गरज आहे त्यामुळे यासंदर्भात मला शासनाला सांगावयाचे आहे की, शासनाने 12 वी पर्यंतचे शिक्षण तातडीने अनुदानित केले पाहिजे. एकीकडे आपण शिक्षण हक्क कायदा केला असून संस्थेमध्ये काम करणारे शिक्षक 10-10,12-12 वर्षापासून काम करीत आहेत परंतु त्या संस्थांना अनुदान मिळत नसल्यामुळे शिक्षकांचे मोठया प्रमाणात शोषण होत असते. जेव्हा आम्ही सभागृहात शिक्षणाच्या संदर्भात प्रश्न मांडतो तेव्हा त्याकडे केवळ शिक्षकांचे प्रश्न म्हणून पाहिले जाते त्यामुळे याकडे बघण्याचा दृष्टिकोन वेगळा असण्याची गरज आहे.

या निमित्ताने मला असे सांगावयाचे आहे की, शिक्षणाचा प्रश्न हा सामाजिक प्रश्न असून तो देशाच्या प्रगतीच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. आपल्याला जर सामाजिक समतेचे स्वप्न पूर्ण करावयाचे असेल तर ग्रामीण भागात राहणारा जो वर्ग आहे, जो वंचित घटक आहे त्याला दर्जेदार शिक्षण कसे देणार आहात? 8 वर्षापासून आपण संस्थांना वेतनेतर अनुदान देत नाही त्यामुळे आम्ही शाळा कशा पध्दतीने चालवावयाच्या ? आपल्या राज्यात 90 टक्के माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण खाजगी शिक्षण संस्थातर्फे दिले जात असते. अन्य राज्यामध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाने उचलली आहे. जर हे शिक्षण देण्याची जबाबदारी राज्य शासनावर आली असती तर इमारती बांधणे, पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याचा आर्थिक ताण शासनावर आला असता. त्यामुळे खाजगी शिक्षण संस्था त्यांच्या पध्दतीने काम करीत असतांना शासन त्यांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे ...

कोणत्याही स्वरुपाची मदत करीत नाही. शिक्षण हक्क कायदा करीत असतांना विद्यार्थ्यांना केवळ मोफत शिक्षणच नाही तर दर्जेदार शिक्षण सुध्दा द्यावयाचे आहे. दर्जेदार शिक्षण द्यावयाचे असेल तर खाजगी संस्थांना निश्चितपणे शासनाने मदत केली पाहिजे असे माझे स्पष्ट मत आहे. संस्थेच्या तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या प्रश्नाच्या संदर्भात शासनाने तातडीने निर्णय घेण्याची गरज आहे.

शासनाने मुल्यांकनाचा निर्णय घेऊन 3 वर्षे झालेली आहेत परंतु अजूनही आपण मूल्यांकनाचे निकष व्यवस्थितपणे ठरवू शकलेलो नाही. सन 2008 पर्यंत शाळांना रोस्टर लागू नसेल असा शासनाचा निर्णय आहे. या रोस्टरमुळे शाळेतील शिक्षकांवर मोठी गदा येणार असून यामध्ये शिक्षक पात्र ठरू शकणार नाहीत. ज्या शिक्षकांनी 10-10,12-12 वर्षे काम केलेले आहे असे शिक्षक पुढील काळात अपात्र ठरणार आहेत. या शिक्षकांचे वय आता 45 वर्षे झाले असून त्यांची मुलेही आता शाळेत जावयास लागली आहे. मला असे वाटते की, शिक्षकांचे जेवढे शोषण होते तेवढे कोणाचेच होत नसणार. शिक्षक म्हणून नोकरीला लागत असतांना संस्था चालक मोठया प्रमाणात पैसे घेत असतात हे आपल्या सर्वांना माहितच आहे. त्यानंतर या शिक्षकांना विनाअनुदान काम करावे लागते. त्यानंतर टप्पे् अनुदान करावे लागते. एखादी व्यक्ती शाळेत शिक्षक म्हणून लागली असेल व त्यावेळेस शाळा विनाअनुदान असेल तर 9 वर्षानंतर त्या शिक्षकाला वेतन मिळण्यास सुरुवात होत असते. त्यामुळे लोकशाही पध्दतीमध्ये एखाद्या वर्गाचे अशा प्रकारे शोषण करण्याला वेठबिगारी म्हटले तर ते वावगे ठरेल काय ? त्यामुळे यासंदर्भात अतिशय गंभीरपणे निर्णय घेणे गरजेचे आहे असे मी शासनास नम्रपणे आवाहन करीत आहे.

सभापती महोदय, आपण सर्व शिक्षा अभियान योजना लागू केलेली आहे. या अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक ठिकाणी मोठया प्रमाणात बांधकामे होत असून बांधकामाची जबाबदारी मुख्याध्यापकावर टाकली जाते. ग्रामीण भागामध्ये काम करीत असतांना या मुख्याध्यापकांचा मानसिक छळ केला जातो. राज्यामध्ये अनेक शिक्षकांनी यासंदर्भात आत्महत्या केलेल्या आहेत. आमच्या अकोले तालुक्यातील एका शिक्षकांनी नुकतीच आत्महत्या केलेली आहे. सध्या कशा प्रकारे भ्रष्टाचार बोकाळलेला आहे हे आपल्याला ठावूक आहे. गावच्या पदाधिका-यांना वाटते की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे ...

शिक्षकाला यामध्ये काही तरी पैसे मिळत असतील त्यामुळे ते लोक शिक्षकांकडून पैशाची अपेक्षा करतात. मुळातच या योजनेच्या बांधकामासाठी शासनाचे जे पैसे आलेले असतात ते थोडे कमी असतात. असे असतांना शाळा खोली बांधण्याची जबाबदारी शिक्षकावर आलेली असते. असे असतांना जर शिक्षकाचा मानसिक छळ होत असेल तर ते योग्य नाही. यासंदर्भात आम्ही वारंवार विनंती केलेली आहे की, सार्वजनिक बांधकाम खाते आपल्याकडे असून या खात्याकडे ही कामे दिली तर अधिक चांगल्या प्रकारे ही कामे होऊ शकतील. त्यामुळे ही बाब मान्य होण्यास काहीच हरकत नाही असे मला वाटते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे....

सभापती महोदय, शालेय पोषण आहाराचा प्रश्न देखील महत्त्वाचा आहे. ही चांगली योजना आहे. त्याबद्दल आमचा काही विरोध नाही. ही योजना राबविताना शिक्षकांना खूप त्रास होतो. एकीकडे आपण त्यांनी उत्तम शिक्षण द्यावे, चांगल्या प्रकारचे शिकवावे अशी अपेक्षा व्यक्त करतो. असे असताना त्या शिक्षकाला शालेय पोषण आहाराचा एक महिन्याचा कोटा दिला जातो. त्याच्याकडे तांदळाचे पोते ठेवायला जागा सुद्धा नसते. महिन्याचा कोटा ट्रक भरून येतो व शिक्षकाला सांगितले जाते की तो कोटा खाली करून घे. शाळेच्या खोल्या धान्याने भरून जातात. धान्य ठेवायला जागा नसते. हे तांत्रिक स्वरूपाचे प्रश्न आहेत. हे आपण तातडीने का सोडवू शकत नाही, असा देखील प्रश्न माझ्या मनात निर्माण होतो.

या शिवाय दुसरा एक महत्त्वाचा प्रश्न आहे. आज आपण वेतनेतर अनुदान देत नाही. सर्व शिक्षा अभियान माध्यमिक शाळांना लागू झाले आहे. त्यासाठी आपल्याकडे खूप मोठ्या निधीची व्यवस्था आहे. आपल्या संस्था खाजगी म्हणून ट्रीट केल्या जातात. त्यामुळे आपल्या संस्थांना हे पैसे मिळत नाही. त्यासाठी आपण केंद्र शासनाकडे प्रयत्न करणे गरजेचे आहे. ते प्रयत्न यशस्वी झाले तर निश्चित फायद्याचे होईल. कारण संपूर्ण वेतन आपण देत आहोत. वेळ प्रसंगी आपण तेथे प्रशासक लागू करतो. त्यामुळे त्या निमशासकीय संस्था आहेत असे म्हटले तर ते वावगे ठरणार नाही. या सर्व माध्यमिक शाळा सर्व शिक्षा अभियानामध्ये आल्या तर त्यांना त्याचा निश्चितच उपयोग होईल. या देशाचे 20 हजार कोटीचे बजेट आहे. त्यातून आपल्याला मोठ्या प्रमाणावर निधी मिळाला तर त्याचा उपयोग करून घेता येईल. वेतनेतर अनुदाना शिवाय आपण अनेक प्रकारच्या अपेक्षा ठेवत आहोत. या निधीतून इमारती करता येतील, चांगले वाचनालय करता येईल, संगणकीय प्रयोगशाळा इत्यादी सर्व गोष्टी आपण करून शकतो.

राज्य पुरस्कारा संबंधी सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. हा देखील फार मोठा विषय नाही. शिक्षक उत्तमरितीने काम करीत आहेत. त्यांना वेतनवाढ देण्यासाठी कुठल्याही प्रकारची अडचण येण्याचे कारण नाही.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे....

नगरपालिकेच्या शाळांसंबंधी देखील सांगण्यात आले. नगरपालिकेचे वेतन शासन देते. महानगरपालिकेने काही भाग द्यावा अशी व्यवस्था आहे. पण वर्षानुवर्षे ते त्यांचा हिस्सा देत नाही. तेथील शिक्षकांचा वेळेवर पगार होत नाही. मी पूर्वी नगरपालिकेत अध्यक्ष म्हणून काम करताना पाहिले की, 10 टक्के पैसे नगरपालिकेला द्यायचे असतात. ते सुद्धा नगरपालिका कधी वेळेवर देत नव्हती. त्यामुळे शिक्षकांचे वेतन वेळेवर होत नाही.

शिक्षण हा विषय शालेय शिक्षण, नगरविकास, ग्रामविकास, सामाजिक न्याय, आदिवासी विकास या पाच विभागांमध्ये वाटला गेला आहे. त्यामुळे या संबंधी प्रशासकीय दृष्ट्या धाडसी निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. खाते कुठले असले तरी नियंत्रण एकाच विभागाचे म्हणजे शालेय शिक्षण विभागाचे असले पाहिजे, अशा प्रकार गंभीर मागणी आपण केली पाहिजे असे मला वाटते. आज आपण शिक्षणासाठी 25 ते 30 हजार कोटी रूपये खर्च करीत आहोत. एवढा मोठा खर्च करीत असताना त्यातून आपल्याला अपेक्षित परिणाम मिळाला नाही तर त्याचा काहीही उपयोग नाही. या शाळेत शिकणारी मुले मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबातील आहेत. त्यांच्यावर अशा प्रकारचा अन्याय झाला तर ते सामाजिक दृष्ट्या चुकीचे ठरेल.

सभापती महोदय, मला येथे महत्त्वाचा प्रश्न मांडावयाचा आहे. यात धोरणात्मक अडचणी आहेत. त्या सन्माननीय सदस्य श्री.मोते साहेबांनी मांडल्या आहेत. त्या सगळ्या प्रस्तावा मध्ये आहेत. यात रात्र शाळेचा देखील प्रश्न आहे. हे सगळे प्रश्न महत्त्वाचे आहेत. या शिवाय खूप मोठा प्रश्न असा आहे की, आमचा शिक्षक जेव्हा ॲप्रुव्हलसाठी जातो तेव्हा त्याला अडविण्यात येते. तो कुठल्याही गोष्टीसाठी गेला तरी शिक्षणाधिकारी, उप संचालक, संचालक कार्यालय असेल तेथे प्रचंड प्रमाणावर त्याची अडवणूक होते. त्यामुळे प्रशासकीय सुधारणा करता येतील याकडे लक्ष दिले पाहिजे. आता संगणकाचे युग आहे. आपण ऑनलाईन सेवा करू शकतो काय याचा विचार केला पाहिजे. ज्या तांत्रिक गोष्टी आहेत त्या कशा कमी करता येतील हे पाहिले पाहिजे. शिक्षकाला मन मोकळे काम कसे करता येईल यासाठी प्रशासकीय सुधारणा माननीय मंत्री श्री.दर्डा साहेब आपण हाती घेतल्या पाहिजेत अशी नम्र विनंती मी करीत आहे.

अपंगाचा विषय देखील महत्त्वाचा आहे. तो शालेय शिक्षणाशी संबंधित नसला तरी त्यावरही एकदा चर्चा होण्याची गरज आहे असे मला वाटते. ..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे....

नगरपालिकेच्या शाळेत विसंगती असते. असे का होते हे मला समजत नाही. आता विनअनुदान सेवा ग्राह्य धरण्याचे उदाहरण दिले आहे. आपल्याला ग्राह्य धरायचे असेल तर ते सर्वांसाठी धरले पाहिजे. आदेश काढताना माध्यमिकसाठी काढले आणि उच्च माध्यमिक आणि प्राथमिक यांना त्यातून गाळले. शिक्षकेतर कर्मचारी त्यातून गाळले. नगरपालिकेतून वैद्यकीय बिले देताना प्राथमिकला द्यायची माध्यमिक शाळेला द्यायची नाहीत. अशा पद्धतीच्या विसंगती मुळे लोक सारखे येऊन मंत्रालयामध्ये चकरा मारत आहेत.

यानंतर श्रीमती रणदिवे....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यातून केवढा मोठा खटाटोप होत असतो.

सभापती महोदय, यानंतर मला शेवटचा मुद्दा मांडावयाचा आहे की, आदरणीय शिक्षण मंत्री श्री.राजेंद्र दर्डासाहेबांचा नेहमी आग्रह असतो की, हे सर्व करीत असताना आपल्याला गुणवत्तेकडे देखील लक्ष दिले पाहिजे आणि हे खरे आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे आता शिक्षणामध्ये दोन वर्ग तयार झालेले आहेत.काही मुले इंग्रजी शाळेमध्ये तर काही मुले इंटरनॅशनल शाळेमध्ये जातात.तसेच काही मुले जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये जातात,नगर पालिकेच्या शाळेमध्ये जातात.परंतु तेथे जाणारी मुले ही मध्यम वर्गातील किंवा गरीब वर्गातील असतात.तेथे त्यांना कनिष्ठ दर्जाचे शिक्षण आणि दुसऱ्या शाळांमध्ये उच्च दर्जाचे शिक्षण दिले जाते आणि जर आपल्याला ही वर्गवारी बंद करावयची असेल तर गुणवत्तेकडे लक्ष दिले पाहिजे. आज राज्यामध्ये अनेक शिक्षण तज्ज्ञ सेवाभावी वृत्तीने अतिशय चांगले काम करीत आहेत. त्यांना एकत्रित बोलविण्यात यावे तसेच शिक्षण संघटनांनाही एकत्र बोलवावे. तसेच आपण शिक्षकांना जे कार्यक्रम देतो ते अतिशय कृत्रिम आणि क्लिष्ट असतात. उदाहरणार्थ प्रशिक्षणाचा भाग असेल, याबाबतीत सांगावयाचे तर एकाच महिन्यामध्ये खूप प्रशिक्षण सुरु केले जाते.त्यामुळे जर याबाबतीत आपण चांगल्या पध्दतीने व्यवस्था केली तर शिक्षक संघटनांचा किंवा शिक्षकांचा गुणवत्ता वाढीसाठी प्रशिक्षण घेण्यास विरोध नाही हे मला सांगावयाचे आहे.पण हे सर्व करीत असताना त्यांच्या प्रतिनिधींना बोलाविण्यात यावे आणि त्यांना असे सांगावे की,आपल्याला शिक्षकांची गुणवत्ता वाढवावयाची आहे, त्यामुळे तुम्हीच आम्हाला याचा प्रोग्रॅम द्यावा.राज्यामध्ये वेगवेगळया पध्दतीने सेवाभावी वृत्तीचे लोक काम करीत आहेत.

सभापती महोदय, याबाबतीत सांगावयाचे तर एका संस्थेने असे आव्हान स्वीकारले की, एका वर्गातील 80 मुलांना गणितामध्ये 80 टक्क्यापेक्षा जास्त मार्क मिळतील असे ते प्रयोगातून सिध्द करतात. आपल्या राज्यात पुण्यामध्ये संस्था असून ती अतिशय निष्क्रिय स्वरुपाची आहे. तेथे कोणत्याही प्रकारचे काम होत नाही. म्हणून इतर जे लोक सेवाभावी वृत्तीने काम करीत आहेत, ज्यांना गरिबांविषयी काळजी आहे, जे आदिवासी भागामध्ये काम करतात अशा लोकांना एकत्रित बोलवावे अशी मी माननीय शिक्षण श्री.राजेंद्र दर्डा साहेबांना विनंती करतो.मग त्यांच्या माध्यमातून, शिक्षण संघटनेच्या माध्यमातून, गुणवत्तेच्या बाबतीत आपण प्रयोग करावा अशी विनंती करतो. तसेच पुन्हा एकदा मी आदरणीय शिक्षण मंत्र्यांचे मनापासून अभिनंदन करतो. कारण त्यांनी खूप चांगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निर्णय घेतलेले आहेत आणि आपल्याच काळात शिक्षणाला नवीन दिशा मिळू शकते अशा प्रकारची याठिकाणी आशा व्यक्त करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, आज सभागृहासमोर मांडण्यात आलेला प्रस्ताव कितीही विस्तृत असला तरी मी सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांना थोडेसेच धन्यवाद देणार आहे. ते एवढ्यासाठीच की आपल्याला शिक्षकांवर बोलावयाचे नाही तर शिक्षणाबाबत बोलण्याचा प्रयत्न करु. कारण येथे शिक्षकांवर बोलणारे भरपूर आहेत आणि ते अजीर्ण होण्याऐवढे बोलतात. कालतर या सदनामध्ये ऐकून मला धक्का बसला आणि मला माननीय मंत्री महोदयांनी काय उत्तर दिले ते समजलेच नाही. ते असे म्हणाले की, आमच्या भागातील शाळांमध्ये के.जी.साठी अभ्यासक्रम नाही आणि त्यामुळे शिक्षकांना काम नाही. परंतु के.जी.साठी देखील अभ्यासक्रम असू शकतो हे मला पहिल्यांदाच कळले आणि ते सगळे रेकॉर्डवर आहे. अशा प्रकारे शिक्षण क्षेत्राची पातळी के.जी.पर्यंत गेल्यानंतर आपण आता शिक्षणावर बोलू या म्हणजे शिक्षक, त्यांचा पगार वगैरे बाकी सगळ्या गोष्टी त्यामध्ये येतात.

सभापती महोदय, माझा मूलभूत विषय हा मराठी शाळा आणि मराठी शिक्षण असा आहे. काल मी येथे अत्यंत तीव्रतेने म्हणालो की, स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दीचे कोडकौतुक या वर्षामध्ये शासनाकडून होत असतानाच, त्यांना अवमानित करण्यासारखे माननीय शिक्षण मंत्री या सदनामध्ये बोलतात तेव्हा ते वेदनादायक असते. अशा वेळी सरकारची मराठी भाषेकरता दुर्बलता आणि अगतिकता जाणवते त्यावेळेला मी या सदनामध्ये देखील शब्द उच्चारु शकत नाही, इतकी सरकारची नकारात्मक भूमिका असल्याचे जाणवते तेव्हा मराठी संस्कृतीचा, मराठी भाषेचा आणि 11 कोटी मराठी जनतेचा तो एक प्रकारे अवमान आहे आणि मी याबाबतीत सांगण्याचा प्रयत्न करणार आहे.तसेच मी मूलभूत विषयाबाबत विचार मांडणार असल्याने वेळेच्या बाबतीत थोडे मागे-पुढे होईल परंतु मी जो विषय मांडणार आहे तो कोणीच मांडणार नाही.

सभापती महोदय, या महाराष्ट्रामध्ये मराठी शाळा चालाव्यात हे तुम्हाला-आम्हाला सगळयांनाच वाटते. त्यादृष्टीने महाराष्ट्र राज्याने दि. 29 एप्रिल 2008 रोजी परिपत्रक काढले व राज्यामध्ये नवीन प्राथमिक व माध्यमिक शाळा सुरु करण्यासाठी किंवा नव्याने वर्ग सुरु करण्यासाठी प्रत्येकी 5 हजार रुपये शुल्क देण्याबाबत प्रस्ताव मागविले.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

आपण प्रस्ताव मागितले. त्यानंतर दिनांक 20 जुलै 2009 च्या परिपत्रका नुसार 8 हजार आलेले प्रस्ताव रद्द केले. मराठी शाळा काढण्यासाठी 8 हजार प्रस्ताव येतात याचा अर्थ मराठी शाळांची मागणी आहे. मराठी शाळा काढणारे संस्थानिक आहेत. महाराष्ट्रातील मुलांना मराठी भाषा शिकवावी असे त्यांना वाटते म्हणून एवढे प्रस्ताव आलेले आहेत. परंतु शासनाने ते प्रस्ताव रद्द केले. दिनांक 19 जुलै 2000 रोजी अमान्य मराठी शाळा अनधिकृत घोषित करुन त्या ताबडतोब बंद करण्यात आल्या. शाळा सुरु झाल्या असताना त्या बेकायदेशीर म्हणून घोषित करण्यात आल्या. राज्याचे सुवर्ण महोत्सवी वर्ष सुरु आहे. या वर्षात राज्यातील मराठी शाळांचे अस्तित्व संपविण्याचा प्रयत्न विभागाच्या माध्यमातून झालेला आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सांगण्यात आले की, 28 शाळांवर कारवाई करणार, संबंधितांना बेड्या घालणार, त्यांना तुरुंगात टाकणार. संस्थाचालकांवर 420, 406, 35 चा गुन्हा दाखल करण्यात येईल असे सांगण्यात आले. महाराष्ट्रात मराठी शाळा काढल्या हा त्यांनी गुन्हा केला काय ? शासनाने मराठी शाळांना विरोध करताना त्यांनी काय केले ते मी सांगतो. शासनाने इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरु करण्यासाठी आमंत्रण देणारे परिपत्रक काढले. जुलै 2009 मध्ये मराठी शाळांचे प्रस्ताव रद्द केल्यानंतर ऑगस्ट 2009 मध्ये 1190 इंग्रजी माध्यमांच्या शाळांना त्याच बरोबर हिंदी, कन्नड आणि गुजराती अशा 34 शाळांना मान्यता दिली. इंग्रजी शाळांना मान्यता दिल्याची तक्रार नाही. 1190 इग्रंजी शाळांना मान्यता दिल्यानंतर महाराष्ट्रात मराठी शाळा काढणाऱ्यांना बेड्या घालणार असे सांगणारे सरकार इतर भाषिक शाळा काढण्यासाठी मान्यता देते. तेव्हा आम्ही नक्की काय समजायचे ? घटनेमध्ये नमूद केलेले आहे की, शिक्षणासाठी 6 टक्के तर आदिवासी विभागाकरिता 9 टक्के तरतूद केली पाहिजे. माननीय मंत्री महोदयांना हे माहीत आहे. त्यानुसार शिक्षणावर 6 टक्के खर्च झाला पाहिजे. या अर्थसंकल्पामध्ये तेवढी तरतूद करण्यात आली काय याचा खुलासा मंत्री महोदयांनी येथे करावा. मराठी शाळांची इतकी गळचेपी होत आहे. या सभागृहात महापुरुषांच्या तसबिरी लावलेल्या आहेत. या महापुरुषांनी स्वातंत्र्य मिळविण्यासाठी भरपूर लढा दिला, त्याग केला. आपला त्यावेळी जन्म देखील झाला नव्हता.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आम्ही समाजाला काय देणार हे त्यांनी सांगितले. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले मला सहकार्य करतील. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जनतेला त्यांच्या मातृभाषेतून शिक्षण मिळेल आणि व्यवहार करता येईल असे आश्वासन त्यावेळच्या कॉंग्रेस अधिवेशनात देण्यात आले होते. आता होणारे कॉंग्रेस अधिवेशन आणि त्या वेळी होणारे कॉंग्रेसचे अधिवेशन यात मोठा फरक आहे. त्यावेळी मोठमोठ्या नेत्यांची नावे होती. आता श्री. कृपाशंकर सिंह, आता कॉंग्रेसचे कसे अधिवेशन असेल,

श्री एस.क्यू जमा (बसून) : वे आपके जमाने के है.

श्री.दिवाकर रावते : आपके जैसे कार्यकर्ता को अपने दिल में कैसा लगता होगा, कितनी यातना होती होगी, यह बात हम समझ सकते हैं ." कॉंग्रेसने त्यावेळी दिलेले आश्वासन पाळले. त्यानंतर भाषावर प्रांत रचना करुन त्या दिशेने पाऊल टाकले. परंतु महाराष्ट्र राज्याने मराठी विरोधी धोरण राबवून मराठीची गळचेपी केली आहे. या ठिकाणी महापुरुषांच्या तसबिरी आहेत त्यांचा अपमान होत आहे. त्यांच्या आत्म्यांना काय वाटत असेल ? आपण आत्मा वगैरे मानता की नाही हे मला माहीत नाही.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

(अडथळा) ती जी स्फूर्ती आहे, तुमच्याकडे गांधी शिवाय काही चालतच नाही मग ते ओरिजनल गांधी असो की डुप्लीकेट. माननीय मंत्री महोदय, राजेंद्र दर्डा आपण बोलल्यानंतर मी लगेच उत्तर देणार पण त्यामुळे कदाचित तुम्ही अडचणीत याल.

सभापती महोदय,शिक्षणाचा मूलभूत हक्क असताना मराठी शाळांवर बंदी घालण्यात येते. कायद्याच्या कलमाचा दुर्दैवाने चुकीचा अर्थ लावून महाराष्ट्र शासनाने मराठी शाळांना लाखो रुपयाचा दंड आकारण्याची व शाळा चालविणाऱ्या संस्थांना तुरुंगात डांबण्याची कारवाई सुरु करणाऱ्या नोटिसेस देण्यात आल्या आहेत. या नोटिसेस माझ्याकडे आहेत. या सर्व शाळा सर्वोच्च न्यायालयात गेल्या. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल काय आला, मराठी शाळांना अडविण्याचा एवढा मस्तवालपणा प्रशसकीय अधिकाऱ्यांमध्ये का आला आहे? दिनांक 7 सप्टेंबर, 2010 रोजी सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिलेला आहे. दिनांक 8 एप्रिल, 2010 रोजीच्या उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या निवाड्यातील मुद्यामध्ये या निर्णयाचा उल्लेख आहे. तो उल्लेख मी या ठिकाणी करीत आहे. "आपल्या इच्छेने शैक्षणिक संस्था चालविणे हा नागरिकांचा मूलभूत अधिकार आहे. त्या संदर्भात शासनाच्या अटी वाजवी आणि यथार्थ असाव्यात व सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या दृष्टीने ठरविलेल्या असाव्यात. विनाअनुदानित खाजगी शाळांनी संबंधित अटींची पूर्तता केल्यास प्रथम तात्पुरत्या तत्वावर मान्यता द्यावी लागेल. विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित खाजगी शाळांचे प्रस्ताव विचारात घेण्याच्या बाबतीत कुठल्याही प्रकारच्या योजनेच्या आराखडयाचे निमित्त देता येणार नाही." या ठिकाणी बृहत आराखडा काढण्यात आलेला आहे. डोंगरावरुन अंतर मोजावयाचे, हवाई अंतर मोजावयाचे असा जो काही बृहत आराखडा तयार केलेला आहे त्याच्या खोलात मी जात नाही. पण खंडपीठाने सांगितलेले आहे की, बृहत आराखडा वगैरे सांगावयाचे नाही. मराठी माध्यमांच्या शाळांचे सर्व प्रस्ताव सरसकटपणे रद्द करण्याचा व आराखडा तयार झाल्यावर त्याबद्दल विचार करण्याचा राज्य शासनाचा दिनांक 20 एप्रिल, 2002 चा निर्णय आक्षेप घेणारा, अवैध, भेदभाव करणारा असल्यामुळे घटनाबाहय, मनमानी तसेच अविचारीपणाने केलेला आहे. शासनाने काढलेला हा निर्णय खंडपीठाने उखडून लावलेला आहे.

सभापती महोदय, आम्ही राज्य शासनाला, आम्ही म्हणजे खंडपीठ. खंडपीठ असे म्हणते की, "आम्ही राज्य शासनाला अशी सूचना देतो की, त्यांनी विनाअनुदानित तत्वावर मराठी शाळा

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते. . .

चालविण्यासाठी मिळालेल्या सर्व प्रस्तावाचा ताबडतोब विचार करावा आणि त्यांना दिनांक 31 मे, 2010 पर्यंत निर्णय कळवावा म्हणजे मान्यता मिळालेल्या शाळा जून, 2010-2011 या वर्षात चालू होऊ शकतील" असा खंडपीठाने स्पष्ट निकाल दिलेला असताना सुध्दा शासनाची मनमानी चालू राहिली.

सभापती महोदय, मी योगायोगाने अचानक संभाजीनगर येथे गेलो होतो. सर्व शिक्षक माननीय मंत्री महोदय, श्री. राजेंद्र दर्डा यांच्या दरवाज्यात उपोषणाला बसले होते. माननीय मंत्री महेदय, मला एका गोष्टीचा आनंद आहे. जे शिक्षक उपोषणाला बसले होते त्यांचा मला फोन आला होता तेव्हा मी त्यांना असे सांगितले की, मी सभांजीनगरला 4.00 वाजता पोहचत आहे त्यानंतर मी येईन. त्याच्या अगोदरच आपण त्यांना दूरध्वनीवरुन मी येथे नाही अन्यथा मी आपल्याला अवश्य भेटायला आलो असतो असे सांगितले होते. या आदोलनात संभाजीनगरमध्ये आपण त्यांचा आदर केल्याबद्दल मी मनापासून आपल्याला धन्यवाद देतो. पण ते तिकडे जाऊन बसले. मुंबईत न्याय मिळत नाही म्हणून ते औरंगाबादला माननीय मंत्री महोदयांच्या दारात जाऊन उपोषणाला बसले आणि तेथे न्याय मिळविण्याचा प्रयत्न केला. अनायसे मी संभाजीनगरमध्ये होतो म्हणून तेथे गेलो होतो. त्यांनी मला सांगितले होते की, कोणा तरी जिल्हा प्रमुखाला पाठवा, अमुक पाठवा, तमुक पाठवा, मी त्यांना काहीच न सांगता तेथे गेलो तेव्हा त्यांना आश्चर्य वाटले. त्यानंतर त्यांनी असे सांगितले की, आम्हाला माननीय मंत्री महोदयांचा फोन आला होता, त्यांनी असे सांगितले की, मी औरंगाबादमध्ये असतो तर तुम्हाला भेटायला आलो असतो. पण नंतर आपण स्वत: त्यांना भेटायला गेलात त्याबद्दल मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, मी या ठिकाणी आग्रहाने का बोलत आहे? माझी अधिकाऱ्यांनाही विनंती आहे की, ज्या मराठी आईच्या कुशीतून जन्माला आलो ती आपली भाषा, तो आपला धर्म, ती आपली संस्कृती, ती तुम्हाला-आम्हाला आपल्या जन्मापासून नैसर्गिकरित्या मिळते. सभापती महोदय, मी हे यासाठी सांगत आहे की, पुन्हा एक जो अन्याय करण्यात येत आहे तो मी या ठिकाणी निदर्शनास आणण्याचा प्रयत्न करणार आहे. कोणताही विषय इंग्रजीतून शिकताना जितका समजतो त्यापेक्षा तो मातृभाषेतून म्हणजे आपल्या करिता मराठी भाषेतून जास्त चांगला समजतो.

यानंतर श्री. बरवड....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

मार्च, 2011 मध्ये झालेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेत विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांनी मराठीतून पेपर लिहिले. हा एक नवीन विषय आहे की, आपल्या मुलांना मराठी भाषेतून परीक्षा देता येते. ज्याला आपण सायन्स म्हणतो त्या विज्ञान विषयाची परीक्षा मराठीमधून देता येते. नापास झालेले जे विद्यार्थी मराठीतून परीक्षा देतात ते मोठ्या प्रमाणावर पास होतात असा अनुभव आहे. या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे सांगतील. हा अनुभव आहे कारण शेवटी त्या भाषेशी नाळ जुळलेली असते आणि त्याला ती भाषा लवकर कळते. इंग्रजीमध्ये एक वाक्य लिहिण्यासाठी त्याला जेवढा वेळ लागतो तेवढ्या वेळेत तो मराठीमध्ये भराभर चार वाक्ये लिहू शकतो. त्यामुळे ते पास होतात. अशी शैक्षणिक व्यवस्थाच आहे. बारावी विज्ञान शाखेत भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित, जीवशास्त्र या विषयांच्या परीक्षेला गेल्या वर्षी 2500 विद्यार्थी बसले आणि त्यांनी आग्रह केला की, आम्हाला आमच्या भाषेमध्ये पेपर लिहावयाचे आहेत. मग आडवळणाने त्यांना परवानगी देण्यात आली. इतकी गंभीर परिस्थिती आपण निर्माण करतो. त्यावेळी हे विद्यार्थी परीक्षेला बसले आणि त्यांना यश सुध्दा मिळाले. मराठीमध्ये बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी 80 टक्के विद्यार्थी पास होतात. त्यांचा जो निकाल लागला त्यावरुन ते सिध्द झालेले आहे. मराठी भाषेमध्ये जर हे विद्यार्थी परीक्षेला बसले तर ते जास्त प्रमाणात पास होतात. आपले विद्यार्थी जास्त पास व्हावेत असा आपला ध्यास असला पाहिजे. शेवटी शिक्षण मंत्री म्हणून महाराष्ट्रातील जास्तीतजास्त विद्यार्थी शिक्षित करणे हाच आपला ध्यास असला पाहिजे. शिक्षण खात्याचे हेच ध्येय असले पाहिजे. जास्तीत जास्त शिक्षक नेमणे, त्यांचा पगार वाढविणे, त्यांना वेतनवाढ देणे, त्यांच्या सुट्टयांबाबत बघणे हे सर्व आलेच. सेवा प्रवेश नियमाप्रमाणे जे देय असेल ते द्यावे लागते. ते शासन देत नाही म्हणून सन्माननीय सदस्यांना या ठिकाणी बोलावे लागते. एकदा तरी अशी परिस्थिती निर्माण करावी की जे कायद्याने देय आहे ते द्या म्हणजे त्यांना एक शब्दही बोलता यावयास नको. कशाला आमदार झालो असे त्यांना वाटले पाहिजे. पण ते आमदार झाले आणि शासन आपल्याला एवढे सगळे करु देते म्हणून त्यांना आनंद होतो. आपण मतदारसंघ बांधण्याची व्यवस्था करता.

सभापती महोदय, विधान परिषदेमध्ये कोण सदस्य असावेत या संदर्भात शिक्षक मतदारसंघ रद्द करावा अशा प्रकारची शिफारस लोकसभेकडे गेलेली आहे. तो गांभीर्याने घेण्याचा विषय नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

ते सन्माननीय सदस्य या ठिकाणी असल्याचा आम्हाला आनंद आहे. त्यांचे या विधान परिषदेतील कर्तृत्वच एवढे आहे आणि त्याचा परिणाम एवढा भयंकर झाला की हे नकोच असे वाटावयास लागले. याची नोंद आपण घेतली पाहिजे. हा महत्वाचा मुद्दा आहे म्हणून थोडे वेगळ्या पध्दतीने मांडतो. मी एका बाबतीत आग्रह धरला होता. सर्वसामान्य लोकांना आमदार निवडण्याचा अधिकार, मतदानाचा अधिकार एकदाच मिळतो. या वरिष्ठ सभागृहाकरिता शिक्षक मतदारसंघ, पदवीधर मतदारसंघ असे वेगवेगळे मतदारसंघ निर्माण केले. आपले सगळे साम्राज्य असले पाहिजे, मध्ये कोणी घुसता कामा नये म्हणून जे शिक्षक मतदारसंघातील मतदार आहेत ते पदवीधर मतदारसंघामध्ये सुध्दा मतदान करतात. ते म्हणतात की, आम्ही घटनात्मकदृष्ट्या पदवीधर आहोत. पण तसे नाही. हे मी वेगळ्या अर्थाने म्हणत आहे. आपण ते समजून घ्यावे. सर्व पदवीधर शिक्षक होत नाहीत. शिक्षक होण्याकरिता त्यांना डी.एड., बी.एड. करावे लागते. आपण मुंबई विद्यापीठामध्ये पी.एचडी. नसलेले कुलगुरु नेमलेले आहेत. जगाच्या पाठीवर मुंबई विद्यापीठाचा दाखला बघितल्यानंतर अमेरिकतील युनिव्हर्सीटीज सुध्दा त्यापुढे फिक्या पडतात. त्या मुंबई विद्यापीठामध्ये असे कुलगुरु नेमलेले आहेत. लष्कर प्रमुखांच्या जन्म तारखेचे प्रकरण झाले होते त्याप्रमाणे ते पी.एचडी आहेत की नाही या संदर्भात प्रकरण कोर्टात आहे.? त्या ठिकाणी त्यांचा प्रबंध ठेवलेला असतो. ते म्हणतात की, मी पी.एचडी आहे. ते पी.एचडी नाहीत असे पुढे आलेले आहे. न्यायालयाचा निर्णय होईपर्यंत ते निवृत्त होतील.

सभापती महोदय, जर आपल्याला या महाराष्ट्रातील शिक्षणाची उंची वाढवावयाची असेल तर त्या दृष्टीनेच आपण विचार केला पाहिजे. या ठिकाणी गोपाळकृष्ण गोखले, रानडे, रँग्लर परांजपे अशी मोठमोठी माणसे होऊन गेली. त्या वेळचा फर्ग्युसन कॉलेजचा दबदबा बघितल्यानंतर आपण आता कोणत्या पातळीवर या सभागृहामध्ये चर्चा करीत आहोत याचे वाईट वाटते. कुलगुरुंना पदवी घेतली की नाही यासाठी न्यायालयामध्ये जावे लागते आणि आपण त्याचे समर्थन करतो. त्यांना घरी बसवा.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

उद्या जर न्यायालयामध्ये त्यांच्याजवळ पीएचडी. ही पदवी नसल्याचे सिध्द झाले तर ते इतकी वर्षे बेकायदेशीरपणे त्या पदावर काम करीत होते, त्याबाबत शासन काय करणार ? त्यांच्या विषयीचा विषय आम्ही काल सभागृहात उपस्थित केला होता. परंतु त्याबाबत आज मला काही म्हणावयाचे नाही.

सभापती महोदय, या विद्यार्थ्यांना मराठी भाषेतून परीक्षा देण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे तो त्यांना दिला पाहिजे. पण तो लपविला जातो. ज्यांना हा अधिकार असल्याचे माहीत आहे ते त्यांचा बरोबर वापर करतात. महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाने बारावीच्या शास्त्र शाखेच्या विद्यार्थ्यांना मराठी भाषेतून परीक्षा देण्याची सोय 1977 पासून सुरु केलेली आहे. या निर्णयाची सभागृहातील किती सन्माननीय सदस्यांना माहिती आहे ते मला माहीत नाही. आपल्या भागातील विद्यार्थ्यांना मराठी भाषेतून परीक्षा देता येते. पण बऱ्याच जणांना ते माहीत नाही. मला आठवते की, पूर्वी एस.एस.सी.च्या परीक्षेच्या वेळी ज्यांना गणित किंवा इंग्रजी हे विषय कठीण वाटतात त्यांना ते विषय सोडून इतर विषय घेऊन परीक्षा देण्याची मुभा होती. अशा विद्यार्थ्यांना स्पेशल भूगोल हा विषय घेता येत होता किंवा ज्यांचे गणित चांगले आहे त्यांना साधारण गणिताशिवाय स्पेशल गणित हा विषय घेता येत होता. त्यावेळी मी आठवा विषय म्हणून स्पेशल गणित हा विषय घेतला होता. त्यावेळी विद्यार्थ्यांना कठीण वाटत असलेले विषय सोडून इतर विषय घेण्याची मुभा होती. मात्र 7 विषयांची परीक्षा देणे आवश्यक होते. 1977 सालापासून मराठी भाषेतून परीक्षा देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. आजवर सर्वसाधारण माणसांना किंवा विद्यार्थ्यांना याची कल्पना नाही. परंतु त्याचा परिणाम काय होणार आहे ते मी सांगत आहे.

आपल्या पोलीस दलात पोलीस डॉग स्क्वॅड आहे. They are only trained for working in the Bomb Squad. ते बॉम्ब शोधून काढतात. त्यांना बाकीचे काम काही जमत नाही. मराठीसाठी आम्ही दुर्दैवाने हेच करतो. मराठी भाषेसाठी आम्हाला शोध पथक म्हटले तरी चालेल. कारण सत्य शोधण्यासाठी असाच प्रयत्न करावा लागतो. 1977 पासूनची ही व्यवस्था विद्यार्थ्यांना माहीत नाही, स्वत:हून ही माहिती देण्याची व्यवस्था राज्य शिक्षण मंडळाकडे नाही, सरकारने ती केली नाही. माननीय शिक्षण मंत्र्यांनी हा विषय गांभीर्याने घ्यावा असे मी त्यांना

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सांगेन. याबाबत पुढे काय केले जाणार आहे ते जर आपण सांगितले तर मला आनंद होईल. कारण हजारो विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न मिटेल. तुम्ही के.जी.पासून इंग्रजी भाषेचा उदो उदो करीत असला तरी पुढे गेल्यावर तो अडकतो. त्या विद्यार्थ्याला इंग्रजी भाषा येतच नाही. आमच्या काळामध्ये तर्खडकरांची 4 पुस्तके शिकणारा माणूस इंग्रजी भाषेच्या बाबतीत ब्रिटिशांना फाडून खात होता. सध्या तर इंग्रजी भाषेचे स्कील्ड शिक्षकांकडे सुध्दा नाही. आमचे वडील अशिक्षित होते. परंतु ते आम्हाला तर्खडकरांची पुस्तके पाठ कर असे म्हणत असत. त्या काळात तर्खडकरांची पुस्तके प्रत्येक घराघरात असायची. त्यांची चार पुस्तकांची मालिका पाठ केली तर तो माणूस रॅग्लरच होत असे. तर्खडकरांच्या भाषांतरामुळे इंग्रजांना सुध्दा भीती वाटत असे. आता तशी परिस्थिती नाही. शिक्षकांना सुध्दा आता प्रश्न पडतो. वॉट्सन शिक्षकांना माहीत नाहीत. शिक्षकांना इंग्रजी कादंबरी वाचता येत नाही. मी छातीवर हात ठेवून सांगतो की, एखाद दुसरा अपवाद वगळता दहावी किंवा बारावी इयत्तेच्या विद्यार्थ्यांना शिकविणाऱ्या इंग्रजी शिक्षकाने मला नॉवेल वाचून दाखवावे व समजून सांगावे. हे इंग्रजी भाषेचे ज्ञान आहे. आम्ही वाचत होतो म्हणून सांगतो.

मी हिंदी सामाजिक कादंब-याही वाचतो. हिंदी भाषेतील उपन्यास वाचण्यासारखे असतात. त्यातून आपल्याला समाज कळतो. आमच्या काळात मी प्रेमचंद यांच्या कादंबऱ्या वाचलेल्या आहेत. आपण भाषा भाषा असे म्हणतो ते ज्ञानाचे भंडार आहे. त्या काळात इंग्रजी भाषेतील कविता तोंडपाठ असायच्या. हे तर्खडकरांमुळे होत होते. आता ग्रामर हा विषय गेलेला आहे. आता पर्यायी शब्दांचा अभ्यासक्रम सुरु झाला आहे. आता एसएमएस पाठविले जातात किंवा जाहिराती केल्या जातात त्या इंग्रजीमध्ये लिहिलेल्या हिंदी जाहिराती असतात. आता लोकांमध्ये इंग्रजी भाषा अशाप्रकारे आली आहे. त्या भाषेचा अपभ्रंश झाल्यामुळे ती भाषा संपली आहे. त्यामुळे इंग्रजी भाषा आपल्या मुलांना पुढे टिकवत नाही. अर्थात हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम....

श्री. दिवाकर रावते...

शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांना हा प्रश्न आहे. आम्हाला जे काही अनुभव आलेले आहेत ते आम्ही सांगतोय. सरकारने राज्य शिक्षण मंडळाला जे सांगितले पाहिजे ते सांगत नाही. उच्च शिक्षण हे केवळ इंग्रजीतून मिळते असा सर्वांचा गैरसमज आहे. 12वीची परीक्षा मराठीतून देण्याचा पर्याय निवडला न गेल्यामुळे पुण्याचे श्री. अनिल गोरे यांनी प्रचंड प्रयत्न केले.ते दोन वर्षे सातत्याने मागे लागले, गावोगाव फिरले. विद्यार्थ्यांना मराठीत परीक्षा देण्यास सांगितले. त्याचा चांगला परिणाम झाला आणि कालच्या भौतिक शास्त्राच्या परीक्षेला 1283 विद्यार्थ्यांनी मराठीतून परीक्षा दिली. रसायन शास्त्राची परीक्षा 1274 विद्यार्थानी मराठीतून दिली, गणिताची परीक्षा 1254 आणि जीवशास्त्राची परीक्षा 1066 विद्यार्थ्यांनी मराठीतून दिली. म्हणजे मराठीतून परीक्षा देण्याची व्यवस्था आहे.

जेव्हा विद्यार्थी 10वीमध्ये जातो त्यावेळी त्याला 12वीची परीक्षा मराठीतून देता येते ही माहिती अधिकृतपणे त्याला दिली गेली पाहिजे. असे परिपत्रक काढा की तुमच्या शाळेतील 10वी मधील विद्यार्थी 12वीची सर्व विषयांची परीक्षा मराठीतून देऊ शकेल. सभापती महोदय, 27.9.2011ला स्मरणपत्र देऊन पालकांचे एक शिष्टमंडळ गेले आणि त्यांनी राज्य शिक्षण मंडळाच्या अध्यक्षांची भेट घेतली. त्यांनी काढलेले परिपत्रक अपूर्ण होते. 12वी शास्त्रशाखेच्या परीक्षेसाठी भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, गणित आणि जीवशास्त्र विषयांच्या प्रश्नपत्रिका मराठीतून काढल्या जातात इतकीच माहिती दिली आहे. विद्यार्थी ही परीक्षा मराठीतून देऊ शकतील त्यासाठी परीक्षा अर्जात कोठे नोंद करावी ही माहिती देण्यात आली नाही. 11वी 12वीच्या विद्यार्थ्यांना ही माहिती देण्याच्या संदर्भात शासनामार्फत कोणती व्यवस्था केली जाणार आहे ? फर्ग्युसन आणि देसाई महाविद्यालय या ठिकाणी समक्ष भेटून मुलांना वरील माहिती देण्याची मागणी केली असता परिपत्रकात सूचना नाही, म्हणून माहिती देण्यात आली नाही असे उत्तर मिळाले. शासनाने परिपत्रकात अशी सूचना टाकली पाहिजे की, विद्यार्थ्याला कोणत्याही विषयाची परीक्षा मराठीतून देता येईल. असे वाक्य परिपत्रकामध्ये नसल्यामुळे विद्यार्थ्यांना मराठीतून परीक्षा देता आली नाही. इतर राज्यांनी सर्व उच्च शिक्षण स्थानिक राज्य भाषेत उपलब्ध केले, म्हणूनच अनेक राज्यातील विद्यार्थी आता आपल्या पेक्षा अधिक प्रगती करत आहेत. गेल्या 25 वर्षात मराठीतून उच्च शिक्षणाची सोय न केल्याने महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण क्षेत्रात पहिल्या क्रमांकावरुन दहाव्या क्रमांकावर घसरले आहे. इतर राज्यामध्ये त्या त्या भाषातून शिक्षण घेण्याची सोय असल्यामुळे ते लोक आपल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

पुढे जातात.

या संदर्भात मी राज्य शिक्षण मंडळाला एक पत्र लिहिले होते. त्याचे उत्तर मला प्राप्त झाले. मी ते वाचून दाखवतो. "विषय: उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी परीक्षांच्या विषयांची परीक्षा मराठी माध्यमातून देणेबाबत, संदर्भ : आपले जा.कमांक 15/2011 दि. 28.09.2011चे पत्र, उपरोल्लिखित विषयाचे संदर्भीय पत्र या कार्यालयास प्राप्त झाले आहे. त्यानुसार सदर विषयाबाबत सर्व घटकांना माहिती होण्याचे दृष्टीने त्यांचे कार्यकक्षेतील सर्व कनिष्ठ महाविद्यालयांच्या निदर्शनास सदर बाब आणून द्यावी असे दिनांक 24.11.2011चे पत्रान्वये सर्व विभागीय मंडळांना कळविलेले आहे." सभापती महोदय, सर्व विभागीय मंडळांना असे कळविण्यात आलेले असले तरी विभागीय मंडळ ते मानायला तयार नाही. हे काय चालले आहे ? म्हणून या निमित्ताने मी एवढीच सूचना करु इच्छितो की, 11वी 12वीतील प्रत्येक विद्यार्थ्याला त्या त्या वर्ग शिक्षकाने माहिती कळवावी अशी लेखी सूचना संबंधित शाळा महाविद्यालयांना द्यावी. तसेच 11वी प्रवेशाच्या आवेदनपत्राच्या पहिल्या पानावर ही माहिती छापण्याची शासन यंत्रणेने सूचना द्यावी.विज्ञान विषयाची परीक्षा मराठीतून देता येईल हे विद्यार्थ्यांना स्पष्टपणे सांगितले पाहिजे.

...नंतरश्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

शिक्षण संचालक, उप संचालक कार्यालयामार्फत वरील सर्व शिक्षकांपर्यंत आणि त्या संस्थांपर्यंत जनजागृती मोहीम राबविण्यात यावी. याबाबत आवश्यक पत्रव्यवहार व प्रयत्न करावेत. आपल्या संकेतस्थळावर 12 वी व 11 वी बाबत मजकुराच्या जागी ठळक स्वरुपात वरील विषयाची जी जी माहिती आहे ती स्पष्ट व लक्षवेध राहील अशा पध्दतीने प्रदर्शित करावी. 12 वी गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र या विषयाची परीक्षा मराठीतून व अन्य भाषेतून देता येते याची माहिती संकेतस्थळावर आणि खात्याच्या शीर्षक पत्रावर तसेच राज्यातील सर्व वृत्तपत्रातून जनतेला दिली जावी. ही माहिती राज्यातील सर्व जिल्हा माहिती अधिकारी यांच्यामार्फत दृकश्राव्य माध्यमातून जनतेसाठी प्रसिध्द करावी अशा प्रकारची मूलभूत सूचना मी शासनाला करतो.

सभापती महोदय, मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा बालकांचा हक्क कायदा 2009 हा केंद्र सरकारने 1 एप्रिल, 2010 पासून लागू केलेला आहे. तो कायदा माननीय सदस्यांना मिळालेला नाही म्हणून मी हा विषय मांडतो. या कायद्यातील कलमांची पूर्तता शासनाने केली आहे का? हा माझा प्रश्न आहे. मूळ कायद्याच्या कलम 38(4) मध्ये म्हटले आहे की, राज्य सरकारने या कायद्यांतर्गत केलेला प्रत्येक नियम किंवा प्रत्येक निर्णय हा राज्याच्या विधानसभेपुढे ठेवला पाहिजे. त्याप्रमाणे शासनाने नियम सभागृहापुढे ठेवले आहेत का? सभागृहापुढे नियम आलेले नाहीत अशी आमची माहिती आहे. अन्यथा विधिमंडळाच्या उपविधान समितीपुढे ते सादर झाले असते. मंत्री महोदयांनी याबाबत खुलासा करावा. शिक्षण हक्क कायद्याच्या कलम 25(1) नुसार सरकारने हा कायदा अंमलात आणल्यापासून सहा महिन्याच्या आत म्हणजे 30 सप्टेंबर, 2010 पर्यंत सर्व शाळांमधून या कायद्यानुसार विहित केलेले विद्यार्थी व शिक्षक यांचे प्रमाण 30:1 असे करायचे आहे. शासनाने हे प्रमाण निश्चित केले आहे काय? मंत्री महोदयांनी या प्रश्नाचे उत्तर द्यावे.

सभापती महोदय, शिक्षण हक्क कायद्याच्या कलम 34(1) नुसार प्राथमिक शिक्षण व बालविकास या क्षेत्रातील तज्ज्ञ व प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्यांचे एक सल्लागार मंडळ नेमावयाचे आहे. शासनाने सल्लागार मंडळ नेमले आहे काय? या सल्लागार मंडळाच्या सल्ल्याने या कायद्यातील तरतुदी अंमलात आणावयाच्या आहेत. तरतुदींची अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली आहे काय? अनधिकृत शाळांवर कारवाई करण्याचे परिपत्रक मूळ कायद्याची बूज राखणारे आहे की नाही? म्हणून मी विनंती करतो की, स्व.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

करण्यासाठी 100 कोटी रुपयांची गरज नाही. त्यांचे विचार अंमलात आणणाऱ्या प्रयत्नांची गरज आहे. इंग्रजी शाळांना मुक्तपणा देत असाल तर मराठी शाळांबाबत कायद्याचा बडगा आणू नये. मराठी शाळांबाबत कारवाई करणारे जे परिपत्रक काढले आहे ते मागे घेता येत नाही असे मंत्री महोदयांनी सांगू नये. शेवटी आपण राज्यकर्ते आहात, शासनकर्ते आहात. विधिमंडळामध्ये कायदे तयार केले जातात. शाळांसाठी तुम्ही कायदे बदलू शकता. मराठी शाळांकरिता कायद्याचा बडगा कशासाठी दाखविता? हा मूलभूत प्रश्न आहे. लोकांनी निवडून दिलेले लोकप्रतिनिधी या सभागृहात बसतात. या सभागृहाची ताकद किती मोठी असू शकते हे दाखवून द्या. सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर घटना दुरुस्ती केली जाते. घटनेने बहाल केलेल्या अधिकारानुसार सर्व मुलांना शिक्षणाचा हक्क देण्याकरिता मराठी शाळांचा गळा घोटणे थांबवावे अशी विनंती करतो. कायद्यातील कलमांचे कारण देऊ नये. 28 मराठी शाळांवर आम्ही कारवाई करणार असे मंत्री महोदयांनी सांगितले ते विधान मागे घ्यावे. स्व.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे होत असताना मराठी शाळांवर कारवाई करुन त्यांना अपमानित करु नका, एवढे बोलून माझे भाषण संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

नंतर श्री.खर्चे...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सभागृहाच्या विशेष बैठकीची वेळ 11.30 पर्यंत होती. मी सभागृहाची वेळ 7 मिनिटांसाठी वाढवितो. त्यानंतर 11.45 वाजता सभागृहाची नियमित बैठक पुन: भरेल.

श्री. राजेंद्र दर्डा : महोदय, सभागृहात शिक्षण विभागाशी संबंधित चर्चा चांगल्या पातळीवर सुरु असल्याने माझी अशी विनंती आहे की, अजून अनेक सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. त्यामुळे या चर्चेसाठी सभागृहाची वेळ वाढवावयाची असेल तर ती वाढवून द्यावी. पण आता 11 वाजून 30 मिनिटे झालेली आहेत, खालच्या सभागृहात मला जायचे असल्याने ही चर्चा आजच प्रश्नोत्तरानंतर पुन्हा घ्यावी अशी विनंती करतो.

श्री. दिवाकर रावते : आजच्या कार्यक्रम पत्रिकेत दाखविल्याप्रमाणे माझे अशासकीय विधेयक आज असून त्यासाठी 35 मिनिटांचा वेळ दिलेला आहे. ते अशासकीय विधेयक मी आज मांडणार नाही, तो वेळ सुध्दा या चर्चेसाठी घेण्यात यावा.

तालिका सभापती : यासंदर्भात माननीय सभापतींशी चर्चा करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : महोदय, वेतनेतर अनुदानाच्या बाबतीत जो प्रस्ताव आहे त्यासंदर्भात शासनाने सभागृहात अनेक वेळा सांगितले की सहा महिन्यात वेतनेतर अनुदान देतो, एक वर्षात सुरु करतो पण अद्यापही त्याचा विचार शासन करीत नाही, ही खेदाची बाब आहे. खरे पाहिले तर ग्रामीण भागातील शाळा आणि शहरी भागातील शाळा यांची विगतवारी करावी. याचे कारण असे की, ग्रामीण भागातील शाळांना अन्य कोणतेही उत्पन्न नाही तर शहरी भागातील शाळांना अन्य उत्पन्न मिळते. उदा. द्यावयाचे तर दादर येथील राजा शिवाजी विद्यालयामध्ये हॉल, शॉपिंग सेंटर असल्याने त्यातून या शाळेला वेगळे उत्पन्न मिळते. या सर्व गोष्टींचा विचार केला तरी शाळांमधून मिळणाऱ्या शिक्षणाचा दर्जा पाहिला तर मात्र शोचनीय अशीच परिस्थिती आढळून येईल. त्यासंदर्भात शिक्षक आमदार महोदय मात्र कोणीच बोलत नाही, सभागृहात ते वेतन आणि वेतनेतर अनुदान या व्यतिरिक्त दुसरे काही बोलत नाही.....

श्री. कपिल पाटील : महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, सभागृहात चर्चेत भाग घेताना सन्माननीय सदस्यांना आपले विचार व्यक्त करण्याची मुभा असते पण इतर सन्माननीय सदस्यांनी जे विचार व्यक्त केले त्यासंदर्भात त्यांच्यावर अशा प्रकारे हेत्वारोप करता येत नाही.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील..

म्हणून सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी जो मुद्दा उपस्थित केला ते विधान त्यांनी मागे घ्यावे.

श्री. जयंत प्र. पाटील : ठीक आहे, मी माझे विधान मागे घेतो. माझा शिक्षकांच्या पगारवाढीला आणि वेतनवाढीला विरोध नाही, अजून दुप्पट पगार घ्या त्यावर माझे काहीच म्हणणे नाही. पण ग्रामीण भागातील शिक्षणाची परिस्थिती पाहिली तर त्या शाळांमध्ये शिकणाऱ्या मुलांना साधे वाचताही येत नाही. याची प्रचीती मला माझ्या तालुक्यात गेल्या आठवड्यात गेलो असता मला आली आहे. मी एका शाळेत गेलो असता तेथे पाच विद्यार्थी आणि सहा शिक्षक अशी परिस्थिती दिसून आली. त्यातील दोघांना वाचताही येत नाही. यासंदर्भात शासनाने कडक भूमिका घेतली पाहिजे. तसेच सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांचा मुलगा इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकतो.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ....

शिक्षणाच्या संदर्भात जी काही वस्तुस्थिती आहे ती मी या ठिकाणी सांगत आहे. प्राथमिक व माध्यमिक शाळेतील शिक्षकांची मुले इंग्रजी शाळांमध्ये शिक्षण घेत असतात. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांचा नातू सुध्दा इंग्रजी शाळेमध्ये जात असेल. शिक्षणाच्या संदर्भातील ही जी बाब आहे ती अतिशय गंभीर असून ती हसण्यावारी नेण्याची बाब नाही एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. एका शाळेत 6 मुलांना शिकविण्यासाठी 6 शिक्षक असून या शिक्षकांचा महिन्याचा पगार 3 लक्ष रुपये आहे असे असतांनाही या विद्यार्थ्यांना साधे वाचता सुध्दा येत नाही अशी परिस्थिती आहे त्यामुळे या विद्यार्थ्यांना डायरेक्ट अनुदान दिले तर ते चांगल्या शाळेत तरी शिकतील त्यामुळे यासंदर्भातील चर्चा होण्याची आवश्यकता आहे. खरे म्हणजे गरिबांची मुले यामध्ये भरडली जात आहेत. खरे म्हणजे गरिबांची मुलेच चांगल्या शिक्षणापासून वंचित रहात असून आपण गरिबांच्या मुलांना चांगले शिक्षण देत नसल्यामुळे आपण पाप करीत आहोत असे माझे म्हणणे आहे.

सभापती महोदय, माझ्या 36 शाळा असून त्या शाळेतील शिक्षकाला माझ्या ऐपती प्रमाणे पगार देतो. माझ्या 36 शाळेतील 700 शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना माझ्या खिशातून पगार देतो. माझ्या एका शाळेचे उद्घाटन करण्यासाठी माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे आले होते. माझ्या 30 शाळांचा 100 टक्के रिझल्ट आहे. मी चालवित असलेल्या शाळा अनुदानावर आणाव्यात अशी मी दर अधिवेशनात मागणी करीत असतो. परवा अर्थसंकल्पावर चर्चा झाली होती त्यावेळेस सुध्दा मी या संदर्भात विचार मांडले होते.

सभापती महोदय, जे शिक्षक 40 हजार, 50 हजार रुपये घेतात त्यांच्या शाळेचा पगार सुध्दा 15 ते 20 टक्के सुध्दा नाही त्यामुळे यासंदर्भात चर्चा करण्याची आवश्यकता आहे. शिक्षकांना पगार कमी दिला जावा अशा मताचा मी नाही परंतु जे शिक्षक चांगले काम करीत नाहीत त्यांच्या संदर्भात या ठिकाणी मी माझे विचार व्यक्त करावयाचे नाही काय ? ज्या जनतेचे प्रतिनिधीत्व आम्ही करतो त्या जनतेचे दु:ख या सभागृहात आम्ही मांडावयाचे नाहीत काय ? वेळे अभावी मी माझे भाषण येथेच संपवितो.

तालिका सभापती (विनायक मेटे) : सभागृहाची बैठक आता स्थगित होत असून सभागृहाची नियमित बैठक 11.45 वाजता सुरु होईल.

(सभागृहाची बैठक 11.38 ते 11.45 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापती स्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे.

शेती लागवडीसाठी येणारा खर्च आणि उत्पन्नाचा हिशोब सादर करणारी राज्य कृषी मूल्य समिती बरखास्त करुन पुनर्रचना करण्याबाबत

(1) * 25164 **श्री.सय्यद पाशा पटेल , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.केशवराव मानकर , श्री.दीपकराव साळुंखे , श्री.जयवंतराव जाधव , श्री.संदिप बाजोरिया , श्री.अनिल भोसले** : **तारांकित प्रश्न क्रमांक 23121 ला दिनांक 15 डिसेंबर, 2011 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) शेती लागवाडीसाठी येणारा खर्च आणि उत्पन्नाचा हिशोब सादर करणारी राज्य कृषी मूल्य समिती बरखास्त करुन पुनर्रचना करण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी हिवाळी अधिवेशन 2011 मध्ये सभागृहात केली, हे खरे आहे काय,

(2) तसेच, शेतमालाचा उत्पादन खर्च काढण्याच्या प्रचलित कार्यपध्दतीत सुधारणा करण्यासंदर्भात राज्यातील चार कृषी विद्यापींठाना प्रस्ताव सादर करण्यासाठी राज्य शासनाने आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, राज्य कृषी मूल्य समितीची पुनर्रचना करण्यात आली आहे काय, तसेच चार कृषी विद्यापीठाने आपला प्रस्ताव शासनास सादर केला आहे काय

(4) असल्यास, प्रश्न भाग (1) व (2) बाबत केलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे व तद्अनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : (1) राज्यस्तरीय शेतमाल भाव समितीची पुनर्रचना करण्याची घोषणा मा. मुख्यमंत्री यांनी विधानमंडळाच्या हिवाळी आधिवेशन 2011 मध्ये सभागृहात केली, हे खरे आहे.

(2) होय.

(3) राज्यस्तरीय शेतमाल भाव समितीची पुनर्रचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून कृषि विद्यापीठांचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून त्याची छाननी सुरु आहे.

(4) कार्यवाही सुरु आहे.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25164...

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, दोन प्रश्नांचा मिळून एक प्रश्न केला आहे. दहा प्रश्नांचे पाच प्रश्न केले आहेत. त्यामुळे या प्रश्नाला थोडा वेळ द्यावा लागणार आहे. मी दहा प्रश्न विचारले होते त्यापैकी फक्त पाच आलेले आहेत, पाच आलेले नाहीत. याचा पुरावा माझ्याकडे आहे. लेखी उत्तरात नमूद करण्यात आले आहे की, "राज्यस्तरीय शेतमाल भाव समितीची पुनर्रचना करण्याची घोषणा मा.मख्यमंत्री यांनी विधान मंडळाच्या हिवाळी अधिवेशन 2011 मध्ये केली हे खरे आहे." हिवाळी अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली होती. त्यानंतर आता हे दुसरे अधिवेशन होत आहे. ज्या प्रश्नामुळे राज्यातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत, ज्या प्रश्नामुळे गावे ओस पडत आहेत, शहरे सुजू लागली आहेत त्याकडे शासन लक्ष देत नाही. देशापुढे तयार झालेले सगळे प्रश्न हे शेतीच्या शोषणातून तयार झालेले आहेत. हे जर सत्य असेल व अशा महत्त्वाच्या प्रश्नावर समितीची पुनर्रचना करायची होती तर चार महिने झाले तरी शासन अद्याप विचार का करीत आहे ? या समितीची पुनर्रचना करायला एवढा विलंब लागण्याचे कारण काय आहे ?

प्रश्न क्रमांक 2 दोन मध्ये तीन प्रश्न सामावलेले आहेत. शासनाने नमूद केले आहे की, राज्यस्तरीय शेतमाल भाव समितीची पुनर्रचना करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असून कृषि विद्यापीठांचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून त्याची छाननी सुरू आहे. यामध्ये दोन गोष्टी आहेत. राज्यस्तरील शेतीमाल भाव समिती हा वेगळा विषय आहे आणि शेतीमालाच्या उत्पादन खर्च काढण्याच्या पद्धतीच्या संदर्भामध्ये चारही कृषी विद्यापीठाकडून शासनाने प्रस्ताव मागविलेले आहेत. उत्पादन खर्च बदलण्याच्या संदर्भात शासन काय करणार आहे. तसेच चारही कृषी विद्यापीठांचे प्रस्ताव आले आहेत काय ? यात जर काही गोंधळ होत असेल तर कुठली पद्धत स्वीकारावी याची छाननी करण्यासाठी किंवा अभ्यास करण्यासाठी शासन वेगळी समिती तयार करणार आहे काय ? हा विषय गुंतागुंतीचा आहे. त्याचे एक दिवसामध्ये उत्तर मिळणार नाही. त्यामुळे यासंबंधी गंभीरपणे विचार होतो आहे काय ?

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल यांनी राज्यातील शेतीमालाच्या भावाबाबत समितीची पुनर्रचना करण्याबद्दल आग्रह धरलेला आहे. स्वाभाविकपणे या सगळयाबाबत केंद्र शासनाकडे शिफारस करण्यासाठी प्रमुख समिती आहे. म्हणून माननीय मुख्यमंत्री महोदयांनी नागपूर अधिवेशनाच्या वेळी जाहीर केले आहे, त्या अनुषंगाने नंतर दोन-तीन बैठका झाल्या आणि आता राज्य शासनाने शेती माल भाव समितीची पुनर्रचना केलेली आहे. त्यानुसार माननीय कृषी मंत्री या समितीचे अध्यक्ष रहातील, सहकार मंत्री, ग्रामविकास मंत्री, अन्न व नागरी पुरवठा मंत्री, जलसंपदा मंत्री आणि विद्यापीठाचे कुलगुरू इ.मान्यवर या समितीमध्ये आहेत.जसे एकंदर सहा महसुली विभाग असतात तसे कृषी विभागाचे महसुलाच्या संदर्भात 8 विभाग असतात आणि या आठही विभागातून एकेक शेतकरी प्रतिनिधींना देखील या समितीमध्ये घेण्यात आलेले आहे जेणेकरुन यामध्ये शेतकऱ्यांचाही सहभाग राहील. तसेच आपण या समितीमध्ये लोकप्रतिनिधींना देखील निमंत्रित केलेले आहे आणि यामध्ये आयुक्त, सचिव असे शासकीय अधिकारी देखील असतील अशा प्रकारे या नवीन समितीची पुनर्रचना करुन त्याबाबतीत आदेश निर्गमित केलेले आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी समितीची जी पुनर्रचना केली आहे, त्या मध्ये बदल काय झाला ?

श्री.राधाकृष्ण विखे पाटील : सभापती महोदय, पूर्वी तांत्रिक स्वरुपाची समिती होती आणि त्यामध्ये कृषी मंत्री आणि अधिकारी,चेअरमन वगैरे असावयाचे.तेव्हा त्यामध्ये लोक प्रतिनिधी नव्हते, शेतकरी प्रतिनिधी नव्हते. त्यामुळे आता नव्याने जी समिती पुनर्गठीत करण्यात आलेली आहे,ती काम करील आणि यासंबंधीचे कामकाज लगेच सुरु करावे अशा प्रकारचे आदेश सरकारने निर्गमित केलेले आहेत.तसेच दुसरी एक समिती माननीय कृषी विभागाचे सचिव यांच्या अध्यक्षतेखाली पुनर्गठीत केली होती.परंतु या तांत्रिक उप समितीच्या बैठका नियमितपणे होत नव्हत्या. त्यामुळे त्या समितीची देखील पुनर्रचना करण्यात आलेली आहे. त्यामध्ये आता कृषी विभागाचे प्रधान सचिव यांच्याऐवजी कृषी विद्यापीठाचे कुलगुरू यांना अध्यक्ष केलेले आहे आणि या चारही कृषी विद्यापीठांचे कुलगुरु त्याठिकाणी प्रत्येक वर्षी आळीपाळीने अध्यक्ष म्हणून काम करतील. तसेच आपण या समितीमध्ये लोक प्रतिनिधींनाही निमंत्रित केलेले आहे.तसेच या समितीमध्ये सुध्दा आठही विभागांचे शेतकरी प्रतिनिधी रहातील आणि ही समिती डिटेल्स्मध्ये याबाबत अभ्यास करील म्हणजे चारही विद्यापीठांकडून कोणत्या शिफारशी आलेल्या आहेत तसेच त्या-त्या भागातील शेतकऱ्यांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील . . . .

कोणत्या सूचना आहेत वगैरे. अशा प्रकारे समितीची पुनर्रचना करुन शेती माल समितीच्या बाबतीत पुनर्रचना करुन तत्काळ या संबंधातील कार्यवाहीला सुरुवात होईल. विद्यापीठाकडून नियमितपणे शिफारशी येतात की, आपण कशा पध्दतीने भाव ठरविले पाहिजेत आणि यासाठी त्यांनी 4-5 पध्दतीचा अवलंब केलेला आहे. माझी सन्माननीय सदस्यांना एवढीच विनंती आहे की, आता आपण पुनर्गठीत समितीच्या कामकाजास लगेच सुरुवात करु. मला असे वाटते की, अधिवेशनाच्या काळामध्ये देखील याबाबत एक बैठक घेण्यात यावी जेणेकरुन पुढील रुपरेषा निश्चित करता येईल. या राज्यस्तरीय समितीमध्ये सुध्दा चारही विद्यापीठांचे कुलगुरु आहेत आणि अधिवेशनाच्या काळामध्ये एक बैठक घेऊन या समितीची कार्यपध्दती निश्चित केल्यानंतर मला असे वाटते की, या विषयाच्या संबंधातील कामांना गती देता येईल असे मी सदनाला सांगू इच्छितो.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे कृषी विद्यापीठाचा एक प्रस्ताव शासनाला प्राप्त झालेला आहे आणि त्याबाबत छाननी सुरु असल्याचे सांगण्यात येत आहे. या विद्यापीठाची जी छाननी समिती आहे, त्यामध्ये कोण तज्ज्ञ आहेत ? त्या मध्ये कृषी विद्यापीठाचे कुलगुरु किंवा शेतकऱ्यांचे काही तज्ज्ञ प्रतिनिधी आहेत काय ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, कृषी विद्यापीठाकडून पाच पध्दतीच्या मार्गाचा अवलंबन करुन शेती मालाच्या किंमतीबाबत विचार केला जातो. तशा प्रकारचा विद्यापीठाचा प्रस्ताव आलेला आहे. परंतु मी मघाशी सांगितल्याप्रमाणे आता राज्य स्तरावरील जी पुनर्गठीत समिती आहे तसेच कुलगुरुंच्या अध्यक्षतखाली तांत्रिक उप समिती गठीत केलेली आहे. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे पहिल्यांदा राज्य समितीची बैठक घेऊन कार्यपध्दती निश्चित करु या. तसेच जर सन्माननीय सदस्यांना वाटले की आपण याबाबतीत काही सूचना करण्याची आवश्यकता आहे तर सरकार या सर्व सूचनांचे स्वागत करील. तसेच या समितीमध्ये सन्माननीय सदस्यांनाही घेतलेले आहे, त्यामुळे त्यांना सुध्दा याबाबतीत सूचना करण्याची संधी रहाणार आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25164.....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय,शासनाने राज्य स्तरीय शेतमाल भाव समितीची पुनर्रचना करण्याचे ठरविले ही चांगली बाब आहे. या समितीला पूर्वीच्या निकषामध्ये बदल करण्या बाबत सूचना दिलेल्या आहेत काय ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, आपण समितीची पुनर्रचना केलेली आहे आणि पूर्वीच्या निकषामध्ये बदल करायचे किंवा कसे या संबंधीचे अधिकार समितीला आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी जे उत्तर दिले त्यामध्ये तीन बाबी आहेत. पहिली बाब म्हणजे आपण चारही कृषी विद्यापीठांकडून प्रस्ताव मागविले. दुसरी बाब म्हणजे तांत्रिक उप समिती करणार आहात आणि तिसरी बाब म्हणजे राज्य स्तरीय शेतमाल समितीची पुनर्रचना करणार आहात. माननीय मंत्री महोदयांनी पुढे असेही सांगितले की, तांत्रिक उप समितीचे अध्यक्ष कुलगुरु राहतील. आपण राज्य स्तरीय शेतमाल समितीची पुनर्रचना केली त्याशिवाय उप समिती नेमली असे असताना पुन्हा कृषी विद्यापीठांकडून प्रस्ताव मागविण्याचे कारण काय ? कारण आपण सर्वांकडून मते मागविली तर प्रत्येकाकडून वेगवेगळी मते येऊ शकतात. मागील अधिवेशनात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले होते की, आम्ही लवकरात लवकर राज्य स्तरीय शेतमाल भाव समितीचे पुनर्घटन करणार आहोत. तेव्हा या समितीची घोषणा करुन तसेच उप समितीची बैठक घेऊन पूर्वीच्या शिफारशींमध्ये बदल करुन केंद्रीय कृषी मूल्य आयोगाला शिफारशी करण्यात येतील काय ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय,शासनाने दोन्ही समितीच्या बाबतीत आदेश काढलेले आहेत. त्या समिती अस्तित्वात आलेल्या आहेत. मी मघाशी सांगितले की, अधिवेशन काळात या दोन्ही समितीच्या बैठका घेण्यात येतील. राज्य स्तरीय शेतमाल भाव समितीचे अध्यक्ष कोण, तांत्रिक उप समितीचे अध्यक्ष कोण याची माहिती दिलेली आहे. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, या अधिवेशनात राज्य स्तरीय शेतमाल भाव समितीची बैठक घेऊ, आवश्यकता वाटल्यास त्या बैठकीस तांत्रिक उप समितीच्या सदस्यांना देखील बोलावू म्हणजे व्यापक चर्चा होऊ शकेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25164.....

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील.....

निकषामध्ये काही बदल करायचे असतील त्या बाबत देखील आपणास चर्चा करता येऊ शकेल. निकषामध्ये बदल करावे किंवा कसे याचे अधिकार समितीकडे असल्यामुळे कोणती अडचण येईल असे मला वाटत नाही. आपणास नव्या पध्दती प्रमाणे काम करता येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, राज्य स्तरीय शेतमाल भाव समिती गठीत झाली. ही समिती जे भाव निश्चित करणार ते आपण केंद्रीय कृषी मूल्य आयोगाला कळविणार. राज्यातील समिती स्थानिक भागाचा अभ्यास करुन दर ठरविणार आणि तो दर बाजूच्या राज्यांमध्ये असेलच असे नाही. जर कृषी मूल्य आयोगाने आपल्या शिफारशी मान्य न करता आणखी कमी दर दिला तर येणारी तफावत शासन भरुन देणार काय ?

श्री.राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, हा धोरणात्मक विषय आहे. समिती गठीत झाली आहे त्या समितीची कामकाज सुरु होऊ द्यावे. आजही राज्य स्तरीय शेतमाल भाव समितीने शिफारस केलेले दर आणि केंद्रीय कृषी मूल्य आयोगाने ठरवून दिलेले दर यामध्ये फरक आहेच. एमएसपीचा अधिकार केंद्र सरकारचा आहे. आता आपण समितीची पुनर्रचना केलेली आहे या समितीमध्ये चर्चा करुन पूर्वीच्या निकषामध्ये काही दुरुस्ती करुन त्या प्रमाणे केंद्रीय कृषी मूल्य आयोगाकडे आपणास प्रभावीपणे बाजू मांडता येईल. मग पुढे जी परिस्थिती उद्भवेल त्या बाबत यथावकाश निर्णय घेण्यात येईल.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, मैं माननीय मंत्री महोदय को धन्यवाद देना चाहता हूं कि उन्होंने यह समिति गठित की है. यहां पर माननीय सदस्य श्री दिवाकर रावते साहब ने भी कहा और मैं भी कहना चाहता हूं कि जो कमेटी बनाई गयी है उसकी जल्द से जल्द बैठक बुलायी जानी चाहिए ताकि माननीय सदस्य वहां अपने विचार रख सकें.

मेरा एक प्रश्न यह भी है कि मूल्य तय करने संबंधी क्रायटेरिया को तय करने संबंधी विषय इस कमेटी के टर्म्स ऑफ रेफरेंस में है या नहीं ? मेरा एक प्रश्न यह भी है कि स्थानीय प्ररिस्थिति के मुताबिक जो मूल्य हम तय करेंगे उसको केंद्रीय कृषि आयोग की अनुमति की जरुरत होगी या नहीं होगी. हम जो मूल्य तय करेंगे उसका निर्णय सरकार लेगी या नहीं कि राज्य की परिस्थिति के अनुसार हम अपने किसानों को एक निश्चित मिनिमम सपोर्ट प्राइस देंगे ?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या दुसऱ्या प्रश्नाचे उत्तर दिलेलेच आहे. पण टर्म्स ऑफ रेफरन्सेस या समितीबद्दल सध्याची जी काही प्रचलित कार्यपध्दती आहे त्याला अनुसरुन ही पुनर्रचित समिती केलेली आहे त्यांना हे अधिकार राहणार आहेत. पहिल्या बैठकीत समितीला या संदर्भातील कार्यपध्दती निश्चित करता येईल त्यामुळे त्यांना ते स्वातंत्र्य राहील.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, राज्य कृषी आयोगाला या संदर्भात अधिकार नाहीत त्यामुळे शिफारस करण्याबाबत केंद्र कृषी आयोगाने कालमर्यादा कळविलेली आहे का, आणेवारी काढण्याची जुनी ब्रिटिशकालीन पध्दत आहे त्याच पध्दतीने याचे मूल्यांकन होते ती पध्दत बदलण्याबाबत राज्य कृषी आयोगाला सांगण्यात येईल का? त्या वेळची मजुरी, त्या वेळचे तंत्रज्ञान आणि आता असलेले शेतीचे तंत्रज्ञान यामध्ये तफावत आहे याचा ही समिती गांभीर्याने विचार करील का?

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या भावना बरोबर आहेत. मी याबाबत अगोदरच सांगितलेले आहे की, कोणत्या बाबींचा विचार करावा, ज्या बाबींचा समावेश नाही त्या बाबी अंतर्भूत कराव्यात का, हा अधिकार समितीला आहे.शासनाने दिलेले आश्वासन पूर्ण करावयाचे आहे म्हणून या समितीचे गठन करण्यात आलेले नाही तर या राज्यातील शेतकऱ्यांच्या भावना प्रतिबिंबित व्हाव्यात यासाठी ही समिती गठीत करण्यात आलेली आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25164.....

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील. . .

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी या ठिकाणी चांगली सूचना केलेली आहे. त्यामध्ये मला अडचण वाटत नाही. समितीला टर्म्स ऑफ रेफरन्सेसमध्ये मॉडिफिकेशन करण्याचे अधिकार राहणार आहेत. सन्माननीय सदस्यांनी कृषी मूल्य आयोगाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे. राज्य कृषी मूल्य समिती ही शेतीमाल भावा संबंधी शिफारस करते. ही शिफारस करणारी समिती आहे. केंद्रीय कृषी मूल्य आयोगाने राज्य कृषी मूल्य समितीच्या शिफारशींचा विचार करावा , अशी ती व्यवस्था आहे. सभापती महोदय, मी थोडया वेळापूर्वीच या ठिकाणी संगितल्याप्रमाणे दिवसेंदिवस सर्व कार्यपध्दतीमध्ये बदल होत आहे. राज्य कृषी मूल्य समितीच्या शिफारशी केंद्रने स्वीकाराव्या, यासाठी केंद्र शासनाबरोबर चर्चा करण्यासाठी राज्य कृषी मूल्य समितीला त्या ठिकाणी जाऊन आपली बाजू मांडता येईल.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

वडवणी (जि.बीड) तालुक्यात सार्वजनिक बांधकाम उपविभाग अंतर्गत ताडसोत्रा रस्त्याच्या कामात झालेला भ्रष्टाचार

(२) * २६२६८ *प्रा.सुरेश नवले , श्री.राजन तेली* : सन्माननीय ***सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडवणी (जि.बीड) तालुक्यात सार्वजनिक बांधकाम उपविभाग अंतर्गत ताडसोत्रा रस्त्याचे काम अधिकाऱ्यांच्या संगनमताने अतिशय निकृष्ट करण्यात येवून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारांवर व ठेकेदाराला मदत करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रणजित कांबळे, श्री.छगन भुजबळ यांच्या करिता : (१), (२) व (३) अधीक्षक अभियंता दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांच्यामार्फत चौकशी आदेशित करण्यात आली आहे.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, उत्तरामध्ये अधीक्षक अभियंता दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांच्यामार्फत चौकशी आदेशित करण्यात आली आहे, असे म्हटले आहे. ही चौकशी कधी पूर्ण होईल?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, 12 तारखेला पथक पाठविण्यत आलेले आहे. एका महिन्याच्या आत यासंबंधीची चौकशी करुन अहवाल तयार करण्यात येईल.

यानंतर श्री. बरवड....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सावंतवाडी (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) येथे सापाचे विष काढून करीत असलेली तस्करी

(३) * २५५१२ ***श्री.परशुराम उपरकर , डॉ.दीपक सावंत , श्री.राजन तेली , श्री.सुभाष चव्हाण , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , प्रा.सुरेश नवले*** **:** सन्माननीय ***गृह मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावंतवाडी, (ता.दोडामार्ग, जि.सिंधुदुर्ग) येथे शेती व्यवसायाच्या निमित्ताने स्थायिक झालेल्या केरळीयांनी अननस लागवडीच्या नावाखाली विषारी सापाचे संगोपन करुन त्या सापांचे विष काढून त्याची तस्करी करीत असल्याचे माहे डिसेंबर, २०११ व जानेवारी, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) नाही.

(२) सदर प्रकरणी चौकशी केली असता सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सावंतवाडी पोलीस ठाणे दोडामार्ग पोलीस ठाणे व बांदा पोलीस ठाणे हद्दीत केरळीयांनी अननस लागवडीच्या नावाखाली विषारी सापांचे विषाची तस्करी केल्याबाबत कोणताही गुन्हा दाखल नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, विषारी सापाच्या विषाची तस्करी केल्याबाबत कोणताही गुन्हा दाखल नाही. गुन्हा कोणी दाखल करावयाचा याबाबत माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा. याचबरोबर या जिल्ह्यामध्ये दोडामार्ग आणि सावंतवाडी तालुक्यामध्ये परप्रांतीय केरळी लोक येऊन दुर्गम भागात अननस, केळी आणि रबर लागवड करतात आणि या रबर लागवडीच्या अंतर्गत गांजा, अफू किंवा अशा प्रकारच्या वस्तूंची तस्करी करण्याचे प्रकार करतात. श्री. प्रसन्ना हे एस.पी. असताना त्यांनी 20 लाख रुपयांचा गांजा पकडला होता, हे खरे आहे का, सावंतवाडीत हेरॉईन, हशीश असे अंमली पदार्थ मिळाले होते त्या बाबतीत पुढे काय झाले, या गोष्टींचा अर्थ त्यांच्याशी जोडला जातो त्यामुळे शासनाने त्याची व्यवस्थित तपासणी केली आहे का ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी सापाच्या विषाच्या संदर्भात स्पेसिफिक प्रश्न विचारलेला होता. सन्माननीय सदस्यांनी आता जी माहिती विचारलेली आहे त्या संदर्भात वेगळा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर देता येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25512.....

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, या प्रश्नाच्या अनुषंगानेच माझा प्रश्न आहे. परप्रांतीय केरळी लोक त्या ठिकाणी येतात.

सभापती : आपण मूळ प्रश्न सापाच्या विषाच्या संदर्भात विचारलेला आहे. आपण आता जो उपप्रश्न विचारला तो 90 टक्के वेगळा आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, तसे नाही.

सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, सभागृहामध्ये अनेक वेळा अचूक प्रश्न कोणता आणि त्याचे उत्तर काय आहे हे पाहिल्यानंतर पुरवणी प्रश्न जर पूर्णपणे वेगळा असेल तर त्याचे उत्तर घेण्यासाठी वेगळा प्रश्न विचारला पाहिजे असेच सांगावे लागेल.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, कोणतेही लोक कोठेही येऊन शेती करु शकतात त्याबद्दल मला काही म्हणावयाचे नाही. ही बरीच केरळी मंडळी सिंधुदुर्ग जिल्ह्यात दोडामार्ग आणि सावंतवाडी तालुक्यात, विशेषकरुन दोडामार्ग तालुक्यामध्ये आहेत. दोडामार्ग तालुक्याचे जे पोलीस निरीक्षक आहेत त्यांचे ते खूप आदरातिथ्य करतात. त्या ठिकाणी वेगवेगळे गुन्हे होतात. मागे एमएसईबीचे पोल लावण्यासाठी पश्चिम बंगालमधील लोक त्या ठिकाणी आले होते आणि त्यावेळी एका मुलीचे अपहरण झाले होते. माझे असे म्हणणे आहे की, त्या ठिकाणी येणाऱ्या लोकांची नोंद गृह खात्याने ठेऊन पोलीस स्टेशनकडून त्यांची वरचेवर चौकशी करणे किंवा ते नेमके काय करतात हे शासन पाहणार का ?

सभापती : त्याकरिता सुध्दा सन्माननीय सदस्यांना वेगळा प्रश्न विचारावा लागेल. मूळ प्रश्न सापाच्या विषासंबंधीचा असेल तर त्या मर्यादेतच माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर घेतले पाहिजे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी जो प्रश्न विचारला आहे तो जसा सापाच्या विषासबंधी आहे त्याचप्रमाणे दोडामार्गमध्ये तिलारी धरणाचे प्रचंड बॅक वॉटर आहे आणि त्याच्यापुढे सगळे जंगल आहे, त्या जंगलात केरळातील लोकांनी येऊन जमिनी विकत घेतलेल्या आहेत. त्या ठिकाणी पुढच्या भागात ते रबर लावावयाचे आणि आत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25512 ..... श्री. विनोद तावडे ...

गांजा लावावयाचे. ते तेथील एस.पी.नी पकडले. त्या भागात चालणाऱ्या गैरकृत्यांविषयीचा हा प्रश्न आहे. जरी हा सापाच्या विषासंबंधीचा प्रश्न असा तरी वेगवेगळ्या प्रकारची तस्करी करणारा समुदाय सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये जमलेला आहे आणि ते तसे करीत आहेत हे एका प्रकरणामध्ये सिध्दही झालेले आहे. हे जे गैरकृत्य चालले आहेत त्याबाबत आपल्याकडे तक्रार नाही असे नाही. तक्रार नसण्याचे कारण त्यांची मिलीभगत आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली तसेच श्री. परशुराम उपरकर प्रश्न विचारत आहेत आणि ते त्या भागातील आमदार आहेत. आम्ही ते पाहिलेले आहे. त्यामुळे शासन याबाबत स्वत: जाऊन अशा ज्या काही घटना घडत आहेत त्याची माहिती घेणार आहे का ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : सभापती महोदय, अशी गैरकृत्ये होत असतील तर त्याची निश्चितपणे चौकशी केली जाईल.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ KTG/

बोईसर (जि.ठाणे) येथील भैयापाडा (संतोषीनगर) येथे राहणारा व आदर्श विद्यालयातील सुजित राजेंद्र प्रसाद या विद्यार्थ्यांची झालेला हत्या

(४) * २५०४७ ***श्री.भगवान साळुंखे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.रामनाथ मोते , श्री.नागो पुडलिक गाणार , डॉ.रणजित पाटील*** **:** सन्माननीय ***गृह मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (जि.ठाणे) येथील भैयापाडा (संतोषीनगर) येथे राहणारा व आदर्श विद्यालयातील सुजित राजेंद्र प्रसाद या विद्यार्थ्यांची माहे डिसेंबर, २०११ च्या तिसऱ्या आठवड्यात हत्या केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर गंभीर प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय त्यात काय आढळुन आले,

(३) असल्यास, तद्नुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील, श्री. आर.आर.पाटील यांच्याकरिता : (१) होय.

(२) व (३) सदर प्रकरणी मयत याचे वडील यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन बोईसर पोलीस स्टेशन गु.र.नं.१७०/२०११ भा.दं.वि.कलम ३०२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून गुह्याच्या तपासात एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, बोईसर येथील सुजित प्रसाद नावाचा हा विद्यार्थी आदर्श विद्यालय या शाळेत सकाळी 7.00 वाजता जातो आणि 12.00 वाजता परत येत नाही. त्यानंतर त्याची शोधाशोध चालू होते. त्याचा मृतदेह तेथील एमआयडीसीतील एका बंद पडलेल्या कारखान्याच्या आवारामध्ये सापडतो. त्यालाही तीन महिन्यांचा कालावधी होतो. काहींना ताब्यात घेतले जाते आणि

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25047.... श्री.भगवान साळुंखे...

लेखी उत्तरात मात्र एका व्यक्तीला अटक केल्याचे नमूद केलेले आहे. प्रत्यक्षात किती जणांना अटक करण्यात आली आहे आणि तपास कोणत्या पातळीवर आहे ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, संबंधित विद्यार्थी घरात शाळेला जातो असे सांगून जात होता. परंतु शाळेचे हजेरीपट पाहिले असता शाळेमध्ये गैरहजर होता. त्या दिवशी तो शाळा चुकवून पलीकडच्या इमारतीमध्ये मोबाईलवर गाणी ऐकत होता. संबंधित आरोपी त्याच्याकडे गेला व तू शाळा का चुकवितो, येथे का बसला आहेत अशा प्रकारची दोघांमध्ये बाचाबाची झाली, शिवीगाळ झाली. त्यामुळे त्या आरोपीने दोरीने त्याचा गळा आवळल्यामुळे त्याचा मृत्यू झाला आहे. दिनांक 22.12.2011 रोजी ही घटना घडली आहे. अनेकदा पोलिसांवर गुन्ह्याचा तपास वेगवेगळ्या माध्यमातून होत असताना टीका केली जाते, परंतु या प्रकरणी केवळ 2 दिवसामध्ये संबंधित आरोपीला अटक करण्यात आली असून आरोपी सध्या पोलीस कस्टडीमध्ये आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

चंद्रपुर जिल्ह्यातील पुलाच्या कामात झालेली अनियमितता

(५) * २५४२३ *श्रीमती शोभा फडणवीस* : सन्माननीय ***सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील सा.बा.विभाग क्रमांक १ येथे कार्यरत कार्यकारी अभियंता यांनी निविदा सूचना क्रमांक २०/२०११-१२ मधील काम क्रमांक ४ चे कामाकरीता मूळ स्वरूप आर.सी.डब्ल्यू. सह पोच मार्गाचे काम असताना सदर कामात बदल करून आर.सी.डब्ल्यू. पुलाचे बांधकाम दर्शवून सदर कामाची मूळ किंमत ६० लक्ष रूपये असताना ६६ लक्षाची दाखवून बांधकाम विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल करून त्यात गैरव्यवहार केल्याचे उघडकीस आले याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ जानेवारी,२०१२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री तसेच सचिव, बांधकाम विभाग यांना पत्र दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, सदर कामासाठी अधिकचे एक वर्षे दाखवून वरिष्ठाकडे प्रस्ताव सादर करून स्वत:च्या अधिकारात खोटी प्रमाणपत्रे बनवून सदर कामे मंजूर करण्याकरिता पाठविण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित कामात झालेल्या अनियमिततेबाबत शासनाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.रणजित कांबळे,श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता : (१), (२) व (३) मा.लोकप्रतिनिधींकडून प्राप्त दिनांक १४/१/२०१२ च्या पत्रास अनुसरून अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम दक्षता पथक मंडळ, मुंबई यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, ठेकेदाराला काम देण्याची पध्दत पारदर्शक असते, त्यासाठी ई-टेंडर काढले जाते, त्यामुळे टेंडरमध्ये बदल होऊ शकत नाही अशा प्रकारची उत्तरे आम्हाला शासनाकडून दिली जातात. या प्रश्नातील निविदाकाराने निविदा भरत असताना वीज मंडळासाठी संरक्षक भिंत बांधलेली असताना पूल बांधल्याचे प्रमाणपत्र जोडले, पाईपचे कल्व्हर्ट तयार केलेले असताना मोठ्या पुलाचे काम केल्याचे प्रमाणपत्र जोडले आहे. निविदेबरोबर बहुतांश कागदपत्रे वेगळ्या पध्दतीची जोडलेली असताना सुध्दा त्याची निविदा मंजूर करण्यात आली. त्याने बँक गॅरेन्टी सुध्दा भरलेली नव्हती. या संदर्भात आम्ही तक्रार केल्यानंतर निविदा प्रक्रिया थांबविण्यात आली, परंतु बोगस टेंडर भरणाऱ्या ठेकेदाराविरुध्द कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने दक्षता पथकाला चौकशी करुन अहवाल सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. या दक्षता पथकाचे काम किती दिवसात पूर्ण होईल आणि संबंधित ठेकेदाराची चौकशी करुन त्याच्याविरुध्द कारवाई केव्हा केली जाईल ?

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25423....

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, या संदर्भात दक्षता पथकाला 18.2.2012 चौकशी करण्यासाठी पाठविले आहे. येणाऱ्या एक महिन्याच्या आत याबाबत चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्रीमती शोभा फडणवीस : मंत्री महोदयांनी निश्चित तारीख सांगावी.

श्री.रणजित कांबळे : दिनांक 18.4.2012 पर्यंत याबाबतची कार्यवाही पूर्ण केली जाईल.

श्री.चंद्रकांत कांबळे : सभापती महोदय, अनेक कंत्राटदार खोटी कागदपत्रे निविदेसोबत जोडतात असा अनुभव येतो. या प्रकरणातील ठेकेदार दोषी आढले तर त्यांना काळ्या यादीमध्ये टाकले जाईल काय ?

श्री.रणजित कांबळे : होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली घाटाच्या भूगर्भीय चाचणी लवकरात लवकर करुन घाटाची दुरुस्ती त्वरित होण्याबाबत

(६) * २६५०० *श्री.राजन तेली , श्री.सुभाष चव्हाण , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , प्रा.सुरेश नवले , श्री.अमरनाथ राजूरकर* : सन्माननीय ***सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सुमारे सव्वाशे वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या आंबोली घाट वाहतुकीसाठी सद्या सुरक्षित राहिला नसल्यामुळे घाटाची भूगर्भीय चाचणी करण्याचे शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे जानेवारी, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घाटाच्या भूगर्भीय चाचणी लवकारात लवकर करुन घाटाची दुरुस्ती त्वरित होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.रणजित कांबळे, श्री.छगन भुजबळ यांच्याकरिता : (१), (२) व (३) प्रश्नांकित आंबोली घाटरस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत आहे. तथापि, पावसाळयात कि.मी.५१/८०० दरम्यान कोसळणाऱ्या दरडीबाबत जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांचे दिनांक १७/१२/२०११ च्या पत्रान्वये उपमहासंचालक (भूगर्भ शास्त्र) केंद्रिय प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांना जागेची पहाणी करून कायम स्वरूपी उपाययोजना सुचविणेबाबत विनंती केली आहे.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली घाट रस्ता दिनांक 30.7.2010 रोजी कोसळला. हा घाट गोवा, कर्नाटक व महाराष्ट्र राज्याला जोडणारा आहे. त्यावेळी 14 दिवस घाट रस्ता बंद होता. त्यानंतर जून, 2011 या महिन्यात घाट रस्ता तीन वेळा कोसळयावर पुन्हा 7 दिवस रस्ता बंद होता. या संदर्भात सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ आणि सन्माननीय राज्यमंत्री या दोघांनी बैठका घेतलेल्या आहेत. या रस्त्याच्या कामामध्ये वन विभागाची अडचण आहे. हा ब्रिटिशकालीन 100 वर्षापूर्वीचा घाट आहे. वर गटर होते. 2005 पासून वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी आपल्या अधिकाऱ्यांना तेथे जाण्याला मज्जाव केलेला आहे. म्हणून तो घाट रस्ता वरच्या वर कोसळत आहे. वन विभागाने मधल्या काळात भिंत बांधली होती ती सुध्दा कोसळली आहे. हा प्रश्न वन विभागाकडे जाणे आवश्यक होते. तेथे वन विभागाची अडचण निर्माण झालेली आहे. हा भूगर्भाचा विषय असल्यामुळे त्याची चाचणी करण्यास वेळ लागेल. हा घाट रस्ता पुन्हा कोसळणार नाही यासाठी खात्याकडून कोणती व्यवस्था केली जाणार आहे ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्या ठिकाणी वन खात्याचे अधिकारी काम करण्यास अडचण निर्माण करीत आहेत. त्याबाबतीत काय निर्णय घेणार आहात ?

श्री. रणजित कांबळे : सन्माननीय सदस्यांनी सांगितले त्या प्रमाणे 14-15 कि.मी.चा जो घाट सेक्शन आहे त्या ठिकाणी कॅचट्रेन्च बांधणे आवश्यक आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूने वन विभागाची जागा आहे. 2010 आणि 2011मध्ये तेथे दोन वेळा दरडी कोसळल्या आणि वाहतूक बंद झाली. या बाबतीत मी वन विभागाशी वारंवार पाठपुरावा केलेला आहे. वन विभागाच्या परवानगी शिवाय तेथे बांधकाम किंवा कोणतेही काम करता येत नाही. कॅचट्रेन्च आणि ड्रेन्स साफ करण्यासाठी वनक्षेत्रामध्ये जाण्यास वन विभागाची हरकत आहे. याबाबतीत वनमंत्री डॉ. पतंगराव कदम आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे मंत्री महोदय यांची एक बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावला जाईल.

श्री. परशुराम उपरकर : दोन वेळा हा आंबोली घाट कोसळला. दोन्ही वेळोला केसरी फणसवडे - आंबोली आणि गेळे चौकूळ - आंबोली असे दोन पर्यायी रस्ते करण्याचे प्रस्ताव झाले. आंबोली येथे पर्यटक मोठ्या प्रमाणावर येतात. त्यामुळे पर्यायी रस्त्याची नितांत आवश्यकता आहे. दुसरे असे की त्या घाटातून अवजड वाहनांची वाहतूक फार मोठ्या प्रमाणावर होत असल्यामुळे घाट कोसळतो. तेव्हा हे दोन पर्यायी रस्ते केव्हा करण्यात येणार आहेत ?

श्री. रणजित कांबळे : फणसेवाडीच्या साडेपाच कि.मी.च्या रस्त्याचे काम पंतप्रधान ग्रामसडक योजनेतून झालेले आहे. पुढचा भाग हा वनखात्याच्या अखत्यारित येतो. 1 कोटी 70 लाखाचा भूसंपादनाचा प्रस्ताव वन विभागाकडे दिलेला असून त्याबाबतीत पाठपुरावा केलेला आहे. आम्हाला त्या रस्त्यासाठी पर्यायी जागा उपलब्ध झाली की तो रस्ता करण्यात येईल.

श्री. भाई जगताप : मंत्री महोदयांनी प्रश्नाला चांगले उत्तर दिलेले आहे. परंतु हा एका विभागाचा प्रश्न नाही. हा प्रश्न मार्गी लागण्यासाठी वन विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्री महोदयांची बैठक होणे आवश्यक आहे. वन कायद्यामुळे तेथील ड्रेनेज साफ करण्याची परवानगी मिळत नाही. आंबोली हे पर्यटन स्थळ आहे. एका बाजूला खोल दरी आहे. एखादा अपघात घडला तर तो इतका वाईट घडेल की त्याची कल्पना करता येणार नाही. तेव्हा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

भविष्यात अपघात घडू नयेत म्हणून हे अधिवेशन संपण्यापूर्वी वन विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मंत्री महोदयांची एक बैठक घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्यात येईल काय ?

श्री. छगन भुजबळ : सन्माननीय सदस्यांनी सांगितली ती परिस्थिती खरी आहे. त्या ठिकाणी खूप मोठ्या प्रमाणावर पाऊस पडतो. पूर्वी अशा प्रकारचे प्रसंग वारंवार उद्भवत नव्हते. याला दोन गोष्टी कारणीभूत आहेत. मोठ्या गाडयांची वर्दळ हे एक कारण आहे. पावसाळ्यामध्ये रस्त्याच्या बाजूला असलेल्या डोंगरावर पाऊस पडल्यामुळे पाणी झिरपते, त्यामुळे पाण्याचा निचरा पटकन व्हावा म्हणून डोंगरावर गटर्स काढलेले होते. ते काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून व्हायचे. गेल्या काही वर्षापासून वन खात्याच्या अधिका-यांनी त्यास हरकत घेतली आणि काम करण्यास अडथळे निर्माण करण्यास सुरुवात केली. या बाबतीत वन खात्याच्या मंत्री महोदयांबरोबर मिटींग झाली. मी त्यांना सांगितले की एक तर आम्ही हे काम करतो किंवा या कामाचा फंड तुम्हाला देतो, तुम्ही काम करुन घ्या, काम झाले पाहिजे.त्यांनी सांगितले की, पाण्याचा निचरा होण्यासाठी जे काही काम करावयाचे आहे ते सार्वजनिक बांधकाम विभागाला करु द्यावे. एवढे सांगितल्यानंतर देखील खालच्या अधिका-यांनी त्यामध्ये अडथळे निर्माण केले. आज सकाळी या खात्याचे सचिव श्री. परदेशी यांच्याबरोबर सार्वजनिक बांधकाम खात्याचे अधिकारी बोलले आणि त्यांनी सकारात्मक दृष्टीने चर्चा केलेली आहे.

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ..... ता.प्र.क्र.26500....

मला असे वाटते की, हे काम या वेळेला अतिशय सुरळीतपणे पार पडू शकेल. या संदर्भात येत्या आठ दिवसात आणखी काय प्रगती होते यावर मी स्वत: लक्ष ठेवणार आहे आणि ते काम होते की नाही हे देखील पाहणार आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, उत्तरामध्ये म्हटले आहे की, उप संचालक, भूगर्भशास्त्र, नागपूर यांच्याकडून अहवाल मागविला आहे. मध्यंतरी मुंबईतील भूगर्भ तज्ज्ञ श्री.गणपुले यांनी आंबोली घाटात पथक नेऊन अभ्यास केला व अहवाल सादर केला आहे. या अहवालात त्यांनी काय नमूद केले आहे याची मंत्री महोदय माहिती देतील काय? माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी मंत्री महोदयांना 2010 मध्ये पत्र पाठविले होते. त्या पत्रात त्यांनी पर्यायी वाहतूक होण्यासाठी केसरी-फणसवडे-नेनेवाडी, सावंतवाडी-गोताड किंवा चौकूळ-तळकट असे तीन रस्त्यांचे पर्याय सुचविले होते. या संदर्भात फिजिबिलिटी काय आहे, पर्याय निघू शकतो का?

श्री.छगन भुजबळ : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जी माहिती दिली आहे त्यामधील पर्यायावर निश्चितपणे विचार करुन काही मार्ग काढता येईल काय याबाबत कारवाई करु.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, उत्तरामध्ये मंत्री महोदयांनी म्हटले आहे की, उप संचालक, भूगर्भशास्त्र, प्रादेशिक विभाग, नागपूर यांच्याकडून अहवाल मागविला आहे. हा घाट 125 वर्षे जूना आहे. ब्रिटिश राजवटीपासून हा घाट अस्तित्वात आहे. महाराष्ट्र राज्याची स्थापना होऊन 50 वर्षे झाली. असे असताना 125 वर्षे जुन्या झालेल्या घाटाची दुरुस्ती का करण्यात आली नाही, लोकांच्या सोयीकडे दुर्लक्ष का करण्यात आले? आंबोली घाट तीन राज्यांना जोडणारा आहे. वन आणि सार्वजनिक बांधकाम विभागाची एकत्रितपणे बैठक घेऊन या संदर्भातील निर्णय घेण्यात येईल काय?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी यापूर्वी जे सविस्तर उत्तर दिले त्यात या प्रश्नाचे उत्तर आलेले आहे. 125 वर्षे जूना घाट आहे हे खरे आहे. 2005 पर्यंत त्या परिसरात लँडस्लाईड झालेले नव्हते. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून ड्रेन सफाईचे काम केले जाते ते करण्यास वन विभागाने मनाई केल्यानंतर 2010-11 मध्ये लँडस्लाईड झाले. आम्ही वन विभागाला वारंवार विनंती केली की, कमीत कमी ड्रेन सफाई करण्यास परवानगी द्यावी. अन्यथा वन विभागाने ते काम करुन घ्यावे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26500....

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, मी सार्वजनिक बांधकाम आणि पर्यटन मंत्र्यांचे शतश: आभार मानतो. आंबोली हे थंड हवेचे ठिकाण असून तेथे पर्यटकांची संख्या वाढत आहे आणि शासनाच्या महसुलामध्ये देखील वाढ होत आहे. ज्या उपाययोजना करावयाच्या आहेत त्याचा आराखडा अंमलात आणण्यासाठी तरतूद केलेली आहे काय, असल्यास किती तरतूद केली आहे?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, बहुतांश जागा वन विभागाच्या क्षेत्रातील आहे. पर्यटन विभागाच्या माध्यमातून आपण कोणतेही काम करु शकत नाही. तेथे सनसेट पॉईंट आहे. तो स्पॉट वन विभागाने स्वत: विकसित करावा असे आम्ही वन विभागाला कळविले आहे.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील भूविकास बँकेच्या कर्मचा-यांची देणी देणेबाबत

(7) * 26436 श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , डॉ.सुधीर तांबे , श्री.जयप्रकाश छाजेड, श्री.माणिकराव ठाकरे, प्रा.सुरेश नवले : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील भूविकास बँकेच्या कर्मचाऱ्यांना मागील पाच महिन्यापासून पगार व मागील तीन वर्षापासून ग्रॅच्युईटी व इतर देणी मिळाली नसल्याचे माहे डिसेंबर, 2011 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, राज्य शासनाने भूविकास बँकेच्या कर्मचाऱ्यांना मागील पाच महिन्यापासूनचा पगार व मागील तीन वर्षापासून ग्रॅच्युईटी व इतर देणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री.हर्षवर्धन पाटील : (1) अंशत: खरे आहे.

(2) व (3) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 मधील कलम 144 (1) (अ) व कलम 18 नुसार दिनांक 29.12.1999 रोजी शासनाने अधिसूचना काढून महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि व ग्रामीण विकास बँक मर्या. मुंबई या बँकेचे विभाजन करुन मुंबई सोडून राज्यातील इतर प्रत्येक जिल्हयांसाठी एक याप्रमाणे जिल्हा सहकारी कृषि ग्रामीण बहूउद्देशीय विकास बँका निर्माण करण्यात आलेल्या आहेत. विभाजनाच्या आदेशाप्रमाणे विभाजनाच्या दिनांकापासून पुढे आपापली सर्व देणी भागविण्याची व येणी वसूल करण्याची जबाबदारी त्या त्या जिल्हा बँका व शिखर बँकेवर सोपविण्यात आली असल्याने सदर बँकांच्या कर्मचाऱ्यांचे वेतन, गॅच्युईटी व इतर देणी भागविण्याची जबाबदारी ही संबंधित बँकांची आहे. कर्मचाऱ्यांचे देणी भागविण्याची जबाबदारी शासनाची नाही.

श्री. एस.क्यू. ज़मा : सभापति महोदय, कृषि व ग्रामीण बँक के करीब 650 कर्मचारियों को 6 महीने से अधिक समय से पगार नहीं मिला है. पगार के रुप में 22 करोड़ रुपए बकाया हैं. 198 कर्मचारियों को रिटायर हुए 3 साल हो गए हैं, उनको अभी तक ग्रॅच्युटी नहीं मिली है. वैधानिक प्रोवीजन यह है कि इसमें विलम्ब होने पर सरकार या बँक को ब्याज देना होगा. मंत्री महोदय ने उत्तर में कहा है कि यह सरकार की जबाबदारी नहीं है, यह बँक की जबाबदारी है. मेरा प्रश्न यह है कि क्या शासन अपनी तरफ से कर्मचारियों की पगार और ग्रॅच्युईटी देने का प्रयास करेगा ? क्या इसके लिए शासन कोई व्यवस्था करेगा कि इन कर्मचारियों को भविष्य में पगार मिलने में कोई तकलीफ न हो और क्या शासन इन कर्मचारियों के लिए वी.आर.एस. की योजना लागू करेगा ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : महोदय, सन 1988 पासून राज्यातील भूविकास बँकांवर प्रशासक नेमलेले आहेत. या बँकांची जी थकबाकी होती ती वसूल करण्यासाठी वेगवेगळ्या योजना शासनाने तयार केल्या. त्यात वन टाईम सेटलमेंटसारख्या योजनांच्या माध्यमातून ही वसुली करण्याचे प्रयत्न करीत आहोत. तसेच आतापर्यंत कर्मचाऱ्यांच्या पगारावर आपण 66 कोटीपेक्षा अधिक रक्कम खर्च केली आहे हे उत्तरात स्पष्टपणे सांगितले आहे. सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे एखाद्या बँकेच्या कर्मचाऱ्यांचे पगारही शासनाने द्यावे आणि त्यासाठी वेळोवेळी हस्तक्षेप सुध्दा करावा हा प्रकार मला तरी शक्य होईल असे वाटत नाही. तरी देखील या बँकांची
जी स्थावर मालमत्ता आहे त्यासंबंधी एक ॲसेट मॅनेजमेंट कमिटी स्थापन करुन भविष्यात बँकेच्या दृष्टीने काही मार्ग काढता येईल काय असा प्रयत्न शासनाच्या पातळीवर सुरु आहे. तसेच 167 कोटीची या बँकांची एकूण प्रॉपर्टी असून त्यात मार्केट रेटनुसार थोडीसी वाढही झाली असावी. पण कायमस्वरुपी मार्ग काढण्याचा प्रयत्न आपण करीत आहोत. तसेच सन्माननीय सदस्यांनी व्हीआरएसची सूचना केली आहे त्याचाही विचार आपल्याला करता येईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, भूविकास बँकेकडून कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना कर्जमाफीची सवलत शासनाने जाहीर केली होती. परंतु ही रक्कम शिखर बँकेने स्वत:कडे वळती करुन घेतल्यामुळे कदाचित ही अडचण निर्माण झाली असावी. तशी रक्कम जर वळती करुन घेतली नसती तर या बँकेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या पगारासंदर्भात प्रश्न निर्माण झाला नसता. या कर्मचाऱ्यांनी 25-30 वर्षे बँकेची सेवा केली त्यांना त्यांचे पगार, ग्रॅच्युईटी आणि कर्जवाटप सुध्दा करता आले असते पण हा पैसा न दिल्यामुळे ही वेळ आली आहे. आज विदर्भातील 15 बँका बंद आहेत, त्यातील कर्मचाऱ्यांना आठ महिन्यांपासून पगार नाहीत, त्यामुळे बँकेचे अधिकारी शेतकऱ्यांकडून जबरदस्तीने वसुली करण्याचे प्रयत्न करतात आणि जेवढी वसुली झाली तेवढी आपसात वाटून घेतात असा प्रकार चालू आहे. म्हणून यासंबंधी शासन वेगळा विचार करुन हा प्रश्न कायमचा सोडविणार आहे काय ?

. . . CC-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील : महोदय, जवळपास मागील दोन वर्षात माझ्याच उपस्थितीत मी याच विषयावर 9 बैठका घेतलेल्या आहेत. आज सकाळी सुध्दा ब्रिफींग करीत असताना मी अधिकाऱ्यांना सांगितले की, पुढील आठ-दहा दिवसात आजपर्यंत झालेल्या सर्व बैठकांचे इतिवृत्त एकत्र करुन त्यातून एखादा सर्वसमावेशक मार्ग, सन्माननीय तोडगा काढता येता काय याचाही विचार करता येईल. काही ठिकाणी बॅका रिजनल कराव्या लागतील तर काही ठिकाणी या बँकांचे विलीनीकरण करावे लागेल. त्यात विदर्भातील 11 बँका, मराठवाड्यातील 8 बँका, कोकणातील 4 बँका आणि काही पश्चिम महाराष्ट्रातील काही बँका आहेत. त्यासंदर्भात निश्चितच मार्ग काढण्याचा प्रयत्न विभागाचा राहणार आहे. हे करीत असताना तेथील कर्मचाऱ्यांची ग्रॅच्युईटी, पगार आणि भविष्यात बँकेला व्यवसाय करता येईल की नाही अशा सर्वच गोष्टींचा सहानुभूतीने विचार करता येईल.

श्री. भाई जगताप : महोदय, मंत्री महोदयांनी यासंदर्भात अनेक बैठका घेतल्या व त्यातील अनेक बैठकांना मी कामगारांचा नेता म्हणून उपस्थित होतो. मला मंत्री महोदयांना विचारावयाचे आहे की.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 26436 .....

श्री. भाई जगताप ....

कर्मचाऱ्यांना पगार मिळाले पाहिजेत, याबद्दल कोणाचेही दुमत असणार नाही. मात्र हा पगार सरकारनेच दिला पाहिजे, असे आमचे म्हणणे नाही. या संदर्भात आपण जो सर्वसमावेशक पर्याय काढणार आहे, त्यामध्ये बँकामध्ये कर्मचाऱ्यांची ग्रॅच्युईटी व इतर काही देणी असेल तर ती देखील देण्याच्या सदर्भातील जबाबदारी शासनाने घेणे आवश्यक आहे. सन्माननीय सदस्य श्री. ज़मा साहेबांनी बँक कर्मचाऱ्यांच्या व्हीआरएसच्या संदर्भात जो पर्याय दिलेला आहे, त्या पर्यायाचा शासन विचार करणार आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, सर्वंकष विचार करावयाचा झाला तर या कर्मचा-यांची एकूण संख्या किती आहे, त्यांच्या व्हीआरएसच्या संदर्भात कसा मार्ग काढावा लागेल, उत्पन्नाचे सोर्सेस कशा प्रकारे सुरु करता येतील, याचा विचार करावा लागणार आहे. आपण काही बँका सुरु करु शकतो अशी परिस्थिती आहे. सर्वच बँका बंद राहणे व त्यांच्यावर कायमस्वरुपी प्रशासक नेमणे, हे सुध्दा योग्य राहणार नाही. त्यामुळे यासंदर्भात सर्वांना बरोबर घेऊन यातून सकारात्मक मार्ग काढण्याचा विभागाचा प्रयत्न राहील.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मंत्री महोदयांना सहकार खात्याचा दांडगा अनुभव आहे. एके काळी शेतक-यांची बँक म्हणून भूविकास बँकेकडे पाहिले जात होते. प्रत्येक जिल्हयामध्ये भूविकास बँक आहे. भूविकास बँकामध्ये जे कर्मचारी काम करीत होते ते आज सेवानिवृत्त झालेले असून त्यांना आतापर्यंत ग्रॅच्युटी सुध्दा मिळालेली नाही. माझे म्हणणे असे आहे की, भूविकास बँका बंद करुन या ठिकाणच्या कर्मचा-यांना जिल्हा सहकारी बँकामध्ये वर्ग करण्यात येणार आहे काय ? तसेच जे कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत त्यांना ग्रॅच्युईटी कधी दिली जाणार आहे ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, बँक कर्मचा-यांना घेण्यास तयार आहे यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी माहिती दिली तर त्यास आमची काही हरकत राहणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शिरवली (ता.वसई,जि.ठाणे) या गावच्या आदिवासी महिला सरपंच यांना काही समाजकंटकांनी केलेली मारहाण

(८) * २६०५६ ***श्री.सुभाष चव्हाण , श्रीमती अलका देसाई , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , प्रा.सुरेश नवले , श्री.एम.एम.शेख*** **:** सन्माननीय ***गृह मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिरवली (ता.वसई,जि.ठाणे) या गावच्या आदिवासी महिला सरपंच यांना काही समाज कंटकांनी पोलिसांसमोरच मारहाण करण्यात आल्याने सदर घटनेची मांडवी पोलीस स्टेशनला तक्रार करण्यास गेले असता पोलिसांनी तक्रार नोदविण्यास टाळाटाळ करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त घटनेची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या घटनेतील गुन्हेगारांवर व तक्रार नोंदवून घेण्यास टाळाटाळ करणा-या पोलिसांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्या करिता : (१) सदर घटना पोलीसांसमोर झालेली नाही तसेच तक्रार नोंदवून घेतांना टाळाटाळही करण्यात आलेली नाही.

(२) होय.

(३) शिरवली गावातील रहिवासी बाळवा उर्फ संतोष शांताराम पाटील व त्यांची पत्नी यांनी या गावच्या महिला सरपंच यांच्याशी गावाच्या सार्वजनिक रस्त्याच्या खोदकामावरुन धक्काबुक्की केली अपशब्द वापरले. त्यावरुन सदर महिला सरपंचांनी मांडवी पोलीस दुरक्षेत्र येथे दिलेल्या तक्रारीवरुन आकरन्स क्रमांक १२/२०१२ नोंद करण्यात आला व तद्नंतर विरार पोलीस ठाणे, गु.र.नं १/२०१२ अनुसूचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा, १९८९ चे कलम ३(१)(१०), भादंविसंक ३२३, ५०४, ५०६ प्रमाणे दिनांक ०९.०१.२०१२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यातील आरोपींना दिनांक १२/०१/२०१२ रोजी अटक केली आहे. सध्या ते जामिनावर मुक्त आहेत. आरोपींविरुध्द दिनांक ३१/०१/२०१२ रोजी मा.प्रथमवर्ग न्यायालय, वसई येथे दोषारोपत्र दाखल केले आहे. सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.सुभाष चव्हाण : काही आदिवासी महिलांना काही समाजकंटकांनी बेदम मारहाण केलेली आहे. राजकीय क्षेत्रात महिलांना ५० टक्क्याचे आरक्षण दिलेले असून हे वर्ष आपण सामाजिक समता वर्ष म्हणून साजरे करीत आहोत. या प्रकरणात मारहाण करणारे समाजकंटक कोण आहेत, किती आहेत, कोणत्या समाजातील आहेत ? सरंपच किंवा पदाधिकारी म्हणून ज्या ठिकाणी महिला कार्यरत आहेत त्यांना अंगरक्षक दिला जाणार आहे काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, शिरवली पाडा येथे महिला सरपंच व इतरांचा वाद झाला होता. या प्रकरणातील आरोपी संतोष पाटील व त्याची पत्नी यांनी महिला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : २६०३५ .....

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील.....

सरपंचाला धक्काबुक्की केली व यातून हा प्रसंग उद्‌भवलेला आहे. संबंधित आरोपीला अटक करण्यात आली असून त्यांच्यावर ॲट्रॉसीटीचा गुन्हा देखील दाखल करण्यात आलेला आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, महिलांना आपण ५० टक्के आरक्षण दिले आहे. परंतु महिला सरपंचाना मारण्याची ही काही पहिलीच घटना आहे असे नाही. आमच्याकडील एका महिला सरपंचाला ग्रामसेवकाने थोबाडीत मारले होते. त्यावेळी मी रात्रभर पोलीस स्टेशनला होते. परंतु यासंदर्भात महिलांच्या बाजूने एकही कायदा नाही. त्यामुळे महिलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून व राजकीय क्षेत्रात वावरणा-या पदाधिका-यांच्या संदर्भात नवीन कायदा तयार करुन महिलांना संरक्षण दिले जाणार आहे काय ?

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, जेथे जेथे अशा तक्रारी येतात तेथे तेथे महिलांना संरक्षण दिले जात असते. महिलांसाठी संरक्षणाची जी काही गरज असेल ती आपण देत आलेलो आहे. एखादी महिला सरपंच असेल, ग्रामसभेच्या संदर्भात महिला सरपंचाने बंदोबस्त मागितला किंवा विशिष्ट तक्रार असेल तर आपण अशा ठिकाणी पोलीस बंदोबस्त देत असतो.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

सभापती : प्रश्नोत्तराच्या तासामध्ये पॉईंट ऑफ ऑर्डर मांडता येत नाही.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सभापती.....

आपणाला जे काही म्हणावयाचे आहे ते मी त्यांना सांगतो.

श्री.बंटी ऊर्फ सतेज डी.पाटील : सभापती महोदय, आपले कायदे सक्षम आहेत. महिलांना संरक्षण देण्यासाठी शासनाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. भविष्यकाळात देखील शासन अशी सकारात्मक भूमिका घेईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, आदिवासी महिला संरपंचाला पोलिसांसमोर मारहाण झाली नाही असे उत्तरात म्हटले आहे. येथे जे उत्तर देण्यात आले आहे ते समाधानकारक नाही. नेहमी सारखे छापील उत्तर देण्यात आले आहे. महिलांना 50 टक्के आरक्षण लागू झाले आहे. त्यामुळे महिला सक्षमपणे पुढे आल्या आहेत. पण आता महिलांना वाटते की, आपण चुकीच्या ठिकाणी आलो आहोत. आज महिलांना अपमानास्पद वागणूक दिली जात आहे. महिलांच्या दृष्टीने चिंताजनक बाब आहे. अशा प्रकारची अनेक उदाहरणे आपल्याला पहायला मिळतील. आज महिला सरपंचाना त्रास दिला जात आहे. त्याची दखल घेऊन प्रत्येक ग्रामपंचायतीच्या महिलांना पोलीस संरक्षण देणार आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, शासनाने महिलांना 50 टक्के आरक्षण लागू करण्याची भूमिका घेतली आहे. आज पर्यंत गाव पातळीवर जे समाज घटक सत्तेपासून वंचित होते मग त्यात ओबीसी, एस.सी.,एस.टी.असतील त्यांना न्याय देण्याची भूमिका शासनाने घेतली. काही ठिकाणी असे संघर्ष होत आहेत ही गोष्ट निश्चितपणे खरी आहे. महिला पदाधिकारी झालेल्या आहेत त्यांना संरक्षित वाटावे म्हणून तातडीने सर्व पोलीस ठाण्याला योग्य सूचना देण्यात येतील. विशेष करून जेथे मागासवर्गीय घटक आहेत, महिला आहेत त्यांना संरक्षण देण्याची भूमिका घेतली जाईल. त्यांची तक्रार येता क्षणी अतिशय गांभीर्याने दखल घेतली जाईल. धक्काबुक्की केल्यानंतर जातीवाचक शब्द उच्चारल्या नंतर ॲट्रॉसिटीसह सर्व गुन्हे नोंद करून संबंधित आरोपींना तातडीने अटक करण्यात आली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा प्रश्न व्यवस्थापकात्मक आहे. पोलिसांनी दखल घेण्याचा विषय आहे. माननीय गृह राज्य मंत्री श्री.सतेज पाटील हे ग्रामविकास राज्य मंत्री देखील आहेत. जिल्हा परिषद, ग्रामपंचायत कार्यालयांने महिला पदाधिकाऱ्यावर हल्ला झाल्यानंतर सरकार म्हणून स्वत:हून तक्रार दाखल केली पाहिजे. ती महिला गेली. तिच्या बद्दल वैयक्तिक वाद नाही. पदावर अतिक्रमण झाल्यामुळे तिच्यावर हा हल्ला झाला आहे. त्यामुळे सरकारने तक्रार दाखल करून त्या महिला सरपंचाला संरक्षण दिले पाहिजे. ही जबाबदारी ग्रामसेवक आणि तहसीलदार यांच्यावर शासन सोपविणार आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय तिसरी यंत्रणा सुमोटो फौजदारी गुन्हे दाखल करू शकत नाही. जातीवाचक शिवीगाळ केली असेल, मारहाण केली असेल अशा पदाधिकाऱ्यांना संरक्षण देण्याची व संवेदनाशील रितीने अशा गुन्ह्यांकडे बघण्याच्या सूचना देण्यात येतील.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माजी नायब तहसिलदार श्री.अमरनाथ पाटील यांचेकडे असलेल्या अनधिकृत संपत्तीबाबत

(9) * 25098 श्री.जयंत प्र.पाटील , श्री.कपिल पाटील : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मौजे पेढांबे, चेंढरे, गोठेकर, वाघ्रण (ता.अलिबाग) व शेणवाई (ता.रोहा जि.रायगड) आदि भागात श्री. अमरनाथ पाटील, सेवानिवृत्त नायब तहसीलदार यांनी सेवा कालावधीत जमिनी, बंगले व फॉर्म हाऊस खरेदी केले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) ठाणे व रायगड जिल्ह्यातील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक 12 जानेवारी, 2012 रोजी वा त्या सुमारास त्यांच्या घरावर छापा टाकला असता रु. 45 लाख 65 हजाराची बेहिशोबी मालमत्ता सापडली हे खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्अनुषंगाने संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्या करिता : (1) होय, हे खरे आहे.

(2) हे अशंत: खरे आहे.

श्री.अमरनाथ पाटील यांच्या मालमत्तेचा उघड चौकशीमध्ये आढावा घेतला असता, त्यांनी ज्ञात उत्पन्नपेक्षा रुपये 32,35,767/- किंमतीची अपसपंदा (बेहिशोबी मालमत्ता) संपादित केल्याचे निष्पन्न झाले आहे.

(3) व (4) सदर प्रकरणी आलोसे श्री.अमरनाथ पाटील, सेवानिवृत्त नायब तहसिलदार व त्यांची पत्नी सौ.विजया अमरनाथ पाटील यांचेविरुध्द पोयनाड पोलीस ठाणे, जिल्हा रायगड येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक 03/2012 लाचलुचपत प्रतिबंधक कायदा 1988, कलम 13(1)(ई) सह 13(2), भादंवि कलम 109 अन्वये दिनांक 12/01/2012 रोजी दाखल करण्यात येवून, दोन्ही आरोपीतास त्याच दिवशी सदर गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. दोन्ही आरोपीतांस दिनांक 13/01/2012 रोजी मा.विशेष न्यायालय, अलिबाग, जिल्हा रायगड येथे हजर केले असता, मा.न्यायालयाने श्री.अमरनाथ पाटील यांना दिनांक 16/01/2012 पर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली व सौ.विजया अमरनाथ पाटील यांना न्यायालयीन कोठडी मंजूर करुन, जामीन मंजूर केला आहे. आरोपी श्री.अमरनाथ पाटील यांची मा.विशेष न्यायालयाने दिनांक 16/01/2012 रोजी जामिनावर मुक्तता केली आहे. सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, श्री.पाटील हे सुरूवातीला तलाठी होते. त्यानंतर ते मंडळ निरीक्षक झाले व तद्नंतर ते नायब तहसीलदार झाले आहेत. ते एका तालुक्यात किती वर्ष होते. त्यांना मालमत्ता गोळा करण्यासाठी कुठल्या कुठल्या अधिकाऱ्यांनी साथ दिली आहे, सहकार्य केले आहे त्याची चौकशी करण्यात आली आहे काय, सध्या त्यांचे पेन्शन सुरू आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, संबंधित अधिकारी किती काळ होते ही माहिती महसूल विभागाकडून घेतली जाईल आणि ती पटलावर ठेवण्यात येईल. ते शासकीय सेवत असताना तक्रार केली असती तर त्यांनी काही लोकांना लुबाडण्याचे केलेले काम देखील आम्ही थांबवू शकलो असतो. पोलिसांकडे अपसंपदाचे प्रकरण आले. ते निवृत्त झाल्यानंतर देखील पोलिसांनी त्यांची अपसंपदा शोधून काढली आहे व त्यांना अटक केली आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आपल्याला संबंधितांची सर्व पेन्शन थांबविता येत नाही. पण या घटनेचा निकाल लागेपर्यंत पेन्शन कायद्याप्रमाणे पेन्शनचा जो भाग थांबविणे शक्य आहे, तेवढा थांबविला जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, याठिकाणी संबंधितांकडे 45 लाख 65 हजार रुपयांची बेहिशोबी मालमत्ता आहे असे म्हटले आहे, परंतु ती कमी आहे.रायगड जिल्ह्यातील महसूल विभागातील अधिकाऱ्याने त्यांची मालमत्ता तपासली तर ती मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून येईल.रायगड जिल्ह्यामध्ये जमिनीला सोन्याचा भाव आलेला आहे.एकवेळ सोन्याचा भाव कमी असेल तर जमिनीचा भाव जास्त आहे अशी स्थिती आहे.म्हणून त्यादृष्टीकोनातून या नायब तहसीलदारांनी जे-जे गुन्हे केले आहेत किंवा ज्या-ज्या प्रॉपर्टीज् केलेल्या आहेत. त्या गुन्ह्यांच्या तपासातील प्रगती माननीय मंत्री महोदयांनी सांगितलेली नाही, ती सांगावी.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, याबाबतीत उत्तरामध्येच दिलेले आहे.सदरहू नायब तहसीदाराकडे एकंदर जी अपसंपदा आढळून आली आहे, ती सगळी मालमत्ता या केसचा निकाल लागेपर्यंत जप्त करण्याच्या सूचना सुध्दा नियमाप्रमाणे देण्यात आलेल्या आहेत.परंतु नायब तहसीलदारांकडे असलेल्या अपसंपदेबाबत जर कोणाकडे आणखी काही माहिती असेल तर ती आम्हाला सांगावी. आम्ही आतापर्यंत याबाबतीत जो शोध घेतला आहे त्याची माहिती रेकॉर्डवर आलेली आहे. यापेक्षा जर कोणाकडे अधिक माहिती असेल तर ती घेऊन त्याबाबत कारवाई करु.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, एखाद्या व्यक्तीकडे बेहिशोबी मालमत्ता असल्याचे सिध्द झाल्यानंतर किंवा लक्षात आल्यानंतर कायद्यामध्ये कोणत्या कारवाईची तरतूद सुचविण्यात आलेली आहे.परंतु एखाद्याकडे बेहिशोबी मालमत्ता आहे हे कोण ठरविते? याची माहिती द्यावी. तसेच एखाद्याकडे बेहिशोबी मालमत्ता असल्याचे लक्षात आल्यानंतरही तशीच ठेवली तर अशा वेळी कायद्यामध्ये अशी कोणती तरतूद आहे की जेणेकरुन संबंधितांवर गुन्हा दाखल करता येतो.तसेच येथील उप जिल्हाधिकारी श्री.ठाकूर यांच्याकडे बेहिशोबी मालमत्ता सापडली आहे.त्यामुळे माझा असा प्रश्न आहे की,आपण महाराष्ट्रामध्ये जी बेहिशोबी मालमत्तेची प्रकरणे निदर्शनास आली आहेत, त्याबाबत कोणती कारवाई केलेली आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय,या घटनेमध्ये संबंधितांचे एकूण उत्पन्न 42,880रु. इतके होते. त्याचा जो सगळा खर्च झाला तो 29 लाख 61 हजार रुपये इतका असावा. त्या नुसार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25098 . . . .

श्री.आर.आर.पाटील . . .

त्याच्याकडे संभाव्य शिल्लक 13 लाख 26 हजार रुपये इतकी रहावयास हवी होती. पण त्याऐवजी त्याच्याकडे 32 लाख 35 हजार 767 रुपये अतिरिक्त आढळून आले आहेत आणि ही अपसंपदा आहे म्हणून पोलिसांनी त्याच्यावर गुन्हा नोंदविलेला आहे.

. . .. 2 एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबई पोलीस कल्याण विभागात गोळा होणाऱ्या निधीत तब्बल दोन कोटी रुपयाची झालेली अनियमितता

(10) * 25721 **श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.हेमंत टकले, ॲड.उषाताई दराडे, श्री.विक्रम काळे , श्री.सतीश चव्हाण, श्री.रमेश शेंडगे, श्री.किरण पावसकर,श्री.जयवंतराव जाधव, श्री.दीपकराव साळुंखे, श्री.अनिल भोसले, श्री.चरणसिंग सप्रा, श्री.राजन तेली, डॉ.सुधीर तांबे,श्री.रामदास कदम , श्री.परशुराम उपरकर, श्री.अरुण गुजराथी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, प्रा.सुरेश नवले, श्री.माणिकराव ठाकरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत, श्री.सुभाष चव्हाण, श्री.अमरनाथ राजूरकर, श्रीमती अलका देसाई, श्री.एम.एम.शेख, श्री.धनंजय मुंडे, श्री. एस. क्यू.ज़मा, श्रीमती दिप्ती चवधरी** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :

(1) मुंबई पोलीस कल्याण विभागात गोळा होणाऱ्या निधीत तब्बल दोन कोटी रुपयाची अनियमितता झाल्याचे माहे जानेवारी, 2012 च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार अनियमितता करणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता : (1) हे खरे आहे.
(2), (3) व (4) सदर प्रकरणी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांना सखोल चौकशी करुन संबंधितांवर नियमानुसार कारवाई करणेबाबत कळविले आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, याठिकाणी चौकशीचे आदेश देण्यात आलेले आहेत. पण आपल्या विभागातील हे कोण महाराज आहेत, ज्यांनी दोन कोटी रुपयांचा अपहार केलेला आहे? याबाबतीत चौकशी करण्यात आलेली आहे काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मुळात यामध्ये काही अनियमितता झाली असल्याचे आढळून आलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे येथे अपहार वगैरे अशी गोष्ट घडलेली नाही. परंतु पोलीस कल्याण निधीसाठी आता आपण नव्याने काही नियमावली तयार केलेली आहे. त्यामुळे भविष्यकाळामध्ये अशा प्रकारे अनियमितता होऊ नये यासाठी नवीन नियमावली केलेली आहे.

. . . .2 एफ-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ग्राम नंदीगाव (ता. अहेरी, जि. गडचिरोली) येथील सुरेश येर्रा आलाम यांची पोलिसांचा खब-या असल्याच्या संशयावरुन झालेली हत्या

(11) *25376 श्री.केशवराव मानकर, श्री.पांडुरंग फुंडकर,श्री.विनोद तावडे, श्रीमती शोभाताई फडणवीस : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) ग्राम नंदीगाव (ता. अहेरी, जि. गडचिरोली) येथील सुरेश येर्रा आलाम (वय 45) यांची दिनांक 06 जानेवारी, 2012 रोजी वा त्या सुमारास पोलिसांचा खबऱ्या असल्याच्या संशयावरुन गोळया झाडून हत्या करण्यात आली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, मृतक सुरेशच्या मृतदेहाजवळ नक्षलवाद्यांनी टाकलेल्या बॅनरवर 'पोलीस खबऱ्यांचे असेच हाल होतील', असे लिहिलेले आढळले, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तदअनुषंगाने नक्षलवाद्यांविरुध्द कोणती कारवाई केली तसेच संबंधित मृत व्यक्तीच्या कुटुंबाला कोणती आर्थिक मदत केली आहे वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.आर.आर.पाटील : (1) हे खरे आहे.

(2) हे खरे नाही.

(3) अहेरी तालुक्यातील उप.पोलीस स्टेशन राजाराम खांदला येथे गु.र.क्र.01/2012 कलम 302, 147, 149, 120 (ब), 506 भा.दं.वि., 3/25 भा.ह.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

तसेच सदर घटनेतील नक्षलवाद्यांनी हत्या केलेल्या मयत सुरेश आलाम यांचे वारसांना एस.आर.ई. योजनेअंतर्गत रु.1 लक्ष रूपयांची मदत देण्यात आलेली असून केंद्र शासनाचे योजनेनुसार 3 लक्ष रूपये मदत देण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलवाद्यांच्या बाबतीत माहिती देणारा पोलिसांचा खबऱ्या असल्याच्या संशयावरुन त्याची हत्या करण्यात आल्याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे आणि सरकारने त्याच्या कुटुंबीयांना 1 लाख रुपयांची मदत केलेली आहे आणि केंद्र शासन 3 लाख रुपये मदत करणार आहे. माझा प्रश्न असा आहे की, केंद्र शासनाची मदत केव्हा प्राप्त होईल तसेच ही मदत देण्याच्या बाबतीत कोणते प्रोसीजर आहे याची कृपया माहिती द्यावी.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25376...

श्री.आर.आर.पाटील :सभापती महोदय, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यामध्ये कोणाचा मृत्यू झाल्यास त्यांच्या कुटुंबीयास शासना मार्फत एक लाख रुपयांची मदत करण्यात येते. केंद्र सरकारकडून तीन लाख रुपयांची मदत मिळते. अशी सर्व प्रकरणे मंजुरीसाठी दिल्लीला पाठवावी लागतात. त्यांच्याकडून मंजुरी आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांमार्फत ही रक्कम दिली जाते. साधारणत: तीन ते चार महिन्यांनी ही मंजुरी मिळते. आतापर्यंत नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना केंद्र सरकारकडून तीन लाख रुपयांची मदत मिळालेली आहे.

श्री.एस.क्यू.ज़मा : सभापति महोदय, मंत्री महोदय ने कहा है कि उनको सेन्ट्रल गवर्नमेंट का कम्पेनसेसन मिल गया है. नक्सलवादी हमले में जो लोग मारे जाते हैं, उनको आप 1 लाख रुपए कम्पेनसेसन देते हैं. यह 1 लाख रुपए बहुत कम है. इसलिए मेरा प्रश्न यह है कि कम्पेनसेसन की राशि बढ़ाने के प्रस्ताव के ऊपर क्या राज्य सरकार विचार कर रही है ? सेन्ट्रल गवर्नमेंट का कम्पेनसेसन आने में 3-4 महीने का समय लग जाता है. इसलिए सेन्ट्रल गवर्नमेंट का कम्पेनसेसन महाराष्ट्र सरकार तुरन्त दे दे और बाद में सेन्ट्रल गवर्नमेंट से पेमेंट ले लिया जाए, क्या इस प्रकार की योजना सरकार बना सकती है ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सजेशन फॉर ॲक्शन.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आपणा सर्वांना माहीत आहे की, दोन दिवसांपूर्वी जी दुर्दैवी घटना घडली त्यामध्ये काही जवान शहीद झाले. नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात खबऱ्याचा मृत्यू झाल्यास आपण त्यांच्या कुटुंबीयांना मदत करतो. मी मागील वेळेला सुध्दा प्रश्न विचारला होता आणि त्यावेळी आपण सकारात्मक उत्तर दिले होते. नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पोलिसांना आपण शहीदच समजतो. माझा प्रश्न आहे की, आपण 26.11 च्या अतिरेक्यांच्या हल्ल्यामध्ये आपले पोलीस अधिकारी व कर्मचारी शहीद झाले त्यांना आपण जी मदत केली तशीच मदत या शहीद झालेल्या पोलिसांना करणार काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25376...

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मुंबई शहरावर अतिरेक्यांनी दहशतवादी हल्ला केला त्यामध्ये आपले पोलीस अधिकारी व कर्मचारी शहीद झाले त्यांच्या कुटुंबीयांना 25 लाख रुपये सानुग्रह अनुदान, निवृत्ती पर्यंतचे वेतन आणि एक घर देण्यात आले. त्यानंतर गडचिरोली जिल्ह्यातून मागणी आली की, मुंबईमध्ये जे शहीद झाले त्यांना 25 लाख रुपये दिले आणि गडचिरोली जिल्ह्यात जे शहीद होतात त्यांच्यासाठी 10 लाख रुपये देता. आता महाराष्ट्र शासनाच्या पोलीस दलात अशी तफावत केली जात नाही. मुंबईमध्ये शहीद झाले त्यांच्यासाठी ज्या तरतुदी केल्या त्याच तरतुदी गडचिरोलीमध्ये नक्षलवाद्यांशी लढताना जे पोलीस अधिकारी कर्मचारी शहीद होत आहेत त्यांना देखील लागू आहेत. परंतु केंद्रीय राखीव पोलीस दलातील जवानांना अशी मदत मिळत नाही. आपल्याकडे मागील तीन वर्षापासून जवळपास 5 हजार केंद्रीय राखीव पोलीस दलाचे जवान काम करीत आहेत. दोन दिवसांपूर्वी जी घटना घडली, ती सीआरपीएफच्या बाबतीतील पहिली घटना आहे. नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात सीआरपीएफचे जवान शहीद झाल्यास त्यांना केंद्र सरकारकडून 15 लाख रुपयांची मदत मिळते. तर आपला जवान शहीद झाल्यास त्यांना 25 लाख रुपये सानुग्रह अनुदान मिळते. तेव्हा या संदर्भात माझी त्यांच्या वरिष्ठांबरोबर चर्चा देखील झालेली आहे. सीआरपीएफच्या जवानांबरोबर देखील माझे बोलणे झाले आहे. त्यांची एवढीच मागणी आहे की, आम्ही आपल्या राज्यात येऊन काम करतो. आम्ही आपल्याकडे घर मागत नाही. परंतु नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात सीआरपीएफ आणि स्थानिक पोलिसांचा मृत्यू झाल्यास आम्हाला मिळणाऱ्या मदतीमध्ये तफावत दिसते. आमच्यामध्ये कोणताही दुजाभाव नाही. या राज्यासाठी आम्ही आपले रक्त सांडतो. तेव्हा राज्याने देखील आमचा सन्मान करावा. शहीद झालेल्या जवानांना दुजाभावाची वागणूक देऊ नका. तेव्हा 10 लाख रुपयांची जी तफावत आहे ती राज्य शासनामार्फत देण्यात यावी. तेव्हा केंद्र सरकारचे 15 लाख आणि राज्य सरकारचे 10 लाख असे एकूण 25 लाख रुपये सीआरपीएफच्या जवानांना मिळावेत असा प्रस्ताव गृह विभागाने सादर केला असून तो मंत्रिमंडळापुढे सादर केलेला आहे. त्यावर मंत्रिमंडळात अंतिम निर्णय घेण्यात येईल.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25376...

सभापती : मी माननीय गृह मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. आपण आता जे सांगितले ते पोलिसांना मदत करण्या संदर्भात आहे. परंतु या ठिकाणी नक्षलवादी चळवळीमध्ये जो शासनाला मदत करतो त्याचा मृत्यू झालेला आहे. त्याच्या कुटुंबीयांना आपण एक लाख रुपये मदत करतो. नक्षलवाद्यांना शोधून काढण्यासाठी पोलिसांना मदत करतात एवढाच त्यांचा गुन्हा आहे. मी त्यांना खबऱ्या म्हणणार नाही. तेव्हा आपल्या दृष्टीने अशा लोकांचा मृत्यू महत्वाचा आहे. माझे असे म्हणणे आहे की, अशा लोकांना एक लाख ऐवजी 5 लाख रुपयांची मदत करण्यात येईल काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, त्या माणसांचा जगण्याचा हक्क नाकारला जात आहे त्यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी राज्याची आहे. तेथे आपण कुठेतरी कमी पडत आहोत. त्या कुटुंबाचे नुकसान होत आहे हे मी अमान्य करीत नाही. परंतु ही गोष्ट देखील खरी आहे की, ती व्यक्ती खबऱ्या आहे किंवा कसे हे नक्षलवादी ठरवितात. एका निरपराध व्यक्तीला मारायचे आणि दहा हजार माणसांमध्ये जरब निर्माण करायची अशी नक्षलवाद्यांची स्ट्रॅटेजी आहे.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

हे त्यांचे तत्व आहे. त्यांचे जे लिटरेचर सापडलेले आहे त्यातून या गोष्टी स्पष्ट झालेल्या आहेत. निरपराध माणसांना सगळयांसमोर मारुन आपल्या संघटनेचा वचक आणि दरार निर्माण करण्यात येतो. माझी माहिती अशी आहे की, नक्षलवादी ज्यांना खबरे म्हणतात त्यातील निम्म्याहून अधिक लोकांचा पोलिसांशी कधीही संपर्क आला नव्हता. याउलट अशी माहिती पुढे आलेली आहे की, त्यातील 20 टक्के लोक असे निघतील की, ते यापूर्वी कधी ना कधी नक्षलवादी ॲक्टिव्हिटीमध्ये काम करत होते. त्यांनी नक्षल सोडल्यामुळे आणि गावात येऊन राहिल्यामुळे चिडून किंवा आर्थिक गैर विश्वासामुळे,घोटाळयामुळे अशा अनेक हत्या त्या परिसरामध्ये झालेल्या आहेत. पोलिसांना मदत करणारे जे खबरे आहेत, पोलीस पाटील आहेत, पोलिसांना मदत करणारे लोक आहेत ते हे धाडस करीत आहेत. आपल्या सिस्टिमवर विश्वास ठेवीत आहेत.नक्षलवादी कारवाया संपुष्टात येण्यासाठी जे लोक सक्रीय मदत करीत आहेत अशा लोकांना मदत देण्याच्या बाबतीत जरुर धोरण घेतले जाईल. जनतेवर जरब बसावी यासाठी जी निरापराध माणसे मारली जात आहेत त्यांच्याही बाबतीत शासन सहानुभूतीचे धोरण घेईल आणि आज जे एक लाख रुपये दिले जात आहेत त्यामध्ये वाढ करण्याची भूमिका स्वीकारली जाईल, गृह विभागामार्फत, वित्त विभागामार्फत प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर नेला जाईल आणि तीन महिन्याच्या आत यातील योग्य तो निर्णय घेतला जाईल.

सभापती : सन्माननीय गृह मंत्र्यांचे मी अभिनंदन करतो. तसेच या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांचे मी अभिनंदन करतो. आज 11 प्रश्नावर चर्चा झालेली आहे ही आपली अत्यंत चांगली प्रगती आहे.

प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. / मु. शी. : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. राजेंद्र मुळक (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र भूविकास महामंडळ, पुणे यांचे सन 2006-2007 व 2007-2008 या वर्षाचे वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : वार्षिक लेख अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : नियम 93 अन्वये सूचना

सभापती : यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र. पाटील,कपिल पाटील यांनी "महात्मा ज्योतिबा फुले विद्यालय, दाभा, ता. मंगळूरपीर, जि. वाशिम या बोगस विद्यालयास मान्यता देवून शासनाच्या तिजोरीवर डल्ला मारण्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामदास कदम, परशुराम उपरकर यांनी "रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील आंबा बागायतदारांच्या झालेल्या आर्थिक नुकसानीमुळे त्यांना शासनाने आर्थिक मदत देणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "गॅस वाहतुकदारांचा संप सुरु असल्याने राज्यातील पुणे, धुळे, नागपूर, औरंगाबाद, सांगली, कोल्हापूर या भागात गॅस सिलेंडरची निर्माण झालेली टंचाई " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, संजय केळकर, रामनाथ मोते यांनी "राज्यातील जानेवारी महिन्यापासून "आधार" कार्ड नोंदणी होवून वर्षभराचा कालावधी उलटूनही अद्यापपर्यंत सुमारे 1 कोटी नागरिकांना आधारकार्ड प्राप्त होणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे यांनी " महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांच्या अकार्यक्षम अशासकीय कारभारामुळे या विद्यापीठातील हजारो निवृत्तीवेतन धारकांना आर्थिक लाभापासून वंचित राहण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे. उर्वरित नियम 93 अन्वयेच्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकरली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: शैक्षणिक संस्थांकडून व्यापारी दराने वीज बिल वसूल करणे याबाबत श्री. कपिल पाटील वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.राजेंद्र मुळक (ऊर्जा राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

.....5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, हा प्रश्न अनेक वेळा या सभागृहात मांडण्यात आलेला आहे. व्यापारी दराने शैक्षणिक संस्थांकडून वीज दर वसूल केल्यामुळे महाराष्ट्रातील शाळा आणि कॉलेजेस चालू शकत नाहीत अशी स्थिती निर्माण झालेली आहे. मुंबईतील रात्र शाळांना महिन्याचे बिल 70-70 हजार रुपये येत आहे. वेतनेत्तर अनुदान देण्यात येत नाही मग शाळा चालवावयाच्या कशा? माझा प्रश्न असा आहे की, सन 2003 पासून अनेक वेळा या सभागृहात आणि त्या अगोदर शाळांनी शासनाकडे मागणी केल्या नंतरही शासनाने या बाबतची उपाययोजना का केली नाही?

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील ....

आता शेवटच्या परिच्छेदामध्ये असे उत्तर दिले आहे की, नवीन उपवर्गवारी तयार करण्याचा प्रस्ताव सादर केला आहे आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या निर्णयानुसार राज्यातील शैक्षणिक संस्थांना वीजदर आकारणी करण्यात येईल. जो प्रस्ताव दिला आहे तो ठराविक कालावधीत मंजूर होईल हे शासन पाहणार का ? या आधी जी आकारणी झाली त्याचे कॉम्पेन्सेशन शिक्षण संस्थांना देणार का ? घरगुती वीजदरानेच शाळांना वीजदर आकारला जाईल याची हमी घेणार का ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, या संदर्भामध्ये महावितरण कंपनीने एमईआरसीकडे एक नवीन वर्गवारी तयार करण्याच्या संदर्भात आपले अपील दाखल केले होते. ते अपील नामंजूर झाले म्हणून आपण दिल्लीला ॲपिलेट ट्रिब्यूनलमध्ये गेलो. ॲपिलेट ट्रिब्युनलने या सर्व संस्थांसाठी एक नवीन वर्गवारी सुरु करावी अशा प्रकारचे निर्देश दिले. त्यानुसार आपण एल-2 मध्ये एक नवीन वर्गवारी सुरु केली. त्यामध्ये शैक्षणिक संस्था, इस्पितळे, दवाखाने इत्यादी बिगर घरगुती संस्थांना एलटी-2 या वर्गवारीनुसार वीजदर लागू व्हावेत या संदर्भात परत एमईआरसीकडे प्रपोजल दिलेले आहे. 25 टक्के कमी दराने या सर्व संस्थांना वीजदर आकारण्यात येईल.

श्री. कपिल पाटील : मी घरगुती दराप्रमाणे वीजदर आकारण्याची मागणी केली होती.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, नवीन वर्गवारीमध्ये त्यापेक्षा 25 टक्के कमी दराने आकारणी करण्यात येईल. एमईआरसीकडून 15 ते 20 दिवसामध्ये मागणी क्रमप्राप्त आहे.

श्री. कपिल पाटील : आधी जे पैसे वसूल केले आहेत त्यांना कॉम्पेन्सेशन देणार का ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, याला रिट्रॉस्पेक्टिव्ह इफेक्ट देता येत नाही.

श्री. कपिल पाटील : शासन भरपाई करणार का ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, त्याची संपूर्ण तपासणी केल्यानंतरच मी सन्माननीय सदस्यांना सांगेन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : शबरी आदिवासी वित्त व विकास महामंडळाकडून शासनाची मंजुरी नसताना खरेदी करण्यात येणे याबाबत सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, शासनाने या संदर्भात केलेल्या निवेदनाने माझे समाधान झालेले आहे.

नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 3 बाबत

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील खाली गेलेले आहेत व ते पाच मिनिटात सभागृहात येणार आहेत. त्यामुळे आपण निवेदन क्रमांक 3 नंतर घ्यावे अशी माझी विनंती आहे.

सभापती : ठीक आहे. निवेदन क्रमांक 3 नंतर घेण्यात येईल.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./ मु.शी. : नोंदणी करुन सहा महिने होऊनही लोकांना आधार कार्ड न मिळणे याबाबत श्री. परशुराम उपरकर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

प्रा. फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 4 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : निवेदनामध्ये म्हटल्याप्रमाणे राज्यात जवळपास 4 कोटी लोकांची नोंदणी झालेली आहे. यापैकी किती लोकांना आधार कार्ड मिळाले ? आधार कार्डची फार मोठ्या प्रमाणावर जाहिरात झाली. त्या जाहिरातीनुसार ज्या लोकांनी नोंदणी केली त्यांना अद्यापही कार्ड मिळालेले नाहीत. हे महत्वाचे कार्ड आहे. 4 कोटीपैकी किती लोकांना आधार कार्ड देण्यात आले आणि राहिलेले आधार कार्ड देण्याची कार्यवाही कधी होणार आहे ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, आधार कार्ड देण्याच्या बाबतीत तीन प्रकारचे टप्पे आहेत. महाराष्ट्र राज्यात त्याची नोंदणी होते त्यानंतर त्याचे बंगलोर येथे नॅशनल सेंटर आहे त्या ठिकाणी प्रोसेसिंग होते आणि नंतर कलकत्ता येऊन ते कार्ड पोस्टाने वितरित करण्यात येते. राज्याची लोकसंख्या 11 कोटी आहे आणि आतापर्यंत 3,69,19,425 लोकांची नोंदणी झालेली आहे. त्यापैकी 2,83,94,658 कार्ड जनरेट झालेले आहेत. म्हणजे 33 टक्के कार्ड जनरेट झालेले आहेत.

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./ मु. शी. : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कणकवली तालुक्यातील हुंबरठ व कुरगाव नळ पाणीपुरवठा योजना बंद असणे याबाबत श्री. परशुराम उपरकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

श्री. रणजित कांबळे (पाणीपुरवठा राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 5 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...7...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, या दोन्ही नळ योजना जवळजवळ 20 लाख रुपयांच्या आहेत. या दोन नळ योजनांपैकी पहिली जी नळ योजना आहे त्या योजनेतून गेली दहा वर्षे पाणी मिळत नाही. दुसरी जी नळ योजना आहे त्या ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा केला जातो. त्यातील ज्या तीन-चार वाड्या आहेत त्यामध्ये दळवीवाडी, भोसलेवाडी या ठिकाणी सुध्दा पाणी मिळत नाही अशा प्रकारची तक्रार आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर....

या नळ योजनेचे माननीय अटलबिहारी वाजपेयी यांनी नेटवरुन उद्घाटन केले होते. त्या योजनेची अशी परिस्थिती आहे. ही नळ पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करुन तेथे पाणी पुरवठा सुरु केला जाईल काय आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बैठक घेऊन ज्या नळ पाणी पुरवठा अपूर्ण राहण्यास पाणी पुरवठा समित्या कारणीभूत आहेत त्या समित्यांच्या सदस्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल असे जाहीर केले होते. त्याबाबत शासनाची काय भूमिका राहणार आहे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यात एकूण 30 नळ पाणी पुरवठा योजना मंजूर होऊनही 3-4 वर्षे झाल्यानंतरही पूर्ण झालेल्या नाहीत. यापूर्वी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या योजना पूर्ण होण्यासाठी पुढाकार घेतलेला आहे. त्यापैकी 26 नळ पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्या आहेत. उर्वरित 4 योजना जून महिन्यापूर्वी पूर्ण होणार आहेत. एखाद्या कामात अनियमितता झाली असेल तर संबंधिताविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल केला जातो. परंतु ज्या नळ पाणी पुरवठा योजना वादग्रस्त विषयामुळे अपूर्ण असतील त्या समित्या हे काम करीत नसतील तर त्यांची कामे विभागामार्फत करण्याचे आदेश दिलेले आहेत. ही राहिलेली कामे जून महिन्यापर्यंत पूर्ण करुन घेणार आहोत. काही वाड्यांच्या नळ पाणी पुरवठा योजनांची कामे 4-4 वर्षे अपूर्ण राहिली आहेत असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. आम्रड येथील नळ पाणी पुरवठा योजनेचे काम 2008 साली पूर्ण होऊन 2010 पर्यंत पाणी पुरवठा सुरळीत चालू होता. परंतु वीज मंडळाचे बिल थकल्यामुळे ती योजना बंद झाली आहे. परंतु थकित बिल भरुन ती योजना हस्तांतरित करुन घेतली जाईल असे तेथील सरपंचांनी शासनाला पत्र दिलेले आहे. त्यामुळे ती योजना पुन्हा सुरु होईल. दुसरी योजना प्रगतीपथावर असून त्या योजनेचे रायजिंग मिलचे काम व इएसआरचे काम प्लिन्थ लेव्हलपर्यंत झालेले आहे. उर्वरित काम जून महिन्यापर्यंत होणार आहे. त्या ठिकाणी टंचाई भासली व टँकरची मागणी आली तर टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जाईल. ज्या ग्रामपंचायतींकडून अशी मागणी येईल त्यांना निश्चितपणे टँकरद्वारे किंवा अन्य माध्यमातून पाणी देण्याची व्यवस्था केली जाईल.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, नळ पाणी पुरवठा योजनेच्या कामांना 8-8 वर्षे विलंब झालेला आहे त्या ठेकेदारांविरुध्द शासन कारवाई करणार आहे की नाही ?

श्री.रणजित कांबळे : या कामांमध्ये विलंब झालेला आहे याबद्दल दुमत नाही. परंतु नळ पाणी पुरवठा योजनेची कामे पूर्ण करणे ही पाणी वापर समितीची जबाबदारी आहे. ग्रामपंचायतीच्या पाणी वापर समितीमार्फत त्यांचे बांधकाम होत आहे. त्यांच्यामध्ये अंतर्गत वाद असल्यामुळे हा विलंब झालेला आहे. अशा प्रकारे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील काही योजनांची कामे थांबलेली होती. परंतु त्या योजनांची कामे जून महिन्यापर्यंत पूर्ण केली जातील. पाणी पुरवठा योजना पूर्ण झाल्यानंतर त्याचे ऑडिट झाल्यावर त्यात अनियमितता आढळून आली तर संबंधितांवर फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ग्रामीण पाणी पुरवठा योजनेची जबाबदारी ग्रामपंचायतीच्या पाणी वापर समितीवर टाकण्यात आली आहे. त्यांनी ही कामे करावयाची आहेत. त्यांना हा अधिकार दिला आहे. परंतु अनेक ग्रामपंचायतींमध्ये या अधिकाराचा दुरुपयोग होत आहे. त्या सदस्यांची आपसात भांडणे असतात. पाणी देण्याच्या भूमिकेला भांडणाचे स्वरुप येते. एखादी योजना ठराविक काळामध्ये पूर्ण होण्यासाठी सरकारचे कोणते नियंत्रण आहे, कारण काही ठिकाणी 8-8 वर्षे ह्या योजना रखडलेल्या आहेत. त्यासाठी सरकारची नियंत्रण ठेवण्याची भूमिका काय आहे ?

श्री.रणजित कांबळे : अलीकडच्या काळात काही ग्रामपंचायतींमध्ये अंतर्गत वाद असल्यामुळे योजना पूर्ण होण्यास विलंब होत आहे. बहुतांश ग्रामपंचायतींना बांधकामासाठी 18 महिन्यांचा कालावधी दिलेला असतो. या कालावधीत योजना पूर्ण झाली तर ठीक आहे, परंतु त्यामध्ये वाद निर्माण झाला किंवा कोणत्याही कारणास्तव विलंब झाला असेल तर ते काम विभागामार्फत पूर्ण करण्यात येईल.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 6 बाबत</u>

सभापती : नियम 93 च्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 6 हे पुढे ढकलण्याबाबत मला माननीय कामगार मंत्र्यांनी विनंती केली असल्यामुळे मी हे निवेदन प्रलंबित ठेवत आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./ मु.शी : रत्नागिरी जिल्ह्यातील आरेवारे-जयगड या सागरी मार्गाच्या विकासाची कामे करण्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत डॉ.नीलम गो-हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. रणजित कांबळे (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 1 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : ज्या प्रमाणे घाटामध्ये दरडी कोसळून वाहतूक बंद होते त्या प्रमाणे संरक्षक भिंत कोसळून वाहतूकीस अडथळा निर्माण होतो. या संरक्षक भिंतीचे बांधकाम मजबूत असले पाहिजे. उत्तरामध्ये म्हटलेले आहे की, वाहतुकीची कोंडी होऊ नये म्हणून वळण रस्ते बांधण्याची व्यवस्था केलेली आहे. मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर दरडी कोसळू नयेत म्हणून जशी व्यवस्था करण्यात आलेली आहे तशा प्रकारे या मार्गावर दरडी कोसळू नयेत म्हणून काय उपाययोजना करण्यात येणार आहे ?

श्री. रणजित कांबळे : मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर नेट टाकून सिमेंट प्लास्टरींग केलेले आहे. ते खूप खर्चिक काम आहे. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्या ठिकाणी फक्त 8-10 मीटर उंचीची टेकडी आहे. त्यामुळे तेथे संरक्षक भिंत बांधण्यात येत आहे.

श्री. परशुराम उपरकर : सागरी महामार्गासाठी, वळणे वगैरे काढण्यासाठी कोकण पॅकेजमध्ये तरतूद केलेली होती. या वर्षी त्यासाठी किती तरतूद करण्यात आलेली आहे ? तसेच रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांना जोडणारा मालगुड येथे जो पूल आहे त्याच्या दोन्ही बाजूस भराव टाकण्याचे काम राहिलेले आहे. हे भराव टाकण्याचे काम केव्हा करण्यात येणार आहे ?

श्री. रणजित कांबळे : कोकण पॅकेजमध्ये या महामार्गासाठी कोणतीही तरतूद केलेली नाही. 720 कि.मी.चा समुद्र किनारा आहे...

श्री. परशुराम उपरकर : कोकण पॅकेजमध्ये सागरी मार्गाकरिता पैसे राखून ठेवलेले आहेत. मंत्री महोदयांनी सागरी मार्गासाठी पैसे नाहीत असे उत्तर दिलेले आहे. रेकॉर्ड चुकीचे होत आहे.

श्री. रणजित देशमुख : सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारलेला आहे. कोकण पॅकेजमध्ये भूसंपादनासाठी तरतूद केलेली होती. सन्माननीय सदस्यांकडे काही वेगळी माहिती असेल तर ती त्यांनी आमच्याकडे द्यावी. एकूण 51 पुलापैकी 41 पुलाचे काम केलेले आहे. हे पूल फार मोठे आहेत. सध्या पूल बांधण्यावर आमच्या विभागाने भर दिलेला आहे. नाबार्डच्या माध्यमातून 300 कोटीचा पूल घेतलेला आहे. आणखी 3 पूल प्रस्तावित आहेत. त्याचा खर्च एक हजार कोटी इतका आहे. आधी आम्ही पूल करणार आहोत आणि त्यानंतर रस्त्यांचे रुंदीकरण करणार आहोत. आता भूसंपादनाच्या बाबतीत अडचण अशी आहे की, भूसंपादनासाठी निधीची तरतूद करुन देखील लोक भूसंपादनासाठी विरोध करीत आहेत. त्यामुळे भूसंपादन होत नाही. याबाबतीत सर्व लोकप्रतिनिधींनी मदत केली तर हे काम लवकर होईल.

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : चिपळूण तालुक्यातील तांबी नदीवर पुलाची उभारणी व्हावी याबाबत सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रणजित कांबळे(सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-2...

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, नाबार्डकडून रु.1.17 कोटी शासनाला प्राप्त झाले आहेत. या रक्कमेतून या पुलाचे काम पूर्ण होणार नाही. शासनाला उर्वरित रक्कम द्यावी लागणार आहे. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये या कामासाठी तरतूद केली असल्याचे दिसून येत नाही. एका वर्षात, पाच वर्षात, दहा वर्षात किंवा किती वर्षात हे काम पूर्ण होणार हे कळेल काय?

श्री.रणजित कांबळे : हे काम रु.1.17 कोटीमध्ये पूर्ण होणार आहे. हे काम स्वत: नगरविकास राज्यमंत्री यांनी प्रस्तावित केले आहे. या अर्थसंकल्पामध्ये या पुलाचे काम समाविष्ट झालेले आहे. 1.17 कोटी रुपयामध्ये हे काम पूर्ण होईल. कदाचित आणखी पैसा लागला तर शासन त्याची तरतूद करणार आहे आणि दोन वर्षामध्ये हे काम पूर्ण होईल.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : सावंतवाडी येथील आंबोली घाटातील दरड कोसळण्याच्या घटना थांबविणे याबाबत श्री.परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रणजित कांबळे (सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-3 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-3...

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, पावसाळ्यात या रस्त्यावरुन अवजड वाहनांच्या वाहतुकीवर बंदी आणण्यात येईल काय?

श्री.रणजित कांबळे : परिस्थिती पाहूनच निर्णय घ्यावा लागेल. निश्चितपणे गृह आणि सार्वजनिक बांधकाम विभाग माननीय सदस्यांनी केलेली सूचना लक्षात घेऊन गरज भासल्यास अवजड वाहनांची वाहतूक बंद करेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची वेबसाईट हॅक झाल्याबाबत सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, संजय केळकर, रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक-4 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...6...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्रमांक-4....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाची वेबसाईट हॅक झाल्यानंतर हॅकर्सचा रेफरन्स कोईम्बतूर येथील मुस्लीम लिबरेशन आर्मीशी जुळत असल्याचे आढळून आले आहे. एका अर्थाने दहशतवादी संघटनेशी हॅकर्सचा संपर्क असल्याचे दिसते. वेबसाईट हॅक करणाऱ्यांचा आय.पी.ॲड्रेस सापडला आहे काय, असल्यास तो काय आहे?

सभापती महोदय, 18 मार्च, 2012 रोजी वेबसाईट हॅक झाल्यानंतर 12 दिवस उलटले असताना संशयीत म्हणून कोणाला ताब्यात घेण्यात आले आहे काय? अमरावती पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत वेबसाईट हॅक करण्याचा प्रकार कधीही घडला नाही. या प्रकारामुळे कोणत्याही प्रकारचा असंतोष सर्वसामान्य जनतेमध्ये निर्माण झालेला नाही असे निवेदनामध्ये म्हटले आहे. ज्यावेळी वेबसाईट हॅक झाली त्यावेळी मुस्लीम टेररिस्ट संघटनेचा रेफरन्स पुढे आल्यामुळे लोकांमध्ये तीव्र प्रतिक्रिया उमटू लागली होती. असे असताना असंतोष नाही असे म्हणणे म्हणजे अमरावतीमधील लोक थंड वृत्तीचे आहेत असे सरकारला म्हणावयाचे आहे काय? दिवसेंदिवस ई-गव्हर्नन्सचे प्रमाण वाढत आहे. राज्यात सायबर क्राईम सेलची संख्या सध्या तीन आहे. येत्या काळात सायबर क्राईम सेलची संख्या वाढविण्यात येणार आहे काय, असल्यास त्याबाबत शासनाने आर्थिक नियोजन केले आहे काय?

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदन क्र. 4.....

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : महोदय, या घटनेत आयपी ॲड्रेस मिळाला असून इंटर वेब आय टेक (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड, नं. 371, क्रॉस कट रोड,कोईम्बतूर या संस्थेबरोबर पत्रव्यवहार करुन त्यांच्याकडून माहिती मागविण्यात आलेली आहे हे निवेदनात स्पष्ट केले आहे. हे आयपी ॲड्रेस पाकिस्तानमधील लाहोर व कराची येथील असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले व त्यासंदर्भात केंद्र सरकारशी पत्रव्यवहार करुन पुढील कारवाई करण्याचे प्रयत्न चालू आहेत. त्याचबरोबर अमरावती येथील लोकांचा प्रक्षोभ नसल्याचे येथे स्पट केले असून वेब ट्राफिक मॉनिटरिंग आता वाढत चालले आहे. आपण वर्तमान पत्रातून देखील वाचले असेल की वेब वापरणाऱ्यांची संख्या दिवसेदिवस वाढत आहे. त्यासाठी शासनाने सायबर क्राईम इन्व्हेस्टिगेशन सेल्स सध्या मुंबई, ठाणे व नवी मुंबई असे तीन ठिकाणी सुरु केलेले आहेत. भविष्यात पुणे, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर अशा ठिकाणी हे सेल्स स्थापन करण्याचे प्रस्ताव वित्त विभागाच्या माध्यमातून कॅबिनेटसमोर आणणार आहोत. त्या माध्यमातून सायबर क्राईम इन्व्हेस्टीगेशन सेल्सची स्थापना राज्यातील सर्वच प्रमुख शहरांमध्ये करण्यात येईल व त्या माध्यमातून सायबर क्राईम, डेटा थेफ्ट, सायबर टेररिझम, इंटरनेट हॅकिंग तसेच व्हायरस रोखण्यासाठी किंवा मॉनिटरिंग करण्यासाठी शासन प्रयत्न करील.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : औचित्याचे मुद्दे

सभापती : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"सिंधुदुर्ग-रत्नागिरी जिल्ह्यात यंदा आंब्याच्या पिकाला मोठ्या प्रमाणात रोग लागला आहे. तसेच बदलत्या हवामानामुळे गेली तीन वर्षे कोकणात आंबा पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. माहे जानेवारी, 2012 महिन्यात आंब्याला मोठ्या प्रमाणात मोहोर लागला परंतु एकदम उष्णता वाढल्यामुळे आंब्याला कीड लागून आंबा काळा पडला आहे. यावर्षी सुरुवातीला आलेली थंडी आणि अचानक वाढलेल्या तापमानामुळे कोवळी फळे गळून पडल्याने आंबा उत्पादक संकटात आहेत, यामुळे चालू वर्षी दहा टक्केही उत्पादन होऊ शकणार नाही. त्यामुळे विशेष बाब म्हणून राज्य शासनाने कोकणातील आंबा बागायतदारांना हेक्टरी रु. 50,000/- आर्थिक मदत विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात घोषित करावी."

श्री. राजेंद्र मुळक : महोदय, यासंबंधीची नोंद घेण्यात आली आहे.

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंत जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी खालील महत्वाच्या विषयावर औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

"राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून सन 2010 मध्ये शासनाकडून मराठी भाषा विभाग सुरु करण्यात येणे, मात्र हा विभाग सरकार दरबारी कोल्ड स्टेअरेज मध्ये अडकून पडलेला असणे, मराठी भाषा टिकविण्यासाठी व मातृभाषेच्या संवर्धनासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणाऱ्या यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षात तरी भाषा विभागाची लाल फितीतून मुक्तता होण्याची मराठी भाषिकांची होत असलेली मागणी, सरकारी अनास्थेवर बोट दाखवत मराठी भाषा सल्लागार समितीच्या अध्यक्ष पदाचा न्यायमूर्ती नरेंद्र चपळगांवकर यांनी दिलेला राजीनामा, त्यानंतर गेल्या दहा महिन्यांपासून सदर समितीच्या अध्यक्षांचे रिक्त असलेले पद, त्यामुळे सल्लागार समितीची एकही बैठक न होणे, मराठी भाषा विभागाच्या बळकटीकरणासाठी या विभागातील आवश्यक पदे भरुन राज्याच्या मातृभाषेचे धोरण ठरविणारा हा विभाग पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याची आवश्यकता, स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षामध्ये मराठी भाषा विभागाच्या संवर्धनासाठी तात्पुरत्या उपाययोजनेचा देखावा न करता स्थायी व दूरगामी विचार करुन या विभागाची रचना करण्यासाठी शासनामार्फत कार्यवाही करावी अशी मागणी मी या औचित्यांच्या मुद्याद्वारे करीत आहे."

श्री. राजेंद्र मुळक : महोदय, याबाबतची नोंद घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, शासनाच्या सामान्य विभागाने दि.4 जून, 2011 रोजी शासन परिपत्रकानुसार "विधानमंडळ /संसद सदस्यांना सन्मानाची व सौजन्याची वागणूक देणे, त्यांचेकडून आलेल्या पत्र/अर्ज/निवेदनांना पोच देणे/त्यावर सत्वर कार्यवाही करणे, शासकीय कार्यक्रमांना लोकप्रतिनिधींना आमंत्रित करणे, त्यांचे नाव निमंत्रण पत्रिकेवर छापणे इत्यादीबाबत मार्गदर्शक तत्वे ठरविली आहेत. हे परिपत्रक काढण्यापूर्वी शासनाने दि.5 एप्रिल, 2010 रोजी एक परिपत्रक छापणे इत्यादीबाबत मार्गदर्शक तत्वे ठरविली आहेत. हे परिपत्रक काढण्यापूर्वी शासनाने दि.5 एप्रिल, 2010 रोजी एक परिपत्रक काढले असून दि.4 जून, 2011 च्या परिपत्रकात विशेष हक्क समितीने सूचना केल्याप्रमाणे समितीच्या शिफारशी विचारात घेऊन दि.16 ऑक्टोबर, 2009 च्या परिपत्रकान्वये सूचना विहीत केल्या आहेत. तद्नंतर मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधान सभा यांनी निदेश देऊन यापूर्वीची यासंबंधीची एकूण 22 परिपत्रके रद्द करुन दि.4 जून,2011 चे शासन परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे.

या परिपत्रकान्वये विधानमंडळ/संसद सदस्यांना सन्मानाची व सौजन्याची वागणूक देण्यासंबंधी, शासकीय कार्यक्रम समारंभाच्या वेळी विधानमंडळ सदस्य /संसद सदस्यांना आमंत्रित करणे इत्यादीबाबत, ज्या मतदार संघात शासकीय कार्यक्रम असेल, त्या मतदारसंघातील सर्व विधानमंडळ/संसद सदस्यांची नावे निमंत्रण पत्रिकेवर योग्य प्रकारे छापण्यात यावीत, तसेच, त्यांना समारंभाच्या वेळी आदराचे स्थान देण्यात यावे व समारंभाच्या वेळी त्यांची व्यासपीठावरील बैठक व्यवस्था राजशिष्टाचारानुसार करण्यात यावी. मतदारसंघातील विकास कामे, स्थानिक प्रश्न इत्यादी संदर्भात मंत्री / विभागीय आयुक्त यांच्याकडून आयोजित बैठका, दौरे इत्यादी संदर्भात माहिती देणे, पत्रांना पोच व अंतिम उत्तर देणेबाबत दक्षता घेणे, विधानमंडळ/संसद सदस्यांकडून प्राप्त होणा-या पत्रांची नोंद घेणे तसेच विधानमंडळ /संसद सदस्यांकडून प्राप्त होणा-या पत्रावर केलेल्या कार्यवाहीचा आढावा देणे. सन्माननीय विधानमंडळ /संसद सदस्यांना माहिती पुरविणे इत्यादी सूचना देण्यात आल्या आहेत.

मात्र यापैकी एकही सूचना अंमलात आणली जात नाही. हे पत्रक फक्त दप्तरी दाखल झाले आहे. सूचनांची अंमलबजावणी न झाल्याने एकाही अधिका-यांवर कारवाई झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अधिका-यांमध्ये कोणतीच सूचना न पाळण्याची मानसिकता तयार होते.

नंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील.

सभापती महोदय, विधान परिषद व विधान सभेच्या सन्माननीय सदस्यांचा प्रोटोकॉल पाळला जात नाही. आपण स्वत: या विषयाच्या संदर्भात शासनाला व संबंधित अधिका-यांना निर्देश दिलेले असतांना सुध्दा कार्यवाही होत नाही. सन्माननीय सदस्यांच्या प्रोटोकॉलच्या संदर्भात केवळ परिपत्रक काढून काही उपयोग होणार नाही तर प्रोटोकॉलचे कायद्यामध्ये रुपांतर करण्याची गरज आहे.त्यामुळे या दृष्टिकोनातून शासनाने गंभीरपणे विचार करावा, असे मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला सुचवू इच्छितो.

सभापती : सन्माननीय संसदीय कार्य राज्यमंत्र्यांना मी सुचवू इच्छितो की, हा विषय आपल्या संबंधितच आहे. त्यामुळे या मुद्याच्या संदर्भात आपण स्वत: गांभीर्याने पहावे. दोन्ही सदनातील सन्माननीय सदस्यांचा जो प्रोटोकॉल आहे,तो कुठल्याही परिस्थितीत टिकविणे ही शासनाचीही जबाबदारी आहे. परंतु आपण संसदीय कार्य राज्यमंत्री आहात, त्यामुळे ही जबाबदारी आपल्यावर जास्त आहे असे मला वाटते.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांचा प्रोटोकॉल सदैव मेन्टेन रहावा, यासंदर्भात सर्व विभागांना अधिकच्या सूचना देण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, बीड जिल्हा परिषदेची को-ऑपरेटीव्ह बँक मागच्या काही वर्षापासून सतत चर्चेत आहे. या ठिकाणी खूप मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचे आरोप झालेले असून यासंदर्भात ब-याच व्यक्तींवर गुन्हे देखील दाखल झालेले आहेत. यामध्ये शेतक-यांचे 7/12 दाखवून व खोटया सहया करुन पैसे उचलले आहेत. या प्रकरणात ब-याच संचालकांना अटक देखील झालेली आहे. परंतु या प्रकरणात वडवणी तालुक्यतील निरपराध शेतक-यांना अटक करण्यात आलेली आहे. ज्यांनी कर्जच घेतलेले नाही, अशाही काही शेतक-यांना अटक झालेली आहे. ज्यांनी कर्ज घेतलेले नाही त्यांना अटक करु नये तसेच त्यांच्यावरील गुन्हे काढून टाकावेत तसेच ज्यांनी खोटया सहया करुन दुस-याच्या नावावर पैसे उचलले असतील अशी प्रकरणे व्हेरीफाय करण्याच्या सूचना शासनाने देणे गरजेचे आहे.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती स्थापन केली आहे. या समितीने अनेक खंड प्रकाशित केले असले तरी सुध्दा त्याचे अनेक खंड उपलब्धच नाहीत. हे काम अत्यंत मंद गतीने सुरु आहे. 36 वर्षामध्ये केवळ 24 खंड प्रकाशित केले गेले आहेत. सदर खंड कमी किमतीत उपलब्ध व्हावे, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा असते. हे ग्रंथ अजूनही सीडीवर उपलब्ध झालेले नाहीत. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीच्या संदर्भात दर वेळेस सभागृहात विषय येतो परंतु यासंदर्भात सन्माननीय सदस्यांची भूमिका अतिशय उदासीन आहे. त्यांना जी साधन सामुग्री उपलब्ध करुन द्यावयास पाहिजे ती उपलब्ध करुन दिली जात नाही. यासंदर्भात मूल्यमापन व्हावयास पाहिजे तसेच यामध्ये ज्या अडचणी येतात त्याचे निराकरण झाले पाहिजे. मात्र आज याबद्दल अक्षम्य हेळसांड केली जात आहे. म्हणून या कामामध्ये गती यावी, यासाठी शासनाने लक्ष घालण्याची गरज असून अप्रकाशित ग्रंथाची संख्या लक्षात घेऊन यासंदर्भात 50 कोटी रुपयांची तरतूद करावी, अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करते.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मालाड, कुरार गावामध्ये वॉर्ड क्र. 36 येथे मासळी मार्केट आहे. या ठिकाणी पाण्याच्या लिकेजची मोठी समस्या बनलेली आहे. गेल्या आठ दिवसापासून या ठिकाणी मोठया प्रमाणात पाणी वाहून त्याचा स्थानिक लोकांना त्रास होत आहे. महापालिका पाण्याच्या लिकेजेसचे काम करीत नसल्यामुळे स्थानिक रहिवाश्यांमध्ये खूप असंतोष आहे. त्यामुळे लिकेजचे काम जलद गतीने व्हावे. जे पाणी वाहून जात आहे त्यासंदर्भात संबंधितानी कार्यवाही करावी व पाण्याचे लिकेज त्वरित थांबवावे. पाण्याचे लिकेज थांबविणे आवश्यक असूनही हे लिकेज न थांबवता महापालिकेकडून केवळ मलमपट्टी केली जात आहे. लिकेजेस थांबविण्याचा बहाणा महापालिका करीत असते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

त्याची काहीही दखल घेतली जात नाही. स्थानिक मच्छीमार मार्केटच्या पाण्याचा लोकांना खूप त्रास होत आहे. त्यावर ताबडतोब कारवाई करावी अशी मी या निमित्ताने विनंती करीत आहे.

.....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मौजे साकेडी तांबळवाडी, ता.कणकवली नळपाणी पुरवठा योजनेतील गैरकारभारा बाबत विधान परिषद सभागृहात दिनांक 8.4.2010 रोजी म.वि.प.नियम 93 अन्वये चर्चा उपस्थित केली होती. यास उत्तर देताना माननीय मंत्र्यांनी सदर गैरकारभारा बाबत फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे मान्य केले. आता दोन वर्षे उलटून गेली आहेत. या प्रकरणी अद्यापि फौजदारी गुन्हा दाखल झालेला नाही. सभागृहात दिलेले आश्वासन न पाळल्याबद्दल मी माझा औचित्याचा मुद्दा मांडला आहे.

.....

सभापती महोदय, माझा दुसरा देखील औचित्याचा मुद्दा आहे. तो मांडण्यास आपण मला अनुमती द्यावी.

सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आपण एका दिवशी एकच औचित्याचा मुद्दा मांडू शकता. पण अपवादात्मक बाब म्हणून मी आपणास दुसरा औचित्याचा मुद्दा मांडण्याची संधी देत आहे.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग आणि वेंगुर्ला तालुक्यात अश्लील चित्रफित निर्माण करण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर घडत आहेत. हे सातत्याने होत आहे. मालवणला देखील अशा प्रकारचा पूर्वी गुन्हा घडला आहे. या प्रकारात एका रिक्षा चालकाचे नाव वृत्तपत्रात छापून आल्यामुळे त्याने आत्महत्या केल्याचे उघड झाले आहे. आत्महत्येपूर्वी त्याने चिठ्ठी लिहून ठेवली आहे की, मी अमुक एक कारणामुळे आत्महत्या केली आहे. तेव्हा याचा तपास महिला पोलीस अधिकाऱ्या मार्फत शीघ्र गतीने व्हावा अशी विनंती मी या निमित्ताने करीत आहे.

सभापती : सन्माननीय राज्य मंत्री श्री.राजेंद्र मुळक साहेब, सन्माननीय सदस्य श्री परशुराम उपरकर यांनी दोन औचित्याचे मुद्दे दिले आहेत. ते मी आपल्याकडे पाठवून देतो. त्या दृष्टीने आपण स्वत: लक्ष घालावे.

श्री.राजेंद्र मुळक : होय.

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. ज्येष्ठ गांधीवादी नेते, स्वातंत्र्य सैनिक, रोजगार हमी योजनेचे जनक तथा महाराष्ट्र विधान परिषदेचे 18 वर्षे सलग सभापती पद भूषविणाऱ्या विठ्ठल सखाराम तथा वि.स.पागे यांची जन्मशताब्दी या वर्षी साजरी होत आहे. भारत सरकारने सुद्धा आता रोजगार हमी योजनेचे काम हाती घेतले आहे. पुणे शहरातील यशदा या संस्थेच्या माध्यमातून विविध प्रकारचे उपक्रम व अभ्यासक्रम चालवले जातात. संस्थेमधील वि.स.पागे अध्यासन केंद्रा मार्फत रोजगार हमी योजना आणि बेरोजगार कामगारांच्या प्रश्ना विषयी सर्वेक्षण, संशोधन आणि उपाययोजना या बद्दल प्रशिक्षण व अभ्यासक्रम राबविण्यात यावा अशी मागणी या औचित्याच्या मुद्याद्वारे मी शासनाकडे करत आहे. तसेच या क्षेत्रामध्ये विशेष काम करणाऱ्या व्यक्तीस वि.स.पागे यांच्या स्मृति निमित्त त्यांच्या जन्मदिनाच्या दिवशी म्हणजेच 21 जुलै रोजी भरघोस रोख रकमेचा पुरस्कार आणि प्रशस्तीपत्र केंद्र शासनाने महाराष्ट्र शासनातर्फे द्यावे. जेणेकरून कै.वि.स.पागे यांच्या सर्वंकष कार्यास न्याय दिल्यासारखे होईल, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

सभापती महोदय, सभागृहात रोजगार हमी योजना मंत्री श्री.नितीन राऊत उपस्थित आहेत. त्यांनी या संबंधात शासनाची भूमिका मांडली तर बरे होईल.

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, दिवंगत वि.स.पागे यांच्या बद्दल पूर्ण राज्याला अभिमान आहे. त्यांचे जन्मशताब्दीचे हे वर्ष आहे. येथे जी मागणी करण्यात आली आहे त्याची निश्चितपणे नोंद घेतली जाईल आणि उचित कारवाई केली जाईल.

सभापती : आपण वि.स.पागे केंद्र सुरू केले आहे.

श्री.दिवाकर रावते : वि.स.पागे केंद्र विधान मंडळाच्या माध्यमातून सुरू आहे. या मार्फत संपूर्ण महाराष्ट्रामध्ये चर्चा सत्र आयोजित करण्यात येते.

श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आपल्याकडे वि.स.पागे सेंटरच्या माध्यमातून आपण सगळेच कार्य करीत आहोत. सन्माननीय सदस्यांची अशी सूचना आहे की, महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून यशदा ही आपली मध्यवर्ती संस्था आहे. तेथे अशा पध्दतीने एक अध्यासन केंद्र तयार करावे आणि त्या माध्यमातून राज्य शासनाने काही बक्षिसे द्यावीत.

. . . .2 पी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, जे-जे आदरणीय सभापती आसनस्थ झालेले आहेत. ते सर्वच सन्माननीय आहेत. मग ज्यांची-ज्यांची शताब्दी होईल त्यांच्या बद्दल मी बोलत आहे. मग ते आदरणीय सदस्य नाहीत काय ? ते सन्माननीय नाहीत काय ? त्यांच्याबद्दल महाराष्ट्राला आदर वाटत नाही काय ? तेव्हा आपण नक्की कोणता पायंडा निर्माण करीत आहोत हे देखील समजून घेतले पाहिजे. येथे त्यांच्याबाबतीत अनादराचा विषय नाही कारण आपण त्यांच्या नावाने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मोठे व्यासपीठ निर्माण केलेले आहे. मग जे-जे सन्माननीय सभापती महोदय असतील त्यांच्या-त्यांच्या शताब्दीच्या वेळी त्यांना असा सन्मान मिळणार आहे काय ? असा विषय आहे.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, सन्माननीय श्री.वि.स.पागे साहेबांनी महाराष्ट्राला रोजगार हमी योजनेची ओळख करुन दिली. त्याची केंद्र शासनाने दखल घेतली आणि आता देशाच्या पातळीवर या योजनेच्या संबंधातील मोठा कार्यक्रम राबविला जात आहे. त्या योजनेचे जे जनक आहेत, शिल्पकार आहेत .....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ते मला मान्य आहे आणि आपण त्या अनुषंगाने परिसंवाद देखील घेतला होता.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, मग सन्माननीय सदस्यांचा या गोष्टीला विरोध आहे काय ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा विरोध नाही, पण माझे असे म्हणणे आहे की, या अनुषंगाने परिसंवाद देखील घेतला होता. पण त्यांचा सन्मान होणार आहे की नाही हा माझा प्रश्न आहे.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी समजून घ्यावे.

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, याठिकाणी जो मूळ मुद्दा असा आहे की, कै.वि.स.पागे हे रोजगार हमी योजनेचे जनक आहेत आणि ही योजना आपल्या राज्याची आहे. तसेच केंद्र शासनाने देखील ही योजना स्वीकारुन संपूर्ण देशामध्ये लागू केली. रोजगार हमी योजनेचा मंत्री म्हणून मी सांगू इच्छितो की, कै.वि.स.पागे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त रोजगार हमी योजनेशी संबंधित जेवढे चांगले कार्यक्रम घेता येतील, तेवढे घेण्यात येतील.

. . . .2 पी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मी आपल्या परवानगीने अत्यंत महत्वाच्या आणि अत्यंत गंभीर मुद्याबाबत आपले लक्ष वेधत आहे.

सभापती : सन्माननीय सदस्यांना औचित्याचा मुद्दा मांडावयाचा आहे आणि तो अर्ध्या मिनिटामध्येच मांडावयाचा असतो.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आघाडीची चित्रपट निर्माती आणि "डर्टी" पिक्चरची निर्माती एकता कपूरने "बडे अच्छे लगते है" या टी.व्ही.मालिकेमध्ये अत्यंत अश्लील दृश्य समाविष्ट करुन अतिशय खळबळ उडवून दिलेली आहे. अशा प्रकारच्या दृश्यामुळे टी.व्ही.मालिकांना एक प्रकारचे वेगळे वळण मिळालेले आहे. मालिकेचा टीआरपी वाढविण्यासाठी अशा प्रकारे करण्यात आलेली ही पहिलीच युक्ती आहे. "बडे अच्छे लगते है" ही मालिका घराघरातून सर्व कुटुंबीयां समवेत एकत्र बसून पाहिली जाते. त्यावेळी तेथे लहान मुले सुध्दा असतात. परंतु अशा दृश्यांमुळे बालमनावर वाईट परिणाम होतो. या मालिकेमध्ये जवळजवळ 17 मिनिटे अश्लील दृश्य दाखविले होते. त्यामुळे सदरहू दृश्य मालिकेतून काढून टाकावे आणि यापुढे कोणत्याही मालिकांमध्ये अशा प्रकारचे दृश्य दाखविण्यात येऊ नयेत यासाठी कठोर उपाययोजना करावी अशी विनंती व मागणी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाकडे करीत आहे.

.. . .2 पी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, भारतरत्न महर्षी कर्वे यांनी 1896 साली पुणे येथे स्त्रियांच्या उन्नतीसाठी स्थापन केलेल्या महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या कार्याची माहिती महाराष्ट्राला आणि देशाला सुपरिचित आहे. त्यांचे मूळ गाव रत्नागिरी जिल्ह्यातील असून त्याठिकाणी त्यांचे स्मारक करण्या-बाबत सरकारने घोषणा केली होती आणि त्यासाठी तेथे जागा देखील अधिग्रहीत केलेली आहे. पण निधीअभावी सदरहू स्मारक अजूनही झालेले नाही. या स्मारकाच्या बाबतीत शासनाचा निर्णय झाला आहे आणि जागाही अधिग्रहीत झालेली आहे. तेव्हा महषी कर्वे यांनी स्त्रियांच्या शिक्षणाच्या बाबतीत जे काम केलेले आहे, ते पाहता सरकारने यासाठी निधी उपलब्ध करुन द्यावा अशी मी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून विनंती करीत आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा प्रश्न मी उपस्थित करीत आहे. संपूर्ण राज्यात वनसंज्ञेखाली एकूण 62 हजार हेक्टर जमीन असून त्यापैकी 42 हजार हेक्टर जमीन सिंधुदुर्ग जिल्ह्यात दाखविण्यात आली असल्याचे आढळून आले आहे. यामुळे शिल्लक राहिलेल्या अत्यंत कमी जागेवर सिंधुदुर्ग जिल्ह्यात लोकांना स्वत:च्या मालकी जागेत घरे बांधणे कठीण झालेले आहे. तसेच रस्ते तयार करणे, पूल बांधणे, शाळा व पाटबंधारे प्रकल्प, पुनर्वसन इत्यादी विकास कामे होत नसल्याने या विकास कामास मोठ्या प्रमाणावर खीळ बसत आहे. परिणामी सिंधुदुर्ग जिल्ह्यावर अन्याय होत आहे. या संदर्भात फेर सर्व्हे करण्यात आल्यानंतर सिंधुदुर्ग जिल्ह्यात केवळ 18 हजार हेक्टर जमीन वनसंज्ञेखाली येत असल्याचे आढळून आले. चुकीचा सर्व्हे झाल्यामुळे सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या विकासाला खीळ बसलेली आहे. फेरसर्व्हे करण्यात आला त्यामध्ये 18 हजार हेक्टर जमीन वनाखाली असल्याचे दिसून आले होते. तेव्हा त्याप्रमाणे ती जमीन करुन अधिग्रहीत करुन घेण्यासाठी अग्रक्रमाने प्राधान्य द्यावे अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. पाकिस्तानमधील विविध तुरुंगामध्ये असंख्य भारतीय नागरिक खितपत पडले आहेत. यातील कित्येकांची शिक्षेची मुदत देखील संपलेली आहे. महाराष्ट्रातील अहमदनगर जिल्ह्यातील वडगाव येथील भानुदास कराळे हा दुर्दैवी इसम तसेच गडचिरोली जिल्ह्यातील कुरुड येथील माडावी नावा हा शेतमजूरही पाकिस्तानातील तुरुंगामध्ये आहेत. हे लोक रोजगारासाठी पंजाबमध्ये जाणार होते परंतु ते चुकून समझोता एक्सप्रेसमध्ये चढले आणि पाकिस्तानमध्ये जाऊन पोहोचले. अशा प्रकारे जवळपास 25 जण पाकिस्तानमध्ये गेले आहेत आणि त्यांची शिक्षेची मुदत संपूनही ते अजून तेथेच खितपत पडले आहेत. यातील कित्येकांच्या मानसिकतेवर प्रचंड परिणाम झालेला आहे. दिल्लीतील आपल्या दूतावासामार्फत आपल्या राज्यातील जे नागरिक अडकलेले आहेत त्यांना परत आणण्यासाठी प्रयत्न करणे ही त्या त्या राज्याची जबादारी असते. तेव्हा आपल्या राज्यातील नागरिक परत आणण्यासाठी राज्य शासनाने कार्यवाही करावी अशी मी विनंती करतो.

सभापती : मी सन्माननीय राज्य मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आपण या बाबतीत स्वत: लक्ष घालणे गरजेचे आहे. तसेच माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या नजरेस ही बाब आणून केंद्र शासनाकडे त्यासाठी प्रयत्न करावा.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, आपण दिलेल्या निदेशाची मी नोंद घेतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन बाबत

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आताच माननीय उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने एक निर्णय दिलेला आहे. शासनाने शिर्डी देवस्थानावर जी समिती गठीत केली होती त्या बाबत न्यायालयाने निर्णय दिलेला आहे शिर्डी संस्थान किंवा कोणतेही देवस्थान हे राजकीय पुनर्वसनाचे केंद्र नाही असे सांगून ती समिती बरखास्त केली आहे. त्यांच्या जजमेटचे डिक्टेशन चालू आहे. तेव्ही ही समिती बरखास्त केली का, त्या समितीला स्टे दिला आहे का, समिती बदलण्यास सांगितले का आणि हा निर्णय सिध्दीविनायक व पंढरपूर देवस्थानच्या बाबतीत लागू आहे काय ? तसेच या मध्ये राजकीय हस्तक्षेप होत आहे अशी बाहेर देखील टीका सुरु आहे. तेव्हा नेमकी काय परिस्थिती आहे याची माहिती सभागृहाला संध्याकाळ पर्यंत समजल्यास बरे होईल.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने अशा प्रकारे काही तरी निर्णय दिल्याचे आम्हाला कळले आहे. परंतु नेमका काय निर्णय दिलेला आहे हे अजून कळलेले नाही. या निमित्ताने एक गोष्ट येथे सांगितली पाहिजे की, माननीय विरोधी पक्ष नेते आपण राजकारणात आहात, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आपण देखील राजकारणात आहात. आपण आपल्या धार्मिक भावना जोपासत नाही अशातला काही भाग नाही. आपण आमच्याकडे सत्ताधारी म्हणून पाहत असला तरी सर्व पक्षाने या बाबत गांभीर्याने विचार करण्याची वेळ आलेली आहे असे मला वाटते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी येथे चांगला मुद्दा मांडला आणि तो बरोबर आहे. आम्ही काही वाळीत टाकणारी माणसे आहोत काय ? आपण फक्त आपल्याच पक्षाचे सदस्य नेमता. आपण सर्व पक्षाचे सदस्य नेमले पाहिजेत. आमच्या पक्षाचे सर्व सदस्य नेमा असे नाही तर आपल्या पक्षातील चार जणांची नियुक्ती केली तर अन्य पक्षातील दोनजणांची नियुक्ती करावी. मला चांगले आठवते की, श्री.मनोहर जोशी ज्यावेळी आमदार झाले त्यावेळी विरोधी पक्षाच्या सदस्यांना पंधरा-वीसजणांचा कोटा होता. त्यावेळी त्यांनी माझी एसईओ म्हणून नियुक्ती केली होती. तेव्हा आम्हाला काय जबाबदाऱ्या आहेत हे समजले होते. परंतु हे

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सरकार आल्यापासून ते विरोधी पक्षाला मोजतच नाहीत. आपण फक्त आपलीच माणसे नेमता. आमचे देखील कार्यकर्ते असतात, त्यांची देखील काही कामे असतात. हा लोकशाहीची एक पायंडा आहे आणि तो पाळला जात नाही. आम्हाला ते भीक मागितल्या सारखे वाटते. आम्हाला कार्यकर्त्यांचे फोन येतात.

यानंतर कु.थोरात..

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते..

लोकांना असे वाटते की, विरोधी पक्षासाठीही काही कोटा असतो. त्यामुळे तुमच्या कोटयातून करा असे कार्यकर्ते आम्हाला सांगतात. पण शासनाच्या माध्यमातून हे सर्व एकतर्फी चाललेले आहे हा त्या मागील सांगण्याचा उद्देश आहे. शासनाच्या माध्यमातून 50 लोकांना एसईओ करण्यात येत असेल तर विरोधी पक्षाच्या माध्यमातून पाच लोकांना तरी करण्यात यावे. पण ते सुध्दा टाळण्यात येते. या सभागृहातील विरोधी पक्षाचा सन्मान वाढविणे हे शासनाचे काम आहे, हे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

श्री. विनोद तावडे : माननीय मंत्री श्री. भास्करराव जाधव यांना सांगू इच्छितो की, राजकीय नेते न नेमता प्रशासकीय अधिकारी नेमले तर बरे चालते असे काही नाही. शिर्डीचा विषय आम्हीच उपस्थित केला होता. मी त्यामध्ये राजकीय असू नये असे कोठेही म्हटलेले नाही. मला फॅक्च्युअल पोझीशन पाहिजे. कोर्टाला ज्यावेळी उद्या काही सबमिट करावयाचे असते त्यावेळी रात्रौ 11, 12 वाजता ते तयार करतो. या प्रक्रियेमुळे राजकीय इंन्टेशन्स जास्त वाढतात आणि ती चॅलेंज होतात. मला असे वाटते की, या ठिकाणी मंत्री महोदय म्हणत आहेत पण हे सर्व घाईघाईत चालते कारण आघाडी आणि या सगळया भानगडीमुळे शेवटपर्यंत एकमत होत नाही. त्याचा हा परिणाम असावा. सत्ताधारी पक्षाकडून अमुक एखादा प्रस्ताव घेण्याच्या बाबतीत जसे चालते तसेच कोर्टाच्या बाबतीत चालते. कोर्टाच्या तासाभराच्या जजमेंटमध्ये जे फाईंडिंग्स आहेत त्यात कोर्टाने काय म्हटले आहे या संदर्भातील स्पष्टता आम्हाला कळली पाहिजे. कोर्टाने जर असे राजकीय काही म्हटले असेल तर त्या बाबतीत शासनाचे काय मत आहे, शासन ते खोडून काढणार का, या बाबतीतील शासनाची भूमिका या सभागृहाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेला कळली पाहिजे.

सभापती : सन्माननीय मंत्री महोदय, श्री. भास्करराव जाधव यांनी याची नोंद घ्यावी. तसेच त्याबाबतीतील फाईंडिग्स किंवा अन्य काही असेल तर त्या दृष्टीने सदनाला काही बाबी सादर करता येतील काय या दृष्टीने जरुर बघावे.

श्री. भास्कर जाधव :सभापती महोदय, ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MMP/ D/

विशेष उल्लेख

पृ.शी./मु.शी.: गोंदिया जिल्हा परिषदेमध्ये उघडकीस आलेला घोटाळा याबाबत श्रीमती शोभा फडणवीस वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडते.

"गोंदिया जिल्हा परिषदेमध्ये 21 कोटी रुपयांचा घोटाळा उघडकीस येणे, त्यातच जिल्हा परिषद बांधकाम विभागामार्फत 13 कोटी 18 लाख रुपये तर लघु पाटबंधारे विभागामार्फत 7 कोटी 89 लाख रुपये अशा एकूण 21 लाख रुपयांच्या कामासाठी निविदा काढण्यात येणे, सदर निविदा विशिष्ट कंत्राटदाराकडूनच भरल्या जाणे, काढण्यात आलेल्या निविदा प्रसिध्द करताना राज्य शासनाच्या माहिती संचालनालयाने दिलेल्या दिशानिर्देशाचेही उल्लंघन करण्यात येणे, सदर प्रकरणात घोटाळा झाल्याचे उघडकीस आल्याने माननीय आयुक्त नागपूर यांनी चौकशी समिती गठीत करण्याचा खुलासा करणे, परंतु अद्यापही चौकशीत कोणताही निर्णय न घेणे, संबंधित घोटाळयामुळे शासनाच्या महसुलाचे होणारे नुकसान, संबंधितावर त्वरित कारवाई करण्यास होत असलेली दिरंगाई, याबाबत शासनामार्फत कार्यवाही करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियोजन विभागाकडून जिल्हा वार्षिक योजनेच्या संदर्भात महालेखापालांना स्पष्टीकरणात्मक ज्ञापने मराठी व इंग्रजीत पाठविण्यास सांगण्यात येणे याबाबत श्री. दिवाकर रावते वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंवतराव भोसले यांनी श्री. चपळगावकर यांच्या संदर्भात मराठीची उपेक्षा कशी चालते या बाबतचा एक चांगला मुद्दा मांडला आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, नियोजन विभाग मराठीवर अन्याय करतो असे मी या ठिकाणी वारंवार सांगितलेले आहे. माझ्याकडे एक पत्र आलेले आहे. जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, सिंधुदुर्ग यांना श्री. गो.पु.थत्ते, कक्ष अधिकारी, नियोजन विभाग यांनी जे पत्र लिहिले आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की, "मागणी क्रमांक ओ-18, जिल्हा वार्षिक योजना, सन 2008-09, सिंधुदुर्ग बाबत महालेखापालांनी विनियोजन लेखा, सन 2008-09 मध्ये अंतर्भूत केलेल्या परिच्छेदांबाबत आपल्या कार्यालयाने सादर केलेली स्पष्टीकरणात्मक ज्ञापने (प्रत सोबत जोडली आहे.) महालेखापालांकडे Vet करण्यासाठी सादर केले असता महालेखापाल कार्यालयाने दिनांक 13/12/2011 च्या अनोपचारिक संदर्भान्वये (प्रत सोबत जोडली आहे) विविध मुद्दे उपस्थित करुन त्याबाबतची माहिती कागदपत्रांसह मागितली आहे तरी सदर मुद्यांच्या खुलाश्यासह व कागदपत्रांसह सुधारित (मराठी व इंग्रजी) स्पष्टीकरणात्मक ज्ञापने त्याखाली सही करुन शासनास त्वरित सादर करण्यात यावीत, ही विनंती."

सभापती महोदय, राजभाषा मराठी असल्यामुळे सगळा कारभार मराठीत चालला पाहिजे असे घटनात्मक बंधन असताना हे जे श्री. थत्ते नावाचे नियोजन विभागाचे, कक्ष अधिकारी आहेत ते इंग्रजी व मराठी ज्ञापने सादर करण्यात यावीत असे आग्रहाने सांगत आहेत. हा काय प्रकार आहे? मराठी भाषा विकास विभागाकरिता तरतूद करण्याच्या संदर्भात आम्ही आमच्या व्यथा मांडावयाच्या, शासनाची इच्छाशक्ती असेल तर शासनाने ती करावी असे सांगावयाचे आणि 15 कोटी रुपयांची

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

तरतूद केल्यानंतर तिचे स्वागत करावयाचे, पण प्रशासन त्यामध्ये खोडा घालीत आहे की काय असा मुद्दा या ठिकाणी निर्माण झालेला आहे. सभापती महोदय, हे अत्यंत अश्लाध्य आहे. कृपया या सदंर्भामध्ये अधिकृतरित्या मराठी राज भाषेचा आग्रही म्हणून नियोजन विभागाचे कक्ष अधिकारी श्री. गो.पु. थत्ते यांच्या विरुध्द विशेषाधिकार भंगाची सूचना देण्याची आपण मला अधिकृतरित्या परवानगी द्यावी त्या संदर्भात मी आपल्याला रीतसर प्रस्ताव देईन. सभापती महोदय, याला कुठे तरी खीळ बसण्याकरिता टोकाची भूमिका घेणे भाग आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आपण जी माहिती दिली त्या संदर्भात मी सुध्दा माहिती घेतो आणि तपासतो. योग्य असेल तर हक्कभंगाची सूचना देणे आवश्यक आहे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहाच्या कामकाजासंबंधी

सभापती : यानंतर लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. मी सन्माननीय सदस्यांना विनंती करणार आहे. आज शुक्रवार आहे. नक्षलग्रस्त भागात झालेल्या घटनेच्या संदर्भातील कालची चर्चा अपूर्ण राहिलेली आहे. त्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यु.जमा आणि श्रीमती शोभाताई फडणवीस बोलतील त्यानंतर सन्माननीय मंत्री महोदयांचे उत्तर होईल. ती चर्चा एकूण 45 मिनिटांत संपविण्याची माझी इच्छा आहे. त्याच्या अगोदर लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील. अल्पकालीन चर्चेनंतर आज सकाळी नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर जी चर्चा सुरु झाली त्या प्रस्तावावरील चर्चा पुढे सुरु करण्यात येईल. त्या प्रस्तावावरील चर्चेत सकाळी काही सन्माननीय सदस्यांची भाषणे झालेली आहेत. त्या प्रस्तावावरील सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे आज पूर्ण करावयाची आहेत. त्या दृष्टीने सन्माननीय सदस्यांनी वेळेचे बंधन घालणे गरजेचे आहे. आज जरी सन्माननीय सदस्यांची भाषणे पूर्ण झाली नाही तरी सोमवारी फक्त माननीय मंत्री महोदयांचे उत्तरच ठेवण्यात येईल. त्या दिवशी मला या प्रस्तावावर कोणत्याही सदस्याला भाषण करण्यास वेळ देता येणार नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आज अशासकीय कामकाज होणार आहे का ?

सभापती : अशासकीय कामकाज होणार आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आठवड्यातील शेवटचा दिवस अशासकीय कामकाजाचा असतो. आपल्याकडे पूर्वी एक प्रथा होती ती आता बंद पडत चाललेली आहे. शेवटच्या दिवशी आपण लक्षवेधी सूचना किंवा बाकीचे कोणतेही प्रस्ताव चर्चेला ठेवत नव्हतो. गेल्या एक-दीड वर्षापासून किंवा सात-आठ अधिवेशनापासून आपण बघतो की, शेवटच्या दिवशी अशासकीय कामकाज होतच नाही. आता अशी प्रथाच पडत चालली आहे. त्यामुळे अशासकीय कामकाजाला न्याय मिळत नाही. दुसरी एक प्रथा होती ती सुध्दा बंद पडत चालली आहे. आठवड्याच्या शेवटच्या दिवशी सन्माननीय सदस्यांना बाहेरगावी जावयाचे असते, त्यांच्या गाड्या असतात त्यामुळे दुपारी तीन-चार वाजता सभागृहाचे कामकाज स्थगित करीत होतो. आता आपण शेवटच्या दिवशी सुध्दा सायंकाळी 7.00 वाजेपर्यंत कामकाज चालू ठेवतो आणि त्यावेळी सभागृहात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील ....

दोन-तीन सदस्यच उपस्थित असतात. या संदर्भात कामकाज सल्लागार समितीमध्ये दखल घ्यावी असे मला वाटते. शेवटच्या दिवशी दुपारी तीन-चार वाजता कामकाज संपले पाहिजे. जास्तीत जास्त 3.00 वाजता कामकाज संपले पाहिजे. तसे केले तर बरे होईल. माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सुध्दा विनंती आहे. अशासकीय कामकाजाला सुध्दा न्याय मिळावा अशी विनंती आहे.

सभापती : आपण जे सांगितले ते खरे आहे आणि योग्य आहे. परंतु मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, तत्कालीन परिस्थितीनुसार सन्माननीय सदस्यांचा चर्चा घेण्याचा आग्रह असतो. उदा. कामगारांच्या प्रश्नांच्या संदर्भात जेव्हा मोर्चा निघाला त्या अनुषंगाने आपण पाठपुरावा केला. अचानक निर्माण झालेली परिस्थिती टाळून सभापतींनी चर्चेला परवानगी न देणे म्हणजे त्या प्रश्नावर अन्याय केल्यासारखे होईल आणि आपल्यावरही अन्याय केल्यासारखे होईल. सभापतींची दृष्टी सुध्दा थोडी संकुचित आहे असे म्हणणे योग्य नाही. त्यामुळे त्या चर्चेला मला परवानगी दिलीच पाहिजे. अशा अनेक बाबी आहेत.

श्री. जयंत प्र. पाटील : माझे तसे म्हणणे नाही. तो आपला अधिकार आहे. मी त्याबाबत काही बोलत नाही. पण जी प्रथा पडत चालली आहे ती थांबली पाहिजे असे माझे म्हणणे आहे.

सभापती : आपले म्हणणे बरोबर आहे. जे अशासकीय ठराव प्रलंबित आहेत किंवा जी अशासकीय विधेयके प्रलंबित आहेत त्यासाठी वेगळा वेळ देऊन आपल्याला चर्चा करता येईल. त्यामुळे सन्माननीय सदस्यांवर अन्याय होणार नाही. एक दिवस मी 2 तास लक्षवेधी सूचना घेतल्या आणि त्यामध्ये 8 लक्षवेधी सूचनांवर चर्चा झाली. अलीकडे अर्धा-तास चर्चा होत नाही. एक दिवस मी तसे केले पण पुन्हा आपण अडचणीत आलो आहोत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

अशा पध्दतीने संपूर्ण कार्यक्रम पत्रिका पूर्ण होईल या अनुषंगाने सत्तारुढ पक्षातील सन्माननीय सदस्यांच्या व विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांच्या सहकार्याने कामकाज पत्रिकेवरील संपूर्ण कामकाज पूर्ण करीत असतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, शिक्षणावरील विषय 7-8 अधिवेशनानंतर आलेला आहे. तो विषय महत्वाचा आहे आणि त्यावर सकाळी चांगली चर्चाही सुरु झालेली आहे. या विषयाला अधिक वेळ मिळाला पाहिजे असे मला वाटते. आज अशासकीय कामकाजामध्ये विधेयके दाखविण्यात आलेली आहेत. माझ्या अशासकीय विधेयकासाठी देण्यात आलेला 45 मिनिटांचा वेळ मी या प्रस्तावासाठी देत आहे. आपण माझे अशासकीय विधेयक पुढे ढकलावे किंवा मी ते त्यावेळी मागे घेईन. त्यामुळे शिक्षणाच्या विषयावरील चर्चेला पुरेसा वेळ मिळू शकते.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी सांगू इच्छितो की, आजच्या अशासकीय विधेयकापैकी पहिली दोन विधेयके पुरःस्थापनार्थ दाखविलेली आहेत. त्यापैकी पहिले विधेयक सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांचे आहे आणि दुसरे सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांचे आहे. त्यानंतर विचारार्थ दाखविण्यात आलेल्या अशासकीय विधेयकांपैकी पहिले विधेयक सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे आहे. परंतु आपण आपला वेळ शिक्षणावरील चर्चेसाठी देत असल्याचे म्हटलेले आहे, ठीक आहे. दुसरे अशासकीय विधेयक सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांचे आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझे अशासकीय विधेयक आज चर्चेसाठी घ्यावयाचे आहे. परंतु आज विरोधी पक्षातर्फे मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर सकाळी चर्चा सुरु झालेली आहे. ती चर्चा अपूर्ण राहिलेली असल्यामुळे या आठवड्यापुरते अशासकीय कामकाज पुढे ढकलले तर त्याला आमची हरकत नाही. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी आपल्याला जी सूचना केली आहे त्याबाबत आपल्या दालनामध्ये चर्चा करु. शुक्रवारी लक्षवेधी सूचना न घेता अशासकीय कामकाज करण्याबाबत केलेली सूचना मला योग्य वाटली आहे. त्यामुळे आपल्या दालनामध्ये बसून चर्चा करु.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : ठीक आहे, माझ्या दालनामध्ये बसून चर्चा करु या.

श्री.विनोद तावडे : आज शिक्षणासंबंधीचा विषय पूर्ण करु या. त्याला अधिक वेळ देऊ या.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. काल मी सभागृहात अनुपस्थित होतो. काल सभागृहात खोट्या सह्या करुन तारांकित प्रश्न विचारले जात असल्याचा औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. त्याप्रमाणे माझी खोटी सही करुन माझ्या नावावरही कोणी तरी 4 प्रश्न विचारलेले आहेत. हे प्रश्न वगळण्यात यावेत याबाबत मी प्रधान सचिवांना पत्र दिलेले आहे.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव खोटरे यांना मी सांगू इच्छितो की, काल आपण सभागृहात अनुपस्थित होता. या विषयावर मी काल निर्णय दिलेला आहे. आपल्याकडे असलेली कागदपत्रे आपण माझ्याकडे द्यावीत.

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 4 बाबत</u>

सभापती : आजच्या कामकाज पत्रिकेवरील लक्षवेधी सूचना क्रमांक 4 प्रथम घेण्याबाबत माननीय मंत्री महोदयांनी मला विनंती केली असल्यामुळे क्रमांक 4 वरील लक्षवेधी सूचना प्रथम चर्चेसाठी घेण्यात येईल.

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : दिग्रस तालुक्यातील अरणावती धरणाचे काम निकृष्ट दर्जाचे असणे

मु. शी. : दिग्रस तालुक्यातील अरणावती धरणाचे काम निकृष्ट दर्जाचे असणे यासंबंधी डॉ.रणजित पाटील, सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.रणजित पाटील (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"विदर्भातील दिग्रस तालुक्यातील अरणावती धरणाचे सुमारे 24 संगणक (पॅनल्स) पाण्याच्या विसर्गाने वाहून जाणे, धरणाचे बांधकाम करताना निचरा नाल्याचे कामही निकृष्ट दर्जाचे करणे, सदरहू धरणाच्या जलशोधक (स्टिलींग बेसीनचे) काम सदोष असणे, या टाक्यांचे पॅनलचे काम निर्धारीत डिझाईन नुसार झाले नसल्याचा मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना नाशिक यांनी प्रकल्प अधिकाऱ्यांना दिलेला या प्रकरणाची सखोल चौकशी न करता या कामावर कोटयावधी रुपये पुन्हा खर्च करणे, सदरहू खर्चात महालेखापाल नागपूर यांनी अहवाल देऊन ठपका ठेवणे, महालेखापालांचा तो अहवाल मान्य न करता, याच कामासाठी शासनास 12 कोटीचा भुर्दंड बसणे, या कामात अधिकारी व ठेकेदारांनी संगनमत करुन हजारो कोटी रुपयांचा झालेला भ्रष्टाचार व गैरव्यवहार, शासनाचे झालेले अक्षम्य दुर्लक्ष, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना."

श्री.राजेंद्र मुळक (जलसंपदा राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मुळातच अनुशेषग्रस्त विभागातील व ज्या जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या अधिक आत्महत्या झालेल्या आहेत त्या यवतमाळ जिल्ह्यातील हा प्रश्न आहे. या अमरावती विभागात सिंचनाचे प्रकल्प कमी आहेत. तेथे असलेल्या प्रकल्पाचे काम निधीअभावी पूर्ण होण्यासाठी वर्षानुवर्षे निघून जात आहेत. पूर्णत्वास गेलेल्या कामावर 1.5 कोटी रुपये खर्च होण्याऐवजी 12-12 कोटी रुपये खर्च होतात. या प्रकल्पाच्या मूळ डिझाईनमध्ये बदल करुन ज्या पॅनलची जाडी 60 से.मी.असावयास पाहिजे होती त्याऐवजी 24 ते 40 से.मी.जाड असल्याचे चौकशी अहवालातून निदर्शनास आलेले आहे. नागपूरच्या महालेखापालांनी या पॅनलच्या कामावर दुसऱ्यांदा खर्च करण्याची आवश्यकता का भासली असे विचारलेले आहे. मंत्री महोदयांनी निवेदनामध्ये म्हटले आहे की, दोषी अधिकाऱ्यांविरुध्द चौकशी प्रस्तावित केली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. रणजित पाटील...

माझा प्रश्न असा आहे की, चौकशी प्रस्तावित असून चालणार नाही. माननीय मंत्री महोदयांकडे सर्व माहिती आहे. खाली आर्णी गावाला धोका निर्माण होऊ शकतो अशी संभाव्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. 24 पॅनल्स पुराने वाहून गेले, 67 पॅनल्स निकृष्ट दर्जाचे आहेत हे आपल्याला माहीत आहे. तेव्हा ही जी कोटयवधी रुपयांची दुरुस्तीची कामे होत आहेत ती निविदा न मागविता होत आहेत. आपल्या मर्जीतील ठेकेदाराला कामे जोडून दिलेली आहेत. तेव्हा या दुरुस्तीच्या कामामध्ये झालेल्या भ्रष्टाचाराची चौकशी होऊन यामध्ये जे कोणी दोषी अधिकारी असतील त्यांची उच्चस्तरीय चौकशी होईल काय ?

श्री. राजेंद्र मुळक : सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून अरणावती नदी प्रकल्पामध्ये स्पिलवेल आणि इतर कामामध्ये झालेल्या भ्रष्टाचारा संदर्भात आणि अधिका-यांच्या मार्फत झालेल्या अनियमिततेच्या बाबतीत या ठिकाणी प्रश्न उपस्थित केलेला आहे.सीडीओ, नाशिक आणि महालेखापाल यांनी नोंदविलेले आक्षेप विचारात घेऊन मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती यांनी 20 मार्च 2011 रोजी प्रारुप दोषारोप पत्र शासनास सादर केलेले आहे. हे दोषारोप पत्र शासन स्तरावर तपासण्यात येत आहे. सदर दोषारोप पत्र सामान्य प्रशासन विभाग व शासन मान्यते नंतर संबंधितावर बजावण्यात येतील. दोषारोपपत्राच्या अनुषंगाने संबंधितांची अभिवचने विचारात घेऊन चौकशी अधिका-याची नियुक्ती करण्यात येईल. चौकशीमध्ये कोणत्याही अधिका-याला पाठीशी घालण्यात येणार नाही. चौकशी अहवालानुसार संबंधित अधिका-यांवर कारवाई केली जाईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, त्या भागामध्ये पुराचा धोका निर्माण होऊ शकतो. त्याबाबतीत 136 चॅनन्सच्या दुरुस्तीच्या कामास दिनांक 21.10.2011च्या पत्रान्वये मान्यता प्रदान केलेली आहे. त्या कामास सुरुवात करीत आहोत. या प्रकरणी जे कोणी दोषी असतील मग ते अधिकारी असोत अथवा कॉण्ट्रॅक्टर असो, त्या सर्वांवर कारवाई केली जाईल.

श्री. माणिकराव ठाकरे : यवतमाळ जिल्ह्यातील हा महत्वाचा प्रकल्प आहे. 1994ला या प्रकल्पाचे काम पूर्ण झाले. परंतु 15 ते 20 टक्के देखील सिंचन या धरणामुळे होत नाही. या प्रकल्पाच्या कामाबाबत मोठ्या प्रमाणावर तक्रारी आहेत. त्यामधील एक भाग हा या लक्षवेधीच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. माणिकराव ठाकरे...

माध्यमातून सदनासमोर आलेला आहे. या प्रकल्पाच्या अनेक प्रकरणाबाबत यवतमाळ जिल्ह्यामध्ये सातत्याने चर्चा होत असते. काम न करताच पैसे काढले जातात, धरणाच्या टेलपर्यन्त पाणी पोहोचण्याच्या दृष्टीने आता पर्यन्त कामावर झालेला खर्च, कामे योग्य प्रकारे झाली का इत्यादीची माहिती मिळणे आवश्यक आहे. धरण पूर्ण झाल्यानंतर कालवे साफ करणे, गेट, कालव्या मधील झाडे काढून टाकणे इत्यादी कामामध्ये झालेल्या अनियमिततेबाबत शासन कोणालाही पाठीशी घालणार नाही.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.4... श्री.माणिकराव ठाकरे.....

परंतु आपल्या विभागांतर्गत या विषयाची चौकशी सुरु राहिली तर कदाचित नावे पुढे येणार नाहीत. यामध्ये नेमके काय झाले, कॉन्ट्रॅक्टर कोण होता, कॉन्ट्रॅक्टर कोणी नेमला, किती पैशाचा व्यवहार झाला या गोंष्टी पुढे येणार नाहीत. असे झाले तर कोणाला पुढे किंवा पाठीमागे घालण्याचा प्रश्न उद्‌भवणार नाही. त्यामुळे महसूल आयुक्तांच्या माध्यमातून 1994 नंतर झालेल्या संपूर्ण खर्चाची चौकशी करण्यात येईल काय?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सभागृहाचे ज्येष्ठ सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी या प्रकल्पाबाबत काही भावना व्यक्त केल्या आहेत. या प्रकल्पाला दिनांक 6.12.1978 रोजी मूळ प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. दिनांक 28.5.1996 रोजी प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात आली. या कामावर आतापर्यंत एकूण 282 कोटी रुपये खर्च झाले आहेत. सिंचनाच्या लाभक्षेत्राची माहिती उपलब्ध आहे. ती माहिती मी पटलावर ठेवण्यास तयार आहे. या संदर्भात सीडीओ आणि महालेखापाल यांचाही अहवाल प्राप्त झालेला आहे. सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी सांगितल्याप्रमाणे आर्णी परिसरातील हे काम कॅचमेंट एरियामध्ये येत असल्यामुळे दुरुस्तीचे काम तेथील लोकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्वाचे असल्यामुळे जाणीवपूर्वक पूर्ण करण्यासाठी तजवीज ठेवलेली आहे. अधिकाऱ्यांवर दोषारोप पत्र ठेवले जातील. आवश्यकता असल्यास पुन्हा एकदा तांत्रिक तपासणी करुन अनियमिता असेल तर त्याची माहिती घेतली जाईल. अन्य विभागामार्फत चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. या कामाबाबत अधिकारी दोषी आढळले तर त्या अधिका-यांवर निश्चितपणे कारवाई होईल.

श्री.माणिकराव ठाकरे : हे धरण आमच्या गावाशेजारी आहे. जलसाठा मोठया प्रमाणावर होतो. 1994 नंतर कधीही या भागात 10 ते 20 टक्क्यापेक्षा जास्त इरिगेशन झालेले नाही. कॅनालची साफसफाई केली जात नाही. रक्कम उचलली जात असली तरी कॅनॉलची दुरुस्ती होत नाही. अशा प्रकारे धरणाच्या बांधकामानंतर गैरप्रकार झाले. 1994 नंतर अनेकदा खर्च होऊनही टेलपर्यंत पाणी पोहोचले नाही किंवा 10 ते 20 टक्क्यापेक्षा जास्त इरिगेशन झालेले नाही. 20 वर्षानंतर कॅनॉलची कामे होत नाहीत, दुरुस्ती होत नाही, मात्र निधी पूर्णपणे खर्च केला जातो. त्यामुळे यासर्व प्रकरणाची चौकशी पाटबंधारे विभागामार्फत झाली तर त्यातून काहीही निष्पन्न

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.माणिकराव ठाकरे.....

होणार नाही. महसूल आयुक्त स्तरावर या प्रकरणाचा तपास करण्याची जबाबदारी दिली तर अनेक अंतर्गत बाबी बाहेर येतील. पुढे कोणती कारवाई करायची हे शासनाने ठरवायचे आहे. या संदर्भात तपास व्हायला पाहिजे आणि त्या दृष्टीने महसूल विभागाकडे या प्रकरणाचा तपास देण्याबाबत शासन विचार करणार आहे काय?

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 4 .....

श्री. सुनील तटकरे : महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्यासंदर्भात मी सदनाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, सन 2006-07 मध्ये 6 हजार हेक्टर जमीन सिंचनाखाली आली, सन 2007-08 मध्ये 5770 हेक्टरला सिंचनाचा फायदा झाला, त्यानंतरच्या 2008-09 आणि 2009-10 या दोन वर्षात अनुक्रमे 289 आणि 603 हेक्टर एवढ्याच क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळाला त्याचे मुख्य कारण म्हणजे पाण्याचा साठा पुरेसा झाला नव्हता. नंतरच्या वर्षात म्हणजे सन 2010-11 मध्ये 6585 हेक्टर आणि सन 2011-12 मध्ये 8616 हेक्टरला सिंचनाचा फायदा मिळालेला आहे. सन्माननीय सदस्यांनी शेवटपर्यंत पाणी पोहचले नसल्यासंबंधी जी माहिती सांगितली त्याबाबत मला असे सांगावयाचे आहे की, प्रामुख्याने धरणाचे काम पूर्ण झाल्यानंतर वेळोवेळी त्याची दुरुस्ती किंवा गाळ न काढल्यामुळे शेवटपर्यंत पाणी पोहचू शकले नाही यासंबंधीची माहिती घेऊन कामात हयगय केली असेल अथवा गाळ काढण्यासाठी खर्च केला पण तरी देखील पाणी शेवटपर्यंत गेले नाही असे आढळून आले तर संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. तसेच जून अखेर हे काम पूर्ण झाल्यानंतर ज्यावेळेस रब्बीसाठी पाणी सोडण्यात येईल तेव्हा कॅनॉलच्या शेवटपर्यंत पाणी पोहचेल या दृष्टीने उपाययोजना करण्यात येतील. तसेच या प्रकरणाची चौकशी महसूल किंवा अन्य विभागामार्फत करण्याचा प्रश्नच नाही तर वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत ही चौकशी करण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : महोदय, या प्रकल्पाचे मूळ एस्टीमेट 19 कोटीचे होते आणि ते वाढत वाढत 284 कोटीपर्यंत गेले. यावरुन जलसंपदा विभागामध्ये अशाच प्रकारची प्रॅक्टिस चालते की काय अशी दाट शंका येते. वास्तविक 288 कोटीचा आकडा सुध्दा आम्हाला लिहिता येणार नाही तेवढा एकाच प्रकल्पावरील खर्च आहे. माझी मागणी अशी आहे की, ज्या अधिकाऱ्याने मूळ अंदाजपत्रक केले त्याची आणि जसजसे वाढत गेले त्या सर्व एस्टीमेट्सची चौकशी शासन करणार आहे काय ? तसेच या प्रकल्पाची जी किंमत 288 पर्यंत पोहचली ती किती टप्प्यात पोहचली, त्यामध्ये कोणते अधिकारी होते, त्यापेकी सध्या कामावर किती अधिकारी आहेत आणि निलंबित किती अधिकारी झाले आहेत ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे : महोदय, सन 1978 मध्ये या कामाची किंमत 19.14 कोटी एवढी होती. सन 1996 मध्ये 147 कोटीवर गेली. त्यानंतर द्वितीय सुधारित अंदाजपत्रक 224 कोटीचे झाले व नंतर तृतीय अंदाजपत्रक 331 कोटीचे करण्यात आले. यासंबंधीची प्रत्येक टप्प्याची माहिती सध्या तरी माझ्याकडे नाही, पण नंतर हे एस्टीमेट कशामुळे वाढत गेले ही सर्व माहिती घेऊन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : महोदय, महालेखापाल नागपूर यांनी स्टिलींग बेसीनच्या कामाची दुरुस्ती करण्याची परिस्थिती निर्माण झाली यासंदर्भात हा आक्षेप होता. त्याला जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित आहे. हा आक्षेप त्यांनी कोणत्या वर्षी नोंदविला आणि स्टिलिंग बेसीनचे मूळ सदोष बांधकाम सन 1994 मध्ये झाले, सन 2006 मध्ये झाले की, 2009 मध्ये झाले आहे ?

श्री. सुनील तटकरे : महोदय, हे काम पूर्वीच्याच कालावधीतील आहे. यासंबंधीचा करारनामा दि. 1.3.1990 रोजी झाला होता. मूळ काम हे सन 1993 मध्ये झाले असून त्यावेळेस कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यांची नावे जास्त असल्याने ती पटलावर ठेवण्यात येतील. ए.जी. चा आक्षेप मागील वर्षी नोंदविला गेला. सन 2006-07 मध्ये जेव्हा ही परिस्थिती निर्माण झाली तेव्हा डिझाईन सर्कलला याची पाहणी करण्यासंबंधी सूचना करण्यात आली आणि ही दुरुस्ती कशी करण्यात येईल याच्या अनुषंगाने कारवाई चालू आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनबाबत</u>

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, दिवेआगर येथील गणपतीची मूर्ती चोरीला गेल्याच्या घटनेला आठ दिवस होऊन गेले आहेत. या घटनेमुळे हिंदूमध्ये संतापाची लाट उसळली असून कोणत्याही क्षणी काहीही होऊ शकते. त्यामुळे या प्रकरणाचा तपास कुठपर्यंत आलेला आहे यासंदर्भात शासनाने तत्काळ निवेदन करण्याची आवश्यकता आहे.

उप सभापती : शासनाकडून आज सायंकाळ पर्यंत निवेदन केले जाईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मेळघाट येथे अवैधरित्या होत असलेली जंगलतोड

मु. शी. :मेळघाट येथे अवैधरित्या होत असलेली जंगलतोड यासंबंधी सर्वश्री जैनुद्दिन जव्हेरी, प्रा.सुरेश नवले,सर्वश्री राजन तेली, एस.क्यू.ज़मा, डॉ. सुधीर तांबे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जैनुद्दिन जव्हेरी (वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वने मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अमरावती जिल्ह्यात मेळघाट येथे अवैधरित्या सागवान लाकूड चोरी होत असल्याचे माहे जानेवारी २०१२ च्या सुमारास निर्दशनास येणे, पश्चिम मेळघाट वन विभागाअंतर्गत धारणी, हरीसाल, धुळघाट रेल्वे व ढाकणा असे वनपरीक्षेत्र असून अवैध लाकूड तस्करी या सर्वच वनपरीक्षेत्रात मोठया प्रमाणावर सुरु असणे, परंतु याची दखल वन विभागाने घेतली नसून मेळघाट मधील सागवानी लाकूड तस्करांच्या घशात जात असल्याने वन्य प्राणीही नष्ट होण्याच्या मार्गावर असणे, राज्य शासनाने याची दखल घेऊन अमरावती जिल्हयातील मेळघाटात सागवान लाकडाची अवैधरित्या होणारी तस्करी रोखण्याबाबत तातडीने करावयाची उपाययोजना व कार्यवाही व याबाबत राज्यशासनाची प्रतिक्रया"

श्री. भास्कर जाधव (वने राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, अमरावती जिल्हयातील मेळघाट वन विभागाअंतर्गत धारणी, हरीसाल, धुळघाट रेल्वे व ढाकणा या ठिकाणी मोठया प्रमाणात जंगलाची अवैध तोड व तस्करी होत असल्या संदर्भात मी लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे म्हटले आहे की, "गरीब आदिवासी हे मजुरीवर अवलंबून असतात व त्यांच्या दैनंदिन कामासाठी ते छोटया झाडांची तोड करीत असतात". त्यामुळे या संदर्भात माझा प्रश्न असा आहे की, विदर्भात अनेक ठिकाणी जंगलाला लागूनच अनेक गावे आहेत. गोंदिया, अमरावती, यवतमाळ, भंडारा, नागपूर ही शहरे जंगलाला लागूनच आहेत. शासनाच्या कायद्याप्रमाणे जंगलाच्या हद्दीच्या 10 कि.मी. अंतराच्या आत कोणत्याही आरा मशीनला परवानगी दिली जाणार नाही. जे आरा मशीन सुरु आहेत त्यांना 10 कि.मी. बाहेर नेऊन सुरु करण्यात येतील, असे सांगितले गेले आहे. परंतु माझ्या माहिती प्रमाणे ही कारवाई शासनाकडून अद्यापपावेतो झालेली नाही. तसेच 10 कि.मी. ची मोजणी कशा प्रकारे केली जाते, याचीही माहिती माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तरात द्यावी.

सभापती महोदय, ज्या अधिका-यांची सर्व्हीस एकाच ठिकाणी 3 वर्षापेक्षा जास्त झालेली आहे अशा अधिका-यांना दुस-या झोनमध्ये पाठविले जाणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, अभयारण्याच्या हद्दीपासून 10 कि.मी.च्या आत आरा गिरणीला परवानगी देऊ नये, असे निर्देश सुप्रीम कोर्टाने शासनाला दिलेले असून त्या संदर्भात शासनाकडून अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली आहे. गेल्या 22-23 वर्षामध्ये ज्या उभ्या मशिन्स आहेत त्यांनाच परवानगी असून आडव्या मशीनला परवानगी देण्यात आलेली नाही. काही फर्निचर वाल्यांनी सिंगल फेजवर चालणारी मशिन्स बसवली होती ती सुध्दा सील करण्यात आली असून या संदर्भात नवीन परवानगी दिली गेली नाही.

सन्माननीय सदस्यांनी 10 कि.मी. हद्दीचे मोजमाप कसे केले जाते असा प्रश्न विचारला असून यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, जंगलाच्या हद्दीपासून हे मोजमाप केले जाते एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात माननीय मंत्र्यांनी अतिशय तपशीलवार उत्तर दिलेले आहे. वन संरक्षणाकरिता वन विभागातील चारही परिक्षेत्रातील वनरक्षकांनी बिटात केलेल्या कामांची नोंद, संवेदनशील, अतिसंवेदनशील, वन संरक्षण दलाची निर्मिती, हत्यारे दिली आहेत असे लेखी उत्तरात म्हटले आहे. सर्व सुविधा उपलब्ध करुन दिल्या असल्या तरी सुध्दा अवैध वृक्ष तोड थांबली गेलेली नाही. अवैध वृक्षतोड केवळ याच भागात होते, असे नाही तर सातपुडा जंगल पूर्णपणे साफ झाले आहे. यावल, रावेर, चोपडा, शिरपूर या ठिकाणच्या जंगलाची पूर्ण तोड झालेली आहे. या ठिकाणी जे निवेदन देण्यात आलेले आहे ते गेल्या 8-10 वर्षापासून दिले जात आहे. त्यामुळे अवैध वृक्षतोड थांबविण्यासाठी शासन कोणती कार्यवाही करणार आहे, याचे मंत्री महोदयांनी ठोस उत्तर द्यावे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुजराथी साहेबांनी सत्य परिस्थितीचे कथन केलेले आहे. त्यांनी सांगितले आहे की, यापूर्वी वन विभागाकडे स्टाफ कमी आहे, हत्यारे नाहीत असे सांगितले जात होते परंतु आता यासंदर्भात सर्व सुविधा उपलब्ध करुन दिल्यानंतरही हे प्रकार वाढलेले आहेत. सभापती महोदय, मी आज सकाळी खालच्या सभागृहात जे उत्तर दिले होते तेच या ठिकाणी सांगू इच्छितो की, या पूर्वी गार्ड, फॉरेस्टर, रेंजर या अधिका-यांना जबबादार धरुन त्यांच्यावर कारवाई केली जात होती. आता पुढील काळात जंगलामध्ये मोठया प्रमाणात किंवा सातत्याने चो-या होत असतील अशा ठिकाणी एसीएफ, डीएफओ किंवा कन्झर्व्हेटर सारख्या वरिष्ठ अधिका-यांना जबाबदार धरण्यात येईल. कोकण सोडून इतर ठिकाणची फॉरेस्ट रिकव्हरी कमी होत आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

म्हणून त्यांना देखील जबाबदार धरण्याचा निर्णय पुढच्या काळामध्ये आपण घेत आहोत. छोट्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करून हा प्रश्न सुटेल असे मला वाटत नाही.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले की, सुप्रीम कोर्टाचा आदेश आहे. पण तसे नाही. जुन्या मशिनरीबद्दल देखील ऑर्डर आहे. नवीन असो किंवा जुनी मशिनरी असो ती 10 कि.मी.च्या बाहेर पाठवा. या संबंधी शासनाने कोणतीही कारवाई केलेली नाही. माझी अशी माहिती आहे की, तात्पुरता स्टे घेऊन दहा वर्षापासून ते मशिन त्या भागामध्ये उभे आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी मघाशी असे म्हणालो की, नवीन आरा गिरणी तेथे शिफ्ट करण्याकरिता परवानगी देऊ नये. फार जुन्या काळा पासून मिल आहे. पण आता सुप्रीम कोर्टाने निर्णय दिल्यामुळे व्यावहारिक दृष्टया ह्या गोष्टी थोड्या अडचणीच्या झाल्या आहेत. ते लोक कोर्टात गेले व त्यांनी देखील स्टे घेतलेला आहे. त्यामुळे कारवाई करणे थोडे अवघड होत आहे.

श्री. एस.क्यू. जमा : सभापति महोदय, राज्य मंत्री महोदय ने बहुत विस्तार से उत्तर दिया है. राज्य मंत्री महोदय बहुत सक्षम हैं, लेकिन हकीकत यह है कि जंगल में पेड़ कट रहे हैं और सागवान की चोरी हो रही है. मेरा प्रश्न यह है कि सागवान के कितने पेड़ लगाए जाते हैं और कितने पेड़ों का डिस्पोजल होता है, क्या इस बारे में वन विभाग के पास जानकारी है ? सागवान की तस्करी को रोकने के लिए सरकार पिछले 10-20 सालों से कोशिश कर रही है और सुप्रिम कोर्ट के आदेश भी है, लेकिन फिर भी सागवान की चोरी रुक नहीं रही है. इसलिए इसको सब से ज्यादा सीरियस ऑफेन्स समझकर सागवान की चोरी करने वाले लोगों के ऊपर क्रिमिनल कार्रवाई करने के लिए क्या आप विशेष कानून बनाएंगे ? क्या इन लोगों के ऊपर आप कार्रवाई करेंगे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आपल्याकडे वन तोड कायदा 1927 आहे. या अंतर्गत संबंधितांवर कारवाई होते. दुसरी कारवाई इंडियन फॉरेस्ट ॲक्ट 1980 नुसार होते. या दोन्ही कायद्यांमध्ये थोडीशी तफावत आहे. केंद्र सरकारच्या कायद्यानुसार आपण जास्तीत जास्त दोन हजार रूपये दंड करू शकतो. आपला वन तोड कायदा आह. त्यामध्ये एका झाडाला एक हजार रूपया पासून पुढे कितीही रकमेचा दंड करू शकतो. अशा प्रकारे चूक झाली तर अधिकारी कोणत्या प्रकारे गुन्हा दाखल करतात त्यावर ते अवलंबून असते हे आम्ही मान्य करतो. अवैधरित्या तोडलेल्या झाडांचे सर्वेक्षण होते काय, पाहणी होते काय, तशा प्रकारची नोंद आहे काय, असा देखील प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. अगर आपने वन विभाग की मार्च 2012 तक की रिपोर्ट देखी होगी तो उसके अन्दर बिल्कुल वही जाँच और उसके अन्दर की रिपोर्ट की नोंद की गई है, यह मैं आपको जरुर अवगत करुँगा.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, वन विभागामध्ये 64 संयुक्त वन व्यवस्थापन समित्या स्थापन केल्या. वन सांभाळल्यामुळे त्यातून आपण लाकडाची विक्री इमारती साठी करतो. त्यातून 50 टक्के रक्कम संयुक्त वन व्यवस्थापन समितीला द्यावी अशा प्रकारच्या घोषणा वारंवार झाल्या आहेत. पण अद्याप पैसा मिळालेला नाही. तो पैसा त्यांना आपण देणार आहात काय ? कारण त्यांच्या मेहनतीचे ते फळ आहे. दुसरे असे की, रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून कामे देतो. मग स्थलांतरित करणाऱ्या आदिवासींची संख्या जास्त का आहे ? याचे कारण तेथे काम मिळत नाही. आपण तेथील मुलांसाठी वसतिगृह तयार करणार आहोत. लोकांचे स्थलांतर होणार नाही, लोकांना 100 टक्के जागेवर काम मिळण्याकरिता शासन प्रयत्न करणार आहे काय ?

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, ज्या वन समित्या स्थापन केलेल्या आहेत, त्यातून आपल्याला वन उपजत महसूल मिळतो. त्यातील 50 टक्के भाग तेथील समित्यांना द्यावा असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. याबाबत निर्णय झालेला आहे परंतु पैसे दिले जात नाहीत. आज सदनासमोर जी लक्षवेधी सूचना मांडण्यात आलेली आहे, ती थोडीशी वेगळया स्वरुपाची आहे. परंतु मी यासंबंधातील माहिती सन्माननीय सदस्यांना निश्चितपणे अवगत करीन आणि जर पैसे दिले नसतील तर ते निश्चितपणे दिले जातील. आता तर आम्ही त्यांच्या पुढे जात आहोत की, 50 टक्क्याच्या ऐवजी आपण गावागावामध्ये देखील ग्राम पंचायतीच्या वन समित्या स्थापन करुन त्यांना विकासासाठी 10-10 लाख रुपये देत आहोत आणि त्यासाठी केंद्र शासन सुध्दा मदत करीत आहे. याठिकाणी रोजगाराच्या दृष्टीने चांगली तयारी झाली नाही किंवा रोजगार उपलब्ध होत नाहीत म्हणून आदिवासी बाहेर जातात असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. पण विशेष करुन विदर्भामधील जी सगळी वने आहेत, त्याच्या बरोबर हद्दीवर मध्य प्रदेशचा काही भाग आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना माझ्यापेक्षा जास्त माहिती आहे. छत्तीसगढचा भाग आहे आणि तेथील काही ठिकाणी मोठ्या प्रमाणात नक्षलवादी लोकांचे आक्रमण होते आणि नदीच्या पलीकडे गेल्यावर ताबडतोब तेथे विक्रीचा व्यवसाय होतो. म्हणून आता आमच्या विभागाने शेजारच्या राज्या बरोबर देखील संपर्क साधलेला असून त्यांना आता कन्व्हीन्स केलेले आहे. त्यानुसार शेजारील राज्यातील लोक आणि आम्ही संयुक्तरित्या वरचेवर छापे टाकण्याचा कार्यक्रम करणार आहोत. तसेच तेथील जे आदिवासी आहेत ते आजुबाजूचे सरपण गोळा कर किंवा कुठे वासा सापडला तर ते आणून त्याचे घर बांध असे करतात. त्यामुळे आता त्यांच्यामध्ये थोडा अवेअरनेस आणण्याची गरज आहे ही गोष्ट खरी आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, याठिकाणी जे निवेदन दिले आहे, त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "पश्चिम मेळघाट वन विभागातील वनक्षेत्रात व वनक्षेत्रालगत एकूण 139 महसुली गावे असून कोरकू, गोंड, व राठ्या आदिवासी समाज मोठया प्रमाणात वास्तव्यास आहे. मला असे वाटते की, सर्व जगजाहीर आहे की, फॉरेस्ट अधिकारी आणि गार्ड यांच्या संगनमताने येथे मोठया प्रमाणात सागाची तोड केली जाते आणि हे सर्व व्यवहार रात्री होतात. परंतु तेथे काटक्या वगैरे गोळा करणाऱ्या आदिवासींना जबाबदार धरले जाते. मात्र प्रत्यक्षात तेथे जे वनरक्षक आहेत, तेच वनभक्षक झालेले आहेत त्यांच्याकडे मात्र दुर्लक्ष करावयाचे असे प्रकार सुरु आहेत.

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, जंगलातील वनांची किंवा जनावरांची किंवा वाघांची मोजणी करतो तसे आपल्याला सागवान वृक्षांची देखील मोजणी करणे सहज शक्य आहे. प्रत्येक क्षेत्रामध्ये जेवढे सागाचे वृक्ष आहेत त्यामध्ये तोड झाली तर तेथील संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन त्यांच्यावर कडक कारवाई केली तर या चोऱ्या थांबतील. तेव्हा तशा प्रकारची कडक कारवाई करण्यात येणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, यापूर्वी तेथील अधिकाऱ्यांची काही अंशी मिलीभगत होती हे नाकारण्याचे काही कारण नाही.तेथे 139 गावे आदिवासी लोकांची आहेत आणि ते आदिवासी लोक घराला फाटा, सापडा वगैरे तोडण्यासाठी जातात. म्हणून त्यांच्यावर सर्रास कारवाई करणे थोडे अवघड होते. कारण ते स्थानिक आहेत. परंतु आता मोठया प्रमाणात सागाच्या झाडांची गणती करण्याचे काम, त्यांना टॅग लावण्याचे काम, त्यावर मार्कींग करण्याचे काम सुरु आहे. तसेच यामध्ये प्रत्यक्षपणे अधिकारी समाविष्ट असतील तर निश्चितपणे त्यांच्यावर कारवाई करावीच लागेल असे मी सांगितले आहे.

. . . .2 झेड-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी असलेल्या फळपीक विमा योजनेस मुदतवाढ देण्याबाबत

मु.शी. : बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी असलेल्या फळपीक विमा योजनेस मुदतवाढ देण्याबाबत सर्वश्री.एस.क्यू. जमा, जैनुद्दीन जव्हेरी, अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्रीमती अलका देसाई, श्री.मोहन जोशी वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.एस.क्यू.जमा (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय फलोत्पादन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील शेतकऱ्यांच्या मागणीनुसार बिगर कर्जदार शेतकऱ्यांसाठी असलेल्या फळपीक विमा योजनेस मुदतवाढ देण्यात आली नसल्यामुळे अनेक शेतकरी या योजनेपासून वंचित असणे, राज्यात द्राक्ष, डाळिंब, संत्रा, मोसंबी व केळी या फळपिकांचे मोठ्या प्रमाणात उत्पन्न असून अनेकवेळा या फळपिकांवर पडणाऱ्या विविध रोगांमुळे तसेच वादळी व अवकाळी पावसामुळे या बागायतदारांचे मोठ्या प्रमाणात होत असलेले नुकसान, यामुळे अनेक शेतकऱ्यांची अतिशय बिकट झालेली आर्थिक परिस्थिती, सबब राज्यातील शेतकऱ्यांनी फळपीक विम्याची मुदत वाढवून देण्याबाबत शासनाने करावयाची तातडीची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.विजयकुमार गावित (फलोत्पादन मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

. . . .2 झेड-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एस.क्यू. जमा : सभापति महोदय, प्रयोगात्मक आधार पर फल बागों के लिए इन्श्योरेन्स शुरु किया गया है. मेरा पहला प्रश्न यह है कि कितने किसानों ने रजिस्ट्रेशन कराया और कितने किसानों को इसका लाभ मिला ? हमें इस बारे में जानकारी दी जाए. एग्रीकल्चर इन्श्योरेन्स कम्पनी ऑफ इंडिया लिमिटेड ने 1938 के कानून के तहत किसानों के फल बागों का बीमा किया है. यह बहुत पुराना कानून है और इसमें जरुरत के हिसाब से सुधारणा होनी चाहिए, इसलिए इसमें सुधारणा करने के लिए क्या महाराष्ट्र शासन कोई नया प्रस्ताव भेजेगा ?

श्री.विजयकुमार गावित : सभापती महोदय, याठिकाणी विम्याचा जो कालावधी होता, तो काही पिकांच्याबाबतीत संपलेला आहे आणि काही ठिकाणचा कालावधी सुरु आहे. त्यामुळे त्यातून किती आऊटकम झाला हे समजणे कठीण आहे. त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांना हे देखील सांगितले पाहिजे की, आपण सर्वसाधारणपणे 96 हेक्टरचा विमा करणार होता.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित...

परंतु शेतकऱ्यांनी फक्त 43 हजार 647 हेक्टरचा विमा काढला. विमा कमी काढण्याचे कारण असे की, या योजनेस मंजुरी दिली त्यावेळी आचारसंहिता लागू झाली त्यामुळे या योजने बाबत लोकांमध्ये आम्हाला जनजागृती करता आली नाही. शेतकऱ्यांपर्यंत ही योजना पोहोचली नसल्यामुळे कमी क्षेत्रावर विमा काढला गेला. विम्याचा काढण्याचा कालावधी एक महिन्यापुरता होता त्यामुळे देखील कमी विमा काढला गेला. आपण अवेळी पावसामुळे झालेले नुकसान या साठी विमा काढला होता. परंतु कोठेही अवेळी पाऊस झाला नाही त्यामुळे विम्याचा फायदा शेतकऱ्यांना घेता आला नाही. परंतु जास्त उन्हामुळे नुकसान झालेल्या पिकांना विम्याचा फायदा मिळालेला आहे. यामध्ये जळगाव जिल्ह्यातील चोपडा तालुक्यातील आडवत सर्कल आणि मुक्ताईनगर ग्रुहा येथील भागात विम्याचा लाभा मिळालेला आहे. त्या ठिकाणी केळीचे पीक होते. कोकणामध्ये जास्त ऊन्हामुळे आंबा पिकाचे नुकसान होते आणि त्यामुळे तेथील शेतकऱ्यांना या विम्याचा फायदा होत आहे. या विम्याचा कालावधी अजून संपलेला नाही. आपण प्रायोगिक तत्वावर हा विमा काढलेला आहे. ही योजना पुढे चालू करण्यासाठी शास्त्रज्ञ, अधिकारी आणि जे विविध संघ आहेत त्यांच्या बरोबर चर्चा करण्यात येईल. तसेच यामध्ये आणखी कोणत्या सुधारणा करता येतील जेणेकरुन त्याचा फायदा शेतकऱ्यांना मिळेल हे निश्चितपणे पाहिले जाईल.

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, द्राक्ष,डाळिंब, संत्रा, मोसंबी व केळी या व्यतिरिक्त इतर फळांचा देखील या विमा योजनेमध्ये समावेश केला पाहिजे. माझा प्रश्न आहे की, या विम्याचे प्रिमियम कोण भरते, शासन भरते, शेतकरी भरतात की, शासन आणि शेतकरी दोघे मिळून एकत्रितपणे भरतात ? आतापर्यंत किती प्रिमियम भरला गेला, किती रुपयांचे क्लेम आले, ही योजना कशा प्रकारे फायदेशीर आहे याची माहिती मंत्री महोदय देतील काय ? आतापर्यंत फलोत्पादनासाठी कोणतीही योजना घेण्यात आली नव्हती, शासन त्यांच्या निधीतून पैसे देत होते. तेव्हा या संदर्भात नेमकी कोणती कारवाई करणार आहात ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, आपण जो प्रिमियम भरतो त्यामध्ये 25 टक्के रक्कम शेतकरी देतात, 25 टक्के रक्कम केंद्र सरकार देते आणि 50 टक्के रक्कम शासन देते. या योजनेमुळे किती फायदा झाला हे योजना संपल्यानंतरच समजू शकेल. तेव्हा आताच त्या बाबत सांगणे कठीण आहे. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, द्राक्ष, डाळिंब,संत्रा,मोसंबी आणि केळी या पिकांचा फळपीक विमा योजनेमध्ये समावेश केलेला आहे. कोकणामध्ये मोठ्या प्रमाणावर आंब्याचे उत्पादन होते. आजच्या स्थितीला कोकणातील वाईट हवामानामुळे आंबा गळून पडलेला आहे. या फळपीक योजनेमध्ये आंबा पिकाचा समावेश करण्यात आलेला नाही तेव्हा त्या पिकाचा समावेश या योजनेमध्ये करणार काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी, सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, आंबा आणि काजू पिकांचा विमा काढलेला आहे. कडक उन्हामुळे मोठ्या प्रमाणावर फळझड होत आहे आणि विमा असल्यामुळे शेतकऱ्यांना त्याचा निश्चितपणे फायदा होत आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना माहीत नाही. दोन दिवसांपूर्वी आंबा उत्पादक शेतकरी माननीय मुख्यमंत्री महोदयांना भेटले होते. माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी येथे काल उत्तर देताना सांगितले की, आंबा पिकाच्या नुकसानी बाबत शासन निश्चितपणे विचार करुन नुकसान भरपाई देण्या बाबत विचार करेल. फळपीक विमा हे वेगळे प्रकरण आहे. वातावरणातील बदलामुळे कोकणातील आंबा पीक आज पूर्णपणे नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. तेव्हा या प्रकरणी शासन लक्ष देईल काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, या मध्ये निश्चितपणे लक्ष घातले जाईल. वेळ पडल्यास माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री महोदयां समवेत चर्चा करुन यातून मार्ग काढण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातील 20 जिल्ह्यात सिकलसेलचे अनेक रुग्ण आढळून येणे

मु. शी. :राज्यातील 20 जिल्ह्यात सिकलसेलचे अनेक रुग्ण आढळून येणे या संबंधी डॉ.नीलम गोऱ्हे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"राज्यातील 20 जिल्ह्यांत सिकलसेलचे अनेक रुग्ण आढळून आले असणे, सिकलसेल हा आजार आनुवांशिक असल्याने ही एक मोठी सामाजिक समस्या असणे, या रुग्णांसाठी केंद्र शासनाकडून तसेच राज्य शासनाकडून उपलब्ध होणाऱ्या निधीचा विनियोग पूर्णत: होत नसणे, या दुर्धर आजारा बाबत जनजागृती करण्याकडे होत असलेले दुर्लक्ष, राज्य शासन ही गंभीर आरोग्य समस्या नियंत्रणात आणण्याकरिता कोणतीही ठोस पावले उचलत नसल्यामुळे रुग्णांमध्ये व त्यांच्या नातेवाईकांमध्ये निर्माण झालेले चिंतेचे व घबराटीचे वातावरण, या बाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका,"

प्रा.फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, 19 जिल्ह्यांमध्ये या सिकलसेलच्या आजाराने 15 लाखापेक्षा जास्त रुग्ण बाधित असण्याची शक्यता आहे. अतिशय दुर्लक्षित परंतु अतिशय गंभीर असा हा आजार आहे. या आजाराचे स्वरुप आनुवंशिक आहे. महाराष्ट्रातील 45 जातींमध्ये या सिकलसेलचे प्रमाण अधिक मोठया प्रमाणात आढळते. हा सिकलसेल आजार खास करुन विदर्भ, ठाणे, नाशिक, नंदूरबार, यवतमाळ, वर्धा अशा जवळ जवळ 20 जिल्हयांमध्ये आढळतो.

सभापती महोदय, केंद्र शासनाने अर्थसंकल्प जाहीर केलेला आहे. या अर्थसंकल्पात सिकलसेल रुग्णांना रेल्वे भाडयामध्ये 50 टक्के सवलत दिली जाणार आहे असे जाहीर करण्यात आलेले आहे. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, सिकलसेल रिसर्च इन्स्टिटयूट तयार करावे असे सन 2011 मध्ये शाससनाला आदेश देण्यात आलेले होते. त्याबद्दल या अर्थसंकल्पात उल्लेख करण्यात आलेला नाही. माझा तिसरा अत्यंत महत्वाचा प्रश्न असा आहे की, सिकलसेल रुग्णांना आनुवंशिक पध्दतीने आजार होत असल्यामुळे विवाहपूर्व रक्त तपासणी बंधनकारक करण्याच्या संदर्भात कायदा करता येईल काय याबाबत शासनाने पाऊले उचलली तर बऱ्याच लोकांचे जीवन सुरक्षित होऊ शकेल. निवेदनामध्ये या संबंधीची जी आकडेवारी दिलेली आहे ती प्रबोधनाच्या दृष्टीने बरोबर आहे परंतु प्रबोधनाला कायद्याचा आधार असल्याशिवाय लोकांची दिशाभूल थांबत नाही. म्हणून 1) जनतेच्या हिताच्या दृष्टीने कायदा करणे 2) सिकलसेल रिसर्च इन्स्टिटयूट तयार करणे 3) या आजारासाठी ज्या वेगवेगळया सवलती देण्यात आलेल्या आहेत त्यांची माहिती देण्यासाठी नक्की कशा पध्दतीने पाऊले उचलण्यात येणार आहेत या तीन प्रश्नांची उत्तरे देण्यात यावीत.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सिकलसेल रुग्णांना द्यावयाच्या सवलतीच्या संदर्भात महाराष्ट्र राज्यापुरता विचार केला तर एस.टी.बसने प्रवास करणाऱ्या रुग्णांना सवलत देण्याचा विचार करण्यात येत आहे. रिसर्च इन्स्टिटयुट स्थापन करण्याच्या संदर्भातील बाब डीएमईआरशी संबंधित आहे आणि त्यांनी हे प्रस्तावित केलेले आहे असे समजते.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, रेल्वे प्रवास सवलतीच्या संदर्भात मी या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. तसेच सिकलसेल आनुवंशिक आजार असल्यामुळे विवाहपूर्व रक्त तपासणी बंधनकारक करण्या बद्दलचा कायदा करण्यासाठी काय पावले उचलण्यात येणार आहेत असा प्रश्न मी या ठिकाणी विचारलेला आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, ही बाब तपासून बघता येईल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, सिकलसेल या आनुवंशिक आजाराच्या बाबतीत अतिशय सविस्तर आणि स्पष्टता येणारे निवेदन माननीय मंत्री महोदयांनी केलेले आहे. मोफत रक्त संक्रमण हा यातील एक महत्वाचा घटक आहे. हे रक्त संक्रमण सिकलसेल रुग्णांना वारंवार करावे लागते. या रक्त संक्रमणासाठी आवश्यक असलेले इन्फ्रास्ट्रक्चर आरोग्य विभागामार्फत उपलब्ध करणे गरजेचे आहे. कारण या रुग्णांची संख्या मोठया प्रमाणात आहे. या रुग्णांना वारंवार रुग्णालयात यायला लागणे आणि त्यावर होणारा खर्च याची पूर्तता करण्यापेक्षा या रक्त संक्रमणाचा विशेष कार्यक्रम जास्त परिणामकारक होईल या दृष्टीने काही योजना आहे काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, खूप जास्त प्रमाणात रक्त संक्रमणाची आवश्यकता नाही. 331 रुग्णांचे मोफत रक्त संक्रमण केलेले आहे. या रुग्णांना सवलती देण्यासाठी या रुग्णांचा राजीव गांधी आरोग्य योजना तसेच संजय गांधी योजनेमध्ये समावेश केलेला आहे.. या आजारावर ट्रिटमेंट नसल्यामुळे रुग्ण आणि वाहक यांचे लग्न होऊ नये अशा पध्दतीची पर्यायी उपाययोजना करण्यात आलेली आहे.

श्री. सय्यद ज़मा : सभापति महोदय, सिकलसेल बीमारी विदर्भ से शुरु होकर ट्रायबल एरिया में फैल गई है. सिकलसेल से प्रभावित 19 जिलों में आपने 1 जिला और शामिल किया है. माननीय सदस्यों ने रेलवे के कन्सेसन के बारे में, एस.टी. के कन्सेसन के बारे में और ब्लड टेस्ट के बारे में कहा है. सिकलसेल से प्रभावित लोगों का शादी से पहले ब्लड टेस्ट होना चाहिए. सिकलसेल के बारे में मेरा आपसे अनुरोध भी है और प्रश्न भी है कि इस बारे में माननीय सदस्यों की जल्दी से जल्दी एक मीटिंग बुलाकर, एक कंपोजिट पॅकेज बनाकर जिस प्रकार से एच.आय.वी. के लिए अभियान चलाया जा रहा है, क्या सिकलसेल के लिए उसी प्रकार का अभियान चलाने की आपकी योजना है ?

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : विवाहपूर्व रक्त तपासणीच्या संदर्भात मी प्रश्न विचारला होता त्याचेही उत्तर माननीय मंत्री महोदयांनी द्यावे.

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, या सभागृहामध्ये सिकलसेलच्या संदर्भात पहिल्यांदाच चर्चा होत आहे असे नाही. प्रत्येक अधिवेशनामध्ये या संदर्भात आपण चर्चा केलेली आहे आणि सभागृहामध्ये सर्व माहिती दिलेली आहे. मी सांगू इच्छितो की, आपल्या राज्याने सर्वात प्रथम 2005 मध्ये सिकलसेलचे काम हाती घेतले. त्यानंतर दुसऱ्या राज्यांनी पुढाकार घेतला. यामध्ये आपण प्रथम पुढाकार घेऊन 19 जिल्ह्यांमध्ये चांगले काम करीत आहोत. यामध्ये आणखी एका जिल्ह्याचा समावेश करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी सक्तीने रक्त तपासणी करण्याच्या संदर्भात कायदा करण्याबाबत प्रश्न विचारला. जे इंटरनॅशनल नॉर्म्स आहेत, जे इंटरनॅशनल मेडिकल एथिक्स आहेत, वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनचे जे एथिक्स आहेत, त्यानुसार कोणत्याही माणसाने सक्तीने रक्त तपासणी करण्याबाबतचा कायदा आपण करु शकत नाही. सिकलसेल आजाराचा रुग्ण असो, एड्सचा रुग्ण असो किंवा कोणत्याही आजाराचा रुग्ण असो, तो स्वत:हून आला तरच आपण रक्त तपासणी करु शकतो. केवळ आपल्याच देशात नाही तर संपूर्ण जगामध्ये जी प्रथा आहे त्यामध्ये सक्तीच्या रक्त तपासणीला परवानगी नाही. आपण आपल्या राज्यात असा कायदा करु शकत नाही. सक्तीने विवाहपूर्व रक्त तपासणी करा असा कायदा आपण करु शकत नाही. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारताना सांगितले की, विदर्भातून सिकलसेल सुरु झाला आणि नंतर सर्व आदिवासी भागामध्ये पसरला. असे काही नाही. महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, गुजरात, ओरिसा, मध्य प्रदेश, पश्चिम बंगाल येथील संपूर्ण आदिवासी भागामध्ये सिकलसेलचे रुग्ण आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : कायम विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळांचा कायम शब्द काढण्याबाबत शासनाकडून होत असलेली दिरंगाई

मु. शी. : कायम विनाअनुदानित उच्च माध्यमिक शाळांचा कायम शब्द काढण्याबाबत शासनाकडून होत असलेली दिरंगाई यासंबंधी सर्वश्री विक्रम काळे, नितीन गडकरी, विनोद तावडे, हेमंत टकले, रमेश शेंडगे, ॲड. उषा दराडे, श्री. नागो पंडलिक गाणार, डॉ. रणजित पाटील, सर्वश्री एम.एम.शेख, सतीश चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात सन 2000 पासून अंमलात आलेल्या कायम विनाअनुदान धोरण, या तत्वावर परवानगी दिलेल्या सर्व प्राथमिक/माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना कोणतेही अनुदान न मिळणे, परंतु सन 2009 मध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळांचा "कायम शब्द" काढून त्या सर्व शाळांना यापुढे अनुदान देण्याचा शासनाने निर्णय करताना त्यात उच्च माध्यमिक विद्यालयाचा अंतर्भाव नसणे, यामुळे राज्यातील हजारो कायम विनाअनुदानित उच्च माध्यमिक शिक्षक विनावेतन उपाशीपोटी काम करणे, वेळोवेळी अनुदान मागणीसाठी आंदोलने करणे, तथापि शासनाकडून याविषयी निर्णयास दिरंगाई होणे, यावर शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

प्रा. फौजिया खान (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, प्रश्न विचारण्याच्या अगोदर मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, निवेदनामध्ये आपल्याला दुरुस्ती करावयाची आहे का ? सभापती महोदय, जेव्हा एखादी व्यक्ती एखादे महत्वाचे काम करते तेव्हा त्याची इतिहासामध्ये नोंद होते. तत्कालीन शिक्षण मंत्री श्री. राधाकृष्ण विखे-पाटील साहेब आणि तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अशोकरावजी चव्हाण साहेब आणि तत्कालीन अर्थमंत्री श्री. दिलीप वळसे-पाटील यांनी 16 मार्च, 2009 ला खरोखरच ऐतिहासिक निर्णय घेतला. कधीही न होणारा तो निर्णय होता आणि तो या विषयाशी निगडित असल्यामुळे मी त्याबाबत उल्लेख केला. प्राथमिक आणि माध्यमिक शाळांचा कायम शब्द काढला. हजारो शिक्षकांना भाकरी मिळवून देण्याचे काम त्या निर्णयामुळे झालेले आहे. आज आम्ही सातत्याने गेली तीन वर्षे कनिष्ठ महाविद्यालयांचा सुध्दा कायम शब्द काढावा यासाठी भांडत आहोत. कारण या संदर्भातील वस्तुस्थिती आपण पाहिली असेल. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, संविधानिक तरतुदीनुसार 6 ते 14 वयोगटातील मुला-मुलींना सक्तीचे व मोफत शिक्षण देण्याची शासनावर असलेली जबाबदारी विचारात घेता ही मुले या वर्गात मोडत नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे.....

सभापती महोदय, आपल्याला सुध्दा शिक्षणाची आवड आहे. मंत्री महोदयांनी याबाबत आढावा घ्यावा. जे विद्यार्थी दहावी पास होतात त्यापैकी किती विद्यार्थी अकरावीमध्ये प्रवेश घेतात हा सुध्दा संशोधनाचा विषय आहे. अकरावीमध्ये विद्यार्थी प्रवेश घेत नाहीत हा राज्याच्या दृष्टीने चिंतेचा विषय आहे. कारण अकरावीच्या तुकडयांना शासनाकडून अनुदान मिळत नाही. आज 11,848 कायम विना अनुदानित तत्वावरील वर्ग तुकड्या आहेत. या तुकड्यांना अनुदान मिळत नाही. या तुकड्यांमध्ये 6 ते 7 लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आम्ही प्रश्न विचारल्यानंतर प्रत्येक अधिवेशनामध्ये ही बाब शासनाच्या विचाराधीन आहे असेच उत्तर दिले जाते. सरकार विचारच करत आहे की, काही निर्णयही घेते असा प्रश्न आमच्या सारख्या तरुण कार्यकर्त्याला पडतो. कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांची संख्या 17,500 इतकी आहे. ते कायम विना अनुदानित महाविद्यालयांमध्ये काम करतात. त्यांना वैयक्तिक मान्यता देण्याबाबत किती दिवसात निर्णय घेण्यात येईल ? आज आझाद मैदानावर त्यांचे आंदोलन सुरु आहे. त्यापैकी काही शिक्षकांना हॉस्पिटलमध्ये दाखल केलेले आहे. हे अधिवेशन संपण्यापूर्वी या कनिष्ठ महाविद्यालयांचा कायम हा शब्द काढण्याबाबत बाणेदारपणा दाखवावा आणि तातडीने याबाबत निर्णय घेतला जाईल काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारत असताना पार्श्वभूमी सुध्दा विस्तृतपणे सांगितली आहे. दिनांक 16.6.2009 रोजी मंत्रिमंडळाने 2001 पासून कायम विना अनुदान तत्वावर शाळांना मान्यता देण्याचा निर्णय घेतला होता. त्यातून कायम शब्द काढण्यात आला आहे. प्राथमिक व माध्यमिक म्हणजे 6 ते 14 या वयोगटातील वर्ग आहेत त्यांच्यासाठी कायम हा शब्द काढण्यात आला आहे. कारण मोफत व सक्तीचे शिक्षण हा कायदा आहे. त्यामुळे मोफत शिक्षण देणे हे शासनावर बंधनकारक आहे. मोफत व सक्तीचे शिक्षण हा कायदा केंद्र सरकारचा आहे. परंतु हा वर्ग 14 वर्षापेक्षा अधिक वयोगटातील असल्यामुळे त्यांचा अंतर्भाव यामध्ये करण्यात आलेला नव्हता. शासन काही करीत नाही, शासनाला कनिष्ठ महाविद्यालयांबाबत रस नाही अशी वस्तुस्थिती नाही. राज्यात नागरी व ग्रामीण भागामध्ये उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या 6,61,457 इतकी आहे आणि एकूण 3,572

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.विक्रम काळे.....

माध्यमिक शाळांना शासनाकडून अनुदान दिले जात आहे. त्याचप्रमाणे विना अनुदान तत्वावर शाळा चालतात त्यांची संख्या खूप कमी आहे. त्यामध्ये 1 लाख 45 हजार 335 विद्यार्थ्यांचा हा प्रश्न आहे. त्याचप्रमाणे 12 वी पर्यंत मुलींसाठी शिक्षण मोफत केलेले आहे. या सर्व सुविधा आहेत. शासनाने प्राथमिक व माध्यमिक शाळांचा कायम विना अनुदानित मधून कायम हा शब्द काढला असल्यामुळे त्यांचे मूल्यांकन करुन त्यांना अनुदान देण्याचे काम करावयाचे आहे. अनेक सन्माननीय सदस्यांकडून कनिष्ठ महाविद्यालयांचा कायम विना अनुदानित मधून कायम हा शब्द काढून टाकण्याची मागणी केली जाते. त्याबाबत सुध्दा विचार करता येईल. त्याबाबत शासनाने अभ्यास केला असून प्रस्ताव तयार केलेला आहे. तो प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या मान्यतेसाठी वित्त विभागाकडे पाठविणार आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे : 6 ते 14 वर्षे वयोगटातील विद्यार्थ्यांसाठी "कायम"शब्द काढलेला आहे. आपण मुलांमुलींमध्ये भेदभाव कशासाठी करता ? आपण मुलांना उच्च शिक्षणा पासून वंचित ठेवणार आहात काय ? तुकड्यांच्या संदर्भात 162 कोटी रु.चे अनुदान द्यावे लागेल. ही बाब अंतिम टप्प्यामध्ये आहे. शिक्षकांना वेठबिगा-याप्रमाणे राबवू नका. हे शिक्षक तीन दिवसापासून आझाद मैदानावर धरणे आंदोलन करीत आहेत. माझी कळकळीची विनंती आहे की, उच्च माध्यमिक शाळांचा "कायम" शब्द काढून मुलां-मुलींमध्ये केलेला भेदभाव नष्ट करावा. तेव्हा हे अधिवेशन संपण्यापूर्वी या संदर्भातील निर्णय शासन घेणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : शासन मुलांमुलींमध्ये भेदभाव करते, त्यांना सुविधा देत नाही असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. ही वस्तुस्थिती नाही. मी या संदर्भातील आकडेवारी सांगितलेली आहे. आपण विद्यार्थ्यांसाठी अनुदानित शिक्षणाची सुविधा निर्माण केलेली आहे. "कायम" शब्द काढणे ही बाब राज्याच्या आर्थिक परिस्थितीवर अवलंबून आहे. सन्माननीय सदस्यांची जी इच्छा आहे तीच शासनाची देखील इच्छा आहे. आमच्या शिक्षण विभागाची भूमिका सकारात्मक आहे. परंतु केवळ सकारात्मक दृष्टीकोन ठेवून चालणार नाही. शासनाला अनेक बाबींचा विचार करावा लागतो आणि त्यामध्ये आर्थिक बाब ही अत्यंत महत्वाची असते. आम्ही वित्त विभागाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे.

श्री. रामनाथ मोते : प्राथमिक आणि माध्यमिक शाळांचा "कायम"शब्द काढल्यानंतर देखील तीन वर्षे झाली. उच्च माध्यमिक शाळांचा "कायम" शब्द आता काढला तर त्याचा तीन वर्षानंतर अनुदानासाठी विचार करावा लागेल. तेव्हा "कायम" शब्द काढून आंदोलन करणा-या शिक्षकांना दिलासा देण्याचा प्रयत्न शासन करणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : या संदर्भात आम्ही विचार करीत आहोत असे मी सांगितलेले आहे.

ॲड. उषा दराडे : विनाअनुदानित शाळांना 100 मार्कांची परीक्षा द्यावी लागणार आहे. गुण शिक्षण, गुण भौतिक सुविधा, समाजोपयोगी कार्यक्रम, शालेय उपक्रम अशा अटी घातलेल्या आहेत. या अटी शिथिल करण्यात येतील काय ? दरवर्षी 10 टक्के शाळा अनुदानपात्र ठरविण्यात येणार आहेत. मग संपूर्ण शाळा अनुदानपात्र केव्हा होतील ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारलेला आहे. तरीही मी स्पष्ट करु इच्छिते की, जेव्हा "कायम" शब्द काढण्यात आला त्यावेळी मंत्रिमंडळाने सन 2012-13 पासून शाळांचे मूल्यांकन करण्याचा निर्णय घेतला. सन्माननीय सदस्यांनी ज्या अटी सांगितल्या ते मूल्यांकनाचे निकष आहेत. ते निकष अनुदानासाठीच्या सूत्रासाठी वापरण्यात येतील.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पॉईण्ट ऑफ इन्फर्मेशन

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझा पॉईण्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. नाशिक येथील सातपूर व अंबड औद्योगिक वसाहतीमधील उद्योग मालकांच्या काही संघटना या कामगार कायद्यांचे उघड उघड उल्लंघन करणा-या उद्योजकांना पाठीशी घालण्याचे व प्रोत्साहन देण्याचे काम करीत आहेत.

वास्तविक नाशिक जिल्ह्यामध्ये कामगार कायद्याचे पालन व्हावे व विशेष करुन कामगारांना किमान वेतन मिळावे, पी.एफ, बोनस, रजा, ई.एस.आय. आदी संरक्षण मिळावे यासाठी नाशिक वर्कर्स युनियन ही सी.आय.टी.यू. संलग्न संघटना काम करीत असून आजमितीस जिल्ह्यातील 25,000 कामगार सभासद असलेली व 200 पेक्षा जास्त कंपन्यांमध्ये युनियन असलेली संघटना आहे. कामगार कायद्याच्या आधारे कामगार वर्गाला त्याचे हक्क मिळवून देण्यासाठी संघटना काम करीत आहे.

वास्तविक मे. संज्योत मेटलचे मालक संतोष हेगडे यांचे फिर्यादीत नमूद तथाकथित घटनेशी नाशिक वर्कर्स युनियनचे पदाधिकारी व नेते यांचा कोणताही संबंध नाही. तसा जाहीर खुलासा पूर्वीच केलेला आहे. मात्र श्री. हेगडे यांच्या मारहाणीच्या तक्रारीबाबत कोणत्याही प्रकारे मालक वर्गाच्या दबावाने कामकाज व कारवाई होऊ नये म्हणून सर्व संबंधितांना योग्य त्या सूचना देण्यात याव्यात व कामगार कायद्यांचे पालन व्हावे या दृष्टीने सर्व संबंधितांना सूचना देण्यात याव्यात.

...नंतर श्री. भोगले...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विशेष उल्लेख</u>

पृ. शी./मु.शी. : नाशिक जिल्हयातील द्राक्ष पिकाचे थंडीमुळे झालेले नुकसान याबाबत श्री.जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ा मांडतो.

नाशिक जिल्हयात फेब्रुवारी महिन्यामध्ये दोन-तीन वेळा अचानक आलेली थंडीची लाट, अचानक थंडीमुळे व निचांकी तापमानामुळे जिल्हयातील द्राक्षबागाचे झालेले 30 ते 40 टक्के नुकसान, तापमानात लक्षणीय घट झाल्यामुळे त्याचा परिणाम द्राक्ष उत्पादनावर होऊन साधारणपणे 25 टक्के द्राक्ष निर्यातीत झालेली घट, द्राक्ष उत्पादन शेतकरी पीक कर्ज घेऊन द्राक्ष शेती करीत असल्यामुळे अचानक पडलेल्या थंडीमुळे द्राक्ष बागायतदारांचे लाखो रुपयांचे झालेले नुकसान, नाशिक जिल्हयातील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांना या आपत्तीतून सावरण्यासाठी शासनामार्फत द्राक्ष बागांच्या पंचनाम्याची माहिती मागवून नुकसान भरपाई देण्याबाबत शेतकऱ्यांची असलेली मागणी, याबाबत शासनामार्फत कार्यवाही करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु.शी. : मुंबई शहरातील झोपडपट्टयांमध्ये राहणाऱ्या गरीब लोकांना आरोग्य व शिक्षणाची सुविधा मिळणे याबाबत श्री.प्रकाश बिनसाळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, भारतात 9.25 कोटी पेक्षा अधिक लोक झोपडपट्टीत राहणे, देशाच्या तुलनेत सर्वाधिक झोपडपट्टया मुंबईत असणे, झोपडपट्टीत राहणाऱ्या मुलांना लोकसंख्येच्या घनतेमुळे संसर्गजन्य रोग लवकर पसरणे, संपन्न वर्गाला ज्या आरोग्य सुविधा मिळतात त्या सुविधा गरीब लोकांना न मिळणे तसेच शिक्षणाचीही अवस्था तीच असणे अशा प्रकारे जनसामान्यांची शहरे म्हणजे प्रगतीची संधी या दाव्याला युनिसेफच्या अहवालाने धक्का देणे, त्यामुळे शहरातील बालकांच्या हक्कांची जपणूक करण्यासाठी विशेष प्रयत्नांची आवश्यकता, याबाबत शहरातील इ ोपडपट्टीत राहणाऱ्या बालकांचे आरोग्य आणि शिक्षण याची होरपळ थांबविण्याबाबत उपाययोजना करण्यात यावी अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु.शी. : 2005 पूर्वीच्या राजकीय कार्यकर्त्यांवरील पोलीस केसेस काढून घेणे याबाबत श्री.चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, वेगवेगळ्या कारणांनी महाराष्ट्रात जवळजवळ वर्षातील 250 ते 300 दिवस बंदी हुकूम असतो. बंदी हुकूम असतो म्हणून प्रश्न निर्माण व्हायचे रहात नाहीत. प्रश्न निर्माण होऊनही बंदी आहे म्हणून आंदोलने थांबतात असे होत नाही. छोट्या छोट्या गोष्टीसाठी अनेक आंदोलने चालतात. त्या आंदोलनांमध्ये बंदी हुकूम मोडला म्हणून राजकीय कार्यकर्त्यांवर पोलीस केसेस दाखल होतात. मध्यंतरी गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी 2005 पर्यंतच्या अशा राजकीय केसेस काढून घेऊ असे म्हटले होते. त्या संदर्भात कोणतीही कारवाई त्या त्या जिल्हयातील पोलीस अधीक्षक कार्यालयाकडून झालेली नाही. या सगळ्या राजकीय कार्यकर्त्यांना आपापल्या वेगवेगळ्या प्रकारच्या कायदेशीर बाबीमध्ये अडचणी येतात. 2005 पूर्वीच्या राजकीय कार्यकर्त्यांवरील पोलीस केसेस काढून घेण्याच्या प्रश्नावर विचार व्हावा अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाला विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु.शी. : मौजे रोहणा साखरडोह, ता.मानोरा, जि.वाशिम येथील

स्वस्त धान्य दुकानदाराने केलेला गैरव्यवहार याबाबत
श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली
विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

मौजे रोहणा साखरडोह, ता.मानोरा, जि.वाशिम येथील ग्रामस्थांनी तेथील स्वस्त धान्य व रॉकेल दुकानदारांच्या विरुध्द संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी करण्यात येणे, परंतु संबंधित अधिकाऱ्यांने ग्रामस्थांनी केलेल्या तक्रारीची दखल न घेता त्यांच्यावर कोणतीही कार्यवाही न करणे, मौजे रोहणा साखरडोह येथील ग्रामस्थाने दिनांक 17.12.2011 रोजी वा त्या सुमारास स्वस्त धान्य व रॉकेल दुकानदाराच्या गैर व्यवहाराबाबत चौकशी करण्यासाठी तहसील कार्यालयासमोर लाक्षणिक उपोषण करणे, सदर प्रकरणी चौकशी केली असता तहसीलदार, वाशिम यांच्या अहवालामध्ये दुकानदाराविरुध्द अनियमितपणा व गंभीर स्वरुपाचे आरोप सिध्द होणे, जिल्हा पुरवठा अधिकारी, वाशिम यांनी रोहणा व साखरडोह येथील दुकानदाराविरुध्द गंभीर स्वरुपाचे आरोप पत्र असतानाही योग्य ती कार्यवाही करण्यात न येणे, सबब मौजे रोहणा साखरडोह येथील नागरिकांना न्याय मिळावा म्हणून मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्राध्यापकांनी विद्यार्थीनींचा लैंगिक छळ करणे याबाबत
ॲड.उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष
उल्लेखाची सूचना.

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडते.

मौ.पानदल बांदा, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग येथील महाविद्यालयातील विद्यार्थीनींचा प्राध्यापक रमाकांत गावडे यांनी लैंगिक छळ केल्याबाबत महिला विकास कक्ष मुंबई विद्यापीठ यांचेकडे तक्रार केली असता त्यानुसार महिला विकास कक्ष प्राचार्य गोकटे वाळके यांनी महाविद्यालयास चौकशीचे निदेश देण्यात येणे,.....

नंतर श्री.खर्चे..

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे .....

हे प्रकरण चौकशीसाठी गेले असता अहवालात प्रा. गावडे दोषी असल्याचा अहवाल मिळाला आहे. त्यासंदर्भात तारांकित प्रश्न देखील उपस्थित करण्यात आला होता. त्यानंतर या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी समिती नेमली असता त्यात प्रा. गावडे दोषी असल्याचे आढळून आल्यानंतर अद्यापही कोणतीच कारवाई करण्यात आलेली नाही, याबाबत लोकांमध्ये असंतोषाचे वातावरण असून शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: दुकाने व संस्था नियमावली क्लिष्ट केल्याबाबत सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, महाराष्ट्र दुकाने व संस्था सुधारित नियम 2011 शासनाने तयार केला असून त्याची नियमावली पाहिली तर आश्चर्य वाटेल. त्यात जवळजवळ 150 छोटे छोटे नियम दुकानदारांना बंधनकारक केले आहेत. हे जमा करीत असताना त्यांनी ऑन लाईन जमा केले पाहिजेत अशी सक्ती करण्यात आली आहे. माझ्याकडे पुणे येथील व्यापारी संघाने निवेदन दिले आहे. त्यावरुन दिसून येते की, अत्यंत क्लिष्ट स्वरुपात ही माहिती भरण्याचे बंधनकारक केले आहे. आयकर व मूल्यवर्धित कर यासारख्या क्लिष्ट कायद्यांच्या विवरणामध्ये केंद्र व महाराष्ट्र दुकाने व संस्थांच्या नियमामध्ये विनाकारण व अवाजवी बदल करुन ते क्लिष्ट केले आहेत. उदा. मालक व नोकर यांच्या संबंधात विनाकारण ढवळाढवळ करणे, तसेच धंदा/व्यवसाय करणाऱ्या नागरिकांच्या स्वातंत्र्यात सदर अंमलबजावणी हस्तक्षेप करीत आहे. तसेच शिल्लक चार्जेसची माहिती दर सहा महिन्यांनी कळविण्याचे बंधन घातले आहे. एका बाजूला मोठमोठे मॉल्स अशा व्यापाऱ्यांची जागा घेत आहेत अशा वेळेस शासनाच्या नियमांचा सुध्दा अशा प्रकारे दुकानदारांना त्रास होत आहे. अशा प्रकारचे अनेक बदल करुन ते क्लिष्ट करण्यात आले आहेत. तसेच सदर नियमांना व्यापक प्रसिध्दी देणे आवश्यक असताना तशी प्रसिध्दी दिली नसल्यामुळे अनेक संस्था व संघटनांना सुधारित नियमांबाबत हरकती नोंदविणे शक्य झाले नाही. याकरिता शासनाने या सुधारित नियमांना त्वरित स्थगिती देऊन याबाबत हरकती व सूचना मागवाव्यात व सदरहू नियम सशक्त करण्याची आवश्यकता असल्याने याबाबत शासनाने तत्काळ निवेदन करावे आणि सुटसुटीत अशी नियमावली कार्यान्वित करावी अशी विनंती करते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: थकीत कृषी पंपांचे फिडर्स बंद करण्यासंबंधी दिलेले आदेश याबाबत सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

महोदय, "राज्यात कृषी पंप धारकांसाठी कृषी संजीवनी योजना राबविण्यात येणे, सदर योजनेच्या माध्यमातून कृषी पंपाची थकबाकी वसूल करण्याची मोहीम वीज वितरण कंपनीने हाती घेणे, त्यातच पश्चिम विदर्भाची पीक परिस्थिती अत्यंत गंभीर व पिकांची घट झालेली असल्याने सदर परिसरातील शेतकरी वीज बिल भरण्यास असमर्थ असणे, त्यातच वीज वितरण कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक यांनी थकबाकीदार कृषी पंप धारकांवर कारवाई करण्याचे आदेश देऊन व कृषी पंपाचे फिडर काढून टाकण्याच्या दिलेल्या सूचना, त्यामुळे शेतकऱ्यांना कोरडवाहू शेती करण्याची येत असलेली वेळ, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली चीडेची भावना, शासनाने यावर करावयाची कारवाई, त्याकरिता सदर विषयावर मी मुद्दा उपस्थित करीत आहे.

उप सभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होत असून दुपारी 3.30 वाजता सभागृहाची बैठक पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.58 ते 3.30 पर्यंत स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

पृ.शी.: गडचिरोली जिल्हयात पुस्टोला गावाजवळ नक्षलवाद्यांनी घडविलेल्या शक्तीशाली भूसुंरुग स्फोटात केंद्रिय राखीव दलाचे जवान शहीद होणे

मु.शी.: गडचिरोली जिल्हयात पुस्टोला गावाजवळ नक्षलवाद्यांनी घडविलेल्या शक्तीशाली भूसुंरुग स्फोटात केंद्रिय राखीव दलाचे जवान शहीद होणे या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, संजय केळकर, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री प्रितमकुमार शेगांवकर, चंद्रकात पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री परशुराम उपरकर, केशवराव मानकर, रामनाथ मोते, सय्यद पाशा पटेल, डॉ.रणजित पाटील वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

तालिका सभापती (श्री. मोहन जोशी): या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारीक प्रस्ताव मांडता येणार नाही. सन्माननीय सदस्य श्रीमती शोभा फडणवीस आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करते.

गडचिरोली जिल्हयात "ग्रीन हन्ट" मोहिम राबवित असतांना पुस्टोला गावाजवळ (ता. धानोरा) दिनांक 27 मार्च, 2012 रोजी नक्षलवाद्यांनी घडविलेल्या शक्तीशाली भूसुरुंग स्फोटात जवानांची बस 40 फूट उंच उडून दूर फेकल्याने या हल्ल्यात नक्षलवाद्यांच्या झालेल्या चकमकीत केंद्रिय राखीव पोलीस दलाच्या 3 उप निरिक्षकांसह 12 जवान शहीद होणे, 28 जवान जखमी होणे, त्यातील 8 जवानांची प्रकृती चिंताजनक असणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी".

सभापती महोदय, दि.27.03.2012 रोजी पुस्टोला गावाजवळ नक्षलवाद्यानी भूसुरुंग लावून पोलिसांची मिनी बस उडवून दिली. या घटनेत 12 जवान मारले गेले तर काही जवान जखमी झाले. या घटनेवर मी विशेष काही बोलणार नाही. परंतु एवढे नक्की आहे की, नक्षलवाद्यांचा आणि माओवाद्यांचा विचार केला तर नक्षलवाद्यांपेक्षाही माओवादी हे अतिशय क्रूर आहेत. डोळयामध्ये द्वेष

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ...

आणि क्रूरता घेऊन तुमचा खून पाडण्याचे स्वप्न हृदयात घेऊनच ते उतरलेले आहेत. गोरीला आर्मी ही अतिशय क्रूर आहे. कोणाचाही खून करावयाचा असेल तर ते मागेपुढे पाहत नाही. ज्याला टार्गेट केलेले असते त्याला ते मारतच असतात. मागील काळात काँग्रेसच्या सभापतीला त्यांनी मारले, पंचायत समितीचा जुना कार्यकर्ता श्री. बोगामी या उमेदवाराला सुध्दा त्यांनी मारले. क्रूरतेने खून करण्याची त्यांची पध्दत आहे. त्यांची क्रूरता दिवसेंदिवस वाढलेली आहे. हत्तीगोटयामध्ये त्यांनी जेव्हा 17 जवानांचा बळी घेतला होता त्यामध्ये सहा महिलांचा समावेश होता. या सहा महिलांना त्यांनी अतिशय क्रूरतेने मारले होते. त्यातील एक महिला गर्भवती होती त्या महिलेच्या पोटातील गर्भाला त्यांनी बंदुकीने उडविले होते. त्यांनी महिलांच्या शरीराचे तुकडे तुकडे करुन विखरुन टाकले होते. आम्ही या घटनेचा निषेध केला त्यावेळेस त्यांनी कबूल केले की, आम्ही असे काहीही केले नाही. त्यांची प्रेताला विद्रूप करण्याची पध्दत आता थांबली असली तरी त्यांच्या मनातील क्रूरता अजून काही संपलेली नाही.

सभापती महोदय, दि. 8 ऑक्टोबर, 2011 रोजी लाहेरी येथे जेव्हा 17 पोलीस मारले गेले होते त्या स्पॉटवर मी 8 दिवसांनी गेले होते त्यावेळेस त्या ठिकाणी जिवंत हँड बॉंबचा सडा पडलेला होता. जवळपास 100-200 हँड बॉंब त्या ठिकाणी पडलेले होते. मनामध्ये हिंमत असूनही पोलीस त्या ठिकाणी एकटा जाऊ शकत नाही अशी स्थिती आहे. त्यामुळे नक्षलग्रस्त भागामध्ये काम करीत असतांना आपल्याला काही गोष्टी लक्षात घेण्याची गरज आहे.

सभापती महोदय, आदिवासींना आपण प्रत्येक वेळी दोषी ठरवित असतो. कोठेही घटना घडली तर आदिवासींनी माहिती दिली नाही म्हणून, गावात नक्षलवादी असतांना माहिती दिली नाही म्हणून त्यांना जेलमध्ये टाकले जाते. लाहेरीमध्ये सुध्दा असाच प्रकार घडला होता त्यावेळी या सभागृहात चर्चाही झाली होती. प्रत्येक वेळेस आदिवासींना गुन्हेगार ठरवून जेलमध्ये टाकले जाते त्यामुळे ते आपल्यापासून दूर गेलेले आहेत. आदिवासी हे आता पोलिसांचे किंवा नक्षyवाद्यांचेही राहिलेले नाहीत. मी जेव्हा त्यांच्याकडे गेले होते तेव्हा त्यांना विचारले की, तुम्ही आम्हाला मदत का करीत नाही ? त्यावेळी त्यांनी असे मार्मिक उत्तर दिले की, आम्ही नक्षलवाद्यांची माहिती

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ...

पोलिसांना दिली तर ते आम्हाला भर चौकात गोळया घालून, हाल हाल करुन मारतात. पोलिसांना नक्षलवाद्यांची माहिती दिली नाही तर पोलीस आमच्यावर गुन्हे दाखल करुन झोडपून काढतात परंतु त्यामध्ये आमचा जीव वाचतो. मरणापेक्षा यातना ब-या अशा पध्दतीचा त्यांचा विचार झालेला आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

मी आपल्याला कवितेतील दोन ओळी वाचून दाखविते.

डोंगर कपारी राना वना मध्ये
असह्य वेदना साहिल्याने
स्वातंत्र्याचा सूर्य मात्र पाहिला नाही.

अशी त्यांची स्थिती असेल तर त्यांना त्यातून बाहेर काढणे आवश्यक आहे.

एखादी घटना घडल्यानंतर श्री.आर.आर.पाटील आपल्यावर राज्यातील सर्व लोक आरोप करतात. यात आपला काय दोष आहे? राज्यामध्ये किती नक्षलवाद वाढला आहे, हे केंद्र शासनाला माहीत नाही. सगळ्यात जास्त क्रूरतेने लोक मारले जात आहेत. ही जबाबदारी आपल्या एकट्या विभागाची आहे काय ? किती दिवसांपासून, महिन्यांपासून, वर्षापासून आम्ही सांगतो आहेत की, या विभागात माओवादी आले आहेत. तेव्हा पासून या राज्याची परिस्थिती खराब झाली आहे. त्यांचा बंदोबस्त आपण करणार आहात काय ? त्यांचा बंदोबस्त करायचा असेल तर ते काय आपल्या एकट्याचे काम आहे? छत्तीसगड, आंध्र प्रदेश आणि महाराष्ट्र या तिघांचे संयुक्त काम आहे. आज धानोऱ्यात घटना घडवून आणल्यानंतर ते छत्तीसगडमध्ये पळतात. एकदा त्यांनी स्फोट केल्यानंतर कपडे गुंडाळून ठेवतात आणि सिव्हील ड्रेस मध्ये येतात. कुठल्याही बसमध्ये, ट्रकमध्ये बसून निघून जातात. आपण पोहचायच्या आधी ते पळून गेलेले असतात. राहतात ते फक्त आदिवासी. त्यामुळे या तिन्ही विभागांचा एकत्रित झोन करून केंद्राने कोम्बिंग ऑपरेशन करावे अशी मागणी आम्ही बऱ्याच दिवसांपासून करीत आहोत. केंद्र शासन कोम्बिंग ऑपरेशन का करीत नाही ? माओवाद्यांचा बंदोबस्त का करत नाही ? 1 जानेवारी ते 15 नोव्हेंबर 2011 या कालावधीत झारखंड, छत्तीसगड, बिहार, ओरिसा, पश्चिम बंगाल, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये नक्षलवादी कारवायात 513 जण मृत पावले. 1476 घटना घडल्या आहेत. त्यात महाराष्ट्र देखील आला. त्यांचा मोठ्या प्रमाणावर धुडगूस चालू असताना केंद्र शासन आपली जबाबदारी टाळत आहे. ते प्रत्येक वेळी महाराष्ट्राला बदनाम करण्याचे काम करीत आहेत. आमचे तर म्हणणे आहे की, केंद्राने कोम्बिंग ऑपरेशन करावे. नक्षलवाद खऱ्या अर्थाने संपवायचा असेल तर या तिन्ही राज्यांचे एकत्रिकरण करून कोंबिंग ऑपरेशन करावे. हे काम एकट्या महाराष्ट्राचे, आंध प्रदेश, छत्तीसगड राज्याचे नाही. ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

हा विषय प्रत्येक राज्याला भेडसावत आहे. माओवाद्यांचे स्वप्न केंद्र विसरून गेले आहे. त्याचे स्वप्न आहे की, सन 2025 मध्ये भारतावर राज्य करायचे. शस्त्राने राज्य करण्याचे त्याचे स्वप्न आहे, हे आज लपून राहिलेले नाही. देशावर राज्य करण्याचे त्यांचे स्वप्न आहे म्हणजे प्रत्येक राज्याला खिळखिळे करण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे आपण देखील काही तरी विचार करण्याची आवश्यकता आहे. यावेळी आपण केंद्रावर दडपण आणण्याची आवश्यकता आहे.

नक्षलवाद्यांकडे मोठ्या प्रमाणावर स्फोटके येतात. ती बाहेरून येतात. तेव्हा आपले गुप्तहेर खाते काय करते ? ही स्फोटके डब्ल्यूसीएल मधून आली आहेत हे त्यांना माहीत आहे. खाणी मध्ये स्फोट करण्यासाठी स्फोटके येतात. स्फोटके निरनिराळ्या भागातून येतात. ही स्फोटके नक्षलवाद्यांना काही वरून मिळत नाहीत. स्फोटके कुठून येतात, कशी आली याचा कधी तरी आपण सखोलतेने विचार करणार आहात काय, हाही एक महत्त्वाचा प्रश्न आहे.

तेंदू पत्ता, धान्याचे व्यापारी, ठेकेदार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता-ठेकेदार,तेंदू पत्ता गोळा करणारे आदिवासी मजूर यांच्याकडून ते पैसे वसूल करतात. प्रत्येकाला पैसा द्यावा असे वाटत नाही. पैसा दिला नाही तर मृत्यू समोर आहे हे मात्र दिसते.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केवळ घाबरल्यामुळे, केवळ नक्षलवाद्यांच्या धाकापोटी हे पैसे दिले जातात. तुम्ही प्रत्येकाला संरक्षण देऊ शकत नाही.

सभापती महोदय, मला एक गोष्ट आठवते की, गडचिरोलीच्या एका तेंदूपत्ता ठेकेदाराकडे 13 लाख रुपये मागितले होते. पण त्याने दिले नाही तर त्याचा खून करण्यात आला. एका ठेकेदाराकडे 5 ते 10 लाख रुपये मागितले होते. त्यानेही ते दिले नाहीत मग त्याचाही खून करण्यात आला आणि मग खूनाची मालिकाच तयार होते. परंतु आमच्यासाठी कुठेही संरक्षणाची मालिका नाही. जर आपल्याला याठिकाणाहून सगळयांना बाहेर काढावयाचे असेल तर आपली स्वत:ची मानसिकता वाढविण्याची गरज आहे. आज अशी स्थिती आहे की, त्यांना शस्त्रे पुरविली जातात आणि ती कुठून येतात याची माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनाही जाणीव आहे. नक्षलवाद्यांना या शस्त्रांचा पुरवठा माओवाद्यांकडून चीन मधून केला जातो. तेथे चिनी बनावटीची सर्व शस्त्रे वापरली जातात आणि आपण चीनचे किती लाड करतो ? त्यांना येथे मार्केट खुले केले आहे. ते याठिकाणी आक्रमण करण्याच्या तयारीमध्ये असताना सुध्दा त्यांच्याबद्दल आपण काहीही बोलत नाही. चीनला पाठिशी घालावयाचे आणि त्यांनी त्यांच्या शस्त्रांनी आमचे राज्ये उडवावयाची हे जे प्रकरण आहे, त्या बाबत केंद्र शासन विचार करणार आहे की नाही. केवळ शस्त्रे किंवा स्फोटके नाही तर त्यांच्या कडे हेलिकॉप्टर उडविण्याचे लाँचर सुध्दा आहे आणि मी यापूर्वी देखील यासंबंधीची जाणीव करुन दिलेली आहे. अशा प्रकारे ते सर्व गोष्टींनी सुसज्ज आहेत. आज जवळपास 8 ते 10 हजाराच्या वर सक्रीय माओवादी पूर्ण देशामध्ये आहेत. आपला आदिवासी त्यांच्या सोबत जातो.

सभापती महोदय, आदिवासींच्या घरी जाऊन तुमची मुले आम्हाला द्या अशा प्रकारचे आवाहन माओवादी आणि नक्षलवादी करीत आहेत. जर आदिवासींनी त्यांच्याकडे मुलांना दिले नाही तर वडिलांना उचलून नेतात किंवा पोरांना उचलून नेतात. त्यामुळे मुलांना नक्षलवाद्यांकडे जाऊ द्यावयाचे नाही म्हणून तीन-साडेतीन हजार मुलांना यांच्या आई-वडीलांनी गडचिरोलीच्या बाहेर म्हणजे दुसऱ्या जिल्ह्यामध्ये पाठवून दिले आहे. मग तेथील लोक तुमच्या बाजूचे नाहीत काय? तर ते तुमच्या बाजूचे आहेत. परंतु त्यांना भीती वाटते की, आम्ही सरकारबद्दल काय बोलावयाचे ? आम्हाला काय संरक्षण आहे, आम्हाला कोण विचारणार आहे? त्यामुळे या लोकांचा देखील विचार करण्याची आवश्यकता आहे. नक्षलवाद्यांकडे शस्त्र पुरवठा कुठून येतो ? त्याठिकाणी शस्त्रास्त्रे येत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस . . . .

असताना गुप्तहेर खाते काय करीत असते. त्यांना या सर्व गोष्टींची जाणीव का नसावी ? याचाही विचार करण्याची गरज आहे. माननीय मंत्री महोदय, आपण आदिवासींच्या बाजूने खंबीरपणे उभे आहात तसेच आपण विकासाच्या योजना राबवित आहात हेही मला माहिती आहे. परंतु तो विकास त्यांच्या पर्यंत पोहोचत आहेत काय हे पहाण्यासाठी आपल्याकडे काय यंत्रणा आहे? आजही आपण त्या ठिकाणी कोणत्याही रिक्त जागा भरलेल्या नाहीत. तसेच त्या एरियामध्ये जे लोक गेलेले आहेत ते एक-दीड वर्षामध्ये रिटायर होणार आहेत आणि हे कशासाठी? तर 15 टक्के रक्कम जादा मिळते आणि मग निवृत्ती वेतनामध्ये तेवढा फायदा होईल म्हणून हे लोक तेथे गेलेले आहेत. परंतु तेथे जाऊनही काही अधिकाऱ्यांनी तेथील एरिया देखील पाहिलेला नाही.

सभापती महोदय, मी आजही सांगते आणि यापूर्वी देखील माननीय गृह मंत्र्यांना मी एक यादी देखील दिली होती. एकेका तालुक्यामध्ये 50 टक्के देखील रस्ते नाहीत. त्याठिकाणी शाळा, रस्ते, सिंचनाची सोय करण्याची तुमची इच्छा आहे परंतु ते आपण करु शकत नाही. याठिकाणी आपण केवळ ठरवितो पण आज आपल्याकडे तेवढी यंत्रणा नाही आणि हे सर्व करीत असताना बाहेरचे लोक म्हणजे केंद्रीय सुरक्षा दलाचे लोक येतात. त्यांनी येथे येऊ नये असे मी म्हणत नाही. पण त्यांना येथील भाषा कळत नाही, तेथील विभाग माहिती नाही, त्यांचे खान-पान सगळे वेगळे असते. अशा वेळेला पोलीस आणि केंद्रीय सुरक्षा दलाचे लोक यांच्याकडे जरी समन्वय असला तरी ते स्वत:ला मिलिट्रीच समजतात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात त्यांच्या हातून चुका होतात असे आपण म्हणतो.

सभापती महोदय, मला एक गोष्ट सांगा की, जर तुम्हाला 20 कि.मी.चा रस्ता क्लिअर करावयाचा असेल तर खऱ्या अर्थाने त्यांनी चालत जावयास पाहिजे असे आपले म्हणणे आहे. परंतु त्यांना 20 कि.मी.चालत जाण्याची सवय असेल काय ? मग हे अंतर चालून जाण्याची सवय कोणाला आहे ? आज नेमबाजीमध्ये जर सर्वात कोण हुशार असेल तर तो माझा आदिवासी आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

त्यांनी आतापर्यंत बंदुकीच्या नेमाने शिकारी केल्या आहेत. आता त्यांच्या बंदुकीतील बार संपले आहेत. आता फक्त त्याच्याकडे मार खाणे एवढेच फक्त शिल्लक आहे. तेव्हा आपण या सर्व गोष्टींचा कधी तरी विचार केला का ? आपण आदिवासी युवकांचे एक ट्रायल युनिट तयार करुन त्यांच्या शक्तीचा, युक्तीचा आणि गुणांचा विचार का करीत नाही ? त्यांचे एक सशस्त्र पोलीस दल तयार करुन त्यामध्ये स्थानिक तरुणांना सामावून घ्यावे. त्यांना जंगलातील रस्तान्रस्ता माहीत आहे. माझा आदिवासी बांधव कधीही बेईमान झालेला नाही. तो अतिशय इमानदारीने काम करणारा आहे. मला दुर्दैवाने म्हणावेसे वाटते की, आपला पोलीस एकवेळ बेईमानी करील, परंतु माझा आदिवासी बांधव कधीही बेईमानी करणार नाही. तेव्हा आपण सुरक्षिततेसाठी त्यांच्या गुणांचा वापर का करुन घेत नाही ? त्यांना केवळ मरणासाठी दारात उभे करायचे. तुमच्या चुकीमुळे स्फोट होणार आणि लाथा मात्र आम्ही खाणार हे कुठेतरी थांबले पाहिजे.

सभापती महोदय, आजही आपले अधिकारी ग्रामीण भागामध्ये जात नाहीत. आदिवासींना अन्नधान्य मिळते किंवा कसे ते पाहत नाही. वन विभागाचे अधिकारी त्यांना काम देतो असे सांगतात पण मागील तीन वर्षापासून बांबूचे काम सुरु झाले नाही, या वर्षी ते काम सुरु झाले आहे. तेंदूपत्त्याचे टेंडर अजून निघालेले नाही. आतापर्यंत तेंदूपत्त्याचे टेंडर निघाले असते तर पुढील दोन महिन्यामध्ये कमीत कमी वर्षभराचे धान्य माझ्या आदिवासी बांधवाना गोळा करता आले असते. मुंबईत बसून पगार घेणे ठीक आहे. आदिवासी क्षेत्रात 20 कि.मी. चालत जाऊन पोट भरण्याची वेळ आली तर तेथे कण्यासुध्दा मिळत नाही अशी अवस्था आहे.

सभापती महोदय, शस्त्रास्त्र कोठून येतात याची चौकशी झाली पाहिजे, स्फोटके कोठून येतात त्याची सखोल चौकशी झाली पाहिजे. आबा, आता वरवरची मलमपट्टी पुरे झाली. पुन्हा स्फोट होईपर्यंत आम्ही शांत राहणार, स्फोट झाले की खडबडून जागे होणार, शहीद झालेल्यांना पुष्पचक्र वाहणार, त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करणार, त्यांना पैसे देणार. परंतु आपण पत्नीला तिचा पती आणि मुलांना त्यांचा बाप परत देऊ शकत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

सभापती महोदय, पोलीस विभागावर मानव आयोगाचा प्रचंड दबाव आहे. आपण चोर,दरोडेखोर, खुन्याला पाठीवर हात ठेवून विचारणार, काय रे तू खून केल्यास काय ? एखादा नक्षलवादी मारला गेला तर तेथे मानव आयोगवाले जातात. परंतु आतापर्यंत नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात जे पोलीस शहीद झाले त्यावेळी किती वेळा मानव आयोगवाले गेले ? महिलांवर जे अत्याचार, बलात्कार होतात त्यावेळी किती वेळा महिला आयोगवाले आले ? कोणीही आमचे दु:ख ऐकून घेण्यासाठी आले नाही. कोणीही आमच्या दु:खावर मलमपट्टी करण्यासाठी आले नाही. मानव आयोगवाले नक्षलवादी आणि डाकू,चोरांच्यामागे राहणार असतील तर त्याचाही विचार करण्याची आवश्यकता आहे. मरणारे तुम्ही आम्ही लोक आहोत, ते नाहीत. तेव्हा या गोष्टींचा ताबडतोबीने विचार झाला पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, आपण पोलीस विभाग सक्षम केला पाहिजे. पोलीस विभागात कार्यक्षम अधिकारी आहेत तसेच भ्रष्टाचारी अधिकारी देखील आहेत. जे अधिक्कारी चांगले नाहीत त्यांची तेथून बदली करा. नजीकच्याकाळात निवृत्त होणाऱ्या अधिकाऱ्यांना गडचिरोलीला पाठवू नका. तरुण व तडफदार अधिकाऱ्यांना तेथे पाठवा. नवीन रक्ताला वाव द्या. आजही पोलीस विभागाची ताकद कमी झालेली नाही. पोलिसांची ताकद तुम्ही-आम्ही आणि पत्रकारांनी कमी केलेली आहे. आपण प्रत्येकवेळी पोलिसांना टार्गेट करतो, कृपया तसे करु नका. त्यांच्याकडून एखादी चूक होत असेल, जो काम करतो तोच चुका करतो असे म्हटले जाते. आपण पोलिसांची मानसिकता वाढविली पाहिजे. आपण माओवाद आणि नक्षलवाद केंद्र सरकारच्या मदतीने संपवू शकतो. आपण जोपर्यंत कोबिंग ऑपरेशन करीत नाही तोपर्यंत हा नक्षलवाद संपू शकत नाही. पोलिसांजवळ 303 च्या बंदुका असतात तर नक्षलवाद्यांकडे एके-47, एके-56 आणि दूर पल्ल्याच्या बंदुका असतात. आपणास नक्षलवाद्यांचा बंदोबस्त करायचा असेल तर त्या बाबत तातडीने उपाय योजना करणे आवश्यक आहे. भविष्यात असे स्फोट हाऊ नयेत, आदिवासींचे जीव जाऊ नयेत, जवानांचे जीव जाऊ नयेत या करिता आजच आखणी केली पाहिजे.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

सभापती महोदय, आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना शासनाने आपल्याजवळ बोलावून घ्यावे आणि त्यांच्या समस्या, दु:खे मातेच्या मायेने समजून घ्यावीत. त्यासाठी एक वेगळी समिती तयार करण्यात यावी. त्यामध्ये सामाजिक कार्यकर्ते घेण्यात यावेत. एनजीओ ना घेण्यात यावे असे मला म्हणावयाचे नाही पण त्या ठिकाणी प्रत्यक्षात जे काम करतात त्यांना एकत्र करावे, त्या ठिकाणी काम करणाऱ्या आदिवासींना एकत्र करावे, त्या ठिकाणी जे आमदार काम करतात त्यांना एकत्र करावे आणि त्यांच्याकडून प्लॅन तयार करुन घ्यावा. पोलीस विभागाचा प्लॅन किती सक्सेस होतो हे मी आतापर्यंत गेल्या वीस वर्षात बघितलेले आहे, त्यामुळे या सगळया लोकांना विचारात घेऊन, त्यांना प्रत्यक्षात कशाची गरज आहे, प्रत्यक्षात यांना वाचविण्याकरिता काय करावयाचे आहे, या बाबतचा एक प्लॅन तयार करण्यात यावा. केंद्र शासनावर दडपण आणल्याशिवाय आणि कोबिंग ऑपरेशन झाल्याशिवाय, या नक्षलवाद्यांना शस्त्र कुठून मिळतात याचा शोध लावल्या शिवाय, स्फोटके कुठून मिळतात याचा शोध लावल्या शिवाय, त्यांच्याकडे वाहने कुठून येतात याचा शोध लावल्या शिवाय नक्षलवादी कारवाया थांबणार नाहीत म्हणून या सर्व गोष्टींचा विचार करण्याची आवश्यता आहे.

सभापती महोदय, ज्या कारखानदारांनी या नक्षलवाद्यांना पैसे दिले, शस्त्र दिले, पाण्याच्या वॉटर बॅग्स् दिल्या ते अधिकारी पकडले गेले परंतु त्यांच्या विरुध्द अजिबात कारवाई झालेली नाही. ही कारवाई न करण्याचे शासनाचे धोरण संपविण्यात यावे. जो सापडेल त्याच्यावर कारवाई करण्यात यावी. बल्लारशा पेपर मिलचे अधिकारी सापडले होते पण त्यांना सोडून देण्यात आले. त्यांच्यावर कारवाई करण्याची आवयकता आहे एवढेच नाही तर जेथे-कोठे असे लोक सापडतील त्यांच्यावर कारवाई करावी आणि भविष्यात अशा घटना घडणार नाहीत याबद्दल योग्य ती काळजी घेण्यात यावी. आबा तुमच्या सज्जनतेवर आणि तुमच्या कामाबद्दल आम्हाला काही म्हणावयाचे नाही परंतु जो सपोर्ट पाहिजे तो कमी पडत आहे तो सगळयांकडून मिळविण्यामध्ये आपण यशस्वी व्हाल आणि आपले भवितव्य उज्वल ठरेल एवढेच बोलून मी माझे दोन शब्द संपविते.धन्यवाद.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा (महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस ने यहां पर अपने विचार व्यक्त किए. माननीय सदस्या शोभा ताई उसी क्षेत्र में रहती हैं. इसलिए उनका तजुर्बा ज्यादा प्रैक्टिकल है, उस क्षेत्र के निवासियों की तकलीफों की जानकारी माननीय सदस्या को ज्यादा है. इसलिए उन्होंने यहां पर अच्छे सुझाव दिए हैं.

सभापति महोदय, मैं यहां पर ट्रेडिशनल बातों को रिपीट नहीं करना चाहता. क्योंकि हमारे यहां पर पिछले 40-50 सालों से नक्सलवाद और माओवाद की समस्या चल रही है. माओवाद की समस्या पश्चिम बंगाल से शुरु हुई थी. अब यह समस्या बहुत सारे राज्यों में फैली चुकी है. इस समस्या को दूर करने के लिए हमारी केंद्र सरकार तथा अलग-अलग राज्य सरकारों ने तथा हमारी महाराष्ट्र सरकार ने भी कदम तो जरुर उठाए हैं, लेकिन उस समस्या को हल करने में हमारी केंद्र सरकार तथा विभिन्न राज्य सरकारों को खास सफलता नहीं मिली है. मेरा कहना है कि नक्सलवाद या माओवाद की समस्या कम होने की बजाय दिन पर दिन बढ़ती ही जा रही है. हमारी आर्म्ड फोरसेस और पुलिस के जवानों की हत्याओं के साथ-साथ आम नागरिकों की भी हत्याएं हो रही हैं.

इस समस्या को कम करने की दिशा में केंद्र सरकार और राज्य सरकारों की तरफ से भरपूर कोशिश हो रही है. हमारे माननीय मंत्री जी इस समस्या को खत्म करने के लिए भरपूर कोशिश कर रहे हैं और वहां की समस्या के संबंध में समय-समय पर जानकारी लेते रहते हैं. लेकिन भरपूर कोशिश करने के बाद भी उस समस्या को हल करने संबंधी रिजल्ट हमारे सामने नहीं आ रहा है. यह भी एक रिसर्च का ही विषय है कि यह समस्या हल क्यों नहीं हो पा रही है.

हम अखबारों में पढ़ते हैं कि नक्सलवाद और माओवाद के कुछ सपोर्टर हैं या कुछ लोग उनसे सहानुभूति रखते हैं. हमें जानना होगा कि इस तरह की घटनाओं में नक्सलवादियों के सपोर्टर्स का क्या रोल रहता है. मैं कहना चाहूंगा कि ह्युमॅन राइटस से संबंधित जो एक्टिविस्ट हैं, जो हमारे एनजीओज के एक्टिविस्ट हैं, मैं उनका विरोध नहीं करता क्योंकि मैं भी ह्युमॅन राईटस के पक्ष में हूं. पिछले 40 सालों से पब्लिक लाइफ में होने की वजह से मुझे भी मालूम है

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा....

कि यदि माओवाद या नक्सलवाद कहीं पर सफल होता है तो अवश्य ही उनको कहीं न कहीं से लोकल सपोर्ट या स्थानीय लोगों की सहानुभूति प्राप्त होती है. ये सपोर्ट चाहे आइडिओलॉजी के नाम पर हो, ह्युंमॅन राइट के नाम पर हो, ट्राइबल डॅवलपमेंट के नाम पर हो या फिर गरीबी हटाने के नाम पर हो, लेकिन स्थानीय लेवर पर उनके प्रति सहानुभूति रखने वाले लोग अवश्य होते हैं. इसी वजह से इस तरह के गलत काम करने के लिए नक्सलवादियों को प्रोत्साहन मिलता है तथा नक्सलवाद को खत्म करने में हमारी पुलिस को कभी-कभी असफलता भी हाथ लगती है.

सभापति महोदय, अभी तीन दिन पहले धानोरा में जो घटना हुई, इसे मैं हमारी पुलिस फोर्स या सीआरपीएफ जवानों की हार नहीं मानता, बल्कि इसको एरर ऑफ जजमेंट कहा जा सकता है. हमारी पुलिस फोर्स को इस बात का अंदाज नहीं हो पाया कि आगे माइन ब्लास्ट की घटना भी घट सकती है. इसलिए हम अपनी फोर्स की बहादुरी के बारे में किसी प्रकार की शंका नहीं ले सकते. जो लोग वहां पर शहीद हुए हैं, उनको मैं श्रद्धांजलि देता हूं और जो लोग जख्मी हुए हैं, उनके प्रति मैं अपनी सहानुभूति प्रकट करता हू.

सभापति महोदय, जो चीजें ट्रेडिशनल हैं, उनके बारे में माननीय शोभाताई ने भी कहा कि ज्यादा हेलीकॉप्टर इत्यादि साधनों की सुविधा वहां के जवानों के पास होनी चाहिए तथा वहां पर कॉम्बिंग ऑपरेशन इत्यादि कार्रवाई होनी चाहिए. मेरा कहना है कि ये सब काम तो सरकार पहले से ही कर रही है. ये सब काम तो हमारी केंद्र सरकार भी कर रही है. अभी हमारे केंद्रीय मंत्री श्री जयराम रमेश भी वहां पर आए थे. कल हमारे एक माननीय सदस्य ने यहां पर कहा कि जब भी केंद्रीय मंत्री आते हैं तो उसके तुरंत बाद इस तरह की कोई बड़ी घटना घटती है. मैं कहूंगा कि यह भी एक शोध का विषय है कि केंद्रीय मंत्री महोदय के आने के बाद तुरंत कोई प्रोवोकेशन होता है या दूसरा कोई कारण इसके पीछे है, इसकी जांच होनी चाहिए. मैं यहां पर ज्यादा समय नहीं लूंगा परन्तु मैं यही कहूंगा कि मैं भी ह्युमॅन राइट्स का समर्थक हूं. मैं भी यही कहता हूं कि मानव अधिकारों की रक्षा होनी चाहिए. लेकिन माननीय सदस्या की यह बात भी सही

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा.....

है कि यदि किसी नक्सली को थोड़ी सी भी चोट लग गयी तो वह मानव अधिकार का मुद्दा हो जाता है. लेकिन हमारे इतने सारे जवानों की हत्या होने के बाद भी ह्युमॅन राइट का मुद्दा नहीं उठाया जाता है. यह बात जरुर है कि यदि हमारी पुलिस द्वारा वास्तव में कहीं ज्यादती होती है तो वहां पर मानव अधिकार की बात उठनी चाहिए. इस बारे में हमारी केंद्र सरकार तथा सभी राज्य सरकारें भी बहुत जागरुक हैं तथा इस बारे में हमारी सरकार को ह्युमॅन राइट्स एक्टिविस्ट या ह्युमॅन राइट्स कमीशन की किसी सलाह की जरुरत नहीं है. इसलिए हिंसा करने वाले लोगों के प्रति ह्युमॅन राईट्स के नाम पर ..

...3 एम - 1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा...

जो लोग सहानुभूति दिखाते हैं या उनकी आइडिओलॉजी को बहुत ज्यादा हाई लाइट करते हैं या ग्लोरिफाय करते हैं, वह बात ठीक नहीं है. मैं माननीय गृह मंत्री जी से कहूंगा कि इस बारे में कड़क कानून बनाया जाना चाहिए.

ह्युमॅन राइट्स की बात अलग है. लेकिन कुछ एनजीओज यदि ह्युमॅन राइट्स के नाम पर या ट्राइबल डॅवलपमेंट के नाम पर इस तरह की गलत हरकत करते हैं तो उसके बारे कड़क कानून बनाने की जरुरत है, ऐसे लोंगों पर कड़क कार्रवाई होनी चाहिए. हमें देखना चाहिए कि यह ह्युमॅन राइट से संबंधित लोग हैं या गलत लोग उनके प्रति सहानुभूति दिखाते हैं.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, मघापासून ही जी चर्चा चालू आहे त्यामध्ये मानवाधिकार आयोगाबद्दल ज्या पध्दतीने एक प्रकारची संवेदना समोर येत आहे त्या बाबतीत मला असे वाटते की, आपण कोणत्याही यंत्रणेवर असा सरसकट दोष देऊ नये.

श्री. दिवाकर रावते : का देऊ नये ? ते आंतकवाद्याच्या बाजूने येतात. ते कसाबच्या बाजूने येतील. त्यांना चोपून काढले पाहिजे.

श्री. हेमंत टकले : ह्युमन राईट्स कमिशन हे पोलिसांच्या विरुध्द आणि यांच्या बाजूने आहे असा जो आपला समज या निमित्ताने होतो तो अत्यंत चुकीचा आहे. कोठेही मानवी हक्कांचे उल्लंघन होऊ नये हे पाहणे त्या यंत्रणेचे काम आहे. इतर सिस्टिममध्ये जसे दोष आहेत तसे त्या सिस्टिममध्ये सुध्दा असू शकतात. पण सरसकट अशी विधाने करणे मला योग्य वाटत नाही. म्हणून ही बाब मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मानवाधिकारवाल्यांची जी बाजू मांडली ती कामकाजातून काढून टाकावी. त्या लोकांनी वाटोळे केले आहे. गुंडांचा एन्काऊंटर होतो, त्यांच्यावर 100-100 गुन्हे असतात आणि मानवाधिकारवाले हरामखोर पोलिसांना दोष देण्यासाठी येतात. अशा फालतू गोष्टी या ठिकाणी होता कामा नये. आपल्याला बोलण्याचा अधिकार आहे म्हणून आम्ही वाटेल ते सहन करणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, इस बारे में मैं स्पष्टीकरण देता हूं. मैं माननीय सदस्य श्री हेमंत टकले साहब की भावना के अनुरुप ही यहां पर बोलना चाहता हूं. मैं बताना चाहता हूं कि ह्युमॅन राइट्स से संबंधित जानकारी मेरे पास भी है. इस बारे में अन्तर्राष्ट्रीय चार्टर क्या है, हिन्दस्तान का चार्टर क्या है तथा महाराष्ट्र का चार्टर क्या है, इन सब चीजों की जानकारी मेरे पास भी है. मैंने इस बात को यहां पर जनरलाइज नहीं किया, बल्कि मेंने कहा कि ह्युमॅन राइट्स के एक्टिविस्ट जब पुलिस की आलोचना करते हैं तो फिर ये लोग उन लोगों का विरोध क्यों नहीं करते जो आम लोगों की तथा हमारे पुलिस के लोगों की हत्या करते हैं. उस समय पर ह्युमॅन राइट्स एक्टिविस्ट का रोल क्या होना चाहिए ? तब ह्युमॅन राइट्स से संबंधित लोग आगे क्यों नहीं आते ?

मेरा कहना है कि जो लोग अपने आप को बहुत विद्वान समझते हैं और बड़ी-बड़ी आइडिओलॉजी की बात करते हैं या ट्राइबल डॅवलपमेंट की बात करते हैं, गरीबी हटाने की बात करते हैं या गरीबों के प्रति अपनी सहानुभूति की बात करते हैं, तब वे लोग सामने क्यों नहीं आते. इसलिए मैं पूछना चाहता हूं कि क्या इस तरह से हिंसा करने से गरीबी हट सकती है ? क्या वहां पर हिंसा करने से ट्राइबल डॅवलपमेंट का काम हो रहा है. गडचिरोली में आप आयरन ओर की माइन खोदने जाएंगे तो वहां पर एक इंच जमीन आपको नहीं मिलेगी.

(इसके बाद श्री शर्मा के पास....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्री. एस.क्यू. ज़मा जारी (पूर्वी देवदत्त)

आप वहां पर उत्पादन करने के लिए कारखाना डालिए, वहां के लोग आपको जमीन नहीं मिलने देंगे. जैसा कि माननीय सदस्य ने कहा कि बीड़ी पत्ते के कॉन्ट्रेक्टर, पी.डब्ल्यू.डी. के कॉन्ट्रेक्टर, फोरेस्ट के कॉन्ट्रेक्टर और जो वहां के अधिकारी हैं, अगर वे नक्सलाइट लोगों को पैसे नहीं देंगे तो वे वहां पर रह नहीं सकते और पुलिस उनका कुछ नहीं कर सकती है. माननीय मंत्री जी ने आज सुबह मंजूर किया कि नक्सलाइट लोगों की यह कार्य पद्धति है कि एक आदमी को चौराहे पर गोली मार दो और दहशत फैलाओ. वहां पर दहशत फैल जाएगी. वे इनोसेंट लोगों को मारते हैं, इसीलिए इसका नाम टेरिरिज्म है, ये दहशतवादी है और दहशत फैला रहे है. हमारा कहना यह है कि मानवाधिकार आयोग के बारे में मुझे भी आदर है, लेकिन नक्सलाइट के खिलाफ, हिंसा के खिलाफ या आतंकवाद के खिलाफ लड़ने वाले लोगों के बारे में मानवाधिकार आयोग को हस्तक्षेप नहीं करना चाहिए.

अभी औरंगाबाद में इंडियन मुजाहिदीन के आतंकवादी को पकड़ा गया. उनका नेटवर्क पकड़ने के लिए अगर एक आतंकवादी मारा गया और दो लोग पकड़े गए, उनके पास से हथियार पकड़े गए, उनके पास से लिटरेचर पकड़ा गया. अगर उनसे सहानुभूति रखने वाले लोग वहां पर नहीं रहते हैं तो वे किस के भरोसे उस शहर में रह रहे हैं. जिन संगठन या व्यक्तियों के ऊपर प्रतिबंध लगा हुआ है, उनकी बात आप छोड़ दीजिए. लेकिन समाज में जिन संगठन और व्यक्तियों पर प्रतिबंध नहीं लगा है, उनके संरक्षण और उनके सपोर्ट की वजह से वे लोग रहते हैं. ऐसे सहानुभूति रखने वाले जो लोग हैं, जिनकी इंटीग्रिटी संदेहास्पद है, उनको आयडेंटीफाय करने का काम करना पड़ेगा. इंटेलीजेंस, हमारी पुलिस फोर्स, सी.आर.पी.एफ. ये सभी अपना काम करते हैं. वे शौक से अपनी जान देने नहीं जाते. सी.आर.पी.एफ. के जवान को मालूम था कि बस के नीचे लँड माइन होती है और कभी भी बस उड़ जाती है. छत्तीसगढ़ और दूसरे राज्यों में लँड माइन की अनेक घटनाएं हुई हैं. मैं कहना चाहता हूँ कि मानवाधिकार आयोग की जरुरत है और मानवाधिकार आयोग होना चाहिए, लेकिन इसकी आड़ में अगर हिंसात्मक गतिविधि करने वाले लोगों का जो संरक्षण करते हैं तो उनकी भी समीक्षा होनी चाहिए. ऐसे एन.जी.ओ. का, ऐसे एक्टिविस्ट का आयडेंटीफिकेशन होना चाहिए और इसकी मॉनीटरिंग होनी चाहिए.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्री. एस.क्यू. ज़मा जारी

सभापति महोदय, मैं अधिक समय न लेते हुए केवल 2-3 बातें कहना चाहता हूँ. माननीय गृह मंत्री स्वंय वहां पर गए हैं, उन्होंने वह जिला एडॉप्ट किया है और मुझे लगता है कि हम सारे लोगों से ज्यादा गृह मंत्री जी का यह प्रेस्टिज इश्यू है. यह उनकी क्रेडिट है कि उन्होंने खुद कहा है कि वे गडचिरोली जिले के पालक मंत्री बनेगे. जब से वे वहां पर जा रहे हैं, उनके जीवन को खतरा हो सकता है. कोई आतंकवादी या नक्सलाइट बताकर नहीं आता है कि आप सावधान रहना. पूरी सुरक्षा रहने के बाद भी उनकी जान के लिए खतरा है, फिर भी वे वहां पर जाते हैं और पुलिस फोर्स का मनोबल बढ़ाने के लिए वहां पर डटकर रहते हैं.

सभापति महोदय, वहां पर कुछ बुनियादी कदम उठाने के बारे में हमारे माननीय सदस्यों ने अपने सुझाव दिए है. वहां पर जो व्यवस्था है, उसमें बुनियादी तब्दीली करनी होगी. मेरा एक सुझाव यह है कि जो लोग लोकल बॉडीज में चुनकर आते हैं, चाहे वह ग्राम पंचायत का मेम्बर हो, चाहे सरपंच हो, चाहे समिति का सदस्य हो, चाहे सभापति हो, चाहे जिला परिषद का सदस्य हो, चाहे जिला परिषद का अध्यक्ष हो, एक कानून बनाकर इन लोगों को विशेष दर्जा देना चाहिए. जहां नक्सालाइट हैं, जहां माओवादी है, जहां पर आतंकवाद का खतरा है, ऐसे जिलों में आप इन लोगों को एक विशेष दर्जा दीजिए . आज आमदारों को, खासदारों को विशेष दर्जा है, उनके प्रिविलेज है. अगर किसी ने हमारा प्रश्न का जबाब नहीं दिया तो हम प्रिविलेज मोशन ला सकते हैं. लेकिन जो लोग लोकल बॉडीज में काम करते हैं, जो चुनकर आते हैं तो उनको विशेष दर्जा मिलना चाहिए. सरकार की जो भी योजनाएं हैं, चाहे वह विकास की हो, चाहे वहां पर सुरक्षा बढ़ाने के बारे में हो, चाहे वहां पर जन-जागृति करनी हो, किसी भी काम के लिए लोकल बॉडीज के चुने हुए लोगों को आप ज्यादा सक्षम बनाइए.

हमारे माननीय सदस्य ने कहा कि सी.आर.पी.एफ. के लोग, इंडियन तिब्बत फोर्स के लोग वहां की परिस्थिति और भूगोल को उतना नहीं जानेंगे, जितना कि वहां के स्थानीय लोग जानेंगे. हमारे लोकल बॉडीज के लोगों के मन में डर है, अगर वे ज्यादा घूमेंगे, अगर वे ज्यादा काम करेंगे, अगर वे सरकार की बात करेंगे तो उनकी जान को खतरा है और कई लोग मारे जाते हैं. इसलिए नक्सलग्रस्त प्रभावित क्षेत्रों में इनको एक विशेष दर्जा दिया जाए, ताकि उनके मन में एक विश्वास पैदा होगा कि हमें यहां की गरीब जनता ने, हमें यहां की ट्राइबल जनता ने चुनकर दिया

. . . श्री. एस.क्यू. ज़मा जारी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

है तो हमारा विशेष अधिकार है कि हम यहां पर कानून-व्यवस्था बनाकर रखें, यहां का विकास करें, आम लोगों को संरक्षण दें और उनकी तरक्की की बात करें. ऐसा विशेष दर्जा कानून के द्वारा दिया जाना चाहिए. पुराने सिस्टम से इतने सालों में हम नक्सलाइट मूवमेंट को खत्म नहीं कर पाए हैं.

सभापति महोदय, उड़ीसा का भी यही हाल है. वहां पर 2 लोगों को पकड़ लिया, उड़ीसा के एक आमदार का अपहरण किया गया है. इनको छुड़ाने के लिए सरकार को निगोसिएट करना पड़ता है. जो लोग उनसे सहानुभूति रखते हैं, वे ही निगोसिएट करते हैं, इसलिए सरकार को उनके लिए दरवाजे खोलकर रखने पड़ते हैं. मैं तो वहां पर जाता हूँ. मेरा और अन्य आमदारों का भी अपहरण हो सकता है. कोयले के खदान क्षेत्र में पिछले 30-40 साल से मैं वहां पर जाता हूँ. मेरा कहना है कि स्थानीय स्तर की जो बॉडीज हैं, उनको एक्जीक्यूटिव एजेन्सी बनाना चाहिए, उनको स्पेशल पावर्स देने चाहिए, स्टेटस देना चाहिए और पूरी आर्म्ड फोर्स के माध्यम से उनके मार्गदर्शन में नक्सलवाद और हिंसा के खिलाफ वहां का मूवमेंट चलाना चाहिए. केन्द्र शासन, महाराष्ट्र शासन और हमारे गृह मंत्री जी का यह दृष्टिकोण सही है कि वहां पर विकास जरुरी है. वहां पर विकास कम हुआ है, इसके बारे में कोई बहस नहीं कर सकता है. गडचिरोली जिले में, बॅकवर्ड एरिया में विकास का प्रमाण कम है. वहां पर उद्योग आने चाहिए, वहां पर विकास होना चाहिए, वहां के मिनरल्स की माइनिंग होनी चाहिए, उनको अच्छा मुआवजा मिलना चाहिए और वहां के किसानों को बढ़ा हुआ दाम मिलना चाहिए. अगर गडचिरोली में कोई माइनिंग प्रोसस करनी है तो वहां के किसानों को आप जमीन का भाव मार्केट रेट से दुगुना दीजिए. पार्लियामेंट में मिनरल रेगूलेशन एक्ट आया है कि जो वहां पर इन्वेस्टमेंट होगा, उसका 26 प्रतिशत स्थानीय लोगों को देने की बात हो रही है. अगर आप इस तरह के कुछ क्रान्तिकारी कदम उठाएंगे तो ही हमें अधिक सफलता मिल सकती है.

.... 3O-1...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नहीं

श्री. एस.क्यू. जमा...

सभापति महोदय, हमारे एक माननीय सदस्य ने कहा और मैं भी उस बात से सहमत हूँ कि वहां पर एक लोकल फोर्स डिवलप होना चाहिए. गडचिरोली जिले के 2-4 हजार नौजवानों को लेकर, चाहे वे ट्रायबल हों, नॉन-ट्रॉयबल हों, दलित हों, चाहे वे किसी भी जाति के हों, अगर वे मेरिट में हैं और अगर वे फोर्स के साथ लड़ना चाहिते हैं, शासन का साथ देना चाहते हैं तो आप उनका प्रधानता के साथ सलेक्शन करें लोकल लोगों का फोर्स बनाएं. उनको वहां की ज्यादा जानकारी है, उनके मन में एक विश्वास पैदा होगा. इन्हीं शब्दों के साथ एक बार फिर हमारे जो जवान शहीद हुए हैं, उनको श्रद्धांजलि देते हुए, महाराष्ट्र शासन और हमारे गृह मंत्री जी जो भी कदम उठा रहे हैं, उनके साथ खड़े रहते हुए मैं अपनी बात समाप्त करता हूँ. जय हिंद, जय महाराष्ट्र.

****

. . . भाषण पूर्ण, नंतर 3P-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, हा विषय देशाचा आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील झालेला आहे. माननीय गृहमंत्री गडचिरोली जिल्हयामध्ये गेले होते. आम्ही सुध्दा तेथे जाऊन परिस्थिती बघितली होती. लोकांमध्ये मिसळून गृहमंत्री कसे काम करतात, लोकांना आपलेसे कसे करतात हे आम्ही स्वत: बघितले. आम्ही स्वतंत्रपणे ज्या गावात गेलो होतो तेथेच दोन दिवसापूर्वी दुर्दैवी घटना घडली. मरणाची भीती आम्हाला कधीच वाटत नाही. सगळे काही सांगून सुध्दा आम्ही तिथे गेलो आणि सगळी परिस्थिती पाहिली. मी चार वेळा गडचिरोली येथे गेलो आहे. नक्षलवाद चळवळीचा सेकंड रँकचा प्रमुख आहे त्याला जंगलात 10 कि.मी.आत जाऊन भेटून आलो. सरकारला या सगळ्या घटना माहिती आहेत. त्यांच्याकडे यंत्रणा आहे, परंतु तेथील भौगोलिक परिस्थिती विचित्र आहे. मानवाधिकाराचा विषय काढण्यात आला. तो विषय सर्वात तापदायक झालेला आहे. पोलिसांनी एन्काऊंटर केले की, मानवाधिकारवाले गुन्हेगारांच्या बाजूने उभे राहतात. कदाचित एन्काऊंटर चुकीचे असू शकते. परंतु अगोदर त्या व्यक्तीच्या नावावर दहा गुन्हे नोंदलेले आहेत, त्याचा खून पाडला जातो. अशा माणसाला मारुन चालत नाही. कारण मानवाधिकार आड येतो. यामुळे नक्षलवाद वाढत आहे.

माननीय गृहमंत्री जे करीत आहेत ते कोणाला तसे माहिती नाही. आम्ही सभागृहात बंदुका आणि इतर शस्त्रांबाबत वक्तव्य करतो. पोलीस कसे वावरतात हे सांगतो. परंतु सगळे गंभीर आहे. त्या ठिकाणी पोलिसांना बरोबर घेतले असते तर ही घटना घडली नसती. तुम्ही आम्हाला सगळे दाखविले. सगळे आपल्या लोकांनी निर्माण केले आहे. आर्मीने नाही. 10-10 फुटाची पाईपलाईन दाखवूनही पोलिसांना घेऊन गेले नाही. सीआरपीएफ यांच्यामुळे ती परिस्थिती झाली आहे. एक गोष्ट गंभीर वाटली. श्रीलंकेमध्ये एलटीटीईचे जे झाले तसा हा प्रकार आहे. तो देशाच्या मुळावर येत आहे. हे आपल्या देशाचे नागरीक आहेत. ज्यावेळी देशाचे गृहमंत्री श्री.चिदंबरम यांनी हा विषय सैनिकी पध्दतीने हाताळायची भूमिका व्यक्त केली तेव्हा लष्कर प्रमुखांनी स्पष्ट सांगितले की, देशाच्या रक्षणासाठी आपल्या देशातील नागरिकांवर बंदुका उचलणार नाहीत. सैन्य दलाने स्पष्ट भूमिका जाहीर केल्यानंतर नवीन योजना सुरु झाली. कोम्बिंग ऑपरेशन केले आहे. जोपर्यंत मिलिटरी उतरणार नाही तोपर्यंत 100 जिल्हयात नक्षलवाद पसरेल. ती दुर्दैवाची घटना ठरेल. म्हणून हा विषय केंद्राचा आहे. एनसीटीसी बाबत केंद्र सरकारने घोषणा केली. आपल्या राज्याने आम्ही सोबत आहोत अशी भूमिका घेतली. इतर....

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सगळ्या राज्यांनी सांगितले की, राज्याला विश्वासात घेऊन राज्य आणि केंद्रातील सुरक्षा यंत्रणा यांचा ताळमेळ घालण्यात यावा. केंद्र आणि राज्याचा काय वाटा असावा हे निश्चित करावे आणि मग योजना आमच्यावर लादण्यात यावी. थेट योजना लादल्यामुळे महाराष्ट्र राज्याने पहिला हात वर केला. कारण आपण दिल्लीला मानतो. गुजराथ राज्याचे मुख्यमंत्री, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री, तामीळनाडूच्या मुख्यमंत्री या सर्वांना त्यांच्या राज्यातील गुप्तचर यंत्रणेच्या प्रमुखांनी समन्वय कसा असावा याबद्दल सांगितले असावे. अन्यथा एकाकी पडावे लागेल. तुम्ही एक गोष्ट निदर्शनास आणली. आंध्रप्रदेशमध्ये योजना सुरु आहे. तेथील योजनेचा अभ्यास करण्यात यावा. काही करा आणि आमच्याकडे येऊन लपून बसा, आम्ही काही करणार नाही असे त्यांनी कॉम्प्रोमाईज केलेले नाही ना? कदाचित त्या राज्याची ती ॲडजस्टमेंट असू शकेल.

आपल्याकडून जी मदत राज्यासाठी करता येईल ती जरुर करावी. परंतु एक ठराव असा करा, आम्ही पूर्णपणे आमच्या राज्याच्या गृहमंत्र्यांबरोबर आहोत. नक्षलवादाच्या हल्ल्यासंबंधी जे जे करण्यात येईल त्यासाठी सर्व ताकदीनिशी आम्ही आपल्या मागे उभे आहोत. आमच्या खात्याच्या अधिका-यांना माहिती नाही असे नाही. सर्व काही माहिती आहे. आपल्यालाही माहिती आहे. आम्ही ते सांगण्याचा प्रयत्न करतो. एनसीटीसीचा विषय गांभीर्याने घ्यावा. प्रत्येक वेळेला तुम्ही कोंडीत पकडले गेलात असे नाही. तुम्ही मंत्री पदाची शपथ घेतल्यानंतर हिंमतीने गडचिरोली जिल्हयाचे पालकमंत्री पद स्वीकारले. आपल्या स्वत:च्या अंगावर ती जबाबदारी घेतली. मी गडचिरोली जिल्हयाचे पालकमंत्री पद घेणार आणि नक्षलवाद निपटण्याकरिता मदत करणार असे जाहीरपणे सांगितले.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

आजपर्यंत या महाराष्ट्र राज्यात इतके गृह मंत्री झाले पण एका मंत्र्याने देखील स्वत:हून गडचिरोली जिल्ह्याचे पालक मंत्री पद स्वीकारले असे झाले नाही. त्याला किती यश आले, त्याची चर्चा आपण कशाला करायची ? ती वेळ नाही. पण मला एका गोष्टीचे वाईट वाटले की, या राज्याचे मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हण हे एकदा सर्व बंद करुन हेलिकॉप्टर किंवा विमानाने गडचिरोली जिल्ह्यात आपल्याबरोबर आले असते आणि आबा बरोबर फिरले असते तर त्या जिल्ह्यातील जनतेलाही वाटले असते की, आपल्या जिल्ह्यात मुख्यमंत्री आले म्हणून संपूर्ण महाराष्ट्रच आपल्यासोबत आहे आणि अशा प्रकारे त्याला वेगळेच वजन प्राप्त झाले असते, पण दुर्दैवाने तसे घडले नाही. कदाचित हा प्रकार आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस असा असू शकतो पण जनतेच्या सुरक्षेच्या दृष्टीने किमान असा विचार करु नये अशी माझी सूचना आहे. त्या भागातल्या लोकांनी मंत्री महोदय श्री. आर.आर. पाटील, आपल्याकडे फक्त पालकमंत्री म्हणून बघायच की, गृह मंत्री म्हणून बघायचे असा विचित्र प्रश्न त्या भागातील जनतेच्या मनात निर्माण झाला आहे. कारण राज्याचे मुख्यमंत्री गेले की सर्व राज्य त्यांच्यासोबत असते असा त्याचा अर्थ होतो, संपूर्ण सरकार महाराष्ट्र सुध्दा त्यांच्या पाठिशी उभा असतो अशी भावना निर्माण होते.

महोदय, हा प्रश्न केवळ गडचिरोली जिल्ह्यापुरताच मर्यादित नाही. हा प्रश्न नक्षलवादाचा, आतंकवादाचा प्रश्न असून तो केवळ महाराष्ट्रापुरताच नव्हे तर संपूर्ण भारताचाच प्रश्न झालेला आहे. या समस्येशी जवळपास 7 राज्ये निगडित आहेत. मंत्री महोदय, सभागृहात आपण मघाशी जे विधान केले ते मला आवडलेले नाही. आपण म्हणालात की, "वेळ पडली तर आम्ही गप्प बसणार नाही" हे तुमचे वाक्य आहे. ते महत्वाचं आहे, तुम्ही बोललात ते बरोबर आहे. गडचिरोली जिल्ह्यात केंद्रीय राखीव पोलीस दलातील जवानांच्या बसवर झालेला हल्ला हा बसवर झालेला हल्ला नसून तो या विधानसभेवर झालेला हल्ला आहे, असे आपण म्हणालात. आमचे गृह मंत्री म्हणतात त्याप्रमाणे खाली आणि वर कोणतीही निर्णायक भूमिका दिसत नाही अथवा काहीही चर्चा नाही. म्हणून मी अशी सूचना करतो दोन्ही सभागृहात एक ठराव मांडून सरकारने पडेल ती किंमत मोजून गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलवाद संपुष्टात आणण्यासाठी एखादी ठोस उपाययोजना करावी असा या ठरावाचा आशय असेल. दोन्ही सभागृहाच्या माध्यमातून असा ठराव पास करुन ही

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

भूमिका एकमुखी मान्य केली पाहिजे. त्याचबरोबर माननीय मुख्यमंत्री गडचिरोली जिल्ह्यात घडलेल्या घटनेच्या संदर्भात तेथील जनतेला दिलासा देण्यासाठी गेले नाहीत ही खेदाची बाब आहे, अशा दोनच गोष्टी मी मांडतो.

महोदय, ज्या भागात हा स्फोट झाला त्या पेंढोरे आणि धानोरा गावात मी सुध्दा एकदा गेलो होतो. या गावाच्या परिसरातच हे सर्व घडलेले आहे. मंत्री महोदयांबरोबर आम्ही आहोत, ते समर्थपणाने गडचिरोलीचे नेतृत्व करीत आहेत, लढत आहेत. आम्ही आपल्यासोबत आहोत असे समजून आपल्याला या जिल्ह्याच्या बाबतीत कोणते निर्णय घ्यायचे असतील ते जरुर घ्यावेत, एवढेच नव्हे तर आम्ही आपल्याबरोबर येऊन कोणताही धोका पत्करायला तयार आहोत, एवढेच या निमित्ताने सांगतो. कारण ज्या सामर्थ्यांने आपण लढता आहात त्याबद्दल आम्ही तुम्हाला धन्यवाद देतो. आणि एका गोष्टीचे पुन्हा अभिनंदन करतो ते म्हणजे आज आपण सकाळी जे सांगितले ते अत्यंत गौरवास्पद आहे. मुंबईतल्या आंतकवाद्याच्या हल्ल्यामध्ये शहीद झालेल्या शिपायाला मिळणारा जो न्याय असेल तो केंद्राचा असेल, परंतु महाराष्ट्र शासनाकडून राहिलेले दहा लाख रुपये आम्ही भरु असे सांगून शहीदांचा जो सन्मान केला त्याबद्दल सभागृहाच्या वतीने धन्यवाद देतो. महाराष्ट्राची जनता व त्या जनतेचे रक्षण, त्या जनतेच्या पाठीशी राहणे, हीच सरकारची भूमिका असली पाहिजे आणि यालाच राजकीय इच्छाशक्ती म्हणतात. अशी कणखर व स्पष्ट भूमिका सरकारने घेतली तर लोक सामर्थ्याने लढण्यासाठी तयार होतील, बलिदान करायला व मरायला तयार होतील. तसेच नक्षलवाद्यांच्या बाबतीत निर्णय घेऊन आपण जनतेच्या मनात जी भावना निर्माण केली त्याबद्दल आपले मनापासून अभिनंदन करतो आणि आपल्याला शतश: धन्यवाद देतो. त्यामुळे आपण उद्या पासून गडचिरोलीतील नक्षलवाद निपटून काढण्यासाठी जे जे निर्णय घ्याल, जी कोणती सुरुवात कराल, त्यात आम्ही तुमच्या बरोबर आहोत, एवढेच निक्षून सांगतो आणि येथेच थांबतो.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री. अशोक उर्फ भाई जगताप (नामनियुक्त) : महोदय, गडचिरोली जिल्ह्यात नक्षलवाद्यांनी केलेल्या हल्ल्याच्या संदर्भात सभागृहात नियम 97 अन्वये चर्चा उपस्थिती केली, त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, बऱ्याच वेळा महत्वाच्या चर्चेच्या माध्यमातून शासनाने अनेक महत्वाचे निर्णय घेतले आहेत. हा प्रश्न केवळ राज्याच्याच नव्हे तर सात राज्यांशी निगडीत असून संपूर्ण देशाच्या दृष्टीने महत्वाचा आहे. अशा प्रश्नावर सभागृहात अनेक वेळा चर्चा झाल्या. खालच्या सभागृहाचा सदस्य असताना सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस आणि मी याच विषयावर अनेक वेळा चर्चा केल्या आहेत. त्यातून न्याय सुध्दा मिळाला आहे म्हणून हा विषय अतिशय महत्वाचा आहे. हा विषय केवळ सुरक्षेशी संबंधित नाही तर संपूर्ण समाजव्यवस्थेसमोर एक आव्हान उभे केले आहे. या विषयावर बोलत असताना मागील वेळेस मी सभागृहात एक स्टेटमेंट केले होते व त्याला काही सन्माननीय सदस्यांनी हरकत सुध्दा घेतली होती. अलिकडच्या काळात नक्षलवाद हा खरा नक्षलवाद राहिला आहे काय हा खरा प्रश्न आहे. नक्षलवादाचा जन्म ज्या भूमिकेतून झाला त्या भूमिकेपासून हे नक्षलाईट प्रचंड दूर गेले आहेत, असे विधान मी केले असता त्याला ऑब्जेक्शन घेण्यात आले होते. मी म्हणालो होतो की, किसनजी हा माओ संघटनेचा ॲक्टिव्हीस्ट होता आणि त्याच्याकडे पाकिस्तानी आतंकवादी संघटनेचा सदस्य असल्याचे पुरावे शासनाला सापडले होते. असे असताना आम्ही असेच मानत राहिलो की नक्षलवाद हा खरा आहे पण त्याचे बदललेले रुप जाणून घेण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप.....

नक्षलवादी हयूमन राईटचा वापर आपल्या राज्याच्या, देशाच्याच नव्हेतर जगाचा नाश करण्यासाठी करीत आहेत. नक्षलवाद्यांचा बिमोड करण्यासाठी निमलष्करी दलाची स्थापना करण्यात आलेली आहे. त्या निमलष्करी दलाला आपण सर्वांनी सपोर्ट केला पाहिजे. धानोरा तालुक्यातील पुस्टोला गावाजवळ ही घटना घडलेली आहे. निमलष्करी दलाने जर आपल्या पोलिसांची मदत घेतली असती तर कदाचित ही दुर्दैवी घटना घडलीही नसती. नक्षलवाद्यांची केवळ दहशतवाद पसरवण्याचीच मानसिकता झालेली आहे. नक्षलवादाचा बिमोड करण्यासाठी शासनाने पाऊलेच उचलली नाही तर माननीय गृहमंत्र्यांनी नक्षलवाद्यांचा नायनाट करण्यासाठी जो विडा उचलला आहे त्याला संपूर्ण महाराष्ट्राने सलाम केलेला आहे. नक्षलवादाच्या विरोधात आपला जो लढा आहे तो केवळ आपलाच लढा आहे असे नाही तर संपूर्ण महराष्ट्रातील जनतेचा तो लढा आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्पावर चर्चा सुरु होती त्यावेळेस व आजच्या प्रस्तावाच्या संदर्भात सुध्दा मी माझे विचार मांडले होते त्यावर आपण सांगितले होते की, मुंबईवर जो दहशतवादी हल्ला झाला होता व त्यामध्ये जे जवान शहीद झाले होते त्यांना ज्या प्रमाणे न्याय दिला गेला होता तोच न्याय या घटनेतील जवानांना दिला जाईल. नक्षवादाच्या संदर्भात आपण जे विचार व्यक्त केले आहेत त्याबद्दल मी आपले आभार मानतो. या घटनेत सीआरपीएफचे जवान शहीद झालेले असतांना ते आपल्यासाठी शहीद झाले आहे यासंदर्भात आपण जी भूमिका घेतली आहे त्याबद्दल मी मनापासून आपले आभार व्यक्त करतो.

सभापती महोदय, नक्षलवाद्यांचा बिमोड करण्यासाठी 2-3 राज्यांचे पथक निर्माण केले होते असे माझ्या वाचनात आले होते. यासाठी एक कृतीदल तयार झाले होते परंतु नंतर त्या कृती दलाचे काय झाले याची मला माहिती नाही. कृतीदल जर ॲक्टीव्हेट करता आले तर आज ज्या घटना घडतात त्या घडणार नाहीत. नक्षलवादी आपल्या राज्यात कारवाया करुन जवळच्या राज्यात आश्रयासाठी जात असतात त्यामुळे कृती दल ॲक्टीव्हेट झाले तर याला आळा बसू शकेल.

सभापती महोदय, नक्षलग्रस्त भागातील ग्रामपचांयतीचे सदस्य,पोलीस पाटील किंवा तत्सम नागरिकांचे आपण वेगळया प्रकारचे दल तयार केले व त्याला जनतेचा सहभाग मिळाला तर नक्षलाईट चळवळीला आळा बसू शकेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप.....

सभापती महोदय, नक्षलवाद का झाला, कसा फोफावला यावर आपण गेल्या 30 वर्षापासून चर्चा करीत आहोत. परंतु नक्षलवादाला काबूत आणण्यासाठी आपण जे काही प्रयत्न करीत आहोत त्यातून नवीन नवीन प्रश्न निर्माण होत आहेत. नक्षलवादी आता तर निष्पाप माणसांनाही मारावयास लागले आहे. नक्षलवादी जेवढया निर्दयपणे वागत आहेत तेवढयाच निर्दयपणे आपल्याला नक्षलवाद्यांशी लढा द्यावा लागणार आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

त्यामध्ये ह्यूमन राईटचा प्रश्न निर्माण झाला तर सरकारने पोलीस दलाच्या पाठीमागे उभे राहिले पाहिजे हे मला मुद्दाम येथे सांगावेसे वाटते. या विषयीच्या आपल्या वेदना आणि संवेदना दोन्ही आम्ही ऐकलेल्या आहेत, पाहिलेल्या आहेत. आज नक्षलवाद अतिरेकी कारवायांकडे वळलेला आहे. माझे हे वाक्य काही लोकांना आवडणार नाही. पण ही वस्तुस्थिती तुम्हा आम्हाला नाकारता येणार नाही. नक्षलवाद्यांची पावले आतंकवादाकडे चालली आहेत. काही ठिकाणी त्यांची अतिरेक्यांशी हातमिळवणी आहे. ह्या गोष्टी लक्षात ठेवून त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. अगदी निर्दयपणे त्यांना चिरडण्याची संधी मिळाली तर त्यांना चिरडले पाहिजे, अशा प्रकारची भूमिका मला येथे मांडावयाची आहे.

माननीय गृह मंत्र्यांनी अनेक पावले उचलली आहेत हे आम्हाला माहीत आहे. तेवढी पावले उचलून देखील अशा घटना घडत आहेत. ही गोष्ट सर्वात जास्त चिंतेची आहे. अशा घटना घडू नये म्हणून आपले खबऱ्यांचे जाळे असायला हवे.. मी काल आपले केंद्राने इनपूट दिले नाही हे वक्तव्य ऐकले. केंद्राच्या इनपूट संबंधी ज्याने त्याने आपला अर्थ लावावा. परंतु, आपल्याला आपली यंत्रणा उभी करावी लागेल. आपल्या राज्यामध्ये काय चालले आहे हे पहावे लागेल. दुर्दैवाने आज नक्षलवादी पुणे, औरंगाबाद, ठाणे येथे पकडला जात आहे. आता मुंबईचा पण नंबर येईल. कारण मुंबई फारशी लांब नाही. त्यामुळे आपल्याला आपली यंत्रणा उभी करणे आवश्यक आहे. पोलिसांना बळ देणे आवश्यक आहे. खबऱ्यांचे जाळे आपण उभे केले नाही तर आपल्याला अनेक गोष्टीला सामोर जावे लागेल. यापूर्वी देखील आपल्या डोळ्या समोर अनेक घटना घडल्या आहेत. घटना घडल्यानंतर आपण त्यांचे सांत्वन करतो. त्यापेक्षा त्या टाळण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला पाहिजे. यासाठी विशेष निधी उभा केला पाहिजे.

आज नक्षलवादाचा चेहरामोहरा आपल्या समोर येत आहे. तो केव्हा नव्हता ? एक चळवळ म्हणून आम्ही सर्वजण त्याकडे पहात होतो. सरकारच्या विरोधातील असंतोष दाखविणारी चळवळ म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. पण आज ती परिस्थिती नाही. आज निष्पाप लोकांना चौकात आणून मारले जात आहे. टोळीचा म्होरक्या जसा स्वत:ची दहशत निर्माण करतो तशा प्रकारची दहशत नक्षलवादी निर्माण करीत आहेत. ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

असा जर नक्षलवाद असेल तर तुम्हा-आम्हाला तो अजिबात मान्य नाही. त्याचा बिमोड केलाच पाहिजे. यासाठी कठोर पावले उचलली पाहिजेत. यासाठी आपल्याला राज्यातील महत्वाची शहरे, राज्यातील नक्षल प्रभावी क्षेत्र येथे खबऱ्याचे चांगले नेटवर्क उभारण्याच्या दृष्टीने पावले टाकली पाहिजेत. त्यासाठी जास्त पैसा खर्च व्हायला पाहिजे.

मी खालच्या सभागृहातून आलो आहे. तेथे विभागवार चर्चा होते. येथे विभागवार चर्चा होत नाही. त्यामुळे फार अडचण होते. पायाभूत सुविधा पुरविणे आणि त्या वाढविणे हे देखील अत्यावश्यक आहे. आपल्या खात्याला 156 कोटी रूपये दिले आहेत. या निधीमधून आपण काय काय करणार आहात याचे आम्हाला देखील आश्चर्य वाटते म्हणून मी माननीय वित्त मंत्री श्री.अजित पवार यांना विनंती केली होती की, एक विशेष बाब म्हणून 100 कोटी रूपयांची विशेष तरतूद करावी. त्यामुळे आपल्याला देखील विनंती आहे की, विशेष कृती दलाची, विशेष नेटवर्कची उभारणी या महाराष्ट्रासाठी, पर्यायाने या राज्यासाठी आतंकवाद्यांचा धोका टाळण्यासाठी करावी.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप . . ..

आणि आपल्याला आतंकवादापासून, नक्षलवाद्यांपासून जो धोका आहे हे टाळण्यासाठी आपण प्रयत्न करावेत.त्या भागातील इन्फ्रास्ट्रक्चर वाढले पाहिजे, त्यांचा विकास झाला पाहिजे. आज तेथे चांगले रस्ते नाहीत आणि जे रस्ते आहेत त्यावरुन व्यवस्थितपणे गाड्या जातील अशी परिस्थिती नाही. परंतु अलिकडच्या काळामध्ये रस्त्यांची स्थिती बऱ्यापैकी आहे. मात्र ती अधिक चांगली व्हावी अशी आपल्याला विनंती करतो आणि सभापती महोदय, आपण मला येथे बोलण्यासाठी संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

. . . .3 टी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील (गृह मंत्री) : सभापती महोदय, सदनाचे ज्येष्ठ सदस्य आणि माजी विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकरसाहेब, सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे, माजी विरोधी पक्षनेते श्री.रामदासभाई कदम, सन्माननीय सदस्य सर्वश्री. हेमंत टकले, शोभाताई फडणवीस, सय्यद जमा, दिवाकर रावतेसाहेब,भाई जगताप इ.अनेक सन्माननीय सदस्यांनी परवा 27 तारखेला पोस्टोला ता.धानोरा, जि.गडचिरोली येथे नक्षलवाद्यांनी भू-सुरुंग स्फोटाव्दारे सीआरपीएफचे वाहन उडवून ज्या 12 जवानांना शहीद केले आणि 29 जवानांना जखमी केले, त्या घटनेच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी सविस्तरपणे आपली मते आणि भूमिका आपापल्या भाषणामध्ये मांडली आहे. मी या सर्व सन्माननीय सदस्यांना मनापासून धन्यवाद देतो. कारण कोणीही केवळ टीकेसाठी टीका किंवा राजकीय अभिनिवेषातून टीका न करता, अशा पध्दतीची कोती भूमिका न घेता, या प्रश्नाची व्याप्ती आणि खोली गांभीर्याने बघत सरकारला काही चांगल्या सूचना करण्याबरोबरच काही अपेक्षाही व्यक्त केलेल्या आहेत. तसेच याठिकाणी अतिशय चांगल्या प्रकारची चर्चा घडवून आणल्याबद्दल मी सगळयाच सन्माननीय सदस्यांना मनापासून धन्यवाद देऊन त्यांनी जे प्रश्न उपस्थित केलेले आहेत, ज्या भावना व्यक्त केलेल्या आहेत त्याबाबतीत शासनाची भूमिका स्पष्ट करणार आहे.

सभापती महोदय, 27 तारखेला गट्टा नावाच्या गावामध्ये सीआरपीएफ ने लोकांशी अधिक संपर्क यावा, त्यांच्याबद्दल लोकांच्या मनामध्ये जवळीक निर्माण व्हावी म्हणून तेथे औषधांचे वाटप, लहान मुलांना खाऊचे वाटप, कपड्यांचे वाटप तसेच शिलाई मशीन, सायकल या जीवनावश्यक वस्तूंचे आदिवासींना सीआरपीएफ मार्फत वाटप करण्याबरोबरच आणखी जवळीक निर्माण व्हावी म्हणून काही खेळांचे सामने सुध्दा तेथील तरुणांच्या बरोबर आयोजित करण्यात आले होते. या महत्वपूर्ण कार्यक्रमासाठी सीआरपीएफ चे डी.जी.पी. श्री.विजयकुमार हे सुध्दा गट्टयाला जाण्यासाठी गडचिरोली मध्ये येऊन थांबले होते. मला आवर्जून त्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत उल्लेख केला पाहिजे. दक्षिण भारतामध्ये विशेषत: विशेषत: तामिळनाडूच्या जंगलात विरप्पन अनेक वर्षे तस्करी करीत होता, त्याने अनेकांचे अपहरणही केले होते.त्याला प्रतिकार करण्याचे काम,त्याला पकडण्याचे काम आणि खरेतर त्याला ठार करण्याचे काम सीआरपीएफ चे डी.जी. श्री.विजयकुमार या बहाद्दर अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली झाले होते, त्यांचीच सीआरपीएफ च्या डी.जी.पदावर केंद्र सरकारने नियुक्ती केलेली आहे. याच अधिकाऱ्यांनी काश्मिरमध्ये अनेक अतिरेक्यांना, आतंकवाद्यांना जिवंत पकडले आहे तर काही जणांना ठार करुन सीआरपीएफचा एक वेगळा असा दबदबा त्या ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील . . . .

परिसरामध्ये निर्माण केला होता त्यांच्यावर सीआरपीएफ ची महत्वपूर्ण जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. ज्या कार्यक्रमासाठी ते जाणार होते, त्यासाठी आवश्यक असलेला फौजफाटा गडचिरोली येथून टोला या गावामध्ये जाण्यासाठी निघाला होता. पण गडचिरोली पासून 32 कि.मी.अंतरावर भू-सुरुंगाचा स्फोट झाला आणि 12 जवानांना शहीद व्हावे लागले. त्यांची नावे रेकॉर्डवर येणे आवश्यक आहे असे मी मानतो. त्यामध्ये विशेषत: पोलीस उपनिरीक्षक हेत्राम कत्रे, पोलीस उप निरीक्षक श्री.ए.के.हजरा, पोलीस उप निरीक्षक श्री.कन्हैयासिंग.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

पोलीस शिपाई अनिल उपाध्याय, पोलीस हवालदार शिवानंद यादव, पोलीस हवालदार बाबूराव मिनार, पोलीस शिपाई शिबू पिके, पोलीस शिपाई बसनाक दिग्विजय, पोलीस शिपाई जितेंद्र कुमार, पोलीस शिपाई विष्णू पांडे, पोलीस शिपाई विश्वजीत पारीख, पोलीस शिपाई राकेश कुमार पोलीस अधिकाऱ्यांसह कर्मचारी असे बाराजण शहीद झाले. 29 पोलीस कर्मचारी साईटवर जखमी झाले. शासनाने अलीकडच्या काळात तेथे हेलिकॉप्टर पुरविले आहे त्याद्वारे त्यांना गडचिरोलीला व ज्या आठ जणांची प्रकृती चिंताजनक होती त्यांना नागपूर रुग्णालयात हलविण्यात आले आहे. गडचिरोली जिल्ह्यातील रुग्णालयात जे 20 जण होते त्यांची प्रकृती चांगली आहे. त्यांच्या जीविताचा धोका पूर्णपणे टळला आहे. जे आठ जण गंभीररित्या जखमी झाले होते त्यातील एकाची परिस्थिती क्रिटीकल आहे. एकाचा रुग्णालयात नेताना मृत्यू झाला. उर्वरित जखमींची प्रकृती आता चांगली आहे. जीविताचा धोका टळला आहे. यामध्ये एकूण 12 जवान शहीद झाले.

सभापती महोदय, या सदनामध्ये अतिशय गांभीर्याने या महत्वपूर्ण विषयावर चर्चा झाली. हे संकट फक्त महाराष्ट्र राज्यावर आहे असे समजण्याचे काही कारण नाही. अनेक राज्यांमध्ये हे संकट दिवसेंदिवस अधिक उग्र रुप धारण करीत आहेत. मागील पाच वर्षात अन्य राज्यांत घडलेल्या विविध घटनांमध्ये पोलीस आणि नागरिकांचे झालेले मृत्यू पाहिल्यास त्याकडे एक भयानक संकट म्हणून आपल्याला पहावे लागेल. देश स्वतंत्र झाल्यानंतर वेगवेगळ्या युध्दामध्ये देशाची जेवढी मनुष्यहानी झाली नाही, देश स्वतंत्र झाल्यानंतर जे आतंकवादी हल्ले झाले त्यामध्ये मनुष्यहानी झाली त्याच्याही पेक्षा अधिकची मनुष्यहानी नक्षलवाद्यांनी देशामध्ये केलेली आहे. अनेक निरपराध माणसे मारलेली आहेत. अनेक पोलिसांना शहीद व्हावे लागले. सन 2007 पासून 2011 पर्यंत आंध्र प्रदेशमध्ये एकूण 450 चकमकी झडल्या त्यामध्ये 142 जणांचा मृत्यू झाला. बिहारमध्ये 1152 घटना घडल्या त्यामध्ये 371 जणांचा मृत्यू झाला. छत्तीसगडमध्ये 2821 घटना घडल्या त्यामध्ये 1428 जणांचा मृत्यू झाला. झारखंडमध्ये 2726 घडना घडल्या त्यामध्ये 911 जणांचा मृत्यू झाला. महाराष्ट्रामध्ये विशेषत: गडचिरोली जिल्ह्यात आणि अन्य काही जिल्ह्यांत सुध्दा 519 घटना घडल्या त्यामध्ये 239 जणांचा मृत्यू झाला. ओरिसामध्ये 846 घटना घडल्या त्यामध्ये 317 जणांचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

मृत्यू झाला. पश्चिम बंगालमध्ये 762 घटना घडल्या त्यामध्ये 489 जणांचा मृत्यू झाला. ही सर्व आकडेवारी पाहता एकूण 9382 घटना घडल्या त्यामध्ये 3936 जणांचा मागील पाच वर्षामध्ये मृत्यू झालेला आहे. एवढी मोठी मनुष्यहानी झाल्यानंतर हे संकट दिवसेंदिवस कसे उग्र बनत चालले आहे याची प्रचिती सदनाला येईल आणि आपल्याला सुध्दा येईल.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील पोलीस दलाने सातत्याने प्रयत्न केल्यामुळे अन्य राज्यांच्या तुलनेत आपल्याला काही जिल्ह्यांमध्ये यश देखील आलेले आहे. काही वर्षापूर्वी नांदेड, यवतमाळ, भंडारा, चंद्रपूर, गोंदिया या जिल्ह्यांमध्ये देखील काही नक्षलवादी ॲक्टीव्हीटीज झाल्या होत्या, चकमकी झाल्या होत्या. काही निरपराध लोकांचे बळी देखील गेले होते. परंतु सातत्याने केलेल्या प्रयत्नामुळे तसेच स्थानिकांनी नक्षलवाद्यांना कोणत्याही प्रकारचे सहकार्य न करण्याच्या घेतलेल्या भूमिकेमुळे नक्षलवाद्यांना त्या भागातील बस्तान उठवावे लागले आणि केवळ गडचिरोली जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये हे संकट मर्यादित ठेवण्यात राज्यातील पोलीस दलाला पूर्णपणे यश आलेले आहे.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

सभापती महोदय, मागील अनेक वर्षामध्ये नांदेड, यवतमाळ, चंद्रपूर, भंडारा आणि परवाची एक घटना सोडली तर गोंदिया जिल्हयामध्ये सुध्दा नक्षलवादी कोठेही आपले कृत्य करु शकले नाहीत, नुकसान करु शकले नाहीत. गडचिरोलीमध्ये सुध्दा शासनाने तेवढयाच ताकतीने लढण्याचा प्रयत्न केल्यानंतर सुध्दा अपेक्षित यश आले नाही, ही वस्तुस्थिती शासनाला सुध्दा मान्य करावी लागेल. काही लोकांचा असा समज आहे की, तेथे पोलिसांची संख्या का वाढविण्यात येत नाही, काही लोक वेगवेगळया दृष्टिकोनातून या प्रश्नाकडे पहात आहेत. एखादी घटना घटल्यानंतर कधी पोलिसांवर तर कधी शासनावर टिकेची झोड उठवित आहेत. गडचिरोली येथे घडणाऱ्या घटनेच्या संदर्भात जे लोक अशी वरपांगी, वरवर टिका करीत आहेत त्यांना एक तर हे नक्षलवाद्यांचे जे मोठे संकट आलेले आहे, याची व्याप्ती आणि डेप्थ माहीत नाही. गडचिरोलीची भौगोलिक स्थिती या लोकांना माहीत नाही. अशा प्रकारे वरवर टिका करणारे अनेकजण आहेत. त्यांना ज्यावेळी या प्रश्नाची सर्व व्याप्ती समजेल, गडचिरोलीची भौगोलिक स्थिती समजले त्यावेळी त्यांची टिका थोडीशी कमी होऊ शकेल.

सभापती महोदय, गडचिरोली जिल्हा आणि त्याची बॉर्डर महाराष्ट्र राज्याने ठरविलेली आहे. महाराष्ट्राची बॉर्डर आपल्या देशाने ठरविलेली आहे. पण नक्षलवाद्यांनी त्यांचे जे झोन पाडलेले आहेत त्यामध्ये आपल्या परिसराला लागून बालाघाट झोन आणि स्पेशल झोनल कमिटी दंडकारण्य अशा दोन पध्दतीचे झोन आपल्या सीमेलगत आहेत. गडचिरोलीचा जास्तीत जास्त भाग हा दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटीच्या अंतर्गत आहे. या दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटीमध्ये गडचिरोली, दंत्यवाडा, बस्तर, राजनंदगाव नारायणपूर, काकेत, बिजापूर, सुकमा आणि महासमून हे छत्तीसगडमधील जिल्हे दंडकारण्य स्पेशल झोनल कमिटीमध्ये आहेत. गडचिरोली जिल्हा नक्षवाद्यांच्या दृष्टीने या कमिटीचा पार्ट आहे. या सगळया विभागासाठी त्यांनी कंपन्यांची निर्मिती केलेली आहे. टापूंची निर्मिती केलेली आहे. दलमची निर्मिती केलेली आहे.अधून-मधून जसे आपण एखाद्या जिल्हयामध्ये काही कमी-जास्त घडले तर दुसऱ्या जिल्हयातून पोलीस फोर्स आणतो तसे त्यांनी सुध्दा जेथे आवश्यक असेल तेथे एका ठिकाणावरुन दुसऱ्या ठिकाणी आपले नक्षल आणून एक मोठे आव्हान कधी छत्तीसगडच्या पोलिसांसमोर तर कधी या राज्यातील पोलिसांसमोर उभे केलेले आहे.त्यांची दंडकारण्यामधील एकूण संख्या लक्षात घेऊन आपल्यालाही आपल्या पोलीस

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

दलाची रचना करणे ही आवश्यक बाब मानता येईल्. पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यांना लढताना पोलीस स्टेशनच्या मर्यादा आहेत. महाराष्ट्राच्या पोलिसांना लढताना राज्याच्या सीमेच्या मर्यादा आहेत पण नक्षलसाठी अशा कुठल्याही मर्यादा नसल्यामुळे तिकडे राहणारे लोक कधी कधी कॅम्प म्हणून दुसऱ्या राज्यात जाताना आपल्या गडचिरोली आणि गोंदियाच्या बॉर्डरचा उपयोग करतात. त्यामुळे अधुम-मधून आपले अस्तित्व दाखविण्यासाठी त्यांना काही कृती आणि कृत्ये करावी लागतात. पूर्ण खात्रीने एक गोष्ट सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. अलीकडच्या काळात त्या परिसरातील जे तरुण नक्षलमध्ये सहभागी होत आहेत त्यात कोणत्या राज्याचे सर्वात कमी तरुण जात असतील तर महाराष्ट्राचे तरुण आता नक्षल होणे पसंत करत नाहीत, त्यामध्ये जाणे योग्य मानत नाहीत आणि नक्षल ॲक्टिव्हिटिंना पाठिंबासुध्दा देत नाहीत. आपल्या राज्यामध्ये ही प्रक्रिया सुरु झाली असली तरी अन्य राज्यातील नक्षल महाराष्ट्रामध्ये येणार नाहीत अशी स्थिती असू शकत नाही. कारण त्यांच्या दंडकारण्य झोनल कमिटीमध्ये कुठले लोक कुठेही येऊ शकातात. त्यामुळे जोपर्यंत छत्तीसगडचे संकट संपत नाही, आंध्रप्रदशचे संकट संपत नाही, अन्य राज्यातील नक्षल ॲक्टिव्हिटी कमी होत नाही तोपर्यंत आपल्याला सुध्दा दोन आघाडयांवर प्रयत्न करवे लागणार आहेत. एक तर गडचिरोलीमध्ये दक्ष राहणे, गडचिरोलीच्या बाहेर कुठल्याही नक्षवाद्याला येऊ न देणे आणि कोणत्याही राज्यातील हे संकट जोपर्यंत पूर्णपणे संपुष्टात येत नाही तोपर्यंत आपल्याला आज आहोत त्यापेक्षा अधिक कार्यक्षम बनून राहणे हे दोनच पर्याय आपल्यासमोर राहतात.

यानंतर श्री. बरवड....

अप्रधारित प्रश्न / प्रश्नोत्तरासाठी नाही

श्री. आर. आर. पाटील .....

त्या दृष्टीने सुध्दा अलीकडच्या काळात महाराष्ट्राने अन्य राज्यांबरोबर अतिशय चांगल्या पध्दतीचे कोऑर्डिनेशन ठेऊन अतिशय चांगल्या संयुक्त मोहिमा आखलेल्या आहेत. फक्त अन्य राज्यातील नक्षलवादी महाराष्ट्रामध्ये येऊ शकतात तसे महाराष्ट्रातील पोलीस सुध्दा अन्य राज्यात कोठपर्यंत जाऊ शकतात अशा पध्दतीच्या संयुक्त मोहिमा केंद्र शासनाच्या मार्गदर्शनाखाली, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या सल्ल्याने, राज्यांतर्गत आणि शेजारच्या राज्यांनी मिळून अशा मोहिमा आपल्या राज्यामध्ये सुध्दा हाती घेतलेल्या आहेत.

सभापती महोदय, आज महाराष्ट्राने चांगल्या पध्दतीचे यश मिळाल्यावर सुध्दा अधूनमधून ज्या घडना घडत आहेत त्या सुध्दा अतिशय गंभीर आहेत. कोठे तरी राज्याला मदत केली पाहिजे म्हणून केंद्र सरकारने सुध्दा 4 बटालियन आणि 1 क्रोबाची बटालियन महाराष्ट्रामध्ये तैनात केलेल्या आहेत. जवळजवळ 4 हजार जवानांचे मनुष्यबळ केंद्र सरकारने महाराष्ट्राला उपलब्ध करुन दिले आहे. सीआरपीएफचे वरिष्ठ अधिकारी आणि महाराष्ट्र पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी यांच्याबरोबर एकत्रितपणे चर्चा झाल्यानंतर मी खात्रीने सांगेन की, सीआरपीएफ आणि महाराष्ट्राचे पोलीस दल यांच्यामध्ये अत्यंत चांगल्या पध्दतीचे कोऑर्डिनेशन आहे. सीआरपीएफच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ही भावना अनेक वेळा बोलून दाखविलेली आहे की, देशामध्ये स्थानिक पोलीस आणि सीआरपीएफमध्ये उत्कृष्ट कोऑर्डिनेशन जर कोठे असेल तर ते महाराष्ट्रामध्ये आहे. अशा पध्दतीच्या भावना सीआरपीएफने व्यक्त केलेल्या आहेत. महाराष्ट्रातील पोलीस दलाच्या समन्वयाने त्या भागात मोहिमा झाल्या पाहिजेत, एकमेकांचे संरक्षण करत नक्षलवाद्यांचा बिमोड केला पाहिजे अशा पध्दतीच्या सक्त सूचना आहेत.

सभापती महोदय, हे सगळे प्रयत्न करणे, सैन्यदल वाढविणे, त्यांना अत्याधुनिक शस्त्रे देणे, चांगली इक्विपमेंट्स देणे, हेलिकॉप्टर देणे, चांगली वाहने देणे यामध्ये राज्य सरकारने आणि सीआरपीएफने सुध्दा कोठेही कमतरता ठेवलेली नाही. नक्षलवाद्यांच्या तुलनेत संख्येने कित्येक पटीने आपण जास्त आहोत पण नक्षलवादी आणि पोलीस एकमेकांच्या विरोधामध्ये लढत असताना दोघांनाही विसंगत परिस्थितीमध्ये लढावे लागते. नक्षलवाद्यांना सीमेचे बंधन नाही. त्यांच्यासाठी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB

श्री. आर.आर.पाटील .....

कोणताही कायदा नाही. कोणालाही तेच न्याय देऊ शकतात, तेच गोळ्या घालू शकतात. पोलिसांना मात्र कायद्याच्या चौकटीमध्ये राहून लढावे लागते. एखाद्या गावामध्ये पोलिसांचा खबऱ्या आहे असे नक्षलवाद्यांना कळले तर त्याला थेट गोळ्या घातल्या जातात, प्रेते विद्रूप केली जातात आणि त्या परिसरावर जरब बसविली जाते. पण एखादा नक्षलवाद्यांचा खबऱ्या आहे असे पोलिसांना कळले तर आपण त्याला अटक करतो. दोघाचेही वकील समोरासमोर उभे राहतात. खटले चालतात. प्रदीर्घ काळ प्रक्रिया सुरु होते. कितीही ताकदीने लढले तरी आपल्या व्यवस्थेमध्ये मानवी हक्कांचा विचार करत, व्यक्तिस्वातंत्र्यांचा विचार करत जामीन मंजूर होतो. म्हणजे पोलीस फार झाले तर काही दिवसांसाठी अटक करु शकतील परंतु नक्षलवादी मात्र गोळ्या घालणार या भीतीने स्थानिक जनतेला मनापासून नसले तरी बळजबरीने त्यांच्यापुढे दबून वागावे लागते आणि त्यांना सहकार्य करावे लागते.

हे सगळे करीत असताना लोककल्याणकारी राज्यामध्ये नाईलाजास्तव गरीब आदिवासींना त्यांना करावी लागणारी मदत लक्षात घेऊन पोलिसांना आततायीपणाची भूमिका घेऊन चालणार नाही. त्यांच्यासाठी कोठेलेच कायदे नाहीत. आपल्याला मात्र प्रत्येक गोष्ट कायद्याच्या चौकटीमध्ये राहूनच लढावी लागते. पोलिसांना अनेक गोष्टींचा विचार करावा लागतो. ते चुकले तर त्यांना जाब विचारणारे कोणीच नाहीत. पण पोलीस कोठे चुकले तर मानवी हक्क आयोग असेल, माध्यमे असतील, एनजीओ असतील, सभागृहातील चर्चा असतील यामुळे पोलिसांना चूक करण्याचे कोणतेही स्वातंत्र्य राहात नाही. पोलिसांनी चुका कराव्यात अशाही मताचा मी नाही. परंतु आज त्या परिसरामध्ये जी लढाई आहे ती अतिशय विसंगत पार्श्वभूमीवर आहे. नक्षलवाद्यांना कोणतीही बंधने नाही, कोणत्याही मर्यादा नाहीत आणि पोलिसांना मात्र चोहोबाजूंनी निर्बंध घालून लढाई लढण्यास सांगतो. पोलिसांची ही परिस्थिती सुध्दा आपण लक्षात घेतली पाहिजे.

सभापती महोदय, आज त्या परिसरामध्ये एकंदरीत पोलीस दल ज्या पध्दतीने काम करीत आहे ते बघितल्यानंतर, केंद्र सरकारने अलीकडच्या काळामध्ये ज्या भूमिका घेतलेल्या आहेत त्या बघितल्यानतर माझी निश्चितपणे खात्री आहे की, या संकटाचा मुकाबला अगदी ताकदीने आपण करु. त्याचबरोबर ही गोष्ट लक्षात घेण्याची आवश्यकता आहे की,

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

केवळ त्यांनी शस्त्र उगारले म्हणून त्यांच्या शस्त्राला शस्त्राने उत्तर देणे हा एकच पर्याय घेऊन लढलो तर पूर्ण लढाई आपल्याला कधीच जिंकता येणार नाही. केवळ महाराष्ट्राने काही गोष्टी करावयाच्या ठरविल्या तर आपण फिल्डवरील नक्षलवादी मारु, परंतु अन्य राज्यातून नक्षलवादी येणार नाहीत याची ग्वाही देऊ शकत नाही. राज्य सरकारचे थोडेसे अधिकार गेले तरी चालतील, परंतु आतंकवाद्यांच्या व नक्षलवाद्यांच्या बाबतीत केंद्र सरकारने अलीकडच्या काळात ज्या भूमिका घेतलेल्या आहेत त्याला समर्थन घेण्याची भूमिका महाराष्ट्र सरकारने खुलेपणाने घेतलेली आहे. मग एनसीटीसी असेल किंवा आणखी काही संस्था केंद्र सरकारला निर्माण करावयाच्या असतील त्यासाठी महाराष्ट्र सरकार केंद्र सरकारला सहकार्य करण्यास तयार आहे. महाराष्ट्राने स्वत:चा विचार कधीच केलेला नाही, महाराष्ट्राने नेहमीच देशाचा विचार केलेला आहे. देशाचा विचार करुन केंद्र सरकारला पाठिंबा देण्याची भूमिका देशामध्ये पहिल्यांदा व खुलेपणाची महाराष्ट्राची राहील अशी मी ग्वाही देतो. देशासाठी ती आवश्यक गोष्ट आहे असे मी समजतो.

सभापती महोदय, आपण अनेकदा असे म्हणतो की, इंटेलिजन्सला मजबूत करावे. परंतु छत्तीसगडमध्ये बसून जर एखादा प्लान ठरला तर तेथे आपला कोणता इंटेलिजन्स असू शकतो ?

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माननीय गृह मंत्र्यांनी आता असे म्हटले आहे की, राज्याचे अधिकार थोडेसे कमी झाले तरी हरकत नाही. त्यासाठी या सभागृहाला विश्वासात घेणे आवश्यक आहे. भारत हे संघ राज्य आहे. आपण हे महत्वाचे विधान केलेले आहे. मी आपला अधिक्षेप करीत नाही. पण त्या संदर्भात विश्वासात घेतल्यानंतरच शासनाची भूमिका मांडली पाहिजे. एवढेच मला त्यांना सांगावयाचे आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, त्या भूमिका या सदनाला घ्यावयाच्या आहेत. या सभागृहाला जरुर विश्वासात घेतले पाहिजे. परंतु नक्षलवाद व आतंकवादाबाबत सभागृहाच्या वेगळया भूमिका असतील असे मला निश्चित वाटत नाही. शासनाकडून सभागृहाला विश्वासात घेतले जाईल. परवा औरंगाबादला आतंकवाद्यांना पकडण्यात आले आहे. त्यांच्या सगळया कृती मध्य प्रदेशमध्ये झालेल्या आहेत, महाराष्ट्रामध्ये त्यांनी कोणताही गुन्हा केलेला नव्हता. पण

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.आर.आर.पाटील.....

ज्यावेळी शासनाला कळले तेव्हा त्यांना पकडले आहे. अन्य राज्यांमध्ये महाराष्ट्राच्या बाबतीत कोणता कट शिजत आहे, देशाच्या सीमेबाहेर कोणता कट शिजत आहे याची कल्पना स्थानिक पोलिसांना येऊ शकत नाही. अशा एजन्सीची देश स्तरावर निश्चितपणे आवश्यकता आहे. कारण आज ही संकटे मोठी झालेली आहेत. ती गोष्ट शासनाने स्वीकारलेली आहे. हे संघ राज्य आहे म्हणून हा राज्याचा प्रश्न आहे, अशा प्रकारची भूमिका जर छत्तीसगडमध्ये घेतली तर छत्तीसगडमध्ये जेवढे पोलीस सेंट्रल गव्हर्नमेण्टने उपलब्ध करुन दिलेले आहेत, जितके सीआरपीएफचे जवान दिलेले आहेत, त्यांचा पगार सुध्दा छत्तीसगडला भागविणे शक्य नाही. या सगळ्या पार्श्वभूमीवर आज राष्ट्रीय स्तरावर काही गोष्टी निश्चित होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, दिवसेंदिवस नक्षल विरोधातील लढा हा आणखी तीव्र बनत चालला आहे. एकेकाळी पोलिसांची संख्या जास्त होती, एकेकाळी पोलिसांजवळ त्यांच्या तलनेमध्ये आधुनिक शस्त्रे असायची आणि त्यांच्याकडे बरमार बंदुका असायच्या, एकेकाळी आपल्याकडे आर्थिक स्त्रोत जास्त होते, त्यांच्याकडे दुबळे होते. आपली लुटून गेलेली शस्त्रे त्यांचे शस्त्रागार होते. अलीकडच्या काळामध्ये खनिजांचे उत्पादन जंगली भागात सुरु झाल्यानंतर खनिजातून त्यांना मिळणारे उत्पन्न, अधनिकृतपणे खनिज मालकांकडून, खाण मालकांकडून त्यांनी गोळा केलेल्या खंडण्या, बांबू, चहा, तेंदू पत्ता व ग्रेनाईट यांच्या उत्पन्नातील काही भाग नक्षलवाद्यांना नाईलाजास्तव दिला जातो त्यामुळे ते आर्थिकदृष्टया मजबूत झालेले आहेत. ही गोष्ट पुराव्यानिशी सिध्द करता आली नसती तर आतंकवादी नक्षलवाद्यांना शस्त्रे पुरवत नाहीत ही गोष्ट अमान्य करण्यासारखी नाही. एका बाजूला निधीची कमतरता नसेल, त्यांच्याकडे अत्याधुनिक शस्त्रे आल्यामुळे व काही तरुण त्यांच्या आयडालॉजीने प्रभावित होऊन बेकारीमुळे नक्षलवाद्यांमध्ये समाविष्ट होत असल्यामुळे आज त्यांचे संख्याबळ वाढलेले आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

छत्तीसगड मधील घटनेवरुन आपल्या लक्षात आलेले आहे की, पोलिसांवर हल्ला करीत असताना त्यांचे संख्याबळ 1200 जणांचे होते. त्यांच्याकडे अत्याधुनिक शस्त्रास्त्रे होती. त्यांना आता निधीची कमतरता भासत नाही. अशा परिस्थितीमध्ये पुढच्या लढाया आणखी कठीण असणार आहेत. आपल्याला त्या निकराने लढाव्या लागणार आहेत. त्यांच्या जवळ शस्त्रे आहेत. त्यांची संख्या वाढली आहे. हे खरे असले तरी जोपर्यन्त स्थानिक लोकांचे त्यांना सहकार्य मिळत आहे तोपर्यन्त ते लढू शकणार आहेत. परंतु काही ठिकाणी स्थानिक लोकांचे त्यांना मिळणारे सहकारी हे प्रेमाने मिळत असले तरी ब-याच ठिकाणी बळजबरीने त्यांचे सहकार्य घेतले जात आहे. स्थानिक लोकांचे त्यांना मिळणारे सहकार्य कमी करण्यासाठी आज गडचिरोली, चंद्रपूर, गोंदिया यासारखे जे जंगलग्रस्त जिल्हे आहेत, जेथे जंगले मोठी आहेत, तेथील विकास कामाला चालना देऊन जनतेच्या मनामध्ये लोकशाही बद्दल, आपल्या व्यवस्थे बद्दल आदराची भावना निर्माण करण्याची आवश्यकता आहे. त्यांचे समर्थन तोडण्याची गरज आहे. मोठ्या उद्योगपतीच्या घरामध्ये नक्षलवादी होत नाही किंवा मोठ्या बागायतदाराच्या कुटुंबामध्ये नक्षलवादी झाल्याचे बघायला मिळत नाही. परंतु दुर्गम भागातील गरीब मुले नक्षलवादी का बनत आहेत याची कारणे काही ठिकाणी बळजबरी असली तरी काही ठिकाणी कमालीचे दारिद्र्य, अविकसितपणा या गोष्टी अनुभवातून आणि माहितीतून पुढे आलेल्या आहेत.

महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्हा हा नैसर्गिकदृष्टया संपन्न जिल्हा आहे, तिथे बारमाही नद्या आहेत, काळीभोर जमीन आहे. आकाशाशी स्पर्धा करु शकतील अशी झाडे आहेत आणि काम करणारी माणसे आहेत, ज्यांना निसर्गाने महाराष्ट्रातील कुठल्याही जिल्ह्यापेक्षा अधिकचे दिले आहे, ज्या जिल्ह्यामध्ये पाऊस अधिक पडतो, ज्या जिल्हयामध्ये सगळया प्रकारची खनिजे आहेत तो जिल्हा आज आपल्या राज्याच्या तुलनेत कुठे आहे हे जर आपण बारकाईने बघितले तर 2010-11चे राज्याचे दरडोई उत्पन्न 87,686 रु. आहे आणि गडचिरोली जिल्ह्याचे दरडोई उत्पन्न फक्त 43 हजार रुपये आहे. म्हणजे दरडोई उत्पन्नात राज्याच्या सरासरी उत्पन्नाच्या बरोबर निम्मे उत्पन्न हे गडचिरोली जिल्ह्याचे आहे. साक्षरतेचे प्रमाण राज्यात सगळयात कमी आहे. मानवी विकास निर्देशांकामध्ये हा जिल्हा सगळयात पाठीमागे राहिला आहे. जर विकास कामामध्ये हा जिल्हा पाठीमागे राहिला असेल तर उद्रेकाने तेथील तरुण नको त्या गोष्टीला बळी पडत असेल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

तर त्याचाही विचार आम्ही राज्यकर्त्यांनी अधिक करण्याची आवश्यकता आहे. केन्द्र आणि राज्य सरकारने या गोष्टींचा विचार करुन अलीकडच्या काळामध्ये तेथे खूप मोठया प्रमाणावर निधी देण्यास सुरुवात केलेली आहे.

मी गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री पद जरुर घेतलेले आहे. आपणा सर्वांना माहीत आहे की, पालकमंत्र्यांच्या जबाबदा-या, त्या जिल्ह्यासाठी दिला जाणारा प्लॅन, जिल्हयात विकास कामाच्या राबविलेल्या योजना, चांगल्या पध्दतीने राबविणे आणि गृहमंत्री म्हणून माझ्याकडे असलेल्या जबाबदा-या याही वेगळया जबाबदा-या आहेत. मला असे वाटत होते की, कुठल्या तरी जिल्ह्यामध्ये पालकमंत्री म्हणून जायचे आहे तर मग जेथे शक्यतो कोणी जायला तयार नाही आणि जेथे जाऊन काही करता येईल आणि केले पाहिजे असा जिल्हा मी स्वत: पुढे येऊन स्वीकारला हे खरे आहे. आज काही जण टीका करतात की हे गृहमंत्री आहेत, पालकमंत्री आहेत. पण 2 वर्षात काहीच फरक दिसत नाही. मागील 3 वर्षामध्ये कालची घटना सोडली तर एकही गंभीर घटना कुठे झाली नाही हे पोलीस दलाचे यश नव्हते का ? एखाद्या दिवशी महाराष्ट्रामध्ये कुठे काही झाले नाही तर ती बातमी कधीच होत नाही, तो चर्चेचा विषय कधीच होत नाही. तीन वर्षात कधीही मोठी घटना होऊ दिली नाही म्हणून ना आम्ही कधी सीआरपीएफचे अभिनंदन केले होते, ना कधी पोलिसांचे कौतुक केले होते, ना कुठे दोन ओळी छापून आल्या. पण एक घटना घडली आणि अग्रलेखच्या अग्रलेख छापून यायला सुरुवात झाली.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

विधानसभेतील आणि विधानपरिषदेतील सगळे विषय मागे पडले आणि या विषयाला प्राधान्य मिळाले. राज्य सरकार, केंद्र सरकार आणि स्थानिक लोकांमुळे महाराष्ट्रामध्ये जरुर काही गोष्टी मागील तीन वर्षात घडलेल्या आहेत.

राज्यात अनेक जिल्हे आहेत. पण मी गडचिरोली जिल्हा प्रशासनाला आवाहन केले होते. काही गोष्टी अशा आहेत की, त्यासाठी लोकवर्गणी भरावी लागते. गरीब आदिवासी लोकांकडे पैसे नाहीत. एक आवाहन केल्याबरोबर सगळे पोलीस दल, सगळे शिक्षक आणि त्या जिल्हयात जेवढे कर्मचारी काम करतात त्यांनी कोणतीही तक्रार न करता आपला एक दिवसाचा पगार जमा केला. त्यांचीच समिती नेमून त्या निधीचा उपयोग गरीब लोकांसाठी कसा करता येईल हे तेथील कर्मचाऱ्यांनी ठरविले. अलीकडच्या काळात जिल्हयातील संपूर्ण कर्मचाऱ्यांनी आपला एक दिवसाचा पगार देणारी घटना फक्त गडचिरोली जिल्हयातच घडली असू शकेल असा माझा विनम्र दावा आहे.

सभापती महोदय, पालकमंत्री म्हणून तेथील जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून सामाजिक सुरक्षा अभियान सुरु केले होते. राज्य सरकारच्या वेगवेगळया 17 प्रकारच्या योजना आहेत. जातीचे दाखले देण्यापासून धान्य कार्ड देण्यापर्यंत, संजय गांधी निराधार योजनेचा लाभ देण्यापर्यंत गेल्या दीड वर्षात 1.88 लाख लाभार्थ्यांना या अभियानांतर्गत प्रत्यक्ष त्यांच्या हातामध्ये लाभ देण्यात आले आहेत.

सभापती महोदय, वन हक्क कायदा केंद्र सरकारने मंजूर केला. आज त्या जिल्हयामध्ये अधिकाऱ्यांची स्थिती थोडीशी कमजोर आहे. एक तर अनेक पदे रिक्त आहेत. माननीय सदस्यांनी उल्लेख केला त्याप्रमाणे अनेक अधिकारी निवृत्तीच्या मार्गावर आहेत. अनेक अधिकाऱ्यांना महाराष्ट्रातील कोणत्याच जिल्हयात चालत नाही म्हणून पुण्याईचे काम करायला तेथे पाठविले आहे. अशी स्थिती असताना केंद्र सरकारने गरीब आदिवासींना वन हक्काचे पट्टे दिले पाहिजेत, त्यांच्या जमिनी त्यांच्या नावावर केल्या पाहिजेत म्हणून एक महत्वाकांक्षी कायदा केला. मला सांगावयास अभिमान वाटतो की, त्या यंत्रणांनी अहोरात्र काम करुन 27810 वैयक्तिक आणि 737 वन हक्क जमिनीचे पट्टे दिल्यामुळे आज वन हक्क जमिनीचे पट्टे देण्याबाबत गडचिरोली जिल्हा महाराष्ट्रामध्ये प्रथम क्रमांकावर आहे हे सांगण्यात मला निश्चितपणे आनंद वाटतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

सभापती महोदय, केंद्रीय मंत्री श्री.जयराम रमेश त्या जिल्हयात येऊन गेले. मेंढालेखा गावाला बांबू वाहतुकीची परवानगी दिली गेली. 1.25 कोटी रुपये आज त्या ग्रामसभेकडे शिल्लक आहेत. याचे अनुकरण करीत आणखी 7 गावांना पट्टे देण्यात आले आहेत. मला खात्री आहे की, गावागावांना असे पट्टे देण्यात आले आणि गडचिरोली गावाला ज्यावेळी बांबू वाहतुकीची परवानगी मिळेल त्यावेळी पश्चिम महाराष्ट्रातील कोणत्याही गावापेक्षा गडचिरोली हे आज छोटे दिसणारे, गरीब असणारे गाव भविष्यात श्रीमंत होईल. निसर्गाने त्यांना भरभरुन दिले आहे. ते त्यांच्या मालकीचे करण्याचे काम आम्ही केले.

सभापती महोदय, गडचिरोलीच्या सीमेवर छत्तीसगड तांड्याच्या सभोवताली 750 कि.मी.लांबीचा गारलँड रस्ता निर्माण करण्याच्या प्रस्तावाला केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. ज्यावेळी हा रस्ता होईल त्यावेळी पोलिसांच्या मूव्हमेंट त्या परिसरात निश्चितपणे वाढू शकतील. केलेली छोटी मोठी कामे मी आणखी सांगण्याची आवश्यकता नाही. पण केंद्र सरकारने त्या भागातील तीन मोठ्या पुलांच्या कामांना मंजुरी दिलेली आहे. ज्यामुळे त्या भागातील विकासाचा चेहरामोहरा भविष्यात बदलू शकणार आहे. गोदावरी नदीवरच्या पुलाला उल्लेख करता येईल. सिरोंचा-काळणेश्वर रस्त्यावर 183 कोटी रुपयांच्या पुलाच्या कामाला मंजुरी दिली असून पुलाचे काम सुरु झाले आहे. भविष्यात हा पूल झाल्यानंतर गडचिरोली जिल्हा हा हैद्राबाद-विजयवाडा व विशाखापट्टणम या महत्वाच्या शहरांना जोडला जाणार आहे. इंद्रावती नदीवर 150 कोटी रुपयांच्या पुलाच्या कामाला सुध्दा मान्यता मिळाली आहे. त्यामुळे छत्तीसगड राज्यातील जगदलपूर, दंतेवाडा आदी भागाशी गडचिरोलीचा संबंध येणार आहे.

नंतर श्री.खर्चे...

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

90 कोटीचे मोठे पूल मंजूर झाले त्यामुळे आंध्र प्रदेशातील निजामाबाद आणि करीमनगर या शहरांशी संपर्क आणि संबंध येणार आहे. ही महत्वपूर्ण विकासाची कामे पूर्ण झाल्यानंतर विकास कामांना निश्चित चालना मिळेल.

आज त्या परिसराच्या विकासाला चालना दिलेली आहे पण त्यचबरोबर त्यांनी शस्त्र उगारली तर मजबूतीने त्यांची शस्त्रे सुध्दा परतवून लावण्याची परिस्थिती सीआरपीएफने निर्माण केली आहे. माझी खात्री आहे की, हे सर्व करीत असताना जसे पोलिसांना एका चौकटीत राहूनच काम करावे लागते तसे पालक मंत्र्याला सुध्दा एका कक्षेत राहून काम करावे लागते. गडचिरोलीतील बेकार तरुण बघितल्यानंतर तसेच या भागातील रिक्त पदे बघितल्यानंतर महाराष्ट्राच्या अन्य भागातून लोक येऊन नोकरी करण्यास तयार नाहीत त्यामुळे या भागातील पदे रिक्त राहतात. पण सुप्रिम कोर्टाच्या कुठल्या तरी निर्णयामुळे या जिल्ह्यातील स्थानिक लोकांना प्राधान्य दिले पाहिजे ही भूमिका सुध्दा इम्प्लीमेंट करता येत नाही. नोकर भरती करताना अन्य जिल्ह्यातून उमेदवार येतात आणि एखादे वर्ष काम केल्यानंतर पुन्हा बदली करुन घेतात अशी या जिल्ह्याची परिस्थिती आहे. त्यामुळे या भागातील आदिवासींची मुले नोकऱ्यांपासून वंचित राहतात. किमान गडचिरोली जिल्ह्यापुरते का होईना या भागातील स्थानिक लोकांना नोकऱ्या मिळू शकतील अशा पध्दतीने काय प्रयत्न करता येतील याचा विचार शासन स्तरावर सुरु आहे. यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाबरोबर चर्चा करुन स्थानिकांना प्राधान्य देण्याच्या बाबतीत कोणते निर्णय घेता येतील याचा जरुर विचार करण्यात येईल. अन्य कामे करताना सुध्दा या भागात अनेक अडचणी येतात. त्यात कधी निधी नाही, निधी असला तर अधिकारी नाही आणि हे दोन्ही असतील तर वन विभागाची परवानगी नाही, त्यामुळे विकास कामे मार्गी लागताना अडचणी येतात.

महोदय, या निमित्ताने मी इतकेच सांगू इच्छितो की, या सर्व प्रश्नांसंबंधी मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये अतिशय गांभीर्याने चर्चा झालेली आहे. त्यातील काही महत्वाचे मुद्दे घेऊन गृह विभाग आणि पालक मंत्री म्हणून मी पुन्हा कॅबिनेटसमोर जाईन आणि यातील काही अडचणी लवकर सोडविण्याच्या दृष्टीने जरुर काही धोरणात्मक निर्णय घेतले जातील. त्यातील काही निर्णय माझ्या स्तरावर सुध्दा होऊ शकतात. आज गडचिरोलीमध्ये पोलीस भरतीत सुध्दा बाहेरुन खूप मोठ्या

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.....

संख्येने भरतीसाठी लोक येतात पण एक वर्ष काम केल्यानंतर पुन्हा बदली करुन घेतात. मी अनेक वेळा म्हटले की, ही लढाई अवघड आहे. तरी देखील आम्ही प्रयत्न केले आणि पीएसआयचे प्रशिक्षण संपल्याबरोबर पहिली पोस्टींग म्हणून गडचिरोलीला द्यायचे. इतके प्रयत्न करुन प्रशिक्षण झाल्यानंतर त्या भागात नेमणुका झाल्याबरोबर चार लोकांनी राजीनामे दिले, बाकीचे हजर झालेले आहेत. नक्षलवाद्यांबरोबर सीआरपीएफ आणि पोलीस हेच खऱ्या अर्थाने लढत आहेत पण ही लढाई आपल्या पध्दतीने अधिक तीव्र करावयाची असेल तर स्थानिक तरुणांना प्राधान्य दिले, ज्यांना जंगलात राहण्याची सवय आहे, फिरण्याची सवय आहे आणि जंगलाची माहिती आहे अशा लोकांच्या मदतीने अधिक चांगल्या प्रकारे लढू शकतो. पोलीस दलातील प्रस्थापित नियमाप्रमाणे जर प्राधान्य देऊ शकत नसाल तर एसआरपीएफची ट्रायबल बटालियन या परिसरात तयार केली जाईल. त्या बटालियनमध्ये या भागातील आदिवासी असतील तेच यामध्ये पुरेसे पडू शकतात किंबहुना वरचढ ठरु शकतील असा विश्वास वाटतो. अशा प्रकारे एसआरपीएफ मधून ट्रायबल बटालियन निर्माण करण्याचा निर्णय लवकरच घेण्यात येईल. हा प्रश्न गंभीर असल्यामुळे अधिक व्यापक स्वरुपाची चर्चा होणे अपेक्षित होते पण तरी सुध्दा अनेक सन्माननीय सदस्यांनी खूप चांगल्या सूचना मांडल्या परंतु त्या सर्व प्रश्नांची उत्तरे देणे इतक्या कमी वेळात शक्य नाही. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, एकूण नक्षलवाद्यांना पैसे पुरविले जातात हे एक सत्य आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील....

नक्षलवाद्यांना कोण पैसे पुरवतो याची आपल्याला माहिती आहे. परंतु आपल्या देशामध्ये वस्तुस्थितीपेक्षा पुरावा महत्वाचा असतो व हे लोक नेमके पुरावे ठेवत नाहीत आणि हीच पोलिसांची मुख्य अडचण आहे. परंतु त्यांनी पुरावे कितीही नष्ट केले असले तरी कधी ना कधी पुरावे आपल्या हाती लागतीलच. नक्षलवाद्यांना जे मदत करतात त्यांच्यावर आमचे फार बारकाईने लक्ष आहे. नक्षलवाद्यांना शस्त्रे पुरवणारे, पैसा पुरवणारे, लॉजिस्टीक सपोर्ट देणारे कोण आहेत ते आम्ही जरुर शोधून काढू.

नक्षलवाद्यांच्या संदर्भात या ठिकाणी खूप गांभीर्याने चर्चा झालेली असून शासनाने हा प्रश्न गांभीर्याने घेतलेला आहे. या घटनेत 12 जवान शहीद झालेले असल्यामुळे या शहिदांना मी श्रध्दांजली अर्पण करतो. पुन्हा असे प्रकार घडणार यासाठी स्टँडर्ड ऑपरेशन प्रोसिजर आहे त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करवी यासंदर्भात पोलीस दलाला सूचना दिल्या जातील. परंतु नेहमीच स्टँडर्ड ऑपरेशन प्रोसिजर इम्प्लीमेंट करण्याचा आग्रह कोणी धरता उपयोगाचा नाही. शेवटी ही लढाई आहे. लढाईमध्ये नेहमीच आपल्याला विजय मिळतो असाही कोणी अर्थ काढता उपयोगाचा नाही. आक्रमक पध्दतीने लढाई करतांना कधी कधी आपल्याला नुकसानही सहन करावे लागत असते, तोटाही सहन करावा लागत असतो. ज्या त्या परिस्थितीमध्ये निर्णय घ्यावे लागत असतात. स्टँडर्ड ऑपरेशन प्रोसिजर इम्प्लीमेंट केली पाहिजे असे म्हणत असतांना स्थानिक पातळीवर निर्णय घेण्याच्या अधिकारामध्ये कोठेही बाधा न येऊ देता सक्षमपणे महाराष्ट्राचे पोलीस दल लढत राहील आणि त्यांना आवश्यक असलेली साधनसामुग्री राज्यसरकारकडून दिली जाईल व त्या भागातील सुरक्षा वाढवली जाईल एवढीच ग्वाही या निमित्ताने मी देतो.

धन्यवाद.

उप सभापती : अल्पकालीन चर्चा संपली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : नियम 260 अन्वयेच्या प्रसतावावरील उर्वरित चर्चेला आता सुरुवात होत असून या चर्चेला मंत्री महोदय सोमवार दिनांक 2 एप्रिल,2012 रोजी उत्तर देतील.

पृ.शी.: विद्यमान शैक्षणिक धोरणासंबंधातील श्वेतपत्रिका सादर करून नवीन शैक्षणिक धोरण सादर करणे

मु.शी.: विद्यमान शैक्षणिक धोरणासंबंधातील श्वेतपत्रिका सादर करून नवीन शैक्षणिक धोरण सादर करणे या विषयावर सर्वश्री विनोद तावडे,दिवाकर रावते पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत,प्रीतमकुमार शेगावकर,चंद्रकांत पाटील, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री रामनाथ मोते,केशवराव मानकर,भगवानराव साळुंखे, पाशा पटेल, नागो पुंडलिक गाणार,यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु....

श्री. विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, सन 260 च्या प्रस्तावावर आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले मन:पूर्वक आभार मानतो.

या चर्चेवर भाषण न करता मी फक्त सूचना करणार आहे. प्रश्न असा आहे की, या प्रस्तावावर काल आणि आज सकाळी चर्चा झालेली आहे. या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, रामनाथ मोते, सन्माननीय सदस्य डॉ. सुधीर तांबे यांनी चांगल्या सूचना केलेल्या आहेत. माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याच्या पुढे एकच प्रश्न पडतो की, शिक्षणाची गुणवत्ता टिकवण्याचे काम हे शिक्षकांचे आहे परंतु मुळातच शिक्षकांची भरती कशी होते हाच खरा प्रश्न आहे. शिक्षकाची भरती कशी होते हा प्रश्न सुटला तर पुढील गोष्टी सोयीस्कर होतील. शिक्षक होण्यासाठी त्याची डी.एड. पदविका अशी अर्हता आवश्यक असते. बारावी पास झाल्यानंतर दोन वर्षे डी.एड. करावे लागते. वयाची 18 वर्षे पूर्ण झाल्याबरोबर माणूस शिक्षक म्हणून कामाला लागू शकतो. 18 वर्षाचा झाल्यानंतर तो विद्यार्थ्यांना कशा प्रकारे शिकवू शकेल यासंदर्भातील शिक्षकांची पात्रता मी काढणार नाही परंतु परिपक्वता किती येऊ शकेल हा मुळात प्रश्न आहे.

सभापती महोदय, माझी माननीय शिक्षण मंत्र्यांना नम्र विनंती आहे की, शिक्षणाच्या संदर्भात ग्रामीण भागात फार तोटे व्हावयास लागले आहेत.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

श्री.विनायक मेटे....

इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतच्या मुलांना शिकविण्यासाठी डी.एड.धारक शिक्षक लागतो, तर सातवी ते दहावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी बी.एड.धारक शिक्षक लागतो. बी.एड.धारकासाठी शिक्षणाची अट पदवी ठेवण्यात आली आहे. त्यामुळे माझी विनंती आहे की,डी.एड.साठी किमान पात्रता पदवी करण्यात यावी. कारण तो पर्यंत मॅच्युरिटी आलेली असते. पर्यायाने मुलांना चांगले शिक्षण मिळून त्यांच्या गुणवत्तेमध्ये थोडा तरी फरक येऊ शकेल, असे माझे स्वत:चे मत आहे. याचा आपण जरूर विचार करावा अशी मी आपणास नम्र विनंती करीत आहे.

आम्ही ग्रामीण भागातील कार्यकर्ते आहोत. आमच्या मराठवाड्यामध्ये जिल्हा परिषदेच्या 365 शाळा आहेत. नगरपालिकेच्या मिळून 500 ते 600 पर्यंत हा आकडा जाईल. माझ्या माहिती प्रमाणे खाजगी शाळा ह्या जवळपास 22 हजार आहेत. कायम स्वरूपी अनुदानित 4 हजार शाळा आहेत. म्हणजे जवळ जवळ 26 हजार शाळा ह्या खाजगी आहेत. खाजगी संस्था चालकांकडूनच या शाळेत भरती करण्यात येते. मग यामध्ये ज्युनिअर कॉलेजचे प्राध्यापक असतील, माध्यमिक शाळेतील शिक्षक असतील. मंत्री महोदय आपण मराठवाड्याचे आहात. आजच्या शिक्षण भरतीतील नोकरीचा रेट पहावा. एका शिक्षकाची नियुक्ती करायची असेल तर कमीत कमी 18 ते 20 लाख रूपये लागतात. प्राचार्य किंवा मुख्याध्यापक करावयाचे म्हटले तर 20 ते 25 लाख घेतल्याशिवाय त्यांना नियुक्ती मिळत नाही. 18 लाख रूपये घेतल्याचे उदाहरण माझ्याकडे आहे. मी माहिती सांगू शकतो. इथे नाव घेणे बरोबर होणार नाही म्हणून मी ते घेत नाही. सर्व शिक्षक हे पैसे देऊन आलेले असतात. प्राचार्य, मुख्याध्यापक, उप मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, वरिष्ठ क्लार्क, क्लार्क, ज्युनिअर क्लार्क, प्रयोगशाळा सहायक, शिपाई, चौकीदार या सगळ्यांना पैसे दिल्याशिवाय नोकरी मिळत नाही. काही अपवादात्मक संस्था देखील आहेत. रयत शिक्षण संस्था, फर्ग्युसन संस्था ह्या चांगल्या आहेत. पण बहुतांशी ठिकाणी पैसे दिल्या शिवाय त्यांना नोकरी मिळत नाही. शासन 25 हजार कोटी शिक्षणावर खर्च करीत आहेत. हा पैसा कोणाच्या खिशात जात आहे ?

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे.....

दोन चार दिवसांपूर्वी सभागृहात प्रश्न आला होता. दहावीच्या मुलांना साधे इंग्रजी देखील वाचता येत नाही. ही कुणाची मेहरबानी आहे. मी येथे जबाबदारीने सांगतो की, 80 ते 90 टक्के शैक्षणिक संस्था राजकीय लोकांच्या आहेत. यात काही अधिकारी देखील शिरले आहेत. अनेक अधिकाऱ्यांनी शिक्षण संस्था काढल्या आहेत. उद्योगपती आहेत तो भाग वेगळा. डी.एड.धारक शिक्षकांना समज थोडी कमी असते. तो पैसे देऊन आलेला असल्यामुळे काय शिकवणार हा मोठा प्रश्न आहे. पैसे घेताना तो कार्यकर्ता कोणाचा आहे हे पाहिले जाते. ज्याला कोणाला शिक्षक नेमायचा आहे त्याने डायरेक्ट पैसे घेऊन आलेले चालत नाही. तो ज्या गावातील असेल त्या गावात त्याच्या पाठीमागे किती मतदान आहे हे पाहिले जाते. गावाचा प्रमुख कोण आहे त्याला घेऊन यावे लागते. त्याला जामीन रहावे लागते. तो वळवळ करणार नाही ना, इकडे तिकडे जाणार नाही ना हे सगळे बघितले जाते. त्यानंतरच त्याला कामावर ठेवले जाते.. शिक्षक म्हणून नेमले जात नाही. कामाला ठेवले जाते आणि त्याला वेठबिगारा सारखी वागणूक सर्व शिक्षण संस्था चालक देतात.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हणून त्याला शिक्षणाचे काम कमी आणि शिक्षण संस्था चालकांचे काम जास्त करावे लागते ही गोष्ट दुर्दैवाने आपल्यासमोर येते. एवढेच नाहीतर जर निवडणुका आल्या तर त्या बिचाऱ्याला निवडणूक एजन्ट म्हणूनच काम करावे लागते ही जर वस्तुस्थिती असेल तर ती सुधारण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहात की नाही हा खरा प्रश्न आहे.

सभापती महोदय, म्हणून मी आपल्याला सांगू इच्छितो की, आज शिक्षण मुळातच महाग झालेले आहे. शहरातील लोक कसेही चार पैसे जास्त देऊन कोणत्याही चांगल्या शिक्षण संस्थेमध्ये मुलांना घालू शकतात. पण ग्रामीण भागातील मुलांनी काय करावयाचे ? ज्याठिकाणी पुरेसे धान्य पिकत नाही आणि पिकले तरी ते विकले जात नाही, पुरेसा पाऊस पडत नाही.अशा वेळी त्यांनी काय करावयाचे ? आपली मुले चांगली व्हावीत, मोठी व्हावीत, पगारदार व्हावीत, त्यांनी चांगल्या प्रकारचे जीवन जगावे अशी कल्पना जर आमच्या शेतकरी बांधवांनी, शेत मजुरांनी केली तर त्याचे काही चूक नाही. पण ते होणार कसे? कारण जर व्हावयाचे असेल तर या सगळ्या अडचणी आपणच निर्माण केलेल्या आहेत आणि त्याला सर्वस्वी जबाबदार हे शासन आहे. मला माहिती आहे की, माननीय शिक्षण मंत्री श्री.राजेंद्र दर्डासाहेब यांच्या फार शिक्षण संस्था नाहीत. परवाच माननीय उप मुख्यमंत्र्यांनी येथे बोलत असताना काही का असेना पण त्यांनी सांगितले की, या सगळयाच संस्था शासकीय करु या का? त्यांचाही निर्धार आहे. मला असे वाटते की, या राज्याचे माननीय मुख्यमंत्री यांची सुध्दा कोणतीही शिक्षण संस्था नाही. त्यामुळे हे दोघेही तुमच्या पाठीशी ठामपणे उभे रहातील. म्हणून तुम्ही याबाबतीत धाडसी निर्णय घ्यावा. तुमचे नाव महाराष्ट्रातील प्रत्येक घराघरामध्ये घेतले जाईल. फक्त एकच काम करा की, सगळया खाजगी शिक्षण संस्था शासनाने ताब्यात घ्याव्यात. सभापती महोदय, असे का करु नये ? कारण आज शिक्षण संस्थांमध्ये जेवढे लोक आहेत, त्यांना तुम्ही वेतन देत आहात तसेच वेतनेतर अनुदान देत आहात, इमारतीचे भाडेही देत आहात. तसेच मागासवर्गीय किंवा इतर मागासवर्गीय असतील तर त्यांना ईबीसी सवलत देत आहात. अनेक शिक्षण संस्था चालक त्या बिचाऱ्यांच्या ईबीसी सवलत देत नाहीत. त्या काढून घेत आहेत. मात्र आपण मोफत पुस्तके देत आहोत.

सन्माननीय सदस्य (खाली बसून) : त्यांना खाजगी काम करावयास सांगत आहेत.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, आपण पोषण आहार देत आहोत, शिष्यवृत्ती देत आहोत. प्रश्न असा आहे की, आपण या सदनामध्ये बसलो आहोत. पण आपण जनाची नाही तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे . . . .

मनाची तरी किमान ठेवली पाहिजे. आपण येथे कशासाठी येत आहोत. ग्रामीण भागातील लोकांची आज काय अवस्था आहे. मी बाकीच्यांच्या बाबतीत बोलत नाही. पण बीड जिल्ह्यातील एक उदाहरण देतो. यावर्षी माननीय शिक्षण मंत्री श्री.राजेंद्र दर्डासाहेबांनी कॉपीच्या बाबतीत कठोर निर्णय घेतला. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना यासंबंधात माहिती आहे, त्यांना अशा शाळा माहिती आहेत, माणसे माहिती आहेत. पण सध्या निवडणूक असल्यामुळे ते बोलणार नाहीत. आज कोल्हापूरच्या विद्यार्थ्यांनी आमच्या बीड मधील शिक्षण संस्थेमध्ये दहावी व बारावीसाठी प्रवेश घेतलेला आहे आणि त्याचे रेट ठरलेले आहेत. मुलांना पास करण्यासाठी किती लाख रुपये ?

अनेक सन्माननीय सदस्य : नावे सांगा.

श्री.विनायक मेटे : कशासाठी नावे सांगावयाची. सगळयांना माहिती आहे. परीक्षेमध्ये मार्क किती पाहिजेत त्यानुसार रेट आहेत. आपण कुठे चाललो आहोत? आपण या मुलांना बेगडी सर्टीफीकेट देणार आहोत की त्यांना खरोखरच ज्ञान देणार आहोत, शिक्षण देणार आहोत. नक्की काय देणार आहोत ? कर्मवीर भाऊराव पाटील किंवा अन्य जे मोठे लोक असतील त्यांना काय वाटत असेल ? आपण हेच स्वप्न पाहिले होते काय ? हीच अपेक्षा केली होती काय ? जर हे बंद करावयाचे असेल तर माननीय शिक्षण मंत्री श्री.राजेंद्र दर्डासाहेब, जिल्हा परिषदेच्या अनेक शिक्षण संस्था सगळया पुढाऱ्यांनी मिळून बंद केल्या. त्या संस्था कुठे-कुठे वर्ग केल्या आहेत याची जरा आपण माहिती घ्यावी. कोणकोणत्या जिल्हा परिषदेच्या शाळा आणि नगरपालिकेच्या शाळा बंद झाल्या आहेत आणि त्या कोणकोणत्या संस्थेला ॲटॅच केल्या आहेत याची जरा माहिती घेतली तर मग आपल्याला कळून येईल. हे कशाचे द्योतक आहे? आपण कोणत्या मार्गाने जात आहोत. आपण अजून किती खालच्या पातळीवर जाणार आहोत याचा आपण विचार करणार आहोत की नाही ?

सभापती महोदय, मी आज याबाबत जास्त बोलत नाही. पण मी एक उदाहरण देतो की जर ॲग्रीकल्चरचे कॉलेज असेल तर तेथील विद्यार्थ्यांची बिचाऱ्यांची फार वाईट अवस्था आहे.मी माननीय शिक्षण मंत्री श्री.राजेंद्र दर्डा साहेबांच्या माहितीसाठी सांगतो की, या ॲग्रीकल्चरच्या विद्यार्थ्यांना प्रॅटीकलच्या नावावर शेतावर नांगरावयास, ठेवतात, कुळपावयास ठेवतात.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आज जर आम्ही शिकवत नसते तर एवढी मोठी-मोठी माणसे महाराष्ट्रामध्ये घडली नसती. आम्ही शिकवितो आणि तुम्ही आम्हाला जरी कंत्राटी वेतन देत असलात तरी याचा अर्थ आम्ही विद्यार्थ्यांना कंत्राटी शिक्षण देतो काय ? तर बिलकूल देत नाही. आमचा एखादा शिक्षण वर्गावर गेला तर तो तेथे तासन्तास शिकवित रहातो. मी सुध्दा शिक्षक म्हणून काम करीत असताना चार-चार तास सलग शिकवले आहे. शेवटी आम्ही ज्या गोष्टीमध्ये लक्ष घातले तर त्याठिकाणी झोकून देऊन, ज्याला डिव्होशन असे म्हणतात त्याप्रमाणे शिक्षण देण्याचे काम आमचे शिक्षक बांधव करीत असतात.

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : आता सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी भाषण सुरु करावे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मी एकाच मिनिटांमध्ये माझा मुद्दा मांडतो. मला असे वाटते की, आमची माननीय मंत्री महोदयांना गुणवत्तेच्या बाबतीत विनंती आहे. जसे कनिष्ठ महाविद्यालयासाठी नॅक आणलेला आहे.तसे तुम्ही शाळांसाठी शॅक आणावा. यापूर्वी आपण शॅक आणू इच्छित होतो, ते आणण्याचे काम सुध्दा आपण करावे. तसेच शाळेचा दर्जा तपासावा. ज्या गुणवत्ताधारक शाळा आहेत, ज्या प्रयत्न करीत आहेत त्या शाळांना आपण विशेष अनुदान देणार आहात काय ? त्यासाठी तुम्ही शॅक आणावा अशी मी या निमित्ताने विनंती करतो आणि मला भाषणासाठी वेळ कमी मिळाल्यामुळे माझे 25 मुद्दे मांडावयाचे राहिले आहेत याचा उल्लेख करुन मी माझे भाषण संपवितो.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी त्यांचे मुद्दे माननीय शिक्षण मंत्र्यांकडे लेखी स्वरुपामध्ये द्यावेत असे मला सांगावयाचे आहे.

. . . .4 एक्स-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, आदरणीय सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोतेसरांनी आज सकाळच्या प्रस्ताविक भाषणामध्ये जवळजवळ 26 मुद्दे मांडले आहेत आणि त्यातील काही मुद्दे राहिले आहेत तेवढ्याच मुद्यांचा मी उल्लेख करु इच्छितो.

सभापती महोदय, सकाळपासून ज्या-ज्या वक्त्यांनी आपली मते मांडली त्यामधील बहुतेक सर्व मते हा एखाद-दुसरा अपवाद सोडला तर सर्वांनी शिक्षणाला पोषक अशी मते मांडण्यात आली. म्हणून त्या मताशी मी सहमत आहे असे माझे दुसरे मत व्यक्त करतो. तिसरे म्हणजे या सगळ्या व्यतिरिक्त जी मते मांडण्यात आलेली नाही, ती मी येथे मांडणार आहे. त्यातील एक मुद्दा सन्माननीय सदस्यांकडून मांडण्याचे राहून गेला होता आणि तो म्हणजे विषय समित्यांचे कामकाज. आपल्याकडे दोन प्रकारच्या विषय समित्या असतात. एक विषय समिती प्रत्येक शाळेमध्ये असते. प्रत्येक शाळेतील विषय समिती ही चांगल्या प्रकारे सक्रीय काम करते की नाही हे पहाण्याचे काम आमच्या जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी यांनी इन्स्पेक्शनच्या वेळेला पाहिले पाहिजे.दुर्दैवाने आज आमच्या शाळांची इन्स्पेक्शन्स् अलिकडे आमच्या शिक्षण विभागातील अधिकारी करुच शकत नाही. कारण पूर्वी प्रत्येक जिल्ह्यामध्ये 50 शाळा मिळून एक उप शिक्षण अधिकारी असावयाचा. आता 1973 च्या स्टॅपिंग पॅटर्ननुसार आहेत तेवढीच पदे आहेत आणि शाळा मात्र चौपट झाल्या आहेत आणि कामाचे प्रकार एवढे वाढले आहेत की, आमचा शिक्षणाधिकारी शाळेत जाऊ शकत नाही, तेथील इन्स्पेक्शन करु शकत नाही आणि तो तेथे गेला तर थांबू शकत नाही आणि इतर घडामोडीं मुळे त्यांच्यावर इतर कामाचे ताण येतात. म्हणून तेथे ॲकॅडमिक काम होत आहे की नाही हे पाहू शकत नाही. म्हणून शाळेमध्ये असलेल्या सबजेक्ट कमिट्या म्हणजे विषय समित्या आणि ॲकॅडमिक कौन्सिल याचेही काम नीटपणे होते किंवा नाही याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे असा मी पहिला मुद्दा येथे मांडत आहे.

सभापती महोदय, जिल्हा स्तरावर विषय समित्या आहेत हा दुसरा प्रकार आहे. 1986 च्या शैक्षणिक धोरणामध्ये विषय समित्या गठीत कराव्यात, त्यासाठी अनुदान देण्याची तरतूद करणे हे सुध्दा गृहीत धरलेले आहे. पण दुर्दैवाने 1986 पासून आतापर्यंत जिल्हा स्तरावरील विषय समित्या एखाद्या-दुसऱ्या जिल्ह्यात, एखाद्या-दुसऱ्या विषयाची विषय समिती सोडली, कारण एखाद्या ठिकाणी विज्ञानाची समिती चांगली आहे तर कुठे गणिताची समिती चांगली आहे, कुठे मराठीची समिती चांगली आहे. पण बाकी सर्व ठिकाणी मात्र हा कारभार म्हणावा इतका समाधानकारक नाही. कारण तेथे त्या-त्या विषयातील तज्ज्ञ शिक्षक आणि बाह्य मार्गदर्शक यातून त्या विषयाची गुणवत्ता वाढण्या-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

साठी विषय समित्या फार आवश्यक आहेत आणि ते व्हावयास पाहिजे पण दुर्दैवाने तसे होत नाही.

सभापती महोदय, मी आज मुद्दाम ठरविले आहे की, इतर सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे मांडलेले आहेत, ते सोडून दुसऱ्या मुद्यांवर बोलावयाचे ठरविले आहे. आपण राईट टू एज्युकेशन याच्या अंतर्गत सातत्यापूर्ण सर्वंकश मूल्यमापन ही नवीन मुल्यमापनाची पध्दती आणलेली आहे. यामधील उणीवा सोडल्या तर शास्त्रीय बैठक म्हणाल तर सातत्यपूर्ण सर्वंकष मुल्यमापन हे संशोधित आहे, योग्य आहे आणि आवश्यक आहे आणि याबाबत लोकप्रतिनिधी या नात्याने मला माझे मत मांडले पाहिजे. यामध्ये दुसरा आयाम आला आहे तो म्हणजे वर्तन-परिवर्तनाधिष्ठीत मुल्यमापन म्हणजे चेंजेस ओरिएंटेड ई-व्हॅल्युएशन असा तो विषय आहे.वर्तन-परिवर्तनाधिष्ठीत मुल्यमापन याबाबत मी नेहमीच एक उदाहरण देतो की, "सत्यमेव जयते" हे भारतीय बोधवाक्य असते आणि खाली मात्र सत्याला सातत्याने पायाखाली चिरडले जाते.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे..

असले प्रॅक्टीकल तुम्हालाच लखलाभ असो, आम्हाला असले प्रॅक्टीकल नको, अशा प्रॅक्टीकलला कोणालाच साथ देणे जमणार नाही. या राज्याचे राजकारण शिक्षण सम्राट चालवितात. परराज्यातून किती विद्यार्थी येतात, कोणाचे किती किती रेट आहेत हे मी सांगण्याची गरज नाही. आपण स्व.श्री.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करीत आहोत. आज राज्यात जे काही चालू आहे ते पाहून त्यांना वेदना होत असतील. आपण त्यांचे स्मरण ठेवून गोरगरिबांना चांगल्या प्रकारे गुणवत्तेचे शिक्षण देणार आहोत की नाही हा खरा प्रश्न आहे.

सभापती महोदय, माझी मंत्री महोदयांना कळकळीची विनंती आहे की, आपण या सर्व शिक्षण संस्था शासनाच्या ताब्यात घ्याव्यात. कित्येक लोक आपल्याकडे गळे काढतील. या कामात कित्येकजण अडथळा आणतील आणि सांगतील की शाळा सरकारकडे गेल्यास त्याची गुणवत्ता राहणार नाही. ते असे होऊ देणार नाहीत हे मला आणि मंत्री महोदयांना देखील माहीत आहे. परंतु आपण प्रयत्न करणे सोडायचे नाही. असे प्रयत्न आपल्याकडूनच होऊ शकतील अन्य कोणाकडून होणार नाहीत. कारण त्यांच्या शिक्षणसंस्था आहेत. कदाचित उद्याचा शिक्षणमंत्री एखादा शिक्षणसम्राट असेल,काही सांगता येत नाही. आम्ही त्यांच्याकडून अशी अपेक्षा ठेवू शकत नाही. आम्ही आपल्याकडेच अशी अपेक्षा ठेवू शकतो. तेव्हा आपण हे काम करावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, मी बिहार राज्यात गेलो होतो. मी तेथील अनेक शाळा पाहिल्या आहेत. आपल्या महाराष्ट्र राज्यात बिहार राज्यातील किती तरी आयएएस आणि आयपीएस अधिकारी काम करीत आहेत. त्या सर्वांनी त्याच शाळेत शिक्षण घेतलेले आहे. त्यांनी खाजगी शाळेत शिक्षण घेतलेले नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील सांगितले होते की, महाराष्ट्र वगळता अन्य राज्यांमध्ये खाजगी शाळांना असे कुरण चरायला दिलेले नाही. असे असताना आपणच कुरण चरायला का देत आहोत हा खरा प्रश्न आहे. तेव्हा या खाजगी शाळांना पायबंद घालण्याच्या दृष्टीने आपण प्रयत्न करावेत अशी माझी आपणास नम्र विनंती आहे.

सभापती महोदय, आपल्याकडे आता कोचिंग क्लासेसचे कितीतरी पेव फुटलेले आहे. मी कोहिनूर कोचिंग क्लासबद्दल बोलत आहे असे नाही. शिक्षकांच्या नाकर्तेपणामुळे कोचिंग क्लासेस वाढले आहेत. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शाळेत चांगल्या प्रकारे शिकविले तर त्याला कोचिंग क्लासला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे..

जाण्याची आवश्यकता वाटणार नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जे सांगितले तो भाग वेगळा आहे. त्यामध्ये मला जायचे नाही. शिक्षक प्रतिनिधींनीसुध्दा येथे फक्त शिक्षकांच्या वेतनासाठी मते मांडता कामा नयेत. गुणवत्तेबाबत देखील त्यांनी विचार केला पाहिजे. कोचिंग क्लास वाढणे म्हणजे शिक्षकांचा नाकर्तेपणा आहे. हा नाकर्तेपणा कधी घालविणार आहात ? शासन अशा प्रकारच्या कोचिंग क्लासेस बाबत शासन कोणता निर्णय घेणार आहे हे सांगितले पाहिजे. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग शिक्षक) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते आणि आपले प्रथम आभार मानतो कारण आपण एका महत्वाच्या प्रश्नाला या प्रस्तावाच्या रुपाने वाचा फोडली आहे. या एकाच प्रस्तावामध्ये जवळपास 70 ते 80 विषयांची गर्दी केलेली आहे. इतकी गर्दी झाली नसती तर अधिक बरे झाले असते कारण आपणास टार्गेटेड चर्चा करता आली असती. अन्यथा स्टॅम्पेड चर्चा झाल्यासारखे होईल आणि या चेंगराचेंगरीमध्ये किती विषय शहीद होतील याची मला चिंता लागलेली आहे. त्यामुळे इतक्या विषयांची गर्दी टाळावयास पाहिजे होती.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी अतिशय धाडसाने जी भूमिका मांडली तो माननीय मंत्री महोदयांबद्दलचा विश्वास आहे असे मला वाटते.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील. . .

शिक्षण मंत्री हे करु शकतात अशी अपेक्षा महाराष्ट्रातील सर्व वर्गात वाढलेली आहे. या दृष्टीने मंत्री महोदयांनी जे बदल घडविलेले आहेत त्याचे आधी स्वागत केले पाहिजे आणि मन:पूर्वक अभिनंदन केले पाहिजे. कारण श्री. मधुकरराव चौधरीनंतर महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्रात पहिल्यांदाच नवमन्वंतर घडत आहे. माननीय शिक्षण मंत्र्यांना मर्यादा आहेत, अडचणी आहेत, फायनान्सचे अडथळे आहेत पण त्यावर मात करुन माननीय शिक्षण मंत्री जे करत आहेत त्याला दाद दिली पाहिजे, ती मी मन:पूर्वक देतो.

सभापती महोदय, राईट टू एज्युकेशनचा कायदा पास करुन दोन वर्षे उलटलेली आहेत. दिनांक 1 एप्रिल, 2013 ला ही मुदत संपत आहे. या कायद्याने राज्य शासनावर जी जबाबदारी आलेली आहे ती या तारखेच्या आत पूर्ण केली पाहिजे. माझा प्रश्न साधा आहे.दिनांक 1 एप्रिल, 2013 येईपर्यंत थांबावयाचे की त्याच्या आधी काम सुरु करायचे. शेवटचा क्षण येईपर्यंत थांबावयाचे आणि पुढे ढकलावयाचे ही वृत्ती राज्य शासनाच्या तिजोरीने या पुढच्या काळात ठेवू नये. शिक्षणासाठी खुलेपणाने आपली तिजोरी उघडली पाहिजे. कै. यशवंतराव चव्हाण यांचे जन्म शताब्दी वर्षे आपण साजरे करीत आहोत. कै. यशवंतराव चव्हाण यांनी त्यावेळी ईबीसीच्या संदर्भातील एक महत्वाचा निर्णय घेतला होता. त्यावेळी अशी ओरड झाली होती की, तुम्ही सगळयांना का शिकवता, याचे परिणाम उलटे होतील. लोक शिकले तर त्यांच्या अपेक्षा वाढतात आणि अपेक्षा पूर्ण करु शकलो नाही तर तुम्हाला राज्य टिकवणे कठीण जाईल. या राज्याचे शिल्पकार मानल्या जाणाऱ्या कै. यशवंतराव चव्हाण यांनी त्यावेळी असे उत्तर दिले होते की, आपले सरकार टिकले नाही तरी चालेल लोक शिकले आणि आम्हाला प्रश्न विचारावयाला लागले तर त्याचे मी अधिक स्वागत करीन पण लोक शिकले पाहिजेत म्हणून त्या काळात इबीसीचा मोठा भार उचलून त्या काळात त्यांनी एक महत्वाचा निर्णय घेतला. त्या काळात त्या वेळच्या राज्यकर्त्यांनी पुढच्या 50 वर्षाचा विचार करुन निर्णय घेतले त्यामुळे आज महाराष्ट्र शिक्षणाच्या क्षेत्रात अग्रेसर आहे. पण मागच्या काही वर्षांमध्ये शिक्षणाच्या क्षेत्रामध्ये महाराष्ट्र खूप मागे गेला आहे. जवळपास 13 व्या क्रमांकवर आपण जाऊन पोहचलो आहोत. ज्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी केलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील. . .

सभापतीम महोदय, बिहारमध्ये शासकीय शाळांमधून अनेक आयएएस अधिकारी तयार होतात. एकटया मुंबईमध्ये कॉर्पोरट आणि मंत्रालयात टॉपच्या सर्वोच्च पदावर किमान 200 अधिकारी असे आहेत की, जे एका नेत्रहट शासकीय आश्रमशाळेतून आलेले आहेत. आपल्या राज्यातील आश्रमशाळा पाहिल्यानंतर यासंबंधीचे चित्र आपल्या लक्षात येते. जी वेदना आज सन्माननीय सदस्य सर्वश्री विनायक मेटे, जयंत पाटील यांनी व्यक्त केली किंवा या सभागृहात वारंवार व्यक्त केली जाते ही दुरवस्था आपल्याकडील शासकीय शाळांची, जिल्हा परिषदांच्या शाळांची आणि आश्रमशाळांची आपण बदलणार की नाही? हा प्रश्न इच्छा शक्तीचा आहे.शिक्षक शिकवत नाहीत असा शिक्षकांवर दोष टाकणे सोपे आहे. मुद्दा असा आहे की, ज्या पध्दतीची यंत्रणा आपण कामाला लावतो त्या यंत्रणेला काहीही जबाबदारी देत नाही. जी कामे दिली जातात त्यातून खोचाने कसे ओढावयाचे एवढेच काम ही यंत्रणा करते. प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था ग्राम विकास विभागाकडे आहे. खरे म्हणजे ते मंत्री सुध्दा या ठिकाणी उपस्थित पाहिजे होते. सर्व प्रश्नांची उत्तरे एकटे शिक्षण मंत्री देऊ शकत नाहीत, त्यांना मर्यादा आहेत. नवीन अभ्यासक्रम तयार करणे, शिक्षकांचे प्रशिक्षण निर्माण करणे, ते ॲप्रुव्ह करणे, शाळांना परवानग्या देणे या पलीकडे शिक्षण मंत्र्यांकडे काही नाही. त्यासाठी लागणारा पैसा माननीय वित्त मंत्र्यांकडून आणावा लागतो. पुन्हा ही व्यवस्था ग्राम विकास विभागाकडे जाते. ज्यांच्यावर बोट ठेवले जाते ते खाते दुसऱ्या मंत्री महोदयांकडे आहे. दोष मात्र शिक्षण खात्याला भोगावा लागतो. अशी आपल्या शिक्षण क्षेत्राची अवस्था आहे. या बद्दल तुम्ही काही बोलत नाही अशा प्रकारचा रोष या सभागृहात शिक्षक आमदारावर व्यक्त होतो.

सभापती महोदय, खरे म्हणजे या सभागृहात शिक्षक आमदारांनी अतिशय मोठे कॉन्ट्रीब्युशन दिलेले आहे. अकॅडमिक कॉन्ट्रिब्युशन दिलेले आहे. शैक्षणिक दर्जा वाढविण्याच्या दृष्टीने मी या सभागृहात आल्या पासून झालेल्या अनेक चर्चा मी स्वत: सांगेन. पण मला माहीत आहे की, याच्या आधीसुध्दा अनेक चर्चा शिक्षक आमदारांनी उपस्थित केल्या होत्या आणि त्यातून अनेक प्रश्न सुटलेले आहेत. पण आपण ते का करु शकत नाही हा खरा मुद्दा आहे.

श्री. कपिल पाटील....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, राज्य शासनावर सगळयात महत्वाची जबाबदारी 100 टक्के अनुदान देण्याची आहे. त्यासाठी दिनांक 1 एप्रिल, 2013 पर्यंत थांबण्याची गरज काय? या संदर्भात जे निकष लावावयाचे आहेत ते लावण्यात यावेत पण जेथे विद्यार्थी आहेत, जेथे शिक्षक आहेत तेथे दिनांक 1 एप्रिल, 2013 च्या आत 100 टक्के अनुदान देण्याची शासनाची जबाबदारी आहे. शैक्षणिक गुणवत्ता देण्याची जबाबदारी जरुर शाळांची आणि शिक्षकांची आहे. पण भौतिक सुविधा पुरविण्याची जबाबदारी ही राज्य शासनाचीच आहे. त्याच्या पासून राज्य शासनाला पळ काढता येणार नाही. राज्य शासनाने त्याची हमी दिली पाहिजे. खाजगी शैक्षणिक संस्थांच्या बाबतीत कितीही तक्रार केली तरी या संस्थांनी महाराष्ट्रात जे शैक्षणिक जाळे उभे केले आहे त्याला तोड नाही.

यानंतर श्री. बरवड....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

शासनाचा प्रचंड पैसा या संस्थांनी वाचविलेला आहे. आज त्या ठिकाणी काही गैर गोष्टी घडत असतील. सगळ्याच संस्था 100 टक्के चांगल्या आहेत असे मी म्हणणार नाही. पण काही मूठभरांसाठी बाकीच्या सगळ्यांना बदनाम व्हावे लागते, हे सुध्दा आपण लक्षात घेतले पाहिजे. या शाळा आता चालू शकत नाहीत कारण वेतनेतर अनुदान मिळत नाही. वेतनेतर अनुदान नसेल तर खडू-फळ्यापासून इमारतीच्या मेन्टेनन्सपर्यंत आणि पाण्यापासून ते शौचालय आणि बाकीची सफाईची व्यवस्था करण्यापर्यंत लागणारे पैसे त्यांनी कोठून आणावयाचे ? हे पैसे शासन देत नाही. 2004 पासून एक रुपया सुध्दा आपण दिलेला नाही. जोपर्यंत शासन पैसे देत नाही तोपर्यंत त्यांच्याकडून अधिक चांगल्या अपेक्षा करणे संभवणार नाही. त्यामुळे दोन निर्णय ताबडतोबीने घेतले पाहिजे. एक तर वेतनेतर अनुदान ताबडतोब दिले पाहिजे आणि दुसरे म्हणजे ज्या ठिकाणी मुले आहेत, ज्या ठिकाणी शिक्षक आहेत, ज्या ठिकाणी पटसंख्या आहे, ज्या ठिकाणी गुणवत्ता आहे, त्या ठिकाणी भौतिक सुविधाचा विचार न करता 100 टक्के अनुदान दिले पाहिजे. माझे असे म्हणणे आहे की, अनुदान देण्यासाठी इमारतीची गरज नाही. झाडाखाली शाळा भरत असेल पण निकाल चांगला लागत असेल तर आपण 100 टक्के अनुदान दिले पाहिजे. यासाठी पुन्हा टप्पा नाही. कारण 2009 चा जो कायदा आहे तो टप्प्याला परवानगी देत नाही. पूर्ण जबाबदारी राज्य शासनावर येते. या दोन गोष्टीचा निर्णय राज्य शासनाने विनाविलंब घेतला पाहिजे.

सभापती महोदय, शैक्षणिक दर्जाच्या संदर्भात अनेक वेळा चर्चा होते. मी अनेकदा या सभागृहात सांगितले आहे की, आपला अभ्यासक्रम खूप मागे होता. मला शासनाचे अभिनंदन केले पाहिजे की, श्री. राजेंद्र दर्डा साहेब शिक्षण मंत्री झाल्यापासून माध्यमिक स्तरावर दहावी आणि बारावीचे अभ्यासक्रम बदललेले आहेत. पण याची सुरुवात जर प्रायमरीपासून केली नाही, पाया जर आपण मजबूत केला नाही तर वरचा इमला कोसळावयास वेळ लागत नाही. आपण पाया जर मजबूत केला नाही तर आठवीनंतर मुलांची फार गळती होते. गेल्यावर्षी नववीमध्ये 30 टक्के गळती होती आणि 30 टक्के मुले नापास झाली. या मुलांना आपण बाहेर काढलेले आहे. कारण आपण त्यांचे फाऊंडेशन बरोबर करु शकलेलो नाही. परीक्षा पध्दतीबद्दल, मूल्यांकनाबद्दल अनेकांचे आक्षेप

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

आहेत आणि त्यात तथ्य आहे. ते आपण स्वीकारले पाहिजे. कारण ज्या पध्दतीच्या वर्गाला आपण शिकवतो त्या वर्गाचे मूल्यमापन केवळ पाश्चात्य पध्दतीच्या मूल्यमापनातून केले आणि ते निकष लावले तर आपण मुलांवर अन्याय करु आणि शिक्षकांना केवळ लिखापढी करावयास लावू असे होईल. तुमच्या परीक्षा संपलेल्या आहेत असे सांगितल्यामुळे त्यांची भीतीही गेलेली आहे. मला हे मान्य आहे की, शिक्षकांवर पास करण्याची जबाबदारी आहे, नापास करण्याची बिलकुल नाही. पण ते करीत असताना पाश्चात्य मूल्यमापनाचे निकष जसेच्यातसे स्वीकारण्यामध्ये आपली काही गडबड तर होत नाही ना हे तपासले पाहिजे. शिक्षकांची तक्रार आहे. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. जैन आणि श्री. मेटे तक्रार करत होते. किमान चौथी आणि सातवीला स्कॉलरशीपची परीक्षा जर सार्वत्रिक करु शकलो तर आपण कोठपर्यंत पोहोचलो हे कळू शकेल. नाही तर आठवीपर्यंत कळायला मार्ग नाही. काही ठिकाणी गैरफायदा घेतला जाऊ शकतो म्हणून त्याची गरज आहे.

सभापती महोदय, यामध्ये आणखी एक गोष्ट अशी घडली की, बेशिस्त वाढलेली आहे. गरीब वर्गाला असे वाटते की, आपला पाल्य पास होणार आहे त्यामुळे तो दुर्लक्ष करतो. विद्यार्थ्याला असे वाटते की, मी पास होणारच आहे त्यामुळे तो दुर्लक्ष करतो. दोन गोष्टींमुळे बेशिस्त वाढलेली आहे. एक म्हणजे परीक्षा नाहीत ही पध्दत अतिशय चांगली आहे पण परीक्षा नाहीत असा जो तथाकथित समज झालेला आहे त्यामुळे बेशिस्त वाढली आहे. दुसऱ्या बाजूला 17 नंबरचा जो फॉर्म आहे त्यामुळे आपण त्यांना शाळेतून बाहेर जाण्याचा परवाना देतो. एका बाजूला आपण 6 ते 14 वर्षापर्यंतचा कायदा करतो आणि दुसऱ्या बाजूला त्याला सांगतो की, तू शाळा सोड आणि 17 नंबरचा फॉर्म भरुन दहावीच्या परीक्षेला बस. ते कसे काय शक्य आहे ? 16 लाख मुले दहावीच्या किंवा बारावीच्या परीक्षेला बसतात. त्यामध्ये आधीच 30 टक्के मुले गायब होतात. याचा अर्थ हे प्रमाण किती मोठे असेल याची आपल्याला कल्पना येईल.

17 नंबरच्या फॉर्मवर संपूर्ण राज्यातून गेल्या दोन वर्षात 34 हजार विद्यार्थी परीक्षेला बसले. त्यातील 30 हजार विद्यार्थी नापास झाले. जे 4 हजार विद्यार्थी पास झाले ते वेगवेगळ्या कारणांमुळे झाले. ज्या पेपर राहिले आहे असे जे रिपिटर होते ते पास झाले. पण जे रिपिटर नव्हते आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील .....

ज्यांनी शाळा सोडलेली आहे ती मुले कधीच दहावीचा टप्पा ओलांडू शकली नाहीत. बारावी तर फार दूरची गोष्ट आहे. त्यामुळे 17 नंबरच्या फॉर्मच्या संदर्भामध्ये फेरविचार झाला पाहिजे. 17 नंबरच्या फॉर्ममध्ये 17 वर्षे वयाची अट आहे आणि ती योग्य आहे. मूल हे शाळेतच गेले पाहिजे. शाळेच्या बाहेर अनौपचारिक शिक्षण हा गरीब विद्यार्थ्यांसाठी धोका आहे. ज्यांना 17 नंबरच्या फॉर्मवर मोकळीक पाहिजे त्या गरीब मुलांनी शाळेच्या बाहेर जावे हा त्यांचा इरादा आहे. ते आपण बंद केले पाहिजे. जे असे म्हणतात त्यांना समजावून सांगावे आणि समजत नसतील तर आपण विरोध मोडून किमान 17 नंबरच्या फॉर्मची वयाची अट बदलली पाहिजे आणि मुले दहावीपर्यंत शाळेत शिकली पाहिजेत. महात्माजी असे म्हणत होते की, पूर्व विद्यापीठीय शिक्षण देण्याची जबाबदारी सरकारची आहे आणि ते सक्तीने दिले गेले पाहिजे. पूर्व विद्यापीठ म्हणजे आताची बारावी. बारावीपर्यंत मुले शाळेतच राहिली पाहिजेत, ही जबाबदारी राज्य शासनाची आहे. आपण त्यांना आठवीनंतरच शाळेच्या बाहेर काढतो आणि रस्त्यावर सोडतो. ही गोष्ट पुढच्या काळात प्रचंड अराजकाला आमंत्रण देणारी आहे. याला पैसे लागणार नाहीत.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

आपण माझ्या मताच्या बाजूचे आहात हे आम्हाला माहीत आहे. परंतु जे काही अडथळे आहेत त्या अडथळ्याचा विचार मंत्री महोदयांनी करु नये, कारण त्या अडथळ्यांना गरिबांचा विचार करावयाचा नाही. आपण गरिबांच्या बाजूचे आहात याची मला खात्री आहे. म्हणून या संदर्भात तातडीने निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, रात्र शाळांच्या बाबतीत अनेकदा या सभागृहात चर्चा झालेली आहे. यापूर्वी कष्टकरी विद्यार्थी या रात्र शाळांमध्ये मोठ्या प्रमाणावर शिकत होते. प्रामुख्याने मुंबई, पुणे व नागपूर या तीन ठिकाणी रात्र शाळा आहेत. एकट्या मुंबईत 150 रात्र शाळा आहेत. हा कष्टकरी वर्ग आता शिकू शकत नाही. कारण या वर्गाचे स्थलांतर झालेले आहे. जेथे त्याचे स्थलांतर झाले आहे तेथे रात्र शाळा गेलेल्या नाहीत. त्यामुळे काही ठिकाणी रात्र शाळा ओस पडतात आणि जेथे पाहिजेत त्या ठिकाणी शाळा नाहीत. अशी दोन्ही बाजूने या विद्यार्थ्यांची वाईट स्थिती झालेली आहे. या मुलांसाठी अनुभवी, गोळी बंद शिक्षण देणारे शिक्षक पाहिजेत. रात्र शाळांमध्ये कोणत्याही परिस्थितीत अननुभवी शिक्षक नेमण्यात येऊ नयेत. पार्ट टाईम शिक्षक नेमल्यावर मी फूल टाईम शिकवितो, माझी फूल टाईम नेमणूक करावी अशी त्याच्याकडून मागणी केली जाते. म्हणजे आर्थिक बोजा वाढविण्याला शासन आमंत्रण देत आहे. म्हणून या शाळांसाठी अनुभवी शिक्षक दिले पाहिजेत. यापूर्वी जे रात्र शाळांमध्ये काम करीत आहेत त्यांना आर्थिक सुविधा दिल्या पाहिजेत. त्याबाबत माझ्या मनामध्ये शंका नाहीत. पण येथे रात्र शाळांचा विचार करीत असल्यामुळे तेथे अनुभवी शिक्षकांचीच नेमणूक झाली पाहिजे. त्याचप्रमाणे या शाळांमध्ये शिक्षण सेवकांची नेमणूक होता कामा नये. या संदर्भात शासनाने आदेश काढले नाही तर कष्टकरी विद्यार्थ्यांना जो दिवसा काम करुन आपले कुटुंब चालवितो त्या विद्यार्थ्याला शिक्षणापासून पारखे करतो, त्याला दर्जेदार शिक्षणापासून वंचित करतो असा त्याचा अर्थ आहे.

शेवटी शिक्षण खाते हे विद्यार्थ्यांसाठी आहे. म्हणून रात्र शाळांमध्ये कोणत्याही परिस्थितीत शिक्षण सेवकांची नेमणूक करु नये, अननुभवी शिक्षक नेमू नयेत. अनुभवी व गोळी बंद शिक्षण देणारे शिक्षक नेमावेत. त्या शिक्षकांना दिवसाच्या शाळेचा किमान 5 वर्षांचा अनुभव असेल तर

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

त्यांना नेमले पाहिजे. मग ते मागध्यमिक असो की उच्च माध्यमिक असो. ही भूमिका रात्र शाळांबाबत शासनाने घेणे आवश्यक आहे. दहावी उत्तीर्ण झाल्यावर मुले कोठे तरी कामाला लागतात. घरात कोणीही शिकलेले नसते, परंतु त्या मुलामध्ये शिक्षण घेण्याची ऊर्मी असते. त्याला उच्च माध्यमिक रात्र शाळेत प्रवेश मिळाला तर तो तिकडे जातो. दिवसभर काम करतो. शाळेमध्ये कसा तरी उशिरा येतो. परीक्षेचा पेपर रात्री 7 वाजता असेल तर 7.30 वाजता, 8 वाजता पेपरसाठी ही मुले येतात. 8 ते 9.30 पर्यंत परीक्षा देतात, परीक्षेच्या दिवशीही त्यांना मालक लवकर सोडत नसल्यामुळे त्या बिचाऱ्यांचे अर्ध्या तासाचे पेपरचे नुकसान होते. ही मुले परीक्षेसाठी धावत पळत येतात. या वर्गातील मुलांना शिकविण्यासाठी एक व्यवस्था होती ती व्यवस्था शासन हळूहळू कमी करीत आहे. याचे मला दु:ख वाटत आहे.

सभापती महोदय, शालेय अभ्यासक्रमाच्या बाबतीत मला 2-3 महत्वाचे मुद्दे मांडावयाचे आहेत. सीबीएसईच्या धर्तीवर अभ्यासक्रम बदलण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. परंतु प्राथमिक शिक्षण पध्दती बदलण्यात आल्या नाहीत. शासनाने शिक्षण मंडळाला सीबीएसईच्या धर्तीवर अभ्यासक्रम बदलण्यास सांगितले आहे. शिक्षण मंडळाने या आदेशाचा शब्दश: अर्थ घेऊन हिंदी हा विषय वगळून टाकला आहे. या राज्यात त्रिभाषा सूत्र स्वीकारलेले होते. इयत्ता पहिली पासून आठवीपर्यंत भाषा शिकण्याचे वय असते. गणित ही सुध्दा विज्ञानाची भाषा आहे. अनेक भाषा मुले शिकू शकतात. अकरा वर्षानंतर मुलांचे भाषा शिकण्याचे कप्पे बंद होतात. 'सायन्स नेचर' या जागतिक दर्जाच्या मॅगेझिनने हे सप्रमाण दाखवून दिलेले आहे. असे असताना शासन एकेक भाषा कमी का करीत आहे ?

हिंदी विषय वगळण्याचे कारण काय होते ते मला समजलेले नाही. राज्य प्राथमिक शिक्षण परिषदेने परस्पर निर्णय घेतला आहे. त्यांनी सरकारला विचारलेल नाही, शालेय शिक्षण सचिवांना माहिती नाही, खालच्या स्तरावर निर्णय घेऊन मोकळे होतात, पुस्तक छापण्याचे बंद करुन तो विषय बंद करुन टाकतात. या देशाला जोडणारी हिंदी भाषा आहे. हिंदी या देशाची एकतेची भाषा आहे. हिंदी या देशाच्या संवादाची भाषा आहे. हिंदी या देशात रोजगार देणारी भाषा आहे. मुंबईमध्ये फिल्म इंडस्ट्री व इलेक्ट्रॉनिक मीडियाचे सगळयात मोठे आगार आहे. मराठी मुलांना

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील....

हिंदीचे ज्ञान चांगले असल्यामुळे ही मुली टी.व्ही.मालिका, वेगवेगळी चॅनल्स, इलेक्ट्रॉनिक मीडिया किंवा फिल्ममध्ये जाऊ शकली आहेत. साऊथकडील मुले या क्षेत्रात जाऊ शकत नाहीत, कारण तेथे हिंदी ही भाषा चालत नाही. हिंदी सिनेमामध्ये मराठी मुलगा किंवा मुलगी हिरो व हिरोईन म्हणून चमकल्याचे एखाद दुसरे उदाहरण आहे. पण बाकी सर्व फिल्म इंडस्ट्री आज आपल्या ताब्यामध्ये आहे. शासन या मुलांच्या हातातील रोजगार कायमचा घालवू इच्छित आहे का ? हिंदी हा विषय कमी केल्यामुळे रोजगाराची संधी सुध्दा कमी होण्याची शक्यता आहे.

दुसरे असे की, एकाच फटक्यामध्ये राज्यातील 60 हजार हिंदी भाषेच्या शिक्षकांना शासन बेकार करणार आहे. एकाच वेळी इतक्या मोठ्या संख्येने शिक्षकांना वाऱ्यावर सोडले जाणार आहे. त्यामुळे हिंदी ही भाषा गरजेची आहे. देशाची भाषा आहे. देशात 14 राष्ट्र भाषा आहेत हे खरे असले तरी हिंदी ही संपर्काची भाषा आहे. कामाची भाषा आहे, देशाच्या ऐक्याची भाषा आहे. म्हणून ही भाषा टिकली पाहिजे. मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, मी या संदर्भात परवा सुध्दा एक प्रस्ताव आणला होता, माननीय सभापतींनी तो मुद्दा गंभीर असल्याचे मान्य केले होते. मला अपेक्षा आहे की, मंत्री महोदय, हिंदी भाषेचे संरक्षण करतील, या देशाच्या एकतेचे संरक्षण करतील, या देशातील संवादाची भाष जपतील याबद्दल माझ्या मनामध्ये शंका नाही. मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणातून याची घोषणा करावी अशी मी पुन्हा एकदा विनंती करतो.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

सभापती महोदय, तुकडयांच्या समायोजनाच्या संदर्भात काही मुद्दे मांडले गेले. राज्यभर तुकडया कमी झालेल्या आहेत. मुंबईमध्ये आम्ही जो प्रयोग केला त्यामधून आम्ही सप्रमाण दाखवून दिलेले आहे की, तुकडी आणि शिक्षक या दोन वेगवेगळया गोष्टी आहेत. शिक्षकासह तुकडीचे समायोजन ही चुकीची गोष्ट आहे. तुकडी वेगळी गोष्ट आहे आणि शिक्षक वेगळी गोष्ट आहे. रिक्त झालेल्या जागेवर शिक्षकाला पाठवा. म्हणजे तिकडे तुम्ही माणूस भराल आणि पुन्हा ओझे तुमच्या अंगावर येईल. रिक्त होणा-या जागेवर सरप्लस शिक्षक पाठवा आणि सरप्लस तुकडी जेथे मुले वाढली असतील तेथे द्या. हे जर आपण करु शकलात तर विनाअनुदान आणि कायम अनुदान यासाठी पैसे कोठून आणयचे या प्रश्नाचे उत्तर किमान 70 ते 80 टक्के आपणास सापडू शकेल आणि 10-20 टक्क्याचा खर्च तुम्हाला सोसावा लागेल.याचा आढावा राज्य पातळीवर शासनाने घेतला तर मोठा प्रश्न सुटू शकेल याबद्दल माझ्या मनात शंका नाही.

सभापती महोदय, मला आणखी एक-दोन मुद्दे मांडावयाचे आहेत. प्रश्न हिंदीच्या आधुनिकतेचा असेल, सीबीएसईच्या ॲट पार जाण्याचा असेल, मराठी शाळा टिकविण्याचा असेल, आपल्याला जर आधुनिक शिक्षण आणावयाचे असेल तर सबंध अभ्यासक्रमांची पुनर्रचना करायला पाहिजे. आपण सेकंडरी आणि हायर सेकंडरीला अभ्यासक्रम बदलतो. परंतु जर खालपासून बदल करावयाचा असेल तर त्याबाबतीत आपले राज्य शिक्षण मंडळ, बाल भारती, आणि प्राथमिक शिक्षण परिषद या तिघांची पुनर्रचना केली पाहिजे. पारंपारिक माणसांच्या हातामध्ये आपण ही व्यवस्था दिली तर ती सरधोपटपणे कॉपी करणारी माणसे असल्यामुळे त्यांच्याकडून आपल्याला रिझल्ट मिळणार नाहीत. खरी गोम तिकडे आहे. तिथे तुम्ही तज्ज्ञ मंडळींना आणले पाहिजे. विज्ञान आणि अन्य क्षेत्रामध्ये नेतृत्व करणारी माणसे देशपातळीवरची विद्वान माणसे ही महाराष्ट्रातील आहेत. मग ते जयंत नारळीकर असतील, माशेलकर असतील, भटकर असतील, गोवारीकर असतील, आपण या तज्ज्ञ मंडळींचा उपयोग करुन घेत नाही. आपले विज्ञान बिहार, केरळ किंवा दिल्लीच्या बरोबरीने जायचे असेल, आपले गणित बिहार आणि दिल्लीच्या बरोबरीने जायचे असेल तर आपण आपल्याकडील तज्ज्ञ लोकांचे मार्गदर्शन घेतले पाहिजे. आपल्याकडे गणित शास्त्रज्ञ आहेत, खगोल शास्त्रज्ञ आहेत, रसायन शास्त्रज्ञ आहेत. त्यांचा आपण साधा सल्ला देखील घेत नाही. तीच गोष्ट

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील....

इतिहास किंवा समाजशास्त्राच्या, भाषेच्या संदर्भात आहे.

मघाशी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले की, जुनी 7वी पर्यन्त शिकलेल्या लोकांचे इंग्रजी उत्तम होते. कारण त्यावेळी तर्खडकरांची पुस्तके होती. आता आपले हिंदी कच्चे, मराठी कच्चे आणि इंग्रजीही कच्चे, सगळेच विषय कच्चे आहेत. याची काही कारणे आहेत. आपण ज्या इयत्तेला ज्या पध्दतीची पुस्तके दिली पाहिजेत ती न देता काही तरी कोंबायचे म्हणून आपण काही करायला लागलो तर त्यामधून चांगले रिझल्टस् मिळणार नाहीत. माझ्या मुलाची काल मराठीची परीक्षा होती. त्याने मला एक मराठी कविता समजावून सांगायला सांगितले. रात्रीचे 11.00 वाजले होते. कसली तरी ती कविता वाचून मला झोप यायला लागली. पूर्वी फार सुंदर कविता होत्या.

"देवा तुझे किती, सुंदर आकाश
सुंदर प्रकाश सूर्य देतो"
"चिमणी ये, वारा दे, पाणी दे"
"हसरे माझ्या मुला"

म्हणजे मुलांना हसवणा-या कविता होत्या. पण आता मुलगा कसा दुर्मुखेल अशा कविता असतात. या कविता त्याच्या आईला वाचता येणार नाहीत, वडिलांना वाचता येणार नाहीत आणि मास्तराला देखील वाचता येणार नाहीत. आदरणीय सदस्य श्री. उल्हास पवार यांनी परवा एका कविते बद्दल मला सांगितले की, "अरे.. ती कविता मलाच समजली नाही.." आदरणीय श्री. उल्हास पवार साहेबांचा मराठी भाषेचा संत वाङमयापासून मोठा गाढा अभ्यास आहे. त्यांना ती कविता वाचताना त्रास होत असेल आणि अशा प्रकारच्या कविता अभ्यासक्रमामध्ये अंतर्भूत केल्या तर कसे चालेल ?

प्रश्न केवळ आपल्या एसएससी बोर्डाचा नाही. आयसीएसई बोर्ड असेल, सीबीएसई बोर्ड असेल किंवा आयबी बोर्ड असेल या सर्व बोर्डांना 5वी पासून 8वी पर्यन्त मराठी शिकावे लागेल. त्यांची पुस्तके आपण चांगल्या प्रकारे त्यांना बनवून दिली पाहिजेत. कारण त्यांना चांगली पुस्तके उपलब्ध होत नाहीत. म्हणून एसएससी बोर्डातले, इंग्रजी माध्यमातले, अन्य माध्यमातील जे मराठी शिकतात ते आणि अन्य बोर्डामध्ये जे मराठी शिकतात ते, हे सर्वजण आता मराठीचा दुस्वास करायला लागले आहेत. ते म्हणतात नको ती मराठी. मराठी ही भयंकर कठीण गोष्ट आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील....

असे त्यांना वाटते. मग ते 10वीला मराठी सोडतात, 12वीला मराठी सोडतात आणि कॉलेजला तर कुणी मराठी घेतच नाही. एका बाजूला आपण मराठी माध्यमातून हिंदी विषय काढून टाकतो आणि दुस-या बाजूला मराठीतेतर शाळांमधून मराठी संपवितो. मुले मराठीपासून दूर पळावीत, त्यांनी मराठीला स्पर्शसुध्दा करु नये अशी परिस्थिती आपण निर्माण करतो. म्हणजे दोन्ही बाजूने भाषा मारायच्या आणि इंग्रजीचा डांगोरा पिटायचा असे चालले आहे.

सगळया बोर्डांच्या अभ्यासक्रमाच्या संदर्भातील मराठी विषयाची पुस्तके नव्याने लिहिली गेली पाहिजे. अगदी एसएससी बोर्डाची पुस्तके सुध्दा नव्याने लिहिली गेली पाहिजेत. मराठी पुस्तक सहज सुलभ केले पाहिजे, आनंदी केले पाहिजे आणि भाषा संवर्धित करणारे पुस्तक असले पाहिजे. भाषा मारणारे आणि मुलांना रडविणारे, दुर्मुखविणारे पुस्तक असता कामा नये. एकूणच भाषेच्या संदर्भात विचार करताना आपण काही मांडणी कराल अशी मला मंत्री महोदयांच्या उत्तराच्या भाषणातून अपेक्षा आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.....

जाता जाता दोन महत्वाच्या मुद्यांकडे लक्ष वेधू इच्छितो. ज्यांच्यामार्फत आपण हा शिक्षणाचा जगन्नाथाचा रथ वाहून नेणार आहोत त्या शिक्षकांना आपण काही संधी देणार आहोत की नाही? मी सहाव्या वेतन आयोगाचा मुद्दा मांडणार नाही. ती लढाई आम्ही लढू. आम्हाला तो आयोग नाकारला आहे. शासनाला तो आज ना उद्या द्यावाच लागेल. आमच्यावर हकीम समिती लादण्यात आली. शैक्षणिक दर्जा वाढवायचा असेल तर त्याची संधी असणार की नाही? संधी नाही. डी.एड असेल तर डी.एड रहा. 12 वी असेल तर 12 वी रहा. शिकू नका. एखादा शिक्षक पोस्ट ग्रॅज्युएट होऊ पहात असेल, संशोधन करु पहात असेल तर त्याला संधी नाही. त्याला प्रमोशन नाही. 24 वर्षानंतर 20 टक्के लोकांना प्रमोशन दिले जाते. राज्य सरकारच्या 10 लाख कर्मचाऱ्यांना विशिष्ट वर्षे सेवा केल्यानंतर शिपायापासून वरच्या अधिकाऱ्यांपर्यंत प्रमोशनचा फायदा दिला जातो. मग शिक्षकाला का नको? एखाद्या शिक्षकाकडे पदव्युत्तर पदवी असेल तर त्याला प्रमोशन मिळाले पाहिजे. पदव्युत्तर शिक्षण घेतले असले तरी फक्त 20 टक्के शिक्षकांना फायदा मिळणार असेल तर 20 टक्क्यामागील म्हणतो मी त्यात येत नाही. मग कशाला मेहनत करा? त्यामुळे शिक्षक शिक्षणापासून पळ काढतात. म्हणून माझी मंत्री महोदयांना विनंती आहे की, जे शिक्षक अधिक क्वॉलिफिकेशन प्राप्त करणारे असतील, आपला स्तर वाढवू पहात असतील त्यांना संधी दिली पाहिजे आणि सरसकट सगळयांना निवडश्रेणी दिली पाहिजे. 24 वर्षानंतर निवडश्रेणी दिली जाते. निकषामध्ये बदल करा असे आमचे म्हणणे नाही. निकष बरोबर आहेत. परंतु 20 टक्के हा निकष वाईट आहे. ठराविक लोकांना संधी द्यायची हे बरोबर नाही. 20 टक्के केल्यामुळे 10 पैकी 2 लोकांना संधी मिळणार आहे. पुढे कितीही शिकला तरी त्याला फायदा मिळणार नाही. मग पुढचा का शिकेल? हे करु शकलात तर अनेक शिक्षक स्वत:हून पुढे येतील. त्यांची प्रेरणा मारुन टाकण्याचे काम सध्याच्या व्यवस्थेत होत आहे. ते दुरुस्त करण्याची गरज आहे. ते केले तर याचा मोठा फायदा होईल.

सभापती महोदय, रजेचा मुद्दा महत्वाचा आहे. अनेक शिक्षक मी पाहिले, कधीही ते रजा घेत नाहीत. अत्यंत निष्ठेने शाळेत जातात. उरलेल्या वेळी सुध्दा शिकवितात. त्यांची रजा शिल्लक राहते. 300, 400, 500 दिवस रजा शिल्लक असणारे शेकडो शिक्षक मुंबईत मी पाहिले. मी त्यांना विचारले, रजा शिल्लक का राहिली? ते म्हणतात, मी कधीच रजा घेतली नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील.....

कधी ते दांडी मारत नाहीत. बाळंतपण आणि महत्वाचे आजारपण वगळता कधीही रजा न घेणाऱ्या शिक्षिका आहेत. शिक्षकांना रजा कॅश करता आली पाहिजे. असा निर्णय मध्यंतरी झाला होता. परंतु माशी शिंकली आणि तो निर्णय अंमलात आला नाही. यासाठी शासनाला अधिक खर्च करावा लागणार नाही. माझे आई वडील शिक्षक होते. दिवाळी आणि मे महिन्याच्या सुट्टीत देखील मी त्यांना कधी सुट्टी घेतल्याचे पाहिले नाही. कॅटलॉग तयार करणे, चार्ट तयार करणे, पेपर तपासणे असे काही तरी उद्योग सुट्टीच्या काळात सुरु असायचे. वर्कशीट बनवून पुस्तक तयार करायचे.

सभापती महोदय, आज शिक्षक खूप करु मागतो आहे. त्याला करण्याची संधी दिली पाहिजे. माझी शासनाला विनंती आहे की, वित्त विभागाकडे दाद मागून रजा कॅश करण्याची सोय शिक्षकांना उपलब्ध करुन दिली पाहिजे. राज्य सरकारने 1980 मध्ये माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांना रजा कॅश करता येईल असा कॅबिनेटमध्ये निर्णय घेतला होता. परंतु त्या निर्णयाची अंमलबजावणी झाली नाही. यासाठी शासनाला फार पैसा खर्च करावा लागणार नाही. एखाद्या शिक्षकाने जर 300 दिवस रजा घेतली तर तो एक वर्ष कामावर असणार नाही. रजेवर असतानाही त्याला पगार द्यावा लागेल. त्याच्या जागेवर पर्यायी शिक्षक नेमून त्याला पगार द्यावा लागेल. दुप्पट वेतन देण्यापेक्षा रजा कॅश करण्यास अनुमती दिली तर त्याला प्रोत्साहन मिळेल, त्याला न्याय मिळेल.

सभापती महोदय, मराठी माध्यमाच्या शाळा पुढे जाऊ शकतील यासाठी मुंबईमध्ये आम्ही वॉर्डाफ एज्युकेशन हा एक प्रयोग सुरु केला आहे. ज्याला जर्मनीचे रुडॉल्फ स्टेनर मॉडेल म्हटले जाते. ही मेथड स्वीकारुन आपल्या मराठी शाळा आंतरराष्ट्रीय स्पर्धेत उतरविण्यात येतील.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील.....

जे चांगल्या स्कूलमध्ये मिळते ते आपल्याला देता येईल. ही संपूर्ण मेथड मी माननीय विरोधी पक्षनेत्यांना दाखविली असता ते म्हणाले की माझी मुलगी सुध्दा तेच शिकते. या प्रयोगाला अधिकाऱ्यांनी मोडता घालू नये, कारण आम्ही हा प्रयोग करीत असताना शासनाची जी फ्रेम आहे ती तोडत नाही, करिक्युलम मोडत नाही तर फक्त प्रयोग करण्याची संधी आम्हाला द्यावी अशी विनंती करतो. मला खात्री आहे की, हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर मराठी शाळांमध्ये जाण्याचा न्युनगंड येणार नाही म्हणून ही संपूर्ण स्पेलिंग मेथड शिकवून मुलांना एका नव्या विश्वात नेण्याची गरज आहे. ज्या ज्या ठिकाणी असे प्रयोग चालतील तेथे सरकारी अधिकाऱ्यांनी त्याला मान्यता द्यावी अशीही माझी विनंती आहे. अशा प्रकारे जर शासनाची चौकट मोडली जात नसेल तर त्याला प्रोत्साहन दिले पाहिजे. असे प्रश्न अनेक आहेत पण सर्वच प्रश्नांना दाद मागता येणार नाही. पण कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षकांच्या बाबतीत किमान संप काळातील त्यांच्या रजा सर्व्हिस बुकमध्ये जमा कराव्यात. कारण या शिक्षकांनी संप मिटल्यानंतर जबाबदारी सोडलेली नाही तर उलट त्या काळात त्यांनी चांगले रिझल्ट आणून दाखविले आहेत याचा अर्थ त्यांनी चांगली मेहनत घेतली आहे. म्हणून त्यांच्या रजा त्यांच्या सेवा पुस्तिकेत जमा कराव्यात अशी विनंती करुन मी थांबतो.

धन्यवाद.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : महोदय, नियम 260 अन्वये आलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, शिक्षणाकडे कोणत्या दृष्टीने आपण पाहतो यावर या चर्चेचे स्वरुप ठरले पाहिजे. हा प्रस्ताव आणण्यामागे जो विषय किंवा जो दृष्टीकोन होता तो माझ्या मते असा की, शिक्षकांना आवश्यक त्या सोई-सवलती शासनाने दिल्याच पाहिजे. कारण शिक्षकांकडून फार मोठी अपेक्षा शासन आणि समाज करीत आहे, ते योग्यही आहे. अपेक्षा करणे वेगळे आणि अपेक्षांची पूर्तता होण्यासाठी आवश्यक सोई-सवलती उपलब्ध करुन देणे हे सुध्दा अत्यंत आवश्यक आहे. सोई-सवलती उपलब्ध करुन देता येत नाहीत, दिल्या जात नाहीत आणि नियमात तरतूद असताना त्यांचाही फायदा दिला जात नाही, जेव्हा शिक्षक, शिक्षकांच्या संघटना आणि त्यांचे प्रतिनिधी याबाबत विषय मांडतात तेव्हा विषय पुढे केले जातात त्या मागण्यांचे स्वरुप बदलण्यासाठी शैक्षणिक गुणवत्तेचे. मी एक मुद्दा स्पष्टपणे सांगू इच्छितो की, या प्रस्तावात एकूण 26 मुद्दे व्यक्त केलेले आहेत. हे सर्व मी मुद्दे मागण्यांच्या स्वरुपातील आहेत. याबाबत शिक्षकांची राज्यव्यापी संघटना, महाराष्ट्र राज्य शिक्षक संघ सातत्याने प्रयत्न करीत आहे आणि मागण्या काय मागतो तर शासन पूर्ण करीत नाही म्हणून मागण्या मागण्यासाठी प्रयत्न होत असतो. अशा मागण्या पूर्ण करण्यासाठी जी मागणी केली जाते त्याच्या मागचे ध्येय आहे शिक्षणाची गुणवत्ता वाढविणे, भविष्यातील समाज घडविणे, शिक्षकांवर समाजाने शासनाने दिलेली जबाबदारी खऱ्या अर्थाने पार पाडणे म्हणून मागणी करणाऱ्या शिक्षकांना दोष देणे हे चुकीचे आहे हे सर्वप्रथम लक्षात घेतले पाहिजे. शिक्षणाकडे व्यावसायिक दृष्टीकोनातून पाहतो म्हणून सगळीच गल्लत होते. व्यावसायिक दृष्टीकोन म्हणजे आम्ही एवढा खर्च केला त्यातून आम्हाला काय मिळाले, शिक्षण ही बाजारात विकण्यायोग्य वस्तू नाही. शिक्षणाचा संबंध संस्कारांशी आहे हे मला या ठिकाणी नमूद करावेसे वाटते.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नागो पुंडलिक गाणार ....

या राज्यात शिक्षणाच्या संदर्भात जर कुणाचे नाव स्वाभिमानाने घ्यावे लागत असेल व ते घेतल्याशिवाय शिक्षणाचा विषय पूर्ण होत नसेल तर ते नाव आहे प्रसिध्द समाज सुधारक महात्मा फुले यांचे. शिक्षण देण्यची जबाबदारी शासनाची आहे. शासनाने ही जबाबदारी पार पाडलीच पाहिजे असे इंग्रज सरकारपुढे महात्मा ज्योतिबा फुले सांगत असत. मात्र त्यांचा वारसा सांगणारे आज आम्ही शिक्षणाकडे बाजारीकरणाच्या स्वरुपात पाहतो आहे. आम्ही शिक्षणाला खरेदी आणि विक्री करण्याची वस्तू बनवली आहे, आम्ही संस्काराचा संबंध तोडला आहे म्हणून व्यावसायिक दृष्टिकोनातून शिक्षणाकडे पाहिले जाते व मग आम्हाला मागणी करावी लागते ती म्हणजे वेतनेतर अनुदानाची. खरे म्हणजे वेतनेतर अनुदान मागण्याची आमच्यावर वेळ का येते ? सरकारने सेकंडरी स्कूल कोड बनविले असून संस्था आणि शासनाच्या मधील कराराची जबाबदारी शासन का पार पडत नाही ? शासन यासंदर्भात आर्थिक कारण सांगते. परंतु अर्थमंत्री सांगतात की, राज्याची आर्थिक परिस्थिती सुदृढ आहे. असे जर असेल तर वेतनेतर अनुदान देण्यासाठी आर्थिक कारण सांगण्याचे कारणच काय ? या राज्यात, या देशात जन्माला आलेला बालक ही आपल्या देशाची राष्ट्रीय संपत्ती आहे, त्याला शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाची आहे, समाजाची आहे कारण हाच बालक उद्याचा समाज आहे. भविष्यातील समाज आम्ही घडवला नाही तर चांगला नागरिक बनूच शकत नाही. आदर्श सोसायटीचा घोटाळा तसेच अन्य जे घोटाळे होत आहेत ते आयएएस कॅडरचे अधिकारी करीत आहेत. शिक्षणाला आम्ही व्यापारीकरणाचे स्वरुप दिल्यामुळेच घोटाळे होत आहेत असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही.

सभापती महोदय, शिक्षणातील भ्रष्टाचार हा खालच्या स्थरावर जाऊन पोहचलला आहे. शिक्षणाधिकारी, शिक्षण संचालक आणि अन्य अधिकारी हे पैसे गोळा करण्याचे काम करीत असून ते आपल्या जिल्हयातील शिक्षणाकडे लक्ष देत नाहीत. कोणत्याही शिक्षणाधिकारी कार्यालयात आपण गेला तर त्या ठिकाणी प्रत्येक कामाचा दर ठरलेला असतो. शिक्षकाच्या नियुक्तीचा दर किती आहे याची आपल्या सर्वांना कल्पना आहे. सहावा वेतन आयोग लागू झाल्यापासून शिक्षकांच्या नियुक्तीचा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नागो पुंडलिक गाणार ....

दर हा 20 ते 25 लाख रुपये झालेला आहे. एनओसीचा दर 1 लाख, शाळेच्या मान्यतेचा दर 2 लाख अशा प्रकारे प्रत्येक कामाचा दर ठरलेला आहे. या दरानुसार पैसे दिले गेले नाही तर कामच होत नाही ही वस्तुस्थिती आपल्याला नाकारुन चालणार नाही. नियुक्तीचे अधिकार संस्था चालकाकडून काढता येतील काय याचाही विचार आपल्याला करावा लागणार आहे.

सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रातील मालक हा नोकराच्या भरवशावर पोसला जातो. परंतु अन्य क्षेत्रात नोकर हा मालकाच्या भरवशावर पोसला जात असतो. शिक्षणामध्ये उलट आहे, हे सर्वांना मान्य आहे परंतु कोणीही त्यात परिवर्तन करण्यासाठी धजत नाही, हिमंत करत नाही फक्त गुणवत्तेबाबत बोलत असतात.

सभापती महोदय, नागपूर शहरातील शिक्षणाच्या भ्रष्टाचाराबाबत मी चार उदाहरणे देऊ इच्छितो. गेल्या पाच वर्षापासून मी यांसदर्भात भांडतो आहे परंतु त्याची कोठेही दखल घेतली जात नाही. शिक्षणमंत्री पुरके साहेब असतांना मी यवतमाळ येथे त्यांच्याकडे गेलो व त्यांना सांगितले की, "सर तुम्ही शिक्षण मंत्री आहात, मी शिक्षक आहे, त्या काळचे आमचे शिक्षणाधिकारी श्री.महेश करंजगावकर हे सरसकट सांगायचे की, मला वरपर्यंत, शिक्षणमंत्र्यांपर्यंत पैसे द्यावे लागतात त्यामुळे मी पैसे घेतो. ही गोष्ट मी शिक्षणमंत्री पुरके साहेबांना सांगितली त्यावेळी त्यांनी कारवाई करण्याचे आश्वासन दिले, माझ्याकडून लेखी तक्रार लिहून घेतली. मी दुर्भाग्याने सांगतो की, महेश करंजगावकर नावाच्या अधिका-यावर आजपर्यंत कारवाई झाली नाही, उलट शिक्षणाधिकारी पदावर काम करणारा व्यक्ती पदोन्नत होऊन आज नागपूर विभागाचा शिक्षण संचालक म्हणून कार्यरत आहे. या व्यक्तीच्या संदर्भात अनेक तक्रारी केल्या, त्यांच्या संदर्भात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली परंतु यासंदर्भात शासनाने कोणतीही दखल घेतली नाही.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नागो पुंडलिक गाणार...

नागपूर शहरात निराला हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय आहे. या शाळेचे संचालन निराला एज्युकेशन सोसायटी,नागपूर करते. या संस्थेने ही शाळा दुसऱ्या संस्थेला हस्तांतरित करण्याबाबत अर्ज केला नाही, प्रस्तावही सादर केला नाही. तरी सुद्धा ही शाळा ठाकूर शिक्षण संस्थेला हस्तांतरित करण्यात आली. दहा ते बारा लाख रूपयांची लाच घेण्यात आली. या संस्थेची प्राथमिक शाळा नाही. निराला उच्च प्राथमिक नावाची शाळा नाही. ती सुद्धा ठाकूर शिक्षण संस्थेला हस्तांतरित करण्याचा आदेश नागपूर विभागाच्या शिक्षण उप संचालकांनी दिला. या भ्रष्ट व्यवहाराबाबात या सदनाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य आणि भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय नेते श्री.नितीनजी गडकरी यांनी तक्रार केली, पत्र दिले. त्यांच्याही पत्राची दखल घेण्यात आली नाही. मी तर अनेक तक्रारी केल्या. पण त्याकडे लक्ष दिले गेले नाही.

मी दुसरे उदाहरण देतो. सेंट विन्सेंट उच्च प्राथमिक शाळा, मेडिकल चौक नागपूर येथे आहे. 7 शिक्षक गेल्या 19 वर्षापासून कागदोपत्री दाखविले जात होते. त्यांचे वेतन, वेतन पथका मार्फत घेतले जात होते. दोन वर्षापूर्वी नागरपूरच्या महापौर मंगला पांडे यांनी तक्रार केली. त्यांच्या तक्रारीची दखल घेण्यात आली नाही. पगार देणे सुरूच होते. मी स्वत: तक्रारी केल्या. आता शासनाने असे घोषित केले आहे की, 5 कोटी 87 लाखाचा गैरव्यवहार झालेला आहे. त्या 7 शिक्षकांच्या नावाने, मुख्याध्यापक, लिपिक, आणि 4 विस्तार अधिकाऱ्यांच्या नावाने इमामवाडा पोलीस ठाण्यामध्ये तक्रार नोंदविण्यात आली. एकाही शिक्षणाधिकाऱ्याच्या विरूद्ध, वेतनपथकाच्या अधिकाऱ्या विरूद्ध किंवा उच्च अधिकाऱ्या विरूद्ध आज पर्यंत गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. करोडो रूपयांचा भ्रष्टाचार खुलेआम तक्रार केल्यावर सुरू राहतो. तो रोखला जात नाही, चौकशी केली जात नाही. असा भ्रष्ट व्यवहार शिक्षण क्षेत्रात सुरू आहे.

तिसरा प्रकार श्रीमती रुक्मिणी बाई धवड विद्या निकेतनातील आहे. एका राजकीय पक्षाचे नगरसेवक श्री.प्रशांत धवड यात आहेत. ते लिपिक म्हणून कागदोपत्री दाखवले जातात. ते मॅनेजमेंटमध्ये देखील आहेत. त्यांना 1986 पासून लिपिक पदावर दाखविण्यात आले आहे. ते पगार घेत आहेत. पण शाळेत एकही दिवस आलेले नाहीत. मी शिक्षणाधिकार, शिक्षण उप संचालकांकडे

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नागो पुंडलिक गाणार...

दावा केला की, शाळेच्या रेकॉर्डमध्ये या माणसाच्या हस्ताक्षरात एक तरी पत्र दाखवा. सन 1986 पासून हा कधीही शाळेत आलेला नाही. लिपिक पदावर कागदोपत्री दाखवला गेलेला श्री.प्रशांत धवड नावाचा व्यक्ती नगरसेवक म्हणून महानगरपालिकेत उपस्थित असतो. त्याच्या स्वाक्षऱ्या मस्टर रोलवर दुसरा कोणी तरी करतो. त्याच्या अर्जावर देखील दुसऱ्या व्यक्तीच्या सह्या असतात. स्वत:ची एकही सही कुठेही मिळत नाही. त्यांच्या शैक्षणिक पात्रतेच्या प्रमाणपत्राबद्दल देखील संशय घेण्यात आला. त्याची चौकशी कोणी केली नाही. तत्कालीन मुख्याध्यापिका श्रीमती मंगला मानकर यांनी ट्रॅब्युनलमध्ये ॲफिडेव्हीट केले. त्यात मान्य केले की, हे श्री.प्रशांत धवड नावाचे लिपिक शाळेत कधीही आले नाहीत. पण मॅनेजमेंटच्या धाका खाली, दबावाखाली मी त्यांचे नियमित वेतन काढत गेले आणि ते नियमित वेतन उचलले गेले आहे. आज पर्यंत कोणतीही कार्यवाही किंवा कारवाई संबंधितांवर झालेली नाही हे दुर्भाग्य आहे.

चौथा मुद्दा राष्ट्र सेवा विद्यालयाचा आहे. 1990 पासून या शाळेच्या शेकडो तक्रारी आहेत. परंतु, कोणत्याही तक्रारीची दखल घेण्यात आली नाही.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नागो पुंडलिक गाणार....

सभापती महोदय, शिक्षण क्षेत्रात असा जर भ्रष्टाचार चालत असेल, आमचे अधिकारी जर अशा पध्दतीने वागत असतील, आमचे स्वत:चे धोरण मराठी माध्यमांच्या शाळांच्या विरोधात असेल, मराठी माध्यमांच्या शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांना व्यवस्थापक मंडळाच्या दबावाखाली, धाका खाली काम करावे लागत असेल, त्यांच्यावर जनगणना, निवडणूक आणि अन्य अ-शैक्षणिक कामे लादून त्यांना अध्यापनाच्या कामापासून वंचित ठेवत असू आणि दुसरीकडे शिक्षणाच्या गुणवत्तेच्या फक्त कोरडया गोष्टी करत असू तर यातून काही निष्पन्न होणार नाही. म्हणून माझी प्रामाणिक मागणी आहे की, शिक्षण देण्याची जबाबदारी शासनाची आहे. शिक्षणाचा संबंध हा कशाशी घ्यायचा हे आपण ठरवले पाहिजे. आम्हाला संस्कार करण्यासाठी शिक्षण द्यावयाचे आहे. भविष्यातील समाज घडविण्यासाठी शिक्षण द्यावयाचे आहे, ही आमची जबाबदारी आहे, आम्ही ती पार पाडू असे जोपर्यंत ठरवणार नाही, आमच्या अंदाजपत्रकात सकल उत्पन्नाच्या 30 टक्के किंवा किमान 10 टक्के रक्कम याकरता निश्चित करणार नाही किंवा देणार नाही, तोपर्यंत शिक्षणामधील हे प्रश्न सुटू शकत नाहीत, आम्ही सोडवू शकत नाही. आम्ही फक्त चर्चा करु. आज मराठी माध्यमांच्या शाळा विना परवानगी चालविल्या तर फौजदारी गुन्हे दाखल केले जातात. दुसरीकडे सी.बी.एस.सी.च्या शाळा, इंग्रजी माध्यमाच्या शेकडो कॉन्व्हेन्ट या राज्यात अशी आहेत की ज्यांना शासनाची मान्यताच नाही. सी.बी.एस.सी.च्या शाळा तर मान्यता घेतच नाहीत. त्या खुलेआम चालू आहेत. पैसे लुटत आहेत. शासनाचा त्यांच्यावर कुठलाही कंट्रोल नाही. हे जर चालणार असेल, इंग्रजीला आम्ही सन्मान देणार असू आणि मराठी भाषेचा अपमान करणार असू तर मात्र मराठी माध्यमांच्या शाळांना गळती का लागली, मराठी माध्यमांच्या शाळा का डुबत आहेत, का बंद पडत आहेत या बोलण्याला काही अर्थ नाही हे मी नम्रपणे सांगू इच्छितो.धन्यवाद.

. . . .4 एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, खरे तर आता सभागृहाचे कामकाज संध्याकाळच्या वेळेपर्यंत येऊन ठेपलेले आहे. शिक्षणा सारख्या महत्वाच्या विषयावरचा हा नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव आहे. यावर बोलत असताना सकाळपासून या सभागृहात जे-जे विषय येऊन गेले त्या सर्व विषयाचा आणि या विषयाचा कुठे ताळमेळ लागतो का हे जेव्हा आपण बघायला सुरुवात करतो त्यावेळी अगदी ग्रीनहंटच्या चर्चेपासून एक प्रकारच्या सामाजिक रचनेबद्दल आणि सामाजिक रचनेमधल्या शिक्षणाच्या स्थानाबद्दल आपल्याला चिंता करायला लागेल अशा प्रकारची परिस्थिती आपल्यासमोर आल्या शिवाय रहात नाही.

सभापती महोदय, माझा नाटकाशी संबंध आहे असे म्हणतात म्हणून मला पहिल्यांदा नाटकाचीच आठवण होते. काही वर्षापूर्वी थ्री-पेनी ऑपेरा यावरुन पु.ल.देशपांडे यांचे 'तीन पैशाचा तमाशा' नावाचे एक नाटक थिएटर अकॅडमीने आणलेले होते. माननीय शिक्षण मंत्री श्री.राजेंद्र दर्डासाहेबांना मी सांगू इच्छितो की, हे पंधरा-वीस वर्षापूर्वीचे नाटक आहे.पण त्याच्यामध्ये एक अशी रचना दाखविलेली होती की, तेथे प्रशिक्षण देणारी एक मोठी शाळा आहे.त्या शाळेमध्ये प्रशिक्षण दिले जात आहे.पण ते प्रशिक्षण कशाचे आहे तर ते प्रशिक्षण भीक मागण्याचे आहे. भीक कशी मागायची,त्याच्यासाठी तयारी कशी करायची यासाठी ते प्रशिक्षण आहे त्याला पुढे विद्यापीठाचा दर्जा मिळालेला आहे असे एक उपहासात्मक वर्णन पुढे आले होते. ज्यावेळी तेथे नवीन आलेला विद्यार्थी प्राचार्यांना विचारतो की, याचे नक्की महत्व काय ते तुम्ही मला सांगा. त्यावेळी तो तुलना करुन सांगतो की, इतर ठिकाणी जे शिक्षण दिले जाते त्यामधून तुम्हाला पदवी संपादन करता येते आणि त्यानंतर मात्र तुम्हाला भीक मागावी लागते आणि जर तेवढा टप्पा वगळावयाचा असेल तर आम्ही तुम्हाला थेट भीक मागण्याचे शिक्षण देणारी शाळा सुरु केलेली आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले..

ही जर शिक्षणाची व्यवस्था असेल तर आपण याचा गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. या प्रस्तावामध्ये अनेक विषय आलेले आहेत. अर्थशास्त्राच्या भाषेत बोलावयाचे झाले तर दोन स्तरावर या सर्व विषयांचा विचार करता येईल. अर्थशास्त्रामध्ये जशी मायक्रो आणि मॅक्रो लेव्हल असते तशा पध्दतीचा विचार करुन मग त्याच्यातील क्रीडा विषयक गुण असतील,मार्क्स असतील, भाषेचे गुण असतील, या सर्व गोष्टींबद्दल सभागृहातील शिक्षक प्रतिनिधी अधिक चांगल्या पध्दतीने विचार मांडून आणखी काय करण्याची आवश्यकता आहे हे सांगू शकतील.

सभापती महोदय, माझ्या हातामध्ये एक लेख आहे त्या लेखाचे शीर्षक "शैक्षणिक माध्यम भेद नवीन सामाजिक विषमता" असे आहे. त्या लेखामध्ये एक गोष्ट नमूद केलेली आहे ती मी मुद्दाम माननीय मंत्री महोदयांच्या नजरेस आणून देतो. राष्ट्रीय स्तरावर नुकतीच एक पाहणी झाली. शिक्षणाचे माध्यम म्हणून इंग्रजी भाषेने सर्व प्रादेशिक भाषांना मागे टाकलेले आहे. गेल्या काही वर्षातील इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतच्या शिक्षणातील इंग्रजी माध्यमाच्या वाढीचे प्रमाण तब्बल 274 टक्के असून भविष्यात हे प्रमाण वाढतच जाण्याची शक्यता आहे. इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाला इतकी प्रचंड मागणी येते तेव्हा त्या मागील कारणे शोधण्याचा प्रयत्न करतो त्यावेळी एक गोष्ट निश्चितपणे पुढे येते की, इंग्रजी माध्यमांमध्ये शिकल्यामुळे पुढे जास्त संधी मिळतात आणि प्रादेशिक माध्यमांमध्ये शिकल्यामुळे कमी मिळतात अशी धारणा समाजामध्ये बळावत आहे. असा माध्यम भेद केल्यामुळे आपण असा एक नवा वर्ग भेद समाजाच्या माथी मारत आहोत काय याचा विचार करण्याची गरज आज निश्चितपणे निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, माझे शिक्षण मराठी शाळेच्या माध्यमातून झाले. माझ्या वेळेला अकरावीला मॅट्रीक परीक्षा होती. इयत्ता आठवीपासून इंग्रजी विषय होता. पुढे मी ग्रॅज्युएट, पोस्ट ग्रॅज्युएट, मॅनेजमेंट ग्रॅज्युएट इथपर्यंत जाऊ शकलो. पण मला कधीही माझे शिक्षण मराठी माध्यमातून झालेले आहे म्हणून अडचण आली नाही. मला अजूनही आठवते की, त्या काळात आठवीमध्ये पहिल्यांदा इंग्रजी शिकताना नेसेसरीचे स्पेलिंग संबंध वर्गाला कसे समजावून सांगायचे आणि ते कसे पाठ

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

करुन घ्यायचे इथपासून त्या भाषेचे बीज मनामध्ये रुजविण्याचे काम शिक्षकांनी केले आणि तरी सुध्दा मराठी माध्यमातून पुढे गेल्यामुळे पुढच्या काळात मला कधीच अडचण जाणवली नाही.

सभापती महोदय, इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरु होण्याचा आणि मराठी शाळा बंद होण्याचा एक नवीन सामाजिक विषमतेचा विषय या निमित्ताने आपल्या समोर येत आहे. त्यामध्ये पुन्हा एकदा बारकाईने पाहिले तर असे दिसते की, इंग्रजी ही भौतिक विकासाची भाषा म्हणून तिला जागतिक मान्यता आहे, तर मराठीच्या माध्यमातून शिकून मराठीचा विकास करणे ही आपली सामुदायिक जबाबदारी असेल तर त्याचा सर्वांनी मिळून विचार का करु नये ? मराठी सक्षमीकरण करु शकतो, पण ते इंग्रजी भाषेमधून शिकतात, व्यवहार करतात, ज्यांना स्वत:च्या सक्षमीकरणासाठी इंग्रजीची अधिक गरज आहे आणि त्यांना ते सुलभपणे उपलब्ध नसल्यामुळे नाईलाजाने मराठी माध्यमातून शिकावे लागते त्यामुळे मराठीचा वापर. शेवटी भाषा हे एक वाहन आहे. ज्ञान हे आपणास मिळवावयाचे आहे. ते ज्ञान मिळण्यासाठीचे जे एक वाहन आहे त्या वाहनाचा येथे निश्चितपणे विचार करण्याची आवश्यकता आहे. आपण हे बदलू शकत नाही काय ?

सभापती महोदय, मागील अधिवेशनात शासनाने पाण्याच्या संदर्भात एक ऐतिहासिक निर्णय घेतला. हा निर्णय घेताना सरकारने पाण्याला प्राधान्य क्रम ठरवून दिला. पहिले प्राधान्य पिण्यासाठी, दुसरे प्राधान्य शेतीसाठी आणि तिसरे प्राधान्य उद्योगासाठी आणि मग इतर वापरासाठी. आपल्याकडे शाळांना परवानगी देताना पहिले प्राधान्य मराठीला त्यानंतर इतर भाषेला असे आपणास करता येऊ शकेल काय ?

यानंतर कु.थोरात..

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

सभापती महोदय, मला कल्पना आहे की, अशा प्रकारचे क्रांतीकारी पाऊल टाकले तर त्याला प्रचंड विरोध होण्याची शक्यत आहे. त्याच्यामधून नवे प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. परंतु आपल्याला धडाडीने काही नवे प्रयोग करावयाचे असतील त्यासाठी हे करण्याची आवश्यकता आहे असे मला नक्कीच वाटते. सभागृहातील अनेक विषयांचा या विषयाशी कसा संबंध येतो हे सांगण्याचा मी प्रयत्न करीत होतो. मी एका आणखी विषयाची आणि शिक्षणाची तुलना करणार आहे. सार्वजनिक हिताच्या दूरगामी परिणाम करणाऱ्या बाबी समाजाच्या सदसदविवेक बुध्दीवर सोपवाव्यात का हा प्रश्न आपण आता विचारला पाहिजे. एक उदाहरण म्हणून समाजातील मुलींचे घटते प्रमाण आणि त्याचे दूरगामी सामाजिक परिणाम लक्षात घेऊन आपण गर्भलिंग निदान चाचण्यांवर निर्बंध घातलेले आहेत ते मोडणाऱ्यांसाठी कडक शिक्षेची तरतूद आहे. लिंग निवडीच्या स्वातंत्र्याचे जसे दुष्परिणाम आहेत तसचे भाषा निवडीचेही आहेत. त्यामुळे कालांतराने संपूर्ण जगाचे भाषिक आणि सांस्कृतिक सपाटीकरण होऊ शकते. त्यामुळे या माध्यम स्वातंत्र्यांच्या बाबतीत एक नवा वर्गभेद निर्माण करावयाचा नसेल तर आपल्याला मराठी भाषेच्या शाळांकडे अधिक लक्ष देण्याची गरज आहे असे मला या ठिकाणी नमूद करावेसे वाटते.

सभापती महोदय,शेवटी शिक्षण, शिक्षक, गुणवत्ता, शिक्षणाचा दर्जा, शहरातील गरज, खेडयातील गरज,ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांची असलेली अवस्था याचा विचार करण्याची गरज आहे. लॅपटॉपपेक्षा वेगळे असे एक नवीन उपकरण आलेले आहे ज्याला आपण टॅब्लेट असे म्हणतो ते लहानातील लहान शाळेतील विद्यार्थ्यांपर्यंत न्यावयाचे आहे. विज्ञानाच्या माध्यमातून गुणवत्तेसाठी थेट ग्रामीण भागापर्यंत व्हर्च्युअल क्लासरुम किंवा इतर माध्यमातून करता येणे शक्य आहे ते केले तर त्याचा उपयोग होईल. माझे सहकारी सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी सांगितल्या प्रमाणे पूर्वी अनेक व्यवसायाच्या बाबतीत अशी म्हण होती की, डॉक्टरचा मुलगा डॉक्टर होतो, इंजिनियरचा मुलगा इंजिनियर होतो पण यापुढे शिक्षकाचा मुलगा शिक्षकच होईल असे सांगता येणार नाही. आपल्या आई-वडिलांची अवस्था बघून जर त्याला असे वाटले की, आपले आई किंवा वडील हे चुकीच्या व्यवसायात होते त्यामुळे आपल्याला हा ट्रॅक बदलण्याची गरज आहे. अशी अवस्था निर्माण होण्याची शक्यता आहे. एकेकाळी असंख्य मराठी साहित्यातून शिक्षकांची वर्णने ऐकलेली आहेत. मग ते पु.ल. देशपांडे यांचे चितळे मास्तर असतील किंवा अन्य कोणीही

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले. . . .

असतील या सामाज घडविणाऱ्या शिक्षक वर्गाची समाजामध्ये जी प्रतिष्ठा होती ती शिक्षकांची समाजातील प्रतिष्ठा आज शिल्लक आहे का? याचा विचार करण्याची गरज निर्माण झालेली आहे. मध्यंतरी मी एका राजकीय सभेच्या भाषणामध्ये एक उल्लेख ऐकला होता. ग्रामीण भागात प्रचारासाठी जावयाचे असते त्यावेळी मोठे नेते हेलिकॉप्टरमधून जातात त्यामुळे जे गाव आहे त्या गावामध्ये कुठे उतरावयचे आहे हे विचारावयाचे असेल तर असा एक विचार पुढे आला की, त्या गावात बाकी सगळया झोपडया किंवा कौलारु घरे दिसतील पण जे स्लॅब टाकलेले घर असेल ते निश्चितपणे शिक्षकाचेच असू शकेल. शिक्षकाचा पगार जो आता मान्य झालेला आहे. त्या पगाराची समृध्दी, ग्रामीण भागामध्ये त्याचे होणारे खर्च यामधून त्याच्याजवळ तयार होणारे सरप्लस उत्पन्न, त्या उत्पन्नातून त्याचे सुरु होणारे इतर व्यवसाय किंवा चक्क सावकारी अशा केसेस आपल्या दृष्टीस पडतात त्यामुळे शिक्षकाला शिक्षणाशिवाय इतर जी काही कामे आहेत ती त्याला शिक्षणाच्या प्रवाहात येण्याच्या दृष्टीने उपयोगी पडतील अशा पध्दतीने कशी देता येतील याकडे शासनाने लक्ष देण्याचा प्रयत्न केला तर यामधून या प्रश्नाची सोडवणूक करण्याच्या दृष्टीने निश्चितपणे पुढचे पाऊल टाकता येईल.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले .....

सभापती महोदय, मला असे वाटते की, फार मोठ्या वेगाने एका बाजार संस्कृतीचे आक्रमण आपल्या सगळ्या समाजावर होत आहे. आपल्या राज्याचा जो आर्थिक पाहणी अहवाल प्रसिध्द झाला त्यामध्ये आपल्या राज्याची लोकसंख्या किती आणि राज्यातील मोबाईल धारकांची संख्या किती याची तुलना आलेली आहे. त्या बाबतीत आपण जवळजवळ 100 टक्के उद्दिष्ट पूर्ण केले आहे की काय असे वाटण्यासारखी संख्या आहे. पण त्यातील गोम अशी आहे की, अगदी 10 रुपये किमतीचे प्रीपेड कार्ड मिळू शकते आणि 10 रुपयांचे कार्ड टाकून दिल्यानंतर त्याची एक नंबर म्हणून नोंद होते. म्हणजे ते जे आकडे आहेत त्यामध्ये संख्यात्मक वाढ होईल. त्या पध्दतीने शाळांमधील विद्यार्थी वाढतील पण गुणात्मक वाढ काय होणार आहे त्या दृष्टीनेही आता विचार करण्याची गरज आहे असे मला वाटते. जे अनेक प्रश्न या प्रस्तावामध्ये मांडलेले आहेत ते सगळे प्रश्न एका दृष्टीने महत्वाचे आहेतच आणि ते सोडविण्याचीही जबाबदारी निश्चितपणे आपली आहे. परंतु आजकालच्या पध्दतीप्रमाणे सगळ्याच योजनांमध्ये बोओटी नावाचा जो बी.टी. कॉटन सारखा प्रकार आलेला आहे तसा बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा असा प्रयोग शिक्षणाच्या बाबतीत कोठल्याही परिस्थितीत येऊ नये, अशा पध्दतीची भावना आपल्याला तयार करावी लागेल. त्यामुळे समाजव्यवस्थेमध्ये एक नवीन विषमता जर निर्माण होऊ पाहात असेल तर त्याचा विचार करण्याची गरज आहे. आपण खूप चांगल्या गोष्टी करण्यासाठी सक्षम आहात. आपल्याजवळ विचार आहे, आपल्याजवळ दृष्टी आहे, आपले शासनही प्रगतिशील मार्गाने समाजामध्ये समानता आणि समान संधी निर्माण करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

सभापती महोदय, आजकाल असे व्हावयास लागले आहे की, कोणत्या शाळेत शिकल्यानंतर कोणत्या पुढच्या परीक्षेला जाता येईल हे पाहिले जाते. शालेय स्तरावर अजूनपर्यंत ते आले नसावे अशी माझी एक भाबडी समजूत आहे. कारण आज महाविद्यालयामध्ये गेल्यानंतर आपल्याला असे निश्चितपणे जाणवते की, महाविद्यालयात फक्त हजेरीपट पूर्ण करुन देण्यासाठी यावयाचे. बाकी महाविद्यालयातील वर्ग रिकामे असतात, सगळी मुले बाहेर असतात. अजून तरी शाळांमध्ये ही अवस्था आलेली नाही. मुले अजूनही वर्गात बसायला तयार आहेत. शिक्षक शिकविण्यास तयार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले .....

आहेत. पण अडचण अशी आहे की, जी साधनसामुग्री आवश्यक आहे ती त्यांच्यापर्यंत योग्य रीतीने पोहोचली पाहिजे. आपल्याला समाजात सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक असलेले वेतन मिळत असेल तर आपल्याला समाजाने पुढची पिढी घडविण्याची जी जबाबदारी दिलेली आहे ती आपण पार पाडली पाहिजे. हे राष्ट्र उभारणीचे सगळ्यात मोठे आणि सगळ्यात महत्वाचे कार्य करण्यासाठी शिक्षण क्षेत्राचे महत्व लक्षात घेऊन, या सगळ्या समस्यांकडे लक्ष देऊन शिक्षण क्षेत्राला जर एक नवा विचार या निमित्ताने आपल्याला देता आला तर आपण तो जरुर द्याल अशी आम्हाला खात्री आहे. महाराष्ट्र शासन देशामध्ये शिक्षणाच्या नावलौकिकामध्ये अग्रस्थानी आहे आणि ते सगळ्याच बाबतीत शिक्षण क्षेत्रामध्ये पुढे जाईल.

सभापती महोदय, जाता जाता फक्त एकाच गोष्टीचा उल्लेख करतो. शिक्षणाची जी एक फॉर्मल पध्दत आहे, ज्या पध्दतीने शिकवावयास पाहिजे, मग त्याचे काही धडे असतील त्याप्रमाणे ते शिकवत असतील. परंतु त्या चौकटीच्या बाहेर जाऊन बऱ्याच गोष्टी करता येण्याची शक्यता आहे. मला आठवते की, जसे आपण वेगवेगळ्या वक्त्यांना बोलवून वेगवेगळ्या विषयावर त्यांच्या व्याख्यानमाला आयोजित करतो त्या पध्दतीने आम्ही पाच सहा वर्षापूर्वी नाशिकमध्ये एका सांस्कृतिक संस्थेतर्फे असे आयोजन केले होते. आम्हाला वाटले की, आपण कादंबरी, नाटक, सिनेमा, संगीत या सगळ्या विषयांवर बोलतो अशाच पध्दतीने आपण एखाद्या शास्त्रज्ञाला बोलवावे आणि फक्त शाळेतील विद्यार्थ्यांसाठी त्यांचे भाषण ठेवावे असे ठरविले. शास्त्रज्ञांची तीन दिवसांची व्याख्यानमाला ठेवली तर काय होऊ शकेल, हा प्रयोग आम्ही करुन बघितला. यासाठी श्री. जयंत नारळीकर यांना आम्ही नाशिकमध्ये बोलविले होते. त्यांनी विज्ञानाचे तीन विषय त्या विद्यार्थ्यांना समजतील अशा भाषेमध्ये मांडले आणि जमलेल्या मुलांना एक अपील केले की, माझ्या भाषणानंतर तुम्ही मला प्रश्न विचारावायचे पण ते प्रश्न मला या ठिकाणी उभे राहून न विचारता ज्याला जो प्रश्न पडला असेल तो त्याने एका पोस्टकार्डवर प्रश्न लिहून माझ्याकडे पाठवावा.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

या मुलांचे तिन्ही दिवसांचे प्रश्न त्यांच्या संख्येच्या दुपटीने पोस्ट कार्डाच्या माध्यमातून डॉ.जयंत नारळीकर यांच्याकडे जमा झाले. विज्ञानाबद्दल त्यांची जिज्ञासा होती, ती जिज्ञासा पूर्ण करण्यासाठी पुढील 3 महिन्यांनी डॉ.नारळीकर यांनी त्या सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या शंकांचे निरसन करणारी उत्तरे पाठविली. एखादा असा प्रयोग होऊ शकत असेल करण्यास काही हरकत नाही. अशाच काही योजनांची व नव्या संकल्पनांची मांडणी करावी.

मराठीचे योग्य स्थान निर्माण करुन ती ज्ञान भाषा म्हणून समृध्द करुन आपण ही सामाजिक विषमता कायमची संपविण्यासाठी या माध्यमाचा वापर करावा. या चर्चेतून काही तरी नवीन घडेल, नवीन अमृत बाहेर येईल असा मी विश्वास व्यक्त करतो, मला आपण बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानून येथेच थांबतो.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, शिक्षणाच्या महत्वाच्या विषयावर सभागृहात चर्चा सुरु आहे, या चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, एका बाजूला कायदा व सुव्यवस्था या विषयावर प्रत्येक अधिवेशनामध्ये प्रस्ताव येतात, त्यावर दिवसभर चर्चा केली जाते. परंतु 7-8 वर्षानंतर शिक्षणाच्या विषयावर आज सभागृहात उपस्थित करण्यात आली आहे. मला असे वाटते की, या चर्चेत सर्व सन्माननीय सदस्यांना सहभागी होता आले पाहिजे. शिक्षणासाठी शासन भरपूर खर्च करीत आहे असे शासनाचे म्हणणे आहे. पण प्रत्यक्षात आकडेवारी पाहिली तर आपल्याला आश्चर्य वाटेल. छोटाशा क्यूबा या देशाचे उदाहरण घेतले तर वस्तुस्थिती कळू शकेल. त्या देशात जीडीपीच्या आधारे शिक्षणावर 18.7 टक्के खर्च केला जातो आणि भारतामध्ये 4.1 टक्के इतका खर्च केला जातो. शिक्षण हे अतिशय महत्वाचे आहे असे मानणे आवश्यक आहे.

शिक्षणामुळे समाजातील अनेक प्रश्न संपणार आहेत असे म्हणणार नाही. मग कुपोषण असेल, बालमृत्यू असेल, मुलींचे घटते प्रमाण असेल, वाढती गुन्हेगारी असेल या सर्व विषयांची सोडवणूक करण्यासाठी शासन खर्च करीत आहे. त्याच्या उलट शिक्षणावर अधिक खर्च केला, एकूण समाज सुशिक्षित झाला, सुसंस्कृत झाला तर कुपोषण, बालमृत्यू, मुलींचे घटते प्रमाण, वाढती गुन्हेगारी हे जे विषय आहेत ते कमी होतील. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या 10 वर्षामध्येच मोफत व सक्तीचे शिक्षणाचा मार्गदर्शक तत्वामध्ये समावेश करण्यात आला होता. या दोन्ही बाबी मार्गदर्शक तत्वामधून मूलभूत अधिकारामध्ये येतील अशी 10 वर्षामध्येच अपेक्षा होती. परंतु प्रत्यक्षात ते होण्यासाठी 2002 साल उजाडले. 2002 मध्ये घटनेच्या 86 व्या दुरुस्तीद्वारे शिक्षणाचा जो मूलभूत अधिकार आहे त्याला देशामध्ये मान्यता मिळाली. त्यानंतर त्याचा कायदा होण्यासाठी 2009 साल उजाडले. एखाद्या विषयाकडे आपण किती दुर्लक्ष करतो त्याचे हे मोठे उदाहरण आहे. दिनांक 1.4.2010 मध्ये हा कायदा देशभर लागू झाला. त्यामध्ये बालकांना मोफत शिक्षण, पण ते देण्याची शासनाला सक्ती असे या कायद्याचे शब्दांमध्ये विश्लेषण करता येईल. शिक्षण देण्याच्या सक्तीमध्ये केवळ इच्छा असून भागणार नाही तर त्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्च केला पाहिजे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

श्री.चंद्रकांत पाटील....

सभापती महोदय, याबाबतीतील उदाहरण द्यावयाचे झाल्यास सन 2011-12 या वर्षामध्ये केंद्र सरकारने सक्तीचे व मोफत शिक्षण देण्यासाठी सर्वशिक्षा अभियानाद्वारे 2500 कोटींची तरतूद केली होती. ती पुढील वर्षात 2,188 कोटी रुपये इतकी करण्यात आली. हे आपले कर्तव्य आहे असे शासनाला वाटत नाही. उलट घटनेने, कायद्याने केलेली ही सक्ती आहे असे वाटते. त्यामुळे केंद्र सरकारने शिक्षणावरील खर्च वाढविण्याऐवजी मागील वर्षापेक्षा जवळपास 300 कोटींनी कमी केला. त्यातील राज्य सरकारचा हिस्सा पाहिला तर सन 2011-12 मध्ये 780 कोटी इतका होता. पुढील वर्षी 779 कोटी इतका केला म्हणजे 20 कोटींनी कमी केला. यासाठी आवश्यक असलेला खर्च केला, यासाठी आवश्यक असलेल्या किमान सुविधा केल्या अशी शासनाची धारणा असेल. पण या किमान सुविधा नसल्यामुळेच शाळेतील गळतीचे प्रमाण वाढत चाललेले आहे. गळतीचे प्रमाण किती प्रमाण वाढले आहे त्यासाठी मी काही आकडेवारी देऊ इच्छितो. हे कोणत्या राजकीय पक्षाने सत्ताधारी पक्षावर केलेले आरोपाचे आकडे नाहीत. मानव संसाधन मंत्रालयाने पंतप्रधान कार्यालयाला दिनांक 31 डिसेंबर, 2011 रोजी संपलेल्या तिमाहीचा अहवाल पाठविला आहे. त्या अहवालात पहिली ते पाचवी पर्यंत गळतीचे प्रमाण 21.31 टक्के इतके असल्याचे नमूद केलेले आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

1ली ते 8वी च्या स्तरावर गळतीचे प्रमाण 25.88 टक्के आहे. एकूण शालेय विद्यार्थ्यांची संख्या ही 2 कोटी 24लाख 74 हजार 594 इतकी मानली तर ही गळतीची संख्या 40 लाखापेक्षा जास्त होईल. आपण शाळाबाह्य विद्यार्थ्यांची घोषित केलेली संख्या 65046 आहे. एका बाजूला आपण हे गळतीचे प्रमाण कमी करायचे म्हणत असताना त्याची खरी आकडवारी आपण मान्य करायला तयार नाही. केन्द्र सरकारने पंतप्रधानांना लिहिलेल्या पत्रातील आकडेवारी 21.31 टक्के आहे. हे गळतीचे प्रमाण कमी व्हायचे असेल तर मला असे वाटते की शाळा ह्या अधिक जवळ अंतरावर येण्याची आवश्यकता आहे. आता नवीन बृहत आराखडा तयार करीत आहेत. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, 1ली ते 5वी पर्यन्तची शाळा 1 कि.मी.च्या परिसरात असेल, 6वी ते 8वी पर्यंतची शाळा 3 कि.मी. परिसरात उपलब्ध करुन देण्यात येईल आणि एवढया अंतरावर शाळा उपलब्ध नसल्यास वाहतूक व्यवस्था करण्यात येईल. हा किती आदर्श असा निकष आहे. शाळा जवळ देता आली नाही तर शासन वाहतुकीची व्यवस्था करणार आहे. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, सरकारच्या वतीने वाहतुकीची व्यवस्था कधीच होऊ शकणार नाही. एक मात्र निश्चित की, शाळा जवळ दिली गेली नाही तर हे गळतीचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढत जाईल.

सभापती महोदय, एक महत्वाचा मुद्दा मला माननीय शिक्षणमंत्री महोदयांच्या लक्षात आणून द्यायचा आहे तो म्हणजे हा जो सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार आहे त्यामध्ये मुलांचा 6 ते 14 असा एक वयोगट करण्यात आलेला आहे. या वयोगटामध्ये मुले 1ली ते 8वी पर्यंतचे शिक्षण घेतात. आपण शालेय शिक्षणाची केलेली व्यवस्था 1ली ते 7वी अशी आहे आणि 8वी नंतर माध्यमिक शिक्षणाची व्यवस्था केलेली आहे. माझा मुद्दा असा आहे की, आपण जी 1ली ते 7वी अशी शिक्षण व्यवस्था केलेली आहे ती 1ली ते 8वी अशी करणे आवश्यक आहे जेणेकरुन 6 ते 14 वयोगटातील विद्यार्थ्यांना 1ली ते 8वी पर्यन्त मोफत आणि सक्तीचे शिक्षण मिळेल. तेव्हा यादृष्टीने आपण विचार केला पाहिजे. आपल्याकडे 1ली ते 4थी, 4थी ते 7वी, 8वी ते 10वी आणि त्यानंतर 11वी आणि 12वी असे युनिटस् तयार झालेले आहेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील...

सभापती महोदय, अपंग मुलांच्या संदर्भात या ठिकाणी मला मुद्दा उपस्थित करावयाचा आहे. अपंग मुलांच्या शिक्षणाच्या बाबतीत शासनाने कोणताही विचार केलेला नाही. महाराष्ट्रामध्ये अपंग मुलांची संख्या 3 लाख 86 हजार 19 इतकी असल्याचे शासनाच्या एका अहवालात नमूद केलेले आहे. ही अपंग मुले वेगळया शाळेत न शिकता इतर मुलांसमवेत एकत्रितपणे शिकली तर ती अधिक प्रगत होतील म्हणून आपण त्यांना नियमित शाळेत प्रवेश देण्यास सुरवात केली. हा प्रवेश देताना अपंग मुलांसाठी कोणकोणत्या सुविधा लागतात त्याचा मात्र विचार केला गेला नाही. अपंग मुलांसाठी शाळेत केवळ रॅम्प उपलब्ध करणे हे त्यांच्यासाठी पुरेसे नाही. शाळेत अपंग मुले शिकणार आहेत हे गृहीत धरुन शाळेच्या इमारतीच्या स्ट्रक्चर पासून आतील लागणारे फर्निचर आणि अन्य सुविधांची व्यवस्था केली पाहिजे. अपंग मुलांसाठी वेगळी शाळा करण्याचा निर्णय घेत असताना सर्वच शाळांमध्ये अपंग मुलांसाठी आवश्यक असणा-या सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत हे मला येथे आवर्जून नमूद करावयाचे आहे.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये बिहार राज्याचा वारंवार उल्लेख करण्यात आला की बिहार राज्यातील मुले ही स्पर्धापरीक्षामध्ये पुढे असतात, युपीएससीच्या परीक्षामध्ये त्यांचा टक्का जास्त असतो. याचे कारण त्या मुलांना प्राथमिक शिक्षणा पासूनच भविष्यात कोण कोणत्या गोष्टी कराव्या लागणार आहेत, कोणत्या गोष्टी आवश्यक आहे याचे शिक्षण दिले जाते. बिहार राज्यातील अभ्यासक्रम पाहिला तर प्राथमिक शिक्षणापासूनच विद्यार्थ्यांची स्पर्धा परीक्षांबाबतची थोडी थोडी तयारी करुन घेण्यास सुरुवात होते. त्यामुळे सहाजिकच ग्रॅज्युएशन झाल्यानंतर पोस्ट ग्रॅज्युएशन झाल्यानंतर जेव्हा तो विद्यार्थी स्पर्धा परीक्षामध्ये उतरतो त्यावेळी तो इतरांच्या पुढे असतो.मला असे वाटते की, आपला जो वर्षानुवर्षाचा ठरलेला अभ्यासक्रम आहे त्यामध्ये स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक असणारे ज्ञान आत्मसात करणारे विषय असले पाहिजेत आणि ही सुरुवात प्राथमिक शिक्षणापासूनच केली गेली पाहिजे. ग्रामीण भागातील शिक्षणाचा विचार केला तर आपण खूपच मागे पडतो.

अभिनव बिंद्राने ऑलंपिक स्पर्धांमध्ये पहिले सुवर्णपदक मिळवले त्यावेळी खूप आनंद झाला. देशभर त्याचे कौतुक झाले. पण या ऑलंपिक स्पर्धा जेव्हा पासून सुरु झाल्या तेव्हा पासून आपण पाहिले तर किती तरी छोट्या छोट्या राष्ट्रांनी मिळविलेली सुवर्ण पदके ही काही शे आणि हजाराच्या आसपास आहेत. चीनमध्ये तर शालेय शिक्षणापासूनच क्रीडा शिक्षण दिले जाते

...नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यामुळे मोठ्या प्रमाणावर ऑलिम्पिकमध्ये चीनमधील मुले पुढे येतात. प्रसंगी अभ्यासक्रमामध्ये सुध्दा अशा काही गोष्टीमध्ये आपण मागे पडतो त्या अंतर्भूत करु शकलो तर मोठया प्रमाणावर ज्या गोष्टी मुलांमध्ये कमी आहेत त्या सुधारु शकतो. या गोष्टी करण्यासाठी आवश्यक असणारा निधी उपलब्ध करुन दिला पाहिजे. आतापर्यंत निधी देणे हे ऐच्छिक होते. शासनाला वाटले तर निधी दिला जायचा. आता घटनेने केंद्र सरकारला कायदा करायला लावला आहे. या कायद्यामध्ये 6 ते 14 वयोगटातील मुलांना मोफत व सक्तीचे शिक्षण द्यायचे आहे. त्यासाठी निधी उपलब्ध करुन देणे ही सरकारची जबाबदारी आहे. ती पार पाडण्यापासून सरकारला पळ काढता येणार नाही. ही सुविधा उपलब्ध करुन दिल्याशिवाय गत्यंतर नाही.

अनेक माननीय सदस्यांनी शिक्षकांचे पगार, त्यांच्या सुविधा याबद्दलचे मुद्दे मांडले आहेत. माझ या मते शिक्षक समाधानी वृत्तीचा असणे आवश्यक आहे. सभापती महोदयांनी त्यांच्या भाषणामध्ये उल्लेख केला की, मोठया प्रमाणावर टयूशन घेतली जातात. ते प्रमाण यापुढे राहील असे वाटत नाही. मोठया प्रमाणावर पूर्वी शिक्षकांना पगार नव्हते. पगार कमी असल्यामुळे शिक्षकांना खाजगी शिकवण्या घ्याव्या लागत असत. कोचिंग क्लासमध्ये शिकवावे लागे. सहाव्या वेतन आयोगामुळे शिक्षकांचे पगार काही प्रमाणात वाढले आहेत. त्या प्रमाणात शिक्षण संस्थांमध्ये सोयी उपलब्ध करुन दिल्या तर खूप सुधारणा होईल. सरकारने आर्थिक नियोजन करीत असताना महसुलातील फार मोठा भाग उपलब्ध करुन देता येत नसला तरी महत्वाच्या लोकांचा सहभाग घेता येईल. कॉर्पोरेटचा सहभाग वाढवावा लागेल. शिक्षणावर करावा लागणारा खर्च आणि बजेटमधून उपलब्ध होणारा निधी यामध्ये खूप तूट असते. बजेटमधून येणारा निधी मर्यादित असेल तर शिक्षणाकडे डायव्हर्ट होणारा निधी मर्यादित राहील. यासाठी बिझिनेस एम्पायरना आवाहन केले तर खूप मदत होऊ शकते. आज शाळा चालविणाऱ्या सस्था मोठया प्रमाणात पी.आर.करतात, लोकांकडून पैसे गोळा करतात. महाराष्ट्रातील शाळांसाठी वर्षाला लागणारा निधी किती आणि शासन किती उपलब्ध करुन देते यातील फरक लक्षात घेतला तर कॉर्पोरेट सेक्टरचे सहकार्य घ्यावेच लागेल. आता शाळांमधील सोयी सुविधांची आकडेवारी वाचून दाखविण्यास वेळ नाही. आज किती शाळांमध्ये मुलींसाठी स्वच्छतागृहाची सोय नाही. वर्ग नाहीत. मुख्याध्यापकांना बसायला स्वतंत्र कॅबिन नाही. अधिक पैसा येण्याबाबत विचार करावा, आवश्यक असणारा पैसा उपलब्ध देण्याचा विचार करावा एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

--- ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, शिक्षण हे आर्थिक विकासाचे साधन आहे. महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती करण्याचा कार्यक्रम जितका महत्वाचा आहे तितकाच शिक्षणाचा कार्यक्रम महाराष्ट्रात महत्वाचा आहे. "शिक्षणाचा प्रश्न महाराष्ट्राच्या आजच्या संदर्भात अत्यंत क्रांतिकारी प्रश्न आहे असे मी मानतो" हे उद्गार महाराष्ट्राचे शिल्पकार स्व.यशवंतराव चव्हाण यांचे आहेत. त्यांची जन्मशताब्दी आपण साजरी करीत आहोत. त्यांनी शिक्षणाबाबत किती महत्वाचे उद्गार काढले होते, हे आपल्याला मी त्यांचे जे वाक्य उच्चारले त्यावरुन लक्षात येईल. त्यांनी असे म्हटले होते की, "The best Leaders of India are developed in the classrooms." वर्गावर्गातून देशाचे नेतृत्व आकार घेत असते. म्हणून विशेषकरुन शाळांना आणि शिक्षणाला महत्व आहे. श्री.नेल्सन मंडेला यांनी म्हटले आहे की, "Education is the most powerful weapon with which you can change the world." जगाला बदलण्याची ताकद शिक्षणामध्ये आहे. म्हणून शिक्षणाकडे बघत असताना राज्य सरकारने आणि मंत्री महोदयांनी सुध्दा तितक्याच गांभीर्याने पाहिले पाहिजे. मी सातत्याने शिक्षणमंत्र्यांचे अभिनंदन यासाठी करतो की, या राज्यामध्ये शिक्षकाला आणि विद्यार्थ्यांना आपल्या राज्याचे पूर्वीचे शिक्षणमंत्री कोण होते, एखाद्याचे नाव सांगा. तर विद्यार्थी आणि शिक्षक सुध्दा "चौधरी" असे नाव घेतात.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

तालिका सभापती (श्री. विनायक मेटे) : सभागृहाची कामकाजाची वेळ सायंकाळी 6.45 पर्यंत ठरलेली होती. सभागृहाची वेळ सायंकाळी 7.15 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे. या वेळेत सन्माननीय सदस्य श्री. विक्रम काळे यांचे भाषण संपल्यानंतर आणखी दोन सन्माननीय सदस्यांची भाषणे होतील.

श्री. विक्रम काळे : महोदय, त्यानंतर योगायोगाने मध्ये बदल झाले आणि पुन्हा जर विद्यार्थ्यांना विचारले की, या राज्याचे शिक्षण मंत्री कोण होते तर ते जरुर मंत्री महोदय श्री. राजेंद्रबाबू यांचे नावे घेतील याबद्दल माझ्या मनात तिळमात्र शंका नाही असे कार्यक्षम मंत्री आम्हाला लाभलेले आहेत याचा मला आनंद वाटतो. शालेय शिक्षण ज्याला म्हणतो तो एक विभाग, उच्च शिक्षण, वैद्यकीय शिक्षण, आश्रमशाळांमधून दिले जाणारे शिक्षण अशा वेगवेगळ्या विभागांमध्ये विभागले गेले आहे. त्यात प्रामुख्याने शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण तसेच वैद्यकीय शिक्षण खात्याबरोबरच आदिवासी, सामाजिक न्याय व ग्रामविकास विभागांचाही संबंध येतो. मुख्यत्वेकरुन शालेय जीवनातील महत्वाचा भाग कुठला असेल तर इयत्ता पहिली ते दहावी जी तीन भागात विभागली आहे. त्यात पहिली ते चवथी, पाचवी ते दहावी आणि अकरावी-बारावी. पूर्वी पहिली ते सातवी हे प्राथमिक शिक्षणामध्ये येत होते पण त्यात आता बदल झालेला आहे. विरोधी पक्षाकडून सातत्याने भडिमार होतो की, महाराष्ट्र शासन मराठीची गळचेपी करीत आहे, मराठी शाळांना परवानगी देत नाही. पण वस्तुस्थिती तशी नाही. आम्ही रुट लेव्हलवर काम करतो, ग्रामीण भागात काम करतो त्यामुळे आम्हाला ही वस्तुस्थिती माहीत आहे. मी तर असेही म्हणेन की, शाळा देण्याची आता गरजच नाही. त्याचे कारण म्हणजे अनेक शाळा बंद झालेल्या आहेत हे पट पडताळणीवरुन मंत्री महोदयांच्याही लक्षात आले असेलच. राज्यात जवळपास 75466 प्राथमिक शाळा सुरु असून त्यापैकी 65324 मराठी माध्यमाच्या शाळा आहेत. तसेच 19767 माध्यमिक शाळा सुरु असून त्यात इंग्रजी माध्यमाच्या 5213 प्राथमिक शाळा आणि 2500 माध्यमिक शाळा सुरु आहे त्यातील विद्यार्थ्यांची आकडेवारी लक्षात घेतली तर पहिली ते आठवीपर्यंत आपण प्राथमिक शाळेचे स्वरुप दिले आहे त्यात 16 लाख विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, त्यापैकी 53 टक्के मुले आणि 47 टक्के मुली आहेत. जवळपास हे प्रमाण आता जुळत आले आहे. 50:50 टक्क्याचा रेश्यो पूर्ण होत आहे, हे महाराष्ट्र राज्याच्या विकासाच्या दृष्टीने तसेच शैक्षणिक गुणवत्तेच्या दृष्टीने अतिशय

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

महत्वाचे पाऊल म्हणावे लागेल. एक काळ असा होता की, फक्त मुलांनाच शिक्षण दिले जात होते, मुलींना शिक्षण दिले जात नव्हते. म्हणून ज्यांचे शाळा तसेच महाविद्यालयांमध्ये प्रेमाने पूजन केले जाते, ज्यांचा आदर्श मुलांसमोर ठेवला जातो त्या सावित्रीबाई फुले यांनी शैक्षणिक क्षेत्रात सामाजिक क्रांति घडविली. ती मुळात ग्रामीण भागात व खेड्यात ही क्रांति घडविली. अनेक शाळांमध्ये आज मुलींची संख्या मुलांपेक्षा जास्त दिसून येते हे नवीन चित्र आज बघायला मिळते याचा मनापासूनन आनंद वाटतो. त्यादृष्टीने तत्कालीन मुख्यमंत्री श्री. अशोकराव चव्हाण आणि शिक्षण मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांचे मी मनापासून आभार मानतो. त्यांच्या काळात हा निर्णय झालेला असून कोणत्याही माध्यमाची शाळा असो त्यांना तो लागू आहे असा महत्वाचा निर्णय घेण्यात आला. त्याचा शिक्षक आमदार म्हणून मी सातत्याने पाठपुरावा करीत होतो. मी त्यांना विनंती केली की, बृहत आराखडा तयार करावा आणि जरुर असेल तेथेच शाळा द्या, आमचा विरोध नाही पण एखाद्या गावात किती शाळा असाव्यात याला मर्यादा ठेवाव्यात. एका खेड्यात एकच शाळा चालू शकते.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे.....

छोटयाशा गावात एकच मराठी माध्यमाची शाळू चालू शकेल मग ती जिल्हा शाळा जिल्हा परिषदेची असो किंवा खाजगी असो. परंतु आज प्राथमिक शिक्षण अर्धे आपल्याकडे असते व अर्धे ग्रामविकास विभागाकडे आहे. याचा अर्थ नियम आपण ठरवायचे परंतु बदल्या करणे, श्रेणी देणे हे याचे काम ग्रामविकास विभाग करीत असतो. जवळपास 75 टक्के शिक्षकांचा कंट्रोल ग्रामविकास विभागाकडे असून नियम करण्याचे काम आपल्याकडे आहे. नियम आपण करायचे व अंमलबजावणी ग्रामविकास विभागाने करावयाची हा मेळ काही बसत नाही त्यामुळे सर्व प्राथमिक शिक्षण एका छत्राखाली आणणे आवश्यक आहे. पूर्ण प्राथमिक शिक्षण ग्रामविकास विभागाकडून काढून शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारीत आणण्याच्या संदर्भात निर्णय घेणे गरजेचे आहे अशी या निमित्ताने माझी मागणी आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाने बृहत आराखडा तयार करण्याचे काम केलेले आहे. मराठी शाळा द्या म्हणून माननीय मंत्री महोदयांवर सारखे दडपण येत होते. बृहत आराखडयाच्या संदर्भात आपण सॅटेलाईट पारदर्शकता ठेवली आहे. शाळा मागण्यासाठी कोणी आमदारांचे, मत्र्यांचे पत्र आणत असतो. शेवटी मंत्री आणि आमदारांना पत्र द्यावेच लागते. पत्र दिले नाही तर लोक म्हणतात आमदार साधे पत्रही देत नाही. त्यामुळे आपल्याला पत्र द्यावेच लागते.

सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, नवीन शाळा देत असतांना त्यासंदर्भात निकष ठरवले गेले पाहिजेत. शहरी भागात शाळेची मागणी असेल तर त्यांच्याकडे अमुक एवढी जागा असली पाहिजे, इमारत बांधण्यासाठी संस्थेकडे फंड असला पाहिजे. फर्निचर, लॅबरोटरी, संगणक या सर्व भौतिक सुविधा पुरवण्यासाठी पैसे असले पाहिजे. ज्या संस्थांकडे अशा भौतिक कामासाठी निधी असेल तसेच यासंदर्भात फिक्स डिपॉझिट असल्याशिवाय शाळेला मान्यता देऊ नये. बँक बॅलन्स म्हटले तर इतर लोकांच्या खात्यातील पैसे जमा करतात व दुस-या दिवशी परत देऊन टाकतात त्यामुळे एफडीआर असल्याशिवाय शाळेला मान्यता देता कामा नये. तसेच शाळेला मान्यता देतांना त्या संस्थेची गुणवत्ता कशी आहे, रेप्युटेशन कसे आहे याचाही विचार शाळेला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे.....

मान्यता देण्यासाठी झाला तर ख-या अर्थाने गुणवत्तेची अंमलबजावणी होऊ शकेल त्यामुळे भविष्यामध्ये शाळेला मान्यता देण्याचे धोरण या प्रकारे शासनाने अवलंबवावे अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, एखाद्या ग्रामीण भागाचे उदाहरण घेतले, सिल्लोड तालुक्यातील पाथरीचे उदाहरण घेतले तर एका गावात एकच शाळा चालू शकते याची माहिती आपल्याला सुध्दा आहे. आता प्रत्येक गावामध्ये शाळा झालेल्या आहेत. पूर्वी सात आठ गावांपैकी एकाच गावात हायस्कूल होते त्यामुळे सात आठ गावातील मुले शिक्षणासाठी हायस्कूलमध्ये जात असत. परंतु आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. सर्व शिक्षा अभियानामुळे वाडी-तांडयांपर्यंत शाळा जाऊन पोहचल्या आहेत. आता असे होते की, एखाद्या गावात पहिली ते चवथी पर्यंतची जिल्हा परिषदेची शाळा असेल किंवा पहिली ते सातवी पर्यंतची प्राथमिक शाळा असेल आणि त्याच गावात खाजगी संस्थेची आठवी ते दहावी पर्यंतची शाळा असेल तर त्या गावातील पहिली ते दहावी पर्यंतच्या शिक्षणाची गरज पूर्ण झालेली असतांना विनाकारण जिल्हा परिषदेच्या वतीने पाचवीचा,आठवीचा वर्ग तेथे उघडला जातो व त्यामुळे कोणत्याही शाळांना पुरेसे विद्यार्थी मिळत नसल्यामुळे विद्यार्थी पळवापळवीचे प्रकार सुरु होतात व परिणामी शिक्षक-शिक्षकांमध्ये वाद सुरु होतात. त्यामुळे ज्या गावात पहिली ते दहावी पर्यंतच्या शिक्षणाची सोय झालेली असेल अशा ठिकाणी नवीन शाळांना मान्यता देता कामा नये. शेवटी यामध्ये सरकारचाच पैसा खर्च होत असतो. अशा प्रकारचा निर्णय राबविण्यासाठी काहीही पैसे लागणार नाहीत. त्यामुळे यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी निर्णय घ्यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, मला असे सांगावयाचे आहे की, इन्टेक प्रकार व्यवस्थित केला तर शासनाचे लाखो-करोडो रुपये वाचू शकतील. शाळांच्या तुकडया दिल्या नाही, तुकडयांना शासन मान्यताच देत नाही अशी 7-8 वर्षापासून बोंब चालली आहे. यासंदर्भात मला असे वाटते की, ज्या पध्दतीने डी.एड. ला इन्टेक आहे...

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे.....

डी.एड., पॉलिटेक्निकल प्रवेशासाठी इन्टेक कॅपॅसिटी आहे. एका वर्गाची प्रवेश क्षमता निश्चित केली आहे. डी.एड.च्या पहिल्या वर्षासाठी 25 विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. परीक्षा परिषद 51 व्या विद्यार्थ्यांचा फॉर्म भरून घेत नाही. आपण नवीन शिक्षण कायद्यानुसार एका तुकडीला 30 ची मान्यता दिली असेल तर 31व्या विद्यार्थ्याचा प्रवेश ग्राह्य धरला जाणार नाही असा कडक निकष जो पर्यंत करणार नाही तो पर्यंत काहीच होणार नाही. इन्टेक कॅपॅसिटी ठरविली तर प्रत्येक शाळांना मुले मिळतील. अशाने सर्व शाळा देखील व्यवस्थित चालतील. काही भागात तर एकाच शाळेत गर्दी होते. आताच येथे सांगितले की, दहा मुलांना देखील 4 शिक्षक आणि 100 मुलांना देखील 4 शिक्षक असतात. म्हणजे यात शासनाचेच नुकसान होते. ज्या प्रमाणे आम्ही मागण्या करतो त्या प्रमाणे शासनाला हिताचे सांगण्याचे देखील काम करतो. कारण शिक्षणाने आम्हाला विचार दिला आहे. चांगल्याला चांगले म्हणणे हा विचार आम्हाला शिक्षणाने दिला आहे. त्यामुळे हा देखील बदल करणे गरजेचे आहे.

मी माननीय मंत्र्यांचे अभिनंदन करणार आहे. त्यांनी कायम शब्द काढला आहे. चांगला निर्णय झाला. परवा माननीय मंत्री म्हणाले की, आम्ही मूल्यांकन सुरू करणार आहोत. 1 एप्रिल पासून परीक्षा सुरू होणार आहेत. आता जर आपण मूल्यांकन सुरू केले तर दोन गोष्टी चांगल्या होतील. आपल्याला विद्यार्थी बघायला मिळतील. परीक्षेसाठी सगळी मुले आलेली असतात. एका महिन्यामध्ये जेवढ्या काही शाळा होतील तेवढयांचे आपण मूल्याकंन करावे. आता लगेच करायचे नसेल तर सगळी तयार करून ठेवावी. ज्या काही समित्या आहेत त्या निश्चित कराव्यात. येणाऱ्या जून-जुलै पासून आपण या शाळांचे मूल्यांकन त्वरित करावे, अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

हे सर्व आपण एका विचाराने करीत आहोत. शिक्षणासाठी करीत आहोत. यात ज्या जाचक अटी आहेत त्याचा देखील आपण गांभीर्याने विचार केला पाहिजे. आपण त्या खात्याचे वजनदार मंत्री आहात. मंत्रिमंडळातील वजनदार मंत्री आहात. आपण घेतलेला निर्णय परत पाठविण्याची किंवा आपल्या निर्णयाला ना म्हणण्याची ताकद या मंत्रिमंडळात आहे असे मला वाटत नाही. तेव्हा ज्या जाचक अटी आहेत त्या दूर करून जून पासून मूल्यांकन सुरू केले पाहिजे अशी विनंती मी या निमित्ताने करीत आहे. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

दोन-तीन महत्त्वाचे प्रश्न आहेत. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची बिनपैशाची मागणी आहे. यात नवीन दायित्व काहीच नाही. जी पदे अगोदर मंजूर झाली आहेत, अर्थसंकल्पात आधीच तरतूद झाली आहे, त्यातूनच आपल्याला पदे भरावयाची आहेत. यासाठी आपल्याला नवीन पदे निर्माण करण्याची कुठलीही गरज नाही. तेव्हा ही जी बिनपैशाची मागणी आहे त्यासंबधी देखील आपण ताबडतोब निर्णय घ्यावा.

12 टक्के वेतनेतर अनुदानाचा प्रश्न आहे. मघाशी सन्माननीय सदस्य म्हणाले की, शिक्षक भरतीसाठी पैसे घेतले जातात. हाताची पाचही बोटे सारखी नसतात. काही संस्था तशा असतीलही. भारत देशात इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र हे एकमेव राज्य आहे की, तेथे खाजगी शिक्षण संस्था आहेत. खाजगी शाळा आहेत. बाकीच्या राज्यांमध्ये शिक्षण हे राज्या तर्फे दिले जाते. शासन जर या सर्व शिक्षण संस्था ताब्यात घ्यायला तयार असेल तर त्या देण्याची आमची तयारी आहे. त्या शिक्षण संस्था शासनाने चालूवन दाखवाव्यात. यासाठी आमची 100 टक्के तयारी आहे. शासन असे करू शकत नाही, याची मला पूर्ण खात्री आहे. याचा अर्थ आम्ही कसेही राबवावे असा नाही. कर्मवीर भाऊराव पाटील यांची रयत शिक्षण संस्था, स्वामी विवेकानंद संस्था अशा किती तरी मोठ्या शैक्षणिक संस्था आहेत की त्या चांगले काम करीत आहेत. सरकार त्यांना काही देत नाही. तरी देखील त्या संस्था गुणवत्ताधारक विद्यार्थी घडविण्याचे काम करीत आहेत. आज गुणवत्ताधारक विद्यार्थी घडविण्याचे काम कोण करीत आहेत याचा गांभीर्याने विचार करणार आहात की नाही. शेवटी याचा विचार शासनालाच करावा लागणार आहे. म्हणून मला असे वाटते की, ज्या शिक्षण संस्था चांगले काम करीत आहेत त्यांना आपण प्रोत्साहन दिले पाहिजे.

मी येथे शेवटचा मुद्दा उपस्थित करणार आहे. कनिष्ठ महाविद्यालयाचे देखील प्रश्न आहेत. महाराष्ट्रात कनिष्ठ महाविद्यालयाचे 45 हजार शिक्षक आहेत. त्यांचा 1.1.1996 पासून वेतनश्रेणी लागू करण्याचा विषय असेल, 42 दिवसांच्या संपाचा विषय असेल हे महत्त्वाचे आहेत. पद मान्यतेचा देखील विषय आहे. त्याला तर तर पैसे द्यायचे नाहीत. पद मान्यता सन 2008-2009 पासून प्रलंबित आहे. ती पद मान्यता आपण दिली पाहिजे. आज कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक देखील अतिरिक्त होत आहेत. त्यांना विद्यार्थी कमी पडत आहेत. ती पट संख्या देखील कमी करण्याचा निर्णय आपण ताबडतोब केला पाहिजे, अशी देखील मागणी मी या निमित्ताने करतो.

अशुधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे....

या सभागृहात वारंवार बोलले जाते की, शिक्षक आमदार उठसूठ वेतनावर बोलतात. आम्ही शिक्षकांचे प्रतिनिधी आहोत. आम्ही त्यांचे आवाज आहोत. मग आम्ही कोणासाठी बोलणार ? आम्ही गुणवत्तेवर बोलत नाही असे नाही.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे . . . .

आज जर आम्ही शिकवत नसतो तर एवढी मोठी-मोठी माणसे महाराष्ट्रामध्ये घडली नसती. आम्ही शिकवितो आणि तुम्ही आम्हाला जरी कंत्राटी वेतन देत असलात तरी याचा अर्थ आम्ही विद्यार्थ्यांना कंत्राटी शिक्षण देतो काय ? तर बिलकूल देत नाही. आमचा एखादा शिक्षक वर्गावर गेला तर तो तेथे तासन्तास शिकवित रहातो. मी सुध्दा शिक्षक म्हणून काम करीत असताना चार-चार तास सलग शिकवले आहे. शेवटी आम्ही ज्या गोष्टीमध्ये लक्ष घातले तर त्याठिकाणी झोकून देऊन, ज्याला डिव्होशन असे म्हणतात त्याप्रमाणे शिक्षण देण्याचे काम आमचे शिक्षक बांधव करीत असतात.

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : आता सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी भाषण सुरु करावे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मी एकाच मिनिटांमध्ये माझा मुद्दा मांडतो. मला असे वाटते की, आमची माननीय मंत्री महोदयांना गुणवत्तेच्या बाबतीत विनंती आहे. जसे कनिष्ठ महाविद्यालयासाठी नॅक आणलेला आहे.तसे तुम्ही शाळांसाठी शॅक आणावा. यापूर्वी आपण शॅक आणू इच्छित होतो, ते आणण्याचे काम सुध्दा आपण करावे. तसेच शाळेचा दर्जा तपासावा. ज्या गुणवत्ताधारक शाळा आहेत, ज्या प्रयत्न करीत आहेत त्या शाळांना आपण विशेष अनुदान देणार आहात काय ? त्यासाठी तुम्ही शॅक आणावा अशी मी या निमित्ताने विनंती करतो आणि मला भाषणासाठी वेळ कमी मिळाल्यामुळे माझे 25 मुद्दे मांडावयाचे राहिले आहेत याचा उल्लेख करुन मी माझे भाषण संपवितो.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी त्यांचे मुद्दे माननीय शिक्षण मंत्र्यांकडे लेखी स्वरुपामध्ये द्यावेत.

. . . .4 एक्स-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, आदरणीय सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोतेसरांनी आज सकाळच्या प्रस्ताविक भाषणामध्ये जवळजवळ 26 मुद्दे मांडले आहेत आणि त्यातील काही मुद्दे राहिले आहेत तेवढ्याच मुद्यांचा मी उल्लेख करु इच्छितो.

सभापती महोदय, सकाळपासून ज्या-ज्या वक्त्यांनी आपली मते मांडली.एखाद-दुसरा अपवाद सोडला तर सर्वांनी शिक्षणाला पोषक अशी मते मांडलेली आहेत. म्हणून त्या मताशी मी सहमत आहे असे माझे दुसरे मत व्यक्त करतो. तिसरे म्हणजे या सगळया व्यतिरिक्त जी मते मांडण्यात आलेली नाही, ती मी येथे मांडणार आहे. त्यातील एक मुद्दा सन्माननीय सदस्यांकडून मांडण्याचा राहून गेला होता आणि तो म्हणजे विषय समित्यांचे कामकाज. आपल्याकडे दोन प्रकारच्या विषय समित्या असतात. एक विषय समिती प्रत्येक शाळेमध्ये असते. प्रत्येक शाळेतील विषय समिती ही चांगल्या प्रकारे सक्रीय काम करते की नाही हे पहाण्याचे काम आमच्या जिल्ह्याच्या शिक्षणाधिकारी यांनी इन्स्पेक्शनच्या वेळेला पाहिले पाहिजे.दुर्दैवाने आमच्या शाळांची इन्स्पेक्शन्स् अलीकडे आमच्या शिक्षण विभागातील अधिकारी करुच शकत नाही. कारण पूर्वी प्रत्येक जिल्ह्यामध्ये 50 शाळा मिळून एक उप शिक्षण अधिकारी असावयाचा. आता 1973 च्या स्टॅपिंग पॅटर्ननुसार आहेत तेवढीच पदे आहेत आणि शाळा मात्र चौपट झाल्या आहेत आणि कामाचे प्रकार एवढे वाढले आहेत की, आमचा शिक्षणाधिकारी शाळेत जाऊ शकत नाही, तेथील इन्स्पेक्शन करु शकत नाही आणि तो तेथे गेला तर थांबू शकत नाही आणि इतर घडामोडीं मुळे त्यांच्यावर इतर कामाचे ताण येतात. म्हणून तेथे ॲकॅडमिक काम होत आहे की नाही हे पाहू शकत नाही. म्हणून शाळेमध्ये असलेल्या सबजेक्ट कमिट्या म्हणजे विषय समित्या आणि ॲकॅडमिक कौन्सिल याचेही काम नीटपणे होते किंवा नाही याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे असा मी पहिला मुद्दा येथे मांडत आहे.

सभापती महोदय, जिल्हा स्तरावर विषय समित्या आहेत हा दुसरा प्रकार आहे. 1986 च्या शैक्षणिक धोरणामध्ये विषय समित्या गठीत कराव्यात, त्यासाठी अनुदान देण्याची तरतूद करणे हे सुध्दा गृहीत धरलेले आहे. पण दुर्दैवाने 1986 पासून अशी परिस्थिती आहे की,एखाद्या-दुसऱ्या जिल्ह्यात जिल्हा स्तरावरील ज्या विषय समित्या आहेत त्यामध्ये एखाद्या ठिकाणी विज्ञानाची समिती चांगली आहे तर कुठे गणिताची समिती चांगली आहे तर कुठे मराठीची समिती चांगली आहे.अशा प्रकारे एखाद्या-दुसऱ्या विषयाची विषय समिती सोडली,बाकी सर्व ठिकाणी मात्र हा कारभार म्हणावा इतका समाधानकारक नाही. कारण तेथे त्या-त्या विषयातील तज्ज्ञ शिक्षक आणि बाह्य मार्गदर्शक

APR/MMP 7.00

श्री.भगवान साळुंखे . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यातून त्या विषयाची गुणवत्ता वाढण्यासाठी विषय समित्या फार आवश्यक आहेत आणि ते व्हावयास पाहिजे पण दुर्दैवाने तसे होत नाही.

सभापती महोदय, मी आज इतर सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे मांडलेले आहेत, ते सोडून दुसऱ्या मुद्यांवर बोलावयाचे ठरविले आहे. आपण राईट टू एज्युकेशन याच्या अंतर्गत सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन ही नवीन मूल्यमापनाची पध्दती आणलेली आहे. यामधील उणीवा सोडल्या तर शास्त्रीय बैठक म्हणाल तर सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन हे संशोधित आहे, योग्य आहे आणि आवश्यक आहे आणि याबाबत लोकप्रतिनिधी या नात्याने मला माझे मत मांडले पाहिजे. यामध्ये दुसरा आयाम आला आहे तो म्हणजे वर्तन-परिवर्तनाधिष्ठीत मूल्यमापन म्हणजे चेंजेस ओरिएंटेड ई-व्हॅल्युएशन असा तो विषय आहे.वर्तन-परिवर्तनाधिष्ठीत मूल्यमापन याबाबत मी नेहमीच एक उदाहरण देतो की, "सत्यमेव जयते" हे भारतीय बोधवाक्य असते आणि खाली मात्र सत्याला सातत्याने पायाखाली चिरडले जाते.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळंखे.....

आमच्याकडे आचार आणि विचार यामध्ये प्रचंड तफावत आहे ही तफावत मिटविण्यासाठी वर्तन परिवर्तनाधिष्ठीत मूल्यमापन हे आपणास शालेय शिक्षणात प्रस्थापित करण्याची ती पध्दत आहे.

सभापती महोदय, श्रेणीदेय मूल्यमापनाचे सुध्दा स्वागत केले पाहिजे. एक मुलगा 90 टक्के मार्क्स मिळवितो तर दुसरा मुलगा 89.50 टक्के मार्क्स मिळवितो. मग अर्ध्या टक्क्यासाठी त्याचे मेडिकलला ॲडमिशन मिळत नाही आणि मग त्याच्यामध्ये न्यूनगंड निर्माण होतो. हे होऊ नये यासाठी या पध्दतीचे स्वागत केले पाहिजे.

सभापती महोदय, मूळ मुद्दा असा की, एससीआयटीने आणि आमच्या प्रशासनातील अधिकाऱ्यांनी सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन आणले. आमच्या सारख्या शिक्षक लोकप्रतिनिधींना बरोबर घेऊन चर्चा करावी असे संचालकांना सांगून देखील कोणीही आम्हाला विश्वासात घेतलेले नाही. आमची सुध्दा 30-35 वर्षे सेवा झालेली आहे. आम्हाला त्यामध्ये काही मते मांडायची आहेत. माझ्या 20-25 वर्षाच्या नोकरीच्या काळात मी स्वत: 50 वेळा रिसर्च केलेले आहे. त्यामुळे मी चांगल्या सूचना देऊ शकतो. दुर्दैवाने आम्हाला कोणी बोलवत नाही. का बोलवत नाही ते मला कळत नाही. तेथे चांगली व्हीगरस चर्चा व्हायला पाहिजे. सातत्यपूर्ण सर्वकष मूल्यमापन झाले पाहिजे. यातील सातत्य व सर्वकष या दोन शब्दांमध्ये खूप अर्थ साठलेला आहे हे आपल्या लक्षात येऊ शकते. दुर्दैवाने या दोन शब्दांना अनुषंगिक कार्यपध्दती आली नाही म्हणून संपूर्ण जनमानसातून एक असंतोष येत आहे. हा असंतोष थांबविण्याची नितांत आवश्यकता आहे आणि त्याचे दोषारोपण माझ्या शिक्षकांवर होत आहे ही माझ्या आणि आपल्या मनाला वेदना करणारी बाब आहे हे मी लक्षात आणून देतो.

सभापती महोदय, आम्ही पांरपारिक पध्दतीचे म्हणजे सकाळी 11.00 ते सांयकाळी 7.00 असे वेळापत्रक मानतो. पण माझ्या शिक्षकाला त्याच्यापेक्षा जास्त काम करावे लागते. शिक्षकांवर तीन प्रकारची कामे निर्धारित आहेत. एक अध्यापनपूर्व काम, दुसरे अध्यापनाचे काम आणि तिसरे शिकवल्यानंतरचे काम म्हणजे गृहपाठ, घटक चाचण्यांचे पेपर्स तपासणे इत्यादी. अध्यापनपूर्व कामाचे चार पैलू आहेत. दुर्दैवाने स्वातंत्र्यपूर्व पासून ते काम गृहीत धरले आहे पण आजही

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळंखे.....

आमच्या एसएस कोडमध्ये, सेवा शर्तीमध्ये आणि बदललेल्या नियमावलीमध्ये कुठेही ते काम मोजले जात नाही. ते काम म्हणजे वाचन यामध्ये मग संदर्भ ग्रंथाचे वाचन असेल, पाठ्पुस्तकांचे वाचन असेल, टाचण काढण्याचा विषय असेल, टिचिंग साहित्य करण्याचा विषय असेल, या सर्व कामांचे कुठेही मोजमाप करण्यात येत नाही. मी अत्यंत नम्रपणे एक गोष्ट शासनाच्या नजरेस आणून देऊ इच्छितो की, कितीही कामचुकार शिक्षक असेल त्याला यासाठी कमीत कमी एकतास तरी राबावे लागते. प्रामाणिकपणे काम करणाऱ्या शिक्षकाला कमीत कमी दोन तास राबावे लागते. तेव्हा कार्यभारामध्ये अध्यापनपूर्व काम धरण्याची नितांत आवश्यकता आहे. ते दुर्दैवाने धरले जात नाही. हा मुद्दा मी लक्षात आणून देऊ इच्छितो. सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन अंतर्गत मूल्य मापनाच्या पध्दती बदलल्या,मूल्यमापनाची वारंवारिता वाढली, फ्रिक्वेन्सी वाढली, वर्गात 50- 100 विद्यार्थी असले तरी शिक्षक त्यांना टाळू शकत नाही. विद्यार्थी संख्येमुळे पूर्ण अंशाने त्यांना न्याय देऊ शकत नाही, परंतु त्यांना काही ना काही काम करावेच लागते. हे ही काम कुठेतरी मोजले पाहिजे असा मी मुद्दा मांडतो.

सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा मांडतो. विद्यार्थी केंद्रीत दृष्टीकोन ठेवून त्या अनुषंगिक गोष्टींवर चर्चा व्हायला पाहिजे. खूप बोलता येण्यासारखे आहे परंतु वेळ कमी असल्यामुळे येथे थांबून माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, आपण इतक्या महत्वाच्या प्रश्नावर येथे चर्चा घडवून आणली. परंतु ही चर्चा सकाळी 10.00 वाजता ठेवण्यात आली. त्यावेळी सभागृहात जास्त उपस्थिती नसते आणि रात्री उशिरापर्यंत कोणी थांबत नाही. सभागृहात जास्त उपस्थिती असते त्यावेळेत या विषयावर चर्चा झाली पाहिजे. आपण इतका महत्वाचा विषय असा गुंडाळून टाकत आहोत त्याबद्दल मी प्रथम खेद व्यक्त करते. कारण मुलांच्या उज्ज्वल भविष्याचा हा विषय आहे.

यानंतर कुमारी थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण.....

संबंध महाराष्ट्रामध्ये शिक्षणाचे बाजारीकरण झालेले आहे, खाजगी करण झालले आहे. शिक्षणामध्ये प्रचंड भ्रष्टाचार वाढलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्र 13 व्या क्रमांकावर गेलेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. मेटे यांनी या ठिकाणी सांगितले की, शिक्षण क्षेत्रामध्ये नोकरीसाठी पंधरा ते वीस लाख रुपये दिले जातात. त्याचप्रमाणे एन.ओ.सी.साठी एक-एक लाख रुपये घेतले जातात. शिक्षणाची अवस्था काय झालेली आहे? फुले, शाहू आणि आंबेडकर यांचे नाव घेण्यात येते. रवींद्रनाथ टागोर, साने गुरुजी यांच्या शिक्षणाचा दृष्टिकोन काय होता, सावित्रीबाईंनी महिलांना शिक्षण मिळण्यासाठी अनेक कष्ट घेतले. आज ज्या स्त्रिया शिक्षण क्षेत्रामध्ये नोकरी करीत आहेत त्यांना केवळ पैसेच द्यावे लागत नाहीत तर त्यांचे इतरही शोषण केले जाते हे सर्व मुद्दे अत्यंत महत्वाचे आहेत. अशा महत्वाच्या विषयावर या सभागृहात चर्चा चालू असताना माझ्या आधीच्या वक्त्यांनी सांगितल्याप्रमाणे मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, ग्राम विकास मंत्री, अर्थ मंत्री सभागृहात उपस्थित पाहिजेत आणि त्यांच्यासमोर ही चर्चा झाली पाहिजे,त्यातून काही तरी निष्पन्न झाले पाहिजे. एकटे माननीय शिक्षण मंत्री या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांनी बरेच टिपण लिहून घेतलेले आहेत आणि या चर्चेला ते उद्या उत्तर देणार आहेत.

सभापती महोदय, या महत्वाच्या विषयावर अनेक सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्याची पुनरावृत्ती मी करणार नाही. पण पालक या नात्याने अनेक समस्या शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेल्या आहेत.शिक्षणाचे खाजगीकरण झालेले आहे त्यामुळे पालकांना अनेक प्रश्नांना तोंड द्यावे लागत आहे म्हणून या विषयावर देखील या सभागृहात चर्चा होण्याची गरज आहे. शिक्षण क्षेत्रामध्ये नोकऱ्यांच्या समस्या आहेत. मी पाच-सात वर्षापूर्वी विदर्भात गेले होते त्यावेळी पाच ते सहा लाख रुपये नोकरीचा दर होता तो आज वीस लाख रुपयापर्यंत पोहचलेला आहे. महाराष्ट्रा सारख्या राज्यामध्ये शिक्षणक्षेत्रामध्ये बजबजपुरी माजलेली आहे. मी मुंबईमध्ये अनेक छात्र भारतीच्या विद्यार्थ्यांबरोबर काम करीत होते त्यामुळे रात्र शाळेचे प्रश्न, तेथे येणारे शिक्षक, तेथे येणारे विद्यार्थी यांचा दर्जा वाढविण्याची आवश्यकता आहे. मुंबई महानरपालिकांच्या शाळांची आज अतिशय दुर्दशा झालेली आहे. कोटवधी रुपये या शाळांच्या दुरुस्तीवर खर्च केले जातात पण प्रत्यक्ष दुरुस्ती होत नाही. त्या शाळा पुन्हा चालू करण्याच्या दृष्टीने ठोस प्रयत्न केले

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

श्रीमती विद्या चव्हाण....

जात नाहीत. अशा प्रकारे शिक्षण क्षेत्रातील हे सर्व विषय अत्यंत महत्वाचे आहेत परंतु या रिकाम्या सभागृहात ते मांडणे मला उचित वाटत नाही. मला या ठिकाणी विनंती करावयाची आहे की, पाच आठवडयांचे हे अधिवेशन आहे. आतापर्यंत दोन आठवडे संपलेले आहेत. अजून तीन आठवडे शिल्लक आहेत. तेव्हा माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री व इतर सर्व मंत्री महोदयांच्या उपस्थितीत ही चर्चा पुन्हा घेण्यात यावी. तसेच आज ज्या सन्माननीय सदस्यांची भाषणे झालेली आहेत ती सर्व भाषणे संबंधिताकडे पाठविण्यात यावीत आणि त्यांनी या संदर्भात ठोस निर्णय घ्यावेत अशा प्रकारची सूचना मी या ठिकाणी करते. सर्व माननीय मंत्री महोदयांनी या विषयासाठी वेळ दिला पाहिजे आणि याकडे लक्ष दिले पाहिजे अशी विंनती मला या ठिकाणी करावयाची आहे.

सभापती महोदय, थोडया वेळापूर्वी या सभागृहात मागणी करण्यात आली की, सर्व खाजगी शाळा शासकीय करण्यात याव्यात आणि पुन्हा एकदा या शाळा कशा पध्दतीने चांगल्या करता येतील याकडे लक्ष द्यावे. ही अत्यंत महत्वाची सूचना आहे. तसेच या विषयावर पुन्हा चर्चा होणार असेल तर ती मघल्या वेळात जेव्हा सभागृह पूर्ण भरलले असेल त्यावेळी व्हावी. जेणेकरुन सर्व सन्माननीय सदस्य यावर आपले विचार मांडू शकतील. अन्यथा या सभागृहात आता केवळ चार सन्माननीय सदस्य बसलेले आहेत आणि भाषणे सुरु आहेत हे योग्य वाटत नाही. तेव्हा या सर्व मुद्यांचा विचार झाला पाहिजे आणि याची दखल माननीय मुख्यमंत्र्यांपासून सर्व मंत्री महोदयांनी घेतली पाहिजे कारण हा शेवटी मुलांच्या भविष्याचा प्रश्न आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, बीड संबंधी एक निवेदन माननीय गृह मंत्री आजचे सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी करणार होते. या संदर्भात या सभागृहात काल स्पेसिफिक विषय मांडण्यात आला होता. माननीय गृहमंत्री आज या सभागृहात येऊन गेले पण सदर निवेदन अद्याप इ ालेले नाही. एका पोलिसाला मारहाण करुन त्याचा मृत्यू झालेला आहे तरी देखील कलम 302 ची केस दाखल होत नाही अशी त्याच्या मुलाची तक्रार आहे. जिल्हा परिषदेच्या माजी सदस्याबरोबर भांडणे आणि मारामाऱ्या होतात तेव्हा यासंबंधीचे निवेदन झाले पाहिजे.

यानंतर श्री. बरवड....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

तालिका सभापती (श्री. विनायक मेटे) : माननीय मंत्री महोदय श्री. राजेंद्र दर्डा यांना मी सांगू इच्छितो की, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो महत्वाचा आहे. काल या सभागृहामध्ये माननीय विरोधी पक्ष नेते तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जो मुद्दा उपस्थित केला होता त्यावेळी शासनातर्फे असे सांगण्यात आले होते की, त्या संदर्भात आज संध्याकाळपर्यंत निवेदन करण्यात येईल. आता सभागृहाची वेळ संपत आलेली आहे तरीही ते निवेदन आलेले नाही, ही गोष्ट बरोबर नाही. आपण सरकारच्या वतीने किमान सोमवारी तरी ते निवेदन करण्यास सांगावे.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सोमवारी निश्चितपणे निवेदन करण्यात येईल.

तालिका सभापती : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सोमवार, दिनांक 2 एप्रिल, 2012 रोजी सकाळी 10.00 ते 11.30 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक होईल. या बैठकीत गुरुवार, दिनांक 29 मार्च, 2012 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या सत्ताधारी पक्षाच्या प्रस्तावावर चर्चा होईल. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.45 वाजता भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 7 वाजून 16 मिनिटांनी सोमवार, दिनांक 2 एप्रिल, 2012 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही